**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. कॅबिनेट मंत्री सभागृहात येणार नसतील तर सभागृहाचे कामकाज थांबवावयाचे की सुरु ठेवावयाचे ? नाही तर माननीय राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांना कॅबिनेट मंत्री करा.

श्री. दिवाकर रावते : त्यांना दहा मिनिटांची शिक्षा द्यावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, एक तर अधिवेशन लवकर संपवावयाचे आणि जे कामकाज आहे ते नीट करावयाचे नाही, हे बरोबर नाही. शासनाला गांभीर्य नाही. आमची बिले पास करा असे म्हणतात. आम्ही सरकारला मदत कशी करावयाची ?

**सभापती** : मी पाच मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 11.01 ते 11.06 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचा वेळ वाया जाणार नाही याची शासनाने पूर्ण काळजी घेतली पाहिजे आणि शासनाचे ते कर्तव्य आहे. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचा 5 मिनिटांचा वेळ वाया गेला आहे असे मी म्हटले तर ते वावगे ठरु नये. सन्माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांना मी सांगू इच्छितो की, आपण सभागृहामध्ये दिलगिरी व्यक्त करावी. आपले ते कर्तव्य आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी दिलगिरी व्यक्त करीत आहे.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सेवा निवृत्त झालेल्या अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना डिमट्रेन्ड समजून निवृत्ती वेतनाचा लाभ देण्याबाबत**

**(१) * ३१३२४ श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २५३३२ ला दिनांक १९ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३० जून, १९७२ नंतर सेवेत आलेल्या व २५-३० वर्षे सेवा करुन प्राथमिक शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या अप्रशिक्षित शिक्षकांना शासनाकडून पेन्शन मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गटात मोडणाऱ्या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन देण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन असल्याचे उत्तर दिनांक १९ मार्च, २०१२ रोजी देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या विचाराधीन विषयाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) या शिक्षकांना पेन्शन मिळण्याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिलेल्या निवेदनावर शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) अद्यापी प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक प्रशिक्षित शिक्षकांच्या संदर्भात मी प्रश्न विचारला होता. दिनांक 30.6.1972 नंतर सेवेमध्ये आलेले आणि 25-30 वर्षे सेवा केल्यानंतर निवृत्त झालेल्या शिक्षकांना निवृत्तीवेतन मिळत नाही ही वस्तुस्थिती शासनाने मान्य केलेली आहे. ते शिक्षक प्रशिक्षित नव्हते हे एक कारण दिलेले आहे. या संदर्भात शासनाने दिनांक 4.10.1983 रोजी एक जी.आर.निर्गमित केला होता. त्या जी.आर.नुसार दिनांक 30.6.1972 पर्यंतच्या शिक्षकांना प्रशिक्षित समजण्यात आले आहे. दिनांक 1.7.1972 नंतर सेवेत आलेल्या शिक्षकांना अप्रशिक्षित समजण्यात आले आहे. 1986 पर्यंत प्रशिक्षित झाले नाहीत तर त्यांच्या सेवा समाप्त करावयाच्या होत्या. पण त्यांच्या सेवा सुरु ठेवल्या होत्या. त्या शिक्षकांनी 25 वर्षे काम केल्यानंतर हे निवृत्त झाले आहेत. या शिक्षकांना पेन्शन मिळत नसल्यामुळे शासनाने त्यांना जीवन जगण्याचा अधिकार दिलेला नाही. जे दि.1.7.72 नंतर सेवेमध्ये.....

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

ता.प्र.क्र.31324....                                        श्री.रामनाथ मोते....

आले आणि नियत वयोमानाप्रमाणे निवृत्त झाले. या सर्व शिक्षकांना निवृत्तीवेतन दिले जाणार आहे काय ? मी मागील वेळी आणि यावेळी विचारलेल्या प्रश्नांना हा विषय विचाराधीन आहे असे उत्तर दिलेले आहे. शासन केव्हा विचार करणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, 1972 पूर्वी राज्यातील शाळांची संख्या कमी होती. दोन शाळांमधील अंतर जास्त होते. त्यावेळी प्रशिक्षणाची सुविधाही जास्त प्रमाणात उपलब्ध नव्हती. त्यामुळे अप्रशिक्षित शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. या अप्रशिक्षित शिक्षकांना 1986 पर्यंत प्रशिक्षित होण्यासाठी मुदत देण्यात आली होती. या कालावधीपर्यंत ते प्रशिक्षित झाले नसल्यामुळे त्यांना डिमट्रेन्ड ठरविण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. ज्या शिक्षकांच्या नेमणुका 1972 नंतर झाल्या होत्या त्यावेळी त्यांनी 5 वर्षात प्रशिक्षित व्हावे अशी अट घालण्यात आली होती. त्यावेळी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध होती. त्यांना प्रशिक्षण घेण्याची मुभाही देण्यात आली होती. परंतु त्या कालावधीत ते शिक्षक प्रशिक्षित झाले नाही. या संदर्भात शासनाकडे अनेकदा प्रस्ताव आला होता. परंतु शासनाने त्या प्रस्तावाबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याचे दिसत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क. 31324.... प्रा. फौजिया खान...

उलट या शिक्षकांना संधी देऊनही ते प्रशिक्षित झाले नाहीत. या शिक्षकांच्या बाबतीत असा शब्दप्रयोग करण्यात आला की ते आळसी, निरुत्साही, विकासाकडे दुर्लक्ष करणारे आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा संधी देणे चुकीचे होईल अशा पध्दतीची भूमिका शासनाने घेतलेली आहे. आता पुन्हा मागणी झालेली असून पुन्हा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. परंतु या बाबतीत शासन सकारात्मक भूमिका घेईल असे वाटत नाही.

डॉ.अपूर्व हिरे : या अप्रशिक्षित शिक्षकांनी ट्रेनिंग घेतले नाही असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. जेव्हा 5 वर्षामध्ये हे शिक्षक प्रशिक्षित झाले नाहीत त्यावेळी त्यांना, आपली सेवा समाप्त का करण्यात येऊ नये, आपल्याला सेवेमध्ये का ठेवावे, अशा प्रकारची नोटीस देण्यात आलेली होती काय ? तशी नोटीस त्यांना का देण्यात आली नाही ?

प्रा. फौजिया खान : त्या शिक्षकांना अप्रशिक्षित वेतनश्रेणीवर ठेवण्यात आलेले आहे आणि हीच सहानुभूती त्यांच्या बाबतीत दाखविण्यात आलेली आहे. ते प्रशिक्षित झाले नव्हते तरी देखील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात आली नाही. त्यांना अप्रशिक्षित म्हणून सेवेत ठेवण्यात आले. त्यांना डीमट्रेण्ड करणे योग्य वाटत नाही. हा प्रस्ताव जरी शासनाच्या विचाराधीन असला तरी सभागृहानेच या बाबतीत विचार करावा. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांनी प्रशिक्षित झाले पाहिजे आणि तसे ते झाले नसल्यामुळे त्यांना प्रशिक्षित शिक्षकांप्रमाणे फायदा देणे योग्य नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : अशा अप्रशिक्षित शिक्षकांची संख्या किती आहे, त्यांना पेन्शन दिल्यामुळे शासनाला किती आर्थिक भार सोसावा लागणार आहे ?

प्रा. फौजिया खान : या अप्रशिक्षित शिक्षकांची संख्या 1628 इतकी आहे. त्यामधील 392 शिक्षक निवृत्त झालेले आहेत. सध्या 1236 शिक्षक सेवेमध्ये आहेत. या शिक्षकांना पेन्शन देण्याची भूमिका शासनाने घेतली तर 20 कोटी रु.चा आर्थिक भार शासनावर पडेल.

श्री. भगवान साळुंखे : प्राथमिक शाळेमध्ये घेतलेल्या अनट्रेण्ड शिक्षकाना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी शासनाने तेव्हाही घेतलेली होती आणि आताही घेतलेली आहे. अशा शिक्षकांना पोस्टल डीएड करणे किंवा त्यांना डेप्युटेशनवर सोडणे असे केले असते तर ते प्रशिक्षित झाले असते. शासनाने त्या बॅचला तशी संधी दिली नाही हा त्यांच्यावर अन्याय आहे. म्हणून या बाबतीत फेरविचार करुन शासन त्यांना पेन्शन लागू करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31324....

प्रा. फौजिया खान : या शिक्षकांना शासनाने पूर्ण संधी दिलेली होती. करस्पॉण्डन्स कोर्सने त्यांना प्रशिक्षित व्हायचे होते. प्रशिक्षित होण्याची जबाबदारी ही शिक्षकांची होती.ते आयुष्यभर प्रशिक्षित झालेले नाहीत.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, आता तुम्हीच आम्हाला न्याय देऊ शकता. माननीय मंत्री महोदयांनी शिक्षक आळसी, निरुत्साही आहेत असा शब्द प्रयोग केला. असा शब्दप्रयोग ते शिक्षकांच्या बाबतीत का करीत आहेत ? जेव्हा कोणी मिळत नव्हते त्यावेळी या शिक्षकांना सेवेमध्ये घेतले. त्यांनी 60 वर्षे सेवा केली. त्यांना प्रशिक्षण देण्याची शासनाची जबाबदारी असताना ते प्रशिक्षण शासनाने दिले नाही. त्यामुळे यामध्ये त्या शिक्षकांचा कोणताही दोष नाही. तेव्हा माननीय सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत आपण आम्हाला संरक्षण द्यावे. या 1628 शिक्षकांना पेन्शन मिळाले नाही तर त्यांचे संसार उद्ध्वस्त होतील, त्यांच्यामध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण होईल. म्हणून माननीय सभापती महोदय, या शिक्षकांना पेन्शन देण्यासंबंधी आपण शासनाला निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31324...

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने त्यावेळी कॉन्शस डिसीजन घेतला होता. शासनाकडून सर्व सुविधा उपलब्ध असताना ज्या शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले नाही आणि वारंवार सांगूनही ते प्रशिक्षित झाले नाहीत अशा शिक्षकांना डिमट्रेन्ड करणे योग्य होणार नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी येथे सांगितले की, या संदर्भात सभागृहानेच ठरवावे. ते शिक्षक सेवानिवृत्त झालेले आहेत आणि त्यांनी सेवा पूर्ण केलेली आहे. ते शिक्षक क्वॉलिफाईड नव्हते तर त्यांना त्याच वेळी कामावरुन कमी करावयास पाहिजे होते. शासन त्यांच्या कर्तव्याला चुकले आहे. आता ते निवृत्त झाल्यावर त्यांना निवृत्ती वेतन मिळणार नाही असे सांगत आहात, हे बरोबर नाही. त्यांच्या निवृत्ती वेतनासाठी 20 कोटी रुपये खर्च येणार आहे आणि ही फार मोठी रक्कम नाही. तेव्हा सभागृहाचा कौल लक्षात घेऊन सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकांना निवृत्ती वेतन देण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. मी जी सुरुवातीला भूमिका मांडली तीच भूमिका आताही आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मला योग्य वाटत नाही. ते सर्व जुने शिक्षक आहेत. यातील काही शिक्षक व्हर्नाक्युलर फायनल आहेत, एस.एस.सी. आहेत. त्यांनी ट्रेनिंग घेतले नाही म्हणून शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला. दिनांक 4 ऑक्टोबर 1983 च्या शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, 1 जून 1986 नंतर जे शिक्षक प्रशिक्षित झाले नाही तर त्यांना सेवेतून कमी करण्यात यावे. जुन्या अटींमध्ये गणित आहे तर इंग्रजी नाही, इंग्रजी आहे तर गणित नाही अशा पध्दतीमुळे ते प्रशिक्षित होऊ शकले नाहीत. शासनाने या शिक्षकांच्या 58 वर्षापर्यंत सेवा घेतलेल्या आहेत. तेव्हा सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकांना निवृत्ती वेतन देण्याच्या संदर्भात सकारात्मक आणि मानवतेच्या दृष्टीकोनातून शासन विचार करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

ता.प्र.क्र.31324...

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, राज्यात सुविधा नसताना त्या शिक्षकांच्या बाबतीत शासनाने सहानुभूतीपूर्वक भूमिका घेतली. त्यांच्यासाठी सुविधा निर्माण करण्यात आली आणि.... .

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी शासनाला आवश्यकता होती आणि प्रशिक्षित शिक्षक मिळणे शक्य नव्हते त्यावेळी या प्रशिक्षित नसलेल्या शिक्षकांना विशेषत: डोंगरी भागात, आदिवासी भागात आपण नेमले. दरम्यानच्या काळात काही अटींवर डिमट्रेन्डची व्यवस्था केली. जे शिक्षक अटी पूर्ण करु शकले नाहीत त्यांना सेवेत तसेच ठेवले. तेव्हा मानवतेच्या दृष्टीकोनातून हा प्रश्न सोडविता येईल असे पहावे अशी सर्व सन्माननीय सदस्यांची भावना आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने या बाबतीत कॉन्शस डिसीजन घेतला होता.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी सभापती या नात्याने आपणास कोणताही आदेश देणार नाही. माझी अशी भावना आहे की, ज्या वेळेला शिक्षण विभागामध्ये प्रशिक्षित प्राथमिक शिक्षक उपलब्ध होत नव्हते त्यावेळी या शिक्षकांना आपण प्राथमिक शिक्षक म्हणून घेतले. दरम्यानच्या काळामध्ये डिमट्रेन्ड अशा पध्दतीची सुविधा तयार केली. त्या बाबतीत काही अटी घातल्या. त्यांचा गणित हा विषय असला पाहिजे वगैरे अशा ज्या काही अटी होत्या त्या त्यांनी पूर्ण केल्या नाहीत तरीही त्यांना सेवेतून न काढता सेवेमध्ये कंटीन्यू केले. दरम्यानच्या काळात ते सेवा निवृत्त झाले. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या निवृत्ती वेतनासाठी 20 कोटी रुपये खर्च असल्याचे सांगितले. मला असे वाटते की, ज्या शिक्षकांनी ज्ञानदानाचे काम केलेले आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31324...

सभापती...

त्या शिक्षकांना न्याय देण्याच्या दृष्टीने तसेच माणुसकीच्या भावनेने हा विषय घेऊन पुन्हा आपला विभाग मंत्रिमंडळासमोर जाईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, होय.

----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील शिक्षण विभागातील शिक्षकांनी अपंग असल्याचे खोटे प्रमाणपत्र**

**सादर करुन अनेक योजनांचा लाभ घेत असल्याबाबत**

**(२) * ३०८०६ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण विभागातील हजारो शिक्षक अपंग असल्याची खोटी प्रमाणपत्रे शासनाला सादर करुन कोटयवधी रुपयांच्या योजनांचा लाभ घेत असल्याचे माहे मे, २०१२ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अपंग असल्याची खोटी प्रमाणपत्रे शासनाला सादर करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, अपंगाचे दाखले ससून रुग्णालयाने दिलेले आहे. शिक्षण विभागातील शिक्षकांनी अपंग असल्याचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन अनेक योजनांचा लाभ घेतलेला आहे अशा लोकांची यादी आपणाकडे दिली तर त्या बाबतीत शासनाकडून कोणत्या प्रकारची कारवाई केली जाणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत ब्रिफींग घेत असताना माझ्या समोर फक्त एकाच जिल्हयाची आकडेवारी आलेली आहे. अहमदनगर जिल्हयामध्ये लक्षात आले आहे की, २७२ शिक्षकांनी अपंग असल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यातील ७४ प्रमाणपत्रे खरी होती आणि ७४ प्रमाणपत्रे खोटी असल्याचे आढळून आले आहे. माझ्याकडे एकाच जिल्हयाची आकडेवारी आल्यामुळे मला असे वाटते की, या बाबतीत संपूर्ण राज्यात सखोल चौकशी करणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे शिक्षण संचालकांना आदेशित करण्यात आले आहे.

( गोंधळ )

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.३०८०६....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचे ब्रिफींग घेत असताना एकाच जिल्हयाची माहिती प्राप्त झाली अशी सन्माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी माहिती दिली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी व्यापक प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी संपूर्ण राज्या बाबतची माहिती विचारली आहे. त्यामुळे राज्यातील या बाबतची माहिती गोळा करणे बंधनकारक आहे. संपूर्ण माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे हा प्रश्न कृपया राखून ठेवावा.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, संपूर्ण राज्याची माहिती प्राप्त झालेली नाही ही गोष्ट मला मान्य आहे. संपूर्ण माहिती गोळा करण्यासंबंधी शिक्षण संचालकांना आदेश देण्यात आलेले आहेत. सभापती महोदय, माहिती अप्राप्त असल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे. या प्रश्नावर नंतर चर्चा ठेवण्यात यावी अशीही माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माननीय मंत्री महोदय, आपणास प्रश्नाची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ४० दिवसांचा अवधी असतो. विचारलेल्या प्रश्नाची सविस्तर माहिती संकलित व्हावी आणि संकलित झालेली माहिती लेखी उत्तराच्या स्वरुपात सभागृहासमोर यावी, यासाठी ४० दिवसांचा अवधी दिलेला आहे. आपण प्रश्न क्रमांक १ ला हे खरे नाही असे उत्तर दिलेले आहे. आपण तोंडी उत्तर दिले, त्यात अहमदनगर जिल्हयाची माहिती या ठिकाणी दिली. देण्यात आलेली ७४ प्रमाणपत्रे खरी आहेत आणि ७४ प्रमाणपत्रे खोटी असल्याचे आढळून आली आहेत असे आपण तोंडी उत्तरात सांगितले आहे. या प्रश्नाची पूर्णपणे माहिती आलेली नसल्यामुळे हा प्रश्न मी राखून ठेवतो.

-------------

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील शाळेत झालेल्या पटपडताळणीमध्ये बोगस विद्यार्थी दाखवून कोट्यवधी रुपयांचा केलेला गैरव्यवहार

**(३) * ३०११६ श्री.रमेश शेंडगे , श्री.अनिल भोसले , श्री.दिपकराव साळुंखे , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.किरण पावसकर , श्री.हेमंत टकले , ॲड. उषाताई दराडे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्रीमती अलका देसाई , डॉ.सुधीर तांबे , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.राजन तेली , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.विनायकराव मेटे , श्री.विक्रम काळे , श्री.नागो पुंडलिक गाणार , डॉ.रणजित पाटील , श्री.अरुण गुजराथी , श्री.प्रकाश बिनसाळे , डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांची दिनांक ३ ते ५ ऑक्टोबर, २०११ च्या दरम्यान राबविण्यात आलेल्या पटपडताळणीमध्ये २ हजार ५५९ शाळांनी बोगस विद्यार्थी दाखवून कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे तसेच २ हजार ९२८ शाळांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी गैरहजर असल्याचे माहे एप्रिल, २०१२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस विद्यार्थी दाखवून अनुदान घेणाऱ्या शाळांवर तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व शासनाने मान्यता रद्द केलेल्या शाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नोकरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) पटपडताळणीमध्ये दोषी आढळलेल्या शाळांवर व संबंधितांवर कारवाई करण्याबाबत दिनांक २ मे, २०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये बोगस पटसंख्या दाखवून जवळ जवळ दोन ते अडीच हजार शाळांनी राज्य शासनाची फसवणूक केलेली आहे ही बाब मागील काही दिवसांपूर्वीच शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. ज्या शाळांनी बोगस पटसंख्या दाखविली आहे,

५...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३०११६....

श्री.रमेश शेंडगे...

त्या शाळा संचालकांवर काय कारवाई केलेली आहे ? दिनांक २ मे, २०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे, तर शासन निर्णय कशा संदर्भातील आहे, या अनुषंगाने संबंधितांवर कशा पध्दतीची कारवाई शासन करणार आहे ? कारवाईचा अहवाल कधी प्राप्त होणार प्राप्त होणार आहे व तो सभागृहात कधी सादर करण्यात येणार आहे?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30116.....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, 3 ऑक्टोबर ते 5 ऑक्टोबर, 2011 या कालावधीत राज्यात शाळांची विशेष पटपडताळणी मोहीम घेण्यात आली होती. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली या कामासाठी पथक निर्माण करुन चांगल्या पध्दतीने सर्व शाळांची पटपडताळणी करण्यात आली. त्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती आणि त्या समितीने या सर्व पटपडताळणी मोहीमेचा अभ्यास करुन शासनाला आपला अहवाल आणि शिफारशी सादर केल्या होत्या. त्या शिफारशी मंत्रिमंडळाने मान्य केल्या. यातील मुख्य शिफारशींप्रमाणे ज्या शाळांची अनुपस्थिती 20 टक्क्यांपेक्षा कमी आलेली आहे त्या शाळांवर शासनाने कारवाई करण्याची शिफारस समितीकडून आलेली नव्हती. ज्या शाळांतील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती 20 ते 50 टक्के आहे त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याची शिफारस समितीने केली होती. त्याचप्रमाणे ज्या शाळातील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती 50 टक्केपेक्षा अधिक आहे त्या शाळांच्या संस्थाचालकांवर गुन्हे दाखल करावेत आणि तेथील जे शिक्षक आहेत त्यांना सेवेतून काढून टाकावे अशा प्रकारची शिफारस होती. या शिफारशींच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

सभापती महोदय, यानंतर 100 पेक्षा जास्त शाळांचे संस्थाचालक कोर्टात गेले. कोर्टाने अंतरिम आदेश दिले. त्यानुसार शिक्षकांना सेवेतून काढून टाकणे आणि संस्था चालकांवर गुन्हे दाखल करणे या बाबी वगळून कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार 4 जुलै, 2012 रोजी सुधारित परिपत्रक काढण्यात आले. शाळांना शो-कॉज नोटीस देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली फॅक्ट फाईंडींग कमिटीने डेटा एन्ट्रीमध्ये चूक झाली आहे काय हे व्हेरीफाय करावयाचे आहे. ज्या शाळांना कारणे दाखवा नोटीस द्यावयाची आहे त्याबाबतीत कायदेशीर सल्ला घेऊन कारवाई करावयाची आहे. मूळ कागदपत्रांचे स्कॅनिंग करुन ठेवण्याचे काम समितीला देण्यात आलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली परिपत्रक काढण्यात आले. अंतरिम आदेशानुसार हे प्रकरण न्यायालयात असल्यामुळे ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, न्यायालय अशा प्रकारे निर्णय देते याचा निषेध करावयास पाहिजे. गुन्हे दाखल करु नका किंवा शिक्षकांना सेवेतून काढून टाकू नका असे निर्णय न्यायालय कसे काय देऊ शकते ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30116

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत अशा प्रकारची कारवाई शासनाला करता येणार नाही.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, शाळांच्या पटपडताळणीसाठी राज्यामध्ये फार मोठे अभियान राबविले गेले. यासाठी खूप वेळ लागला असून अजूनही या पटपडताळणीबाबत संदिग्धता आहे. अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे भरण्यास शासन परवानगी देत नाही. शिक्षक कमी असल्यामुळे शिकविण्याच्या कामकाजामध्ये अडथळा निर्माण झाला आहे. पटपडताळणीमुळे 6 महिने पदे रिक्त राहणार आहेत. ज्याप्रमाणे रयत शिक्षण संस्थेला पदे भरण्यासाठी परवानगी दिली त्याचप्रमाणे इतर शिक्षण संस्थांना शिक्षकांची पदे भरण्यासाठी शासन परवानगी देणार काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, पटपडताळणीनंतर जे शिक्षक अतिरिक्त म्हणजे सरप्लस ठरणार आहेत त्यांच्याबाबत निर्णय घेण्यासाठी संचालक(शिक्षण) यांना अभ्यास करण्यास सांगण्यात आलेले आहे. एक महिन्याच्या आत याबाबतचा अहवाल येईल अशी अपेक्षा आहे. विधानसभेमध्ये देखील मी तसे सांगितले आहे. माननीय सदस्यांनी रयत शिक्षण संस्थेला पदे भरण्यास परवानगी दिली तशी इतर संस्थांना देण्यात येईल काय असा प्रश्न विचारला आहे. ज्या संस्थांनी 2 मे पूर्वी शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या असतील त्या संस्थांच्या बाबतीत अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, न्यायालयाने पटपडताळणी संदर्भात घेतलेल्या निर्णयाच्या बाबतीत जो निकाल दिला आहे त्याविरुध्द शासनाने अपिल केले आहे काय ? असे असताना सुध्दा अजूनही 8 हजार तुकडया वाढवून मिळाव्यात म्हणून संस्थाचालकांनी अर्ज केलेले आहेत. याबाबतीत शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतला आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30116.......

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टामध्ये अपील करण्यात आले आहे. सुप्रीम कोर्टामध्ये शासनाने प्रभावीपणे आपले म्हणणे मांडले आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, शासन एका चांगल्या पध्दतीने या यंत्रणेवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करीत होते. पट पडताळणी हा अतिशय चांगला उपक्रम होता. त्यातून काही अनैतिक बाबी बाहेर आल्या. या उपक्रमामुळे काही लोक न्यायालयात जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. हे लक्षात घेऊन शासनाने स्वत:हून कॅव्हेट दाखल केले होते का? शासनाचे म्हणणे ऐकून न घेता न्यायालयाने स्थगिती देण्याचा निर्णय घेतलेला नाही. शासनाचे या स्थगितीमुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. हे नुकसान थांबविण्यासाठी तातडीची गोष्ट म्हणून कॅव्हेट दाखल केले होते का?

प्रा.फौजिया खान : नाही. सुप्रीम कोर्टामध्ये शासनाने अपील केलेले नाही. हायकोर्टामध्ये प्रभावीपणे भूमिका मांडली. हायकोर्टाचा जो निर्णय आहे तो मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखविते: "(i) We direct that the Members of the Management and the Headmasters of the schools shall not be prosecuted only on the ground that more than 50% of the students in the school were found to be absent. We however, make it very clear that if, according to the State Government and authorities, the members of the Management and Headmasters are liable to be prosecuted on any other ground, the Government/concerned authorities can set the criminal law in motion and prosecute the persons concerned..." आणि शो कॉज नोटिसेस दिलेल्या आहेत तो नंतरचा भाग आहे. "(ii)Even if the show cause notices are issued to the Management for withdrawal of the recognition in accordance with clause No. 1.4 of the impugned decision, we direct that till further orders, the recognition shall not be withdrawn only on the ground that more than 50% of the students were found to be absent. However, if there are other legal and valid permissible grounds, the concerned authority may proceed to withdraw the recognition in accordance with law. (iii) We

...2...

direct that clause 1.7 of the impugned decision shall not be implemented till further orders."

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिनांक 10 मे, 2012 रोजीचा न्यायालयाचा निर्णय वाचून दाखविला. जुलै महिन्यात विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होणार आहे हे शासनाला ज्ञात होते. कोर्टाच्या निर्णयाबद्दल मी मघाशी जे शब्द वापरले ते मी मागे घेतो. न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले होते की, शासनाने या संदर्भात कायदा करुन योग्य ती पावले उचलावीत आणि त्यानंतर न्यायालयाने स्थगिती दिली आहे हे खरे आहे काय?

प्रा.फौजिया खान : तसे नाही.

श्री.दिवाकर रावते : निर्णयामध्ये ॲप्रोप्रिएट हा शब्द आहे का?

प्रा.फौजिया खान : नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कोर्टाचा निकाल स्पष्ट आहे. मंत्री महोदयांनी माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांच्या प्रश्नाला जे उत्तर दिले त्यातून नवीन भेदाचा प्रश्न निर्माण होतो. पट पडताळणीनंतर प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिकचे एकूण किती शिक्षक सरप्लस झाले आणि आर.टी.नुसार निर्माण होणाऱ्या जागांची गरज किती आहे याची आकडेवारी सभागृहाला सांगितली पाहिजे. रिक्त असलेल्या पदांपैकी तातडीने किती पदे भरण्याची आवश्यकता आहे याची देखील आकडेवारी जाहीर केली पाहिजे.

सभापती महोदय, रयत शिक्षण संस्थेसाठी परवानगी देण्यात आली असे सांगितले आहे. रयत शिक्षण संस्थेसाठी परवानगी देता येते. अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये नववी व दहावी इयत्तेतील विद्यार्थी परीक्षेची तयारी करीत आहेत. त्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित विषय शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत. हा तातडीने प्रकार थांबविला पाहिजे. ही पदे भरण्यासाठी कोर्टाच्या निकालाची अडचण उद्‌भवणार नाही. असे असताना जी पदे रिक्त आहेत, विद्यार्थ्यांची गरज आहे आणि शाळेत पुरेसा पट देखील आहे तेथील पदे तातडीने भरली गेली पाहिजेत. पट पडताळणीमध्ये दोष आढळून आलेला नाही अशा शैक्षणिक संस्थांना रयत शिक्षण संस्थेचा निकष लावून पदे भरण्यास परवानगी दिली जाईल काय आणि त्या पदांची आकडेवारी काय आहे?

नंतर श्री.खर्चे...

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30116..........

प्रा. फौजिया खान : महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, ज्या संस्थांनी ही प्रक्रिया अगोदरच पूर्ण केली आहे अशा संस्थांचा विचार करण्यात येईल.....अडथळा....सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना माझी विनंती आहे की, आपल्या सर्वच प्रश्नांची उत्तरे मी देणार आहे, कृपया मध्येच अडथळा निर्माण करु नये, प्रथम माझे उत्तर संपूर्ण ऐकून घ्यावे.

श्री. कपिल पाटील : महोदय, मंत्री महोदयांनी काय उत्तर द्यावे हा शेवटी त्यांचा अधिकार आहे पण त्यांना उत्तर मात्र लपविता येणार नाही. रयत शिक्षण संस्थेला कोणत्या बेसवर अशी परवानगी देण्यात आली या प्रश्नाचा खुलासा मंत्री महोदया करतील काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, प्रथम माझे उत्तर ऐकून घेतल्याशिवाय समजणार नाही. मी सांगू इच्छिते की, ज्या संस्थांनी नियुक्तीची प्रक्रिया पट पडताळणीचा जी.आर. निघण्यापूर्वी पूर्ण केली होती त्या संस्थांना त्या निकषांवर आपण मान्यता देण्याचे ठरविले आहे. याच पध्दतीने सर्वच संस्थांच्या बाबतीत माहिती घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी शिक्षक व शिक्षकेतर पदे किती सरप्लस आहेत असा प्रश्न विचारला त्याबाबत मी सभागृहाला सांगू इच्छिते की, मुख्याध्यापक 783, शिक्षक 13095 आणि 1007 शिक्षकेतर अशी ही वेगवेगळ्या रेंजची माहिती आहे. यासंबंधी सविस्तर माहिती वेळेअभावी सांगणे शक्य नसल्याने मी ती माहिती पटलावर ठेवते. तसेच सन्माननीय सदस्यांनी मुंबईत गणित व शास्त्र या विषयांच्या बाबतीतील प्रश्न उपस्थित केला. खरोखरच ही योग्य समस्या असून विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी सन्माननीय सदस्यांच्या सोबत बैठक आयोजित करुन त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल असेही या निमित्ताने मी सभागृहाला आश्वासन देते.

-------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील 17 गावांमधील जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत**

**(4) *31350 डॉ.सुधीर तांबे, श्री.माणिकराव ठाकरे** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील 17 गावांमधील जीवन प्राधिकरणाच्या वतीने पाणीपुरवठा योजना वेगवेगळ्या कारणांनी बंद असल्याने कर्जत तालुक्यात पाणी टंचाईचे मोठे संकट उभे असल्याचे माहे एप्रिल, 2012 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कर्जत तालुक्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी कोणती उपाययोजना राबविण्यात आली आहे वा येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. लक्ष्मणराव ढोबळे** : (1) होय.

(2) म.जी.प्रा. मार्फत पूर्ण झालेल्या परंतु अहस्तांतरीत योजना टंचाई कालावधीत चालविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार दिनांक 10.4.2012 च्या शासन निर्णयानुसार कर्जत तालुक्यातील निमगाव गांगर्डा व 17 गावे व आखोणी व 22 गावे या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना दुरुस्तीसाठी अनुक्रमे रु.88.02 लक्ष थकित विद्युत देयकासाठी व रु. 26.22 लक्ष योजना पुनर्जिवीत करण्यासाठी इतक्या निधीस मंजुरी देण्यात आली असून रक्कम म.जी.प्रा.कडे वर्ग करण्यात आली आहे.

कर्जत तालुक्यात पाणी टंचाई निवारणार्थ सध्या 38 टँकरव्दारे 34 गावे व 151 वाड्यांना पाणी पुरवठा चालू असून, 47 खाजगी विहिरी अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत. तसेच 25 नवीन विंधन विहिरी घेण्यात आल्या आहेत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. सुधीर तांबे : महोदय, पाणी टंचाई ही राज्यातील एक महत्वाची समस्या आहे. राज्यात अनेक अशा प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना राबविलेल्या आहेत पण त्यापैकी बहुतांशी प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सुरु होऊन 10-10 वर्षे झाली पण त्यातील अनेक योजना कार्यान्वित झालेल्या नाहीत. ज्या योजना कार्यान्वित झालेल्या आहेत त्या सध्याच्या परिस्थितीत बंद अवस्थेत आहेत. अशा एका गावासाठी किंवा अनेक गावांसाठी असलेल्या नळ योजना असतील त्यातील बऱ्याच नळ पाणी पुरवठा योजना केवळ तांत्रिक अडचणींमुळे बंद आहेत. अशाच प्रकारे कर्जत तालुक्यातील निमगांव, गांगर्डा व 17 गांवे आणि आखोणी सह 22 गावांसाठी असलेल्या दोन योजना कोट्यवधी रुपये खर्च करुन राबविण्यात आल्या, पण त्यांचा प्रत्यक्षात पाणी पुरवठ्यासाठी उपयोग होत नाही. अजूनही या गावांना टँकरनेच पाणी पुरवठा करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने अशा योजनांवर खर्च केलेल्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. अशा योजनांची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31350........

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी कर्जत तालुक्यातील 17 व 22 गावांसाठी असलेल्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या संदर्भात हा प्रश्न विचारलेला आहे. त्या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की, दि. 10.4.2012 रोजीच्या शासन निर्णयानुसार कर्जत तालुक्यातील निमगांव आणि गांगर्डा या टंचाईग्रस्त गावांसाठी ही योजना सुरु करण्यात आली होती. पण पाणी पट्टी भरण्याबद्दल या गावांमध्ये एकमत होत नाही. याच कारणामुळे अनेक ठिकाणी निम्मी गावे पाणी पट्टी भरतात तर निम्मी गांवे पाणी पट्टी भरण्यास तयार नाहीत. तसेच सन्माननीय सदस्यांनी तांत्रिक अडचणींमुळे काही योजना बंद असल्याचे निदर्शनास आणले. बऱ्याच वेळा पाणी घेतल्यानंतर हा पाणी पट्टी देण्याबाबतचा विषय नंतर उपस्थित होतो. पण त्यावेळेस पाणी पुरवठा बंद असतो म्हणून लोक पाणी पट्टी भरण्यास तयार नसतात. पण आता सीना नदीतील सोर्स उपलब्ध झाला असून या योजनेअंतर्गत एका गावाने ही परवानगी दिलेली आहे. त्यामुळे आता या दोन्ही योजना व्यवस्थित सुरु करण्यात यश येईल. कोणत्याही परिस्थितीत टंचाई सदृश्य परिस्थिती संपेपर्यंत या योजना चालविण्यात येतील, त्यानंतर या गावांनी या योजना हस्तांतरित करुन घेतल्या पाहिजेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कुरंगवणे (ता. कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावातील नळयोजनेचे काम अपूर्ण असल्यामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई**

**(5) * 30688 श्री.परशुराम उपरकर** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कुरंगवणे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावातील नळयोजनेसाठी शासनाने 19 लाख रुपये खर्च करुनही अद्याप सदर नळयोजनेचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर नळयोजनेचे काम अपूर्ण असल्यामुळे गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे ग्रामस्थांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे,

(3) असल्यास, सदर नळयोजना माहे एप्रिल, 2012 पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन देवूनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(5) असल्यास, तद्नुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. रणजित कांबळे, प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्याकरिता** : (1) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेवर रु.19 लक्ष खर्च झालेला नसून रु.8.50 लक्ष इतका खर्च झालेला आहे.

(2) व (3) हे खरे नाही.

सदर योजनेतून दि.24/4/2012 पासून नियमितपणे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी पहिला प्रश्न असा विचारला होता की, सदर नळ योजनेचे काम अद्यापही अपूर्ण अवस्थेत आहे हे खरे आहे काय ? परंतु या प्रश्नाला छापील उत्तरात असे म्हटले आहे की, "अंशत: खरे आहे." शेवटच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "दि. 24.4.2012 रोजी या ठिकाणी नियमितपणे पाणीपुरवठा झालेला आहे. " त्यामुळे सदर योजनेचे काम खरोखर पूर्ण झाले की, या योजनेचे काम अजूनही अपूर्ण आहे ? या ठिकाणी पाणी पुरवठा कशा प्रकारे केला जात आहे ? याबद्दलची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणची नळ योजना ज्या कालवधीत पूर्ण व्हावयास पाहिजे होती ती न झाल्यामुळे संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली जाणार आहे, तसेच ज्या अधिकाऱ्याने चुकीचे उत्तर दिलेले आहे त्या अधिकाऱ्यावर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे छापील उत्तर बरोबर दिलेले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून सदर नळ पाणी पुरवठा योजनेचे काम 1993 मध्ये करण्यात आले होते. सन 2009 मध्ये रिपेअर किंवा ऑगमेंटेशनचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 30688** ......

श्री. रणजित कांबळे ....

प्रस्ताव आला होता. रायझिंग मेनच्या जी.आय. पाईपचे काम 1200 मीटरचे होते. जी.आय.पाईपमध्ये रस्ट आल्यामुळे जी.आय.पाईप बदलून ते पीव्हीसीचे करावयाचे होते तसेच ईएसआर बांधण्यासाठी 19 लाखाचा एक प्रस्ताव आला होता. 1200 मीटरचे रायझिंग मेनचे काम पूर्ण झाले असून या ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे. ईएसआरचे काम पेंडीग असून त्यांनी अतिरिक्त ईएसआर मागितला होता त्यांचे काम सुरु आहे. या क्षणाला पाचही वाडयात पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे. या पाच वाडयांच्या गावामध्ये पाण्याचा स्थानिक स्त्रोत असल्यामुळे ठिकाणचे नागरिक या योजनेतील पाण्याचा उपयोग केवळ उन्हाळयातील दोन महिन्यांमध्येच करीत असतात. या गावांना बीडीओ व तहसीलदारांनी मार्च महिन्यामध्ये भेट दिली होती. आता या पाचही गावांना पाणी पुरवठा सुरळीतपणे सुरु आहे.

ज्या ठेकेदाराने वेळेत काम केले नाही त्याच्यांवर कोणती कारवाई करण्यात येईल असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला असून यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सीईओ सिंधुदुर्ग तसेच पाणी पुरवठा समितीने सदर ठेकेदाराला शोकॉज नोटीस दिली असून पोलीस स्टेशनमध्ये तक्रार सुध्दा दिलेली आहे. परंतु सदर ठेकेदाराने आर्थिक व्यवहार केलेला नसल्यामुळे सदर ठेकेदारावर एफआयआर दाखल होऊ शकला नाही. डिसेंबर 2012 पर्यंत सदर ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही तर विभागाच्या वतीने इएसआरचे काम पूर्ण केले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत**

**(6) * 29962 श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण , श्री.वसंतराव खोटरे** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयात दरवर्षीच्या कार्यभारामुळे वाढणाऱ्या सन 2008-2009 पासून 2011-2012 पर्यंतच्या वाढीव पदांना मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव संचालकांकडून शासनास प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने याबाबत अद्यापही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) हे अंशत खरे आहे.

(2) व (3) सन 2008-2009, 2009-2010, 2010-2011 या वर्षातील कार्यभारामुळे वाढणाऱ्या उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वाढीव पदांचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले असून सन 2008-2009 व सन 2009-2010 चे प्रस्ताव संयुक्त सचिव समिती समोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर सन 2010-2011 च्या प्राप्त प्रस्तावाबाबत पटपडताळणीनुसार आढावा घेऊन त्या नुसार आवश्यक ठरणाऱ्या पदांचा प्रस्ताव फेर सादर करण्यास शिक्षण संचालकांना कळविण्यात आले आहे. मात्र सन 2011-2012 या वर्षातील वाढीव पदांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना उत्तरात काही सुधारणा करावयाची आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, उत्तरात कोणतीही सुधारणा करावयाची नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, कालच ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले होते की, "एक सवाल आप पुछो, एक सवाल हम पुछते है, लेकीन एक सवालका जबाबही एक सवाल है." आम्ही एकच प्रश्न किती वेळा विचारावयाचा ? कनिष्ठ महाविद्यालयाचा कार्यभार वाढल्यामुळे पदे वाढत असतात व शासनाची मान्यता असल्याशिवाय या ठिकाणी काम करणाऱ्या शिक्षकांचे वेतन सुरु होत नाही ही वस्तुस्थिती आहे. सन 2008 पासून म्हणजे सन 2008-2009, 2009-2010, 2010-2011, 2011-2012 या चार वर्षात या पदांना अजूनपर्यंत मान्यता मिळालेली नाही. शासनाने गणित, विज्ञान या महत्वाच्या पदांनाही मान्यता न दिल्यामुळे या शिक्षकांना गेल्या चार वर्षापासून पगार मिळालेला नाही. याविषयाच्या संदर्भात प्रत्येक अधिवेशनात आम्ही प्रश्न उपस्थित करतो परंतु अद्यापही शासनाला जाग येत नाही. उत्तरात म्हटले आहे की, प्रस्ताव संचालकाकडे पाठविण्यात आलेला आहे, त्यात त्रुटी आहेत. त्रुटींची पूर्तता न करणारे हे अधिकारी कोण आहेत ? या अधिकाऱ्यांमुळेच आमच्या शिक्षकांचा छळवाद होत आहे. शिक्षकांनी चार वर्षे बिन पगारी राहणे बरोबर आहे काय ? यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29962 ...

श्री.विक्रम काळे...

तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, जुलै महिन्याच्या अखेर पर्यंत या सर्व पदांना मान्यता देण्याचे काम शासन करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रस्ताव संयुक्त सचिव समिती पुढे आहे. पट पडताळणी नुसार तपासणी करून तसेच विभाग व जिल्हा निहाय अभ्यास करून प्रस्ताव पुन्हा सादर करण्यासंबंधीचा आदेश देण्यात आला आहे. मी येथे एवढे सांगू इच्छिते की, संचालकांना तात्काळ म्हणजे एक-दोन दिवसात तो प्रस्ताव संयुक्त सचिव समिती कडे पाठवून देण्यासंबंधीचे आदेश देण्यात आले आहेत. तद्नंतर संयुक्त सचिव समितीला बैठक घेण्याची विनंती करण्यात येईल व एका महिन्याच्या आत या प्रश्नाचे निराकरण करण्यात येईल एवढे आश्वासन मी येथे देत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन 2008 पासूनच्या पदांचा प्रश्न आहे. पण 2007 पासूनची राज्यात 30 पदे शिल्लक आहेत. तो ही प्रश्न अजून प्रलंबित आहे. त्या 30 पदांना मान्यता देण्याची आवश्यकता आहे. तो प्रश्न याच्याशी निगडित नाही. तो प्रश्न संयुक्त सचिव समितीकडे पाठविण्याची आवश्यकता आहे काय, नसल्यास, त्यांना ताबडतोब मान्यता देणार आहात काय ? कारण सन 2007 पासून हे शिक्षक काम करीत आहेत, कार्यरत आहेत. त्यांच्या नेमणुका झालेल्या आहेत. आपल्या मान्यतेसाठी प्रकरण प्रलंबित आहे. तेव्हा या पदांना पूर्वलक्षी प्रभावासह शासन मान्यता देणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या 30 पदांच्या बाबतीत माहिती घेण्यात येईल आणि ताबडतोब कारवाई करण्यात येईल.

......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लखमापूर (ता.दिडोंरी, जि.नाशिक) येथील एव्हरेस्ट कंपनी व्यवस्थापनाने बेकायदेशीरपणे कामगारांची केलेली भरती**

**(7) * 30385 श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री.उल्हास पवार** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) लखमापूर (ता.दिडोंरी, जि.नाशिक) येथील एव्हरेस्ट कंपनी व्यवस्थापनाने बेकायदेशीरपणे कामगार भरती करुन कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे कंपनीतील कामगारांनी दिनांक 25 एप्रिल, 2012 पासून संप व धरणे आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व बेकायदेशीर कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल कंपनी व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र गावित श्री.हसन मुश्रीफ यांच्या करिता** : (1) अंशत: खरे आहे.

कंपनी व्यवस्थापनाने बेकायदेशीर कामगार भरती केलेली नाही. तथापि, वेतनवाढीसाठी कामगारांनी संप व धरणे आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे.

(2) होय.

(3) उभयपक्षी समझोता घडवून आणण्यासाठी शासनाच्या विविध स्तरावर बैठका घेण्यात आलेल्या असून मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत तसेच आस्थापनेचे विविध कामगार कायद्यातंर्गत निरीक्षण करण्यात आले आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30385....

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागामध्ये ही कंपनी आहे. गेल्या एप्रिल महिन्या पासून या कंपनीतील कामगारांनी बेकायदेशीर कंत्राटी कामगारांच्या भरतीच्या विरोधात तसेच मॅनेजमेंट कामगारांना देत असलेल्या त्रासाबद्दल आंदोलन सुरू केले आहे. हे आंदोलन सुरू होऊन दोन ते अडीच महिने झाले आहेत. या आंदोलनामध्ये हस्तक्षेप करून या कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न कामगार विभागातर्फे झालेला दिसत नाही. आजही नाशिक जिल्ह्यामध्ये त्यांचे आंदोलन सुरू आहे. यातील बऱ्या पैकी गोष्ट म्हणजे नवीन जिल्हाधिकाऱ्यांनी येऊन गेल्याच आठवड्यामध्ये हस्तक्षेप केला व कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. राज्यात कंत्राटी कामगारांची भरती सुरू आहे. या कंत्राटी कामगारांना कमी पगार द्यायचा आणि कामगारांचे शोषण करायचे असे धोरण कंपन्यांनी अवलंबिले आहे. तेव्हा समान काम, समान दाम या न्यायाचा भंग करणाऱ्या कंपनी विरूद्ध शासन नेमकी कोणती कारवाई करणार आहे ? या संबंधी उच्चस्तरीय बैठक घेऊन शासन या प्रश्नासंबंधी हस्तक्षेप करणार आहे काय ? तसेच राज्यात किती कंत्राटी कामगारांना लायसेन्स देण्यात आले आहे ? राज्यात बेकायदेशीर कंत्राटी कामगार घेण्याची प्रथा सुरू झालेली आहे तिचा अभ्यास करून बेकायदेशीर काम करणाऱ्या कंपन्यांवर शासन कारवाई कधी करणार आहे?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कामगार विभागामार्फत कोणतीच कारवाई झाली नाही असे म्हटले आहे. ते योग्य नाही. त्यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, कामगार उपायुक्त, नाशिक यांनी दिनांक 9/11, 15/11, 21/11, 29/11, 12/12, 26/12, 12/1, 23/1, 30/1, 8/2, 21/2, 29/2 आणि 12/3 या महिन्यांमध्ये बैठका घेतल्या आहेत. यात दोन प्रश्न आहेत. या कामगारांचा वेतनवाढीचा करार संपला आहे. वेतनवाढी संबंधी युनियन आणि व्यवस्थापन यांच्यामध्ये चर्चा सुरू आहे. ही वेतनवाढ D.A. सह द्यावी किंवा नाही यावर चर्चा अडलेली आहे. येथे सन्माननीय सदस्यांनी कंत्राटी कामगारांचा उल्लेख केला आहे. हे खरे आहे की, अलीकडे कंत्राटी कामगारांचा रोग संपूर्ण व्यवस्थापनाला लागला आहे. कारण कंत्राटी कामगार कमी पगारात मिळतात. हा केंद्र शासनाचा कायदा आहे. या कायद्यामध्ये केंद्र शासनाने दुरूस्ती करावी असे राज्य शासनाने अनेक वेळा कळविलेले आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30385 . . . .

श्री.हसन मुश्रीफ . . . .

याशिवाय माननीय राज्यमंत्र्यांनी सुध्दा दिनांक 23-5-2012 रोजी आपल्या दालनात बैठक घेतली होती.सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार अधिवेशन झाल्याबरोबर आठ दिवसाच्या आत माझ्या स्तरावर बैठक घेण्यात येईल आणि त्यामध्ये याबाबतीत निश्चितपणे तोडगा काढण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना जवळजवळ आठ-दहा बैठकांचा उल्लेख केला. पण हा एवढा मोठा गहन प्रश्न कुठे आहे? हा साधा प्रश्न आहे. कंत्राटी कामगारांच्या संबंधातील प्रश्न आहे. जे कायम स्वरुपी कामगार आहेत त्यांच्या बाबतीत करार होईल, त्यांच्यामध्ये चर्चा होतील त्या होऊ द्या. त्याबद्दल आमच्या मनामध्ये काही शंका नाही. कारण त्यासाठी थोडा वेळ लागतो. परंतु या क्षणी एव्हरेस्ट कंपनीमध्ये किती कंत्राटी कामगार आहेत, किती कामगार कायम स्वरुपी काम करीत आहेत, तसेच त्याठिकाणी कंत्राटी कामगार किती कालावधीपासून काम करीत आहेत, तसेच कंत्राटी कामगारांचे जे प्रश्न आहेत त्याबाबतीत किती कालावधीमध्ये निर्णय घेण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याठिकाणी 73 कायम कर्मचारी आहेत, 134 कायम कामगार आहेत. 15 व्यवस्थापकीय ट्रेनी कर्मचारी आहेत आणि 300 कंत्राटी कामगार आहेत. तसेच कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲबोलीशनचा जो कायदा आहे त्याप्रमाणे याबाबत खटला भरण्यात येईल आणि अधिवेशन संपल्यानंतर आम्ही याबाबतीत तोडगा काढण्याचा प्रयत्न करु.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय,माझा उप प्रश्न असा आहे की, या प्रश्नाच्या माध्यमातून या विषयाचा निपटारा व्हावा किंवा संबंधितांना न्याय मिळावा. याठिकाणी माननीय मंत्री महोदय स्वत: सांगत आहेत की, 100 कर्मचारी कायम स्वरुपी आहेत आणि 300 कंत्राटी कामगार आहेत. तसेच त्याठिकाणी कंत्राटी कामगार किती वर्षापासून काम करीत आहेत? असा मी प्रश्न विचारला होता.पण माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही.तसेच आपल्या देशातील कॉन्ट्रॅक्ट ॲबोलीशन ॲक्ट असला तरी सुध्दा राज्य शासनाचे स्वत:चे अधिकार आहेत. यापूर्वी अशा प्रकारच्या अनेक केसेस मध्ये राज्य शासनाने निर्णय देखील घेतलेला आहे. म्हणून 300 कामगारांना न्याय देण्यासाठी आपण कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲबोलीशन ॲक्टकडे बोट न दाखविता स्वत: याबाबत निर्णय घेणार आहात काय ? त्याच प्रमाणे 300 कामगार किती कालावधी पासून कंत्राटी कामगार म्हणून काम करीत आहेत या पहिल्या प्रश्नाचे उत्तर हवेच आहे आणि 300 कामगारांच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30385 . . . .

श्री.भाई जगताप . . . .

भवितव्यासाठी शासन म्हणून पुढाकार घ्यावा आणि त्याचे कंत्राट ॲबोलीश करुन त्यांना कायम करणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा कारखाना 1995 पासून सुरु आहे. कामगार किती घेतले, कोणत्या तारखेला घेण्यात आले याबाबतीत आज माझ्या जवळ माहिती नाही. तसेच सगळे कामगार एकाच वेळी घेतलेले नाहीत. जसजसा कामाचा व्याप वाढत गेला, त्या प्रमाणे घेण्यात आलेले आहेत. मात्र आठ दिवसाच्या आत कंत्राटी कामगारांच्या बाबतीत, वेतनवाढीबाबत बैठक धेऊन निश्चितपणे निर्णय घेऊ.

श्री एस. क्यू. ज़मा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने स्वीकार किया है कि हमारे राज्य में कांट्रेक्ट वर्कर्स काफी बढ़ रहे हैं. मंत्री महोदय ने यह भी कहा कि वे इस बारे में एक मीटिंग लेंगे.

मेरा कहना है कि नाशिक के डेप्यूटी कमिश्नर ऑफ लेबर ने अनेक बार मीटिंग ली. लेकिन निर्णय नहीं हो पाया. उन बैठकों में निर्णय न हो पाने के लिए कामगार जिम्मेदार हैं या वहां के प्रबंधक जिम्मेदार हैं. इससे संबंधित जानकारी आप सदन को दीजिए तथा दूसरा मेरा कहना यह है कि कांट्रेक्ट लेबर ॲबोलिशन एक्ट के अंतर्गत हम ॲबोलिशन करने की मांग नहीं कर रहे हैं. लेकिन कांट्रेक्टर लेबर के संबंध में महाराष्ट्र में एक मीनिमम वेजेज एक्ट है तथा मालिक या कांट्रेक्टर उनको बिना नोटिस दिए हुए निकाल देता है तो वर्कर्स को प्रोटेक्शन भी है. मुझे पूछना है कि उस एक्ट के अनुसार क्या हमारी सरकार अविलंब कोई कार्रवाई करेगी ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मघाशी सांगितले की, कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲबोलीशन ॲक्ट हा केंद्र शासनाचा कायदा आहे. त्यामध्ये चांगल्या दुरुस्त्या कराव्यात. कामगारांची पिळवणूक व शोषण होता कामा नये म्हणून मी स्वत: कामगार विभागाचे केंद्रीय मंत्री श्री.मल्लिकार्जून खरगे साहेबांना भेटलो. हा केंद्र शासनाचा कायदा असल्यामुळे राज्य शासन यामध्ये कायदा करु शकत नाही. परंतु मी सदनातील सन्माननीय सदस्यांना सांगितलेले आहे की, आतापर्यंत जे प्रश्न समोर आले ते केवळ वेतनवाढीबाबत आले आहेत. याठिकाणी कंत्राटी कामगारांचा विषय नव्हता. या कंत्राटी कामगारांना किमान वेतन दिले जात आहे आणि तसे ते देण्याचे बंधनही आहे. परंतु मी

...3

ता.प्र.क्र.30385 . . . .

श्री हसन मुश्रीफ....

माननीय सभापतींना सांगितले की,सन्माननीय सदस्यांनी वेतनवाढी बद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. अशा वेळी कंत्राटी कामगारांच्या वेतनवाढी बाबत आठ दिवसाच्या आत व्यवस्थापकांना बोलावून आम्ही यामधून मार्ग काढू.

----

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सातारा व सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांना कायम स्वरुपी पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(८) * ३००९१ श्री.विनोद तावडे , श्री.नितीन गडकरी , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील माण व खटाव या तालुक्यात व सांगली जिल्ह्यातील आटपाडी, जत, कवठे महांकाळ, इ. तालुक्यामधील जनतेला सलग दुसऱ्या - तिसऱ्या वर्षी दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच वेळेस सातारा व सांगली जिल्ह्यांमधील इतर तालुक्यांमध्ये मोठी धरणे बांधली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या धरणांमधून कायम स्वरुपी पाईपलाईनद्वारा सदर दुष्काळग्रस्त तालुक्यांना पाणीपुरवठा योजना सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कायम स्वरुपी पाणीपुरवठा योजना सुरु न करण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा.लक्ष्मणराव ढोबळे** : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांचे बांधकामे पूर्वी पासूनच सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात सातारा व सांगली जिल्ह्यात अनुक्रमे ७६७ व ७९० या गावांचा समावेश कृती आराखड्यात करण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या आधी दुष्काळावर चर्चा झाल्यानंतर आणि मी प्रत्यक्ष त्या भागामध्ये फिरुन आल्यानंतर मला माननीय मंत्री महोदयांना एवढेच विचारावयाचे आहे की, सांगली जिल्ह्यामध्ये आठ महिने सिंचनाकरिता पाणी वापरुन उर्वरित चार महिन्याचे पाणी दुष्काळी भागाकडे फिरविण्याची योजना करु शकता का जेणेकरुन काही तालुक्यांना जे भरपूर पाणी मिळते आणि काही तालुक्यांना दुष्काळात पाण्यासाठी वणवण फिरावे लागते ही त्यांची अडचण दूर होईल का ? आटपाडी या गावाचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी भीमा अथवा कृष्णा नदीवरुन पाईपलाईनव्दारा पाणीपुरवठा करण्याचा निर्णय शासन घेईल का ? मी जे दोन स्पेसिफिक प्रश्न विचारले आहेत त्यामुळे लगेच या दुष्काळी तालुक्यांचे पुढच्या तीन चार वर्षातील प्रश्न मिटू शकतात.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/ KTG

ता. प्र. क्र. 30091 .....

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्या भागात दौरा करुन अतिशय अभ्यासपूर्ण विचारलेला प्रश्न आहे. सुरुवातीच्या काळात आपण जी धरणे शेतीसाठी बांधली होती ती आता पिण्याच्या पाण्याची धरणे म्हणूनच ओळखली जात आहेत. अशा वेळेला ज्या मोठ्या शहरांची तहान वाढलेली आहे ती भागविण्यासाठी अशा शहरांनी आता पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र साईट्स शोधून त्या ठिकाणी धरणे बांधण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असा प्रश्न विचारला की, चार महिने हे पाणी वळते करता येईल का ? या बद्दलचा प्रश्न देखील पाटबंधारे खात्याशी संबंधित असल्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बरोबर घेऊन माननीय पाटबंधारे मंत्र्यांच्या बरोबर यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने बैठक घेण्यात येईल. अलीकडच्या काळामध्ये मोठ्या शहरांना पाणी पुरविताना 100-100 टँकरची मागणी करुन देखील त्या शहराची तहान भागत नाही. त्या ठिकाणी आपण पुरे पडू शकत नाही. 20-20 हजार लोकसंख्येची गावे आहेत. अशा प्रकारच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी निश्चितपणे आम्ही एकत्र बसून यातून मार्ग काढण्यात येईल.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कृष्णा नदीवरुन पाईपलाईनव्दारे पाणीपुरवठा करण्याबाबत आणखी एक प्रश्न विचारला. हा अधिकार त्या गावाचा आहे. त्या गावाने ठराव केला पाहिजे. तुम्ही पाणी घ्या असे आम्ही त्या गावाला सांगू शकत नाही. त्र्याहत्तराव्या घटना दुरुस्ती प्रमाणे त्या गावाने पहिल्यांदा अशी पाणीपुरवठ्याची योजना हवी आहे असा ठराव केला पाहिजे. तो ठराव प्राप्त झाल्याबरोबर दोन महिन्याच्या आत त्याचा सर्व्हे करण्यात येईल.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : माननीय मंत्री महोदय, मूलत: सातत्याने दुष्काळी असलेल्या भागाविषयीचा हा प्रश्न आहे. घटनात्मकदृष्ट्या काय तरतुदी आहेत याबाबत आपण जे सांगितले ते बरोबर आहे. त्याप्रमाणे त्या पंचायतीने एखाद्या ठरावाव्दारे जर अशी मागणी केली तर जरुर त्याचा पाठपुरावा करावा. पण नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्यांना सातत्याने दुष्काळी परिस्थितीमध्येच राहावे लागते त्यांच्याकरिता पाटबंधारे विभाग, ग्रामविकास विभाग यांनी सुध्दा या व्यतिरिक्त काही कार्यक्रम घेऊन हा प्रश्न सोडविला पाहिजे अशी एकूण सदनाची भावना आहे. त्या दृष्टीने आपण काय करणार आहात ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/ KTG/ D/

ता. प्र. क्र. 30091 ....

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, आपण जी सूचना केली ती मान्य करुन तशा पध्दतीची बैठक निश्चितपणे घेण्यात येईल आणि गावाची मागणी आल्यानंतर त्या ठिकाणी सर्व्हे करुन त्या गावाची योजना करण्याबद्दल प्रयत्न करण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30091...

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. यापूर्वी सभागृहात पाणी टंचाईच्या संदर्भातील अशासकीय ठरावाच्या चर्चेला मंत्री महोदयांनी सविस्तरपणे उत्तर दिले होते. पण आजही कायम स्वरुपी दुष्काळी असलेल्या अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "सन 2012-2013 मध्ये 767 गावांचा व सन 2013-2014 मध्ये 790 गावांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समावेश केला आहे. या गावांपैकी किती गावे कायम दुष्काळी आहेत आणि नसतील तर त्या गावांचा या कार्यक्रमात समावेश केला जाईल काय ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यात 2 वर्षांसाठी लागू करण्यात आला. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांकडून गावांची नावे मागविली जातात. ती नावे आल्यानंतर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र सरकारकडे गावांची संख्या कळविली जाते. या कार्यक्रमात राहिलेल्या गावांचा समावेश व्हावा असे सन्माननीय सदस्यांना वाटत असेल तर त्यांनी त्या गावांची नावे शासनाकडे दिली तर त्या गावांचाही यात समावेश केला जाईल आणि उर्वरित गावांचे उद्दिष्ट सुध्दा पूर्ण करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांची बांधकामे पूर्वी पासूनच सुरु आहेत." ही कामे केव्हापासून सुरु आहेत आणि त्यावर आतापर्यंत किती खर्च झाला आहे आणि या कामांची सद्य:स्थिती काय आहे ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : मी पाणी पुरवठा विभागाचा मंत्री म्हणून उत्तरे देत आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे पाटबंधारे विभागाने या प्रकल्पांची कामे केव्हा सुरु केली व केव्हा पूर्ण होतील याबाबतची माहिती पाटबंधारे विभागाकडून घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30091...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आम्ही 45 दिवस अगोदर प्रश्न देत असतो. या प्रश्नाशी दोन विभागांचा संबंध असेल तर दोन्ही मंत्री महोदयांनी उत्तरे देणे आवश्यक होते. हा महत्वाचा प्रश्न आहे. दुष्काळी भागातील लोक पाण्याशिवाय तडफडत आहेत. जनावरांना चारा मिळत नाही. अनेक भागातील जनावरे कत्तलखान्यामध्ये गेली आहेत. ही वस्तुस्थिती असताना मंत्री महोदय या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करीत आहेत असे वाटत नाही. त्यामुळे आपण हा प्रश्न राखून ठेवावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी आतापर्यंत दिलेली उत्तरे ही ग्रामविकास विभागाशी संबंधित व दुष्काळी भागातील परिस्थितीच्या अनुषंगाने दिलेली आहेत. या प्रश्नाच्या अनुषंगाने पाटबंधारे व ग्रामविकास विभागांनी केलेली व पुढील काळात करावयाची कार्यवाही यासंबंधी या दोन्ही मंत्री महोदयांनी एकत्रित बसून विचार केला तरच हा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी उत्तर देण्याचे टाळले आहे. या सरकारमधील अनेक मंत्री महोदय थोडक्यात उत्तर देऊन वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न करीत असतात. सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे साहेब हे अनेकदा महत्वाच्या प्रश्नांसंबंधी त्यांच्या विभागाचा संबंध नसतानाही सामुहिक जबाबदारीच्या नात्याने उत्तरे देत असतात. त्याप्रमाणे सन्माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली पाहिजेत. या विभागाच्या बाबतीत असा अनुभव येतो की, ज्या गावांना पाईप लाईनमार्फत पाणी पुरवठा केला जातो, ती पाणी पुरवठा योजनाच बंद झालेली असते. त्या गावासाठी स्त्रोत दिला आहे म्हणून त्यांना टँकरने पाणी पुरवठा केला जात नाही. म्हणजे त्या गावांना पाईप लाईनद्वारे पाणी मिळत नाही आणि टँकरनेही पाणी दिले जात नाही. या धोरणात बदल केला जाईल काय ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, या धोरणात निश्चितपणे बदल केला जाईल.

प्रा.सुरेश नवले : महाराष्ट्रात अनेकविध ठिकाणी दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. आपद्कालीन व्यवस्था म्हणून समुद्रातील खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रुपांतर करुन ते पाणी दुष्काळग्रस्त भागात पोहोचविण्याची कल्पना शासनाला स्पर्श करुन गेली आहे काय ?

3...



NTK/ D/ D/ ST/ KTG/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30091...

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, माझ्या खात्यातील काही अधिकाऱ्यांना सिंगापूरला अभ्यास करण्यासाठी पाठविले होते. त्याचबरोबर आम्ही व माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतची पाहणी केलेली आहे. खारे पाणी गोडे करण्याची योजना आपल्या भागात राबविण्यासंबंधी अभ्यास झालेला आहे. परंतु असा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात हाती घेतला तरच ती योजना परवडू शकते. याबाबतचा अभ्यास चालू आहे. पण अशी योजना जास्त खर्चिक असल्यामुळे ती आपल्या राज्यात राबविणे कितपत योग्य ठरेल या संदर्भात वेगवेगळी मते समोर आलेली आहेत. त्याबाबतचा अभ्यास करुन अशा प्रकारे पाणी शुध्द करावे असा एक मतप्रवाह आहे. त्याचबरोबर मी सभागृहाला अशी माहिती देऊ इच्छितो की, एमआयटीच्या काही प्राध्यापकांनी एकत्र येऊन नेहमीच्या वापरातील पाणी शुध्द करण्यासंबंधीचाही प्रयोग केलेला आहे. ते पाणी रिसायकल करण्यात आपण यशस्वी झालो तर ते पाणी उद्योगासाठी देता येईल आणि सध्या उद्योगाला पिण्याचे पाणी पुरविले जाते ते पाणी शहरातील लोकांना वापरता येईल. अशा प्रकारच्या कनेक्टिंग पध्दतीचा अवलंब करावयाचा आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या सुरुवातीला सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करण्यात आली होती. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ मी 5 मिनिटे वाढवून देत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उच्च व तंत्रशिक्षण विभागातील रिक्त पदे भरणेबाबत करावयाची कार्यवाही**

**(९) * ३००६७ श्री.सतीश चव्हाण , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २८१५२ ला दिनांक १६ एप्रिल, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सहसंचालक, उपसंचालक, प्राचार्य, विभागप्रमुख यांच्यासह रिक्त असलेली १०९६ पदे तात्काळ भरण्याबाबत निर्णय झाला आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्याने शैक्षणिक दर्जा खालावण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. डी.पी.सावंत, श्री. राजेश टोपे यांच्याकरिता** : (१) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या विविध संचालनालयात ६०३९ इतकी पदे रिक्त आहेत.

(२) नाही.

प्रशासकीय संवर्गातील रिक्त पदांमुळे कामकाजावर परिणाम होऊ नये म्हणून तदर्थ व्यवस्थेने बदलीने काही पदे भरण्यात आली असून काही पदांचा अतिरिक्त कार्यभार ज्येष्ठतम अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे. शिक्षकीय संवर्गातील रिक्त पदांचा कार्यभार सदरहू पदाच्या निकटतम संवर्गात कार्यरत असलेल्या ज्येष्ठतम अधिकाऱ्यांकडे सोपवून सदरहू रिक्त पदांचा कार्यभार पूर्ण करण्यात येत आहे. तसेच अध्यापकांच्या रिक्त पदांमुळे शैक्षणिक कार्यभारावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून रिक्त पदांवर हंगामी व कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या नियुक्त्या करण्यात आल्या असून उर्वरित शैक्षणिक कार्यभार अभ्यागत अध्यापकांकडून (तासिका तत्वावर) पूर्ण करुन घेण्यात येत असल्याने शैक्षणिक दर्जा कायम राखला जात आहे.

(३) व (४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून, सरळसेवेने भरावयाच्या गट-अ व गट-ब च्या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठपुरावा चालू आहे. तसेच पदोन्नतीचे पदे विभागीय पदोन्नती समितीच्या मान्यतेने भरण्याची कार्यवाही ही प्राधान्याने सुरु आहे. गट-क व गट-ड ची पदे भरण्यावरही बंदी घालण्यात आली होती. मात्र मागासवर्गीय अनुशेषाची पदे भरण्यावरची बंदी उठवलेली असल्याने, ती पदे प्राधान्याने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. अपंग अनुशेषाची पदे भरण्याची प्रक्रियाही प्राधान्याने सुरु आहे. तसेच काही संचालनालयातील गट क व ड संवर्गातील रिक्त पद भरतीच्या निर्बंधातून वगळून शासन मान्यतेने भरण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

श्री. विक्रम काळे : तंत्र शिक्षण विभागामध्ये ६०२९ पदे रिक्त असल्याचे मान्य केल्या बद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्रामध्ये तंत्र शिक्षणाला अतिशय महत्व आहे. सर्व विद्यार्थी तंत्र शिक्षणाकडे वळत आहेत ही चांगली गोष्ट आहे. आज आयटीआय असेल, पॉलिटेक्निक असेल, इंजिनिअरिंग असेल अशा कॉलेजमध्ये विविध संवर्गातील ६०३९ पदे रिक्त

..२..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असणे हे भूषणावह नाही. तेव्हा ही ६०३९ रिक्त पदे शासन किती दिवसात भरणार आहे ? वारंवार ही पदे रिक्त रहात आहेत. परिणामी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक मिळत नाहीत, गणितासारखा महत्वाचा विषय शिकविण्यासाठी शिक्षक मिळत नाहीत. तेव्हा जे कंत्राटीपध्दतीवर शिक्षक घेण्यात आलेले आहेत त्यांन कायम करण्यात येईल काय ?

श्री. डी.पी.सावंत : सन्माननीय सदस्यांनी केवळ तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भात नाही तर उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाची जी ५ संचालनालये आहेत त्यामधील रिक्त पदासंबंधीचा प्रश्न विचारलेला आहे. अ,ब,क आणि ड या ४ संवर्गामध्ये ६०३९ रिक्त पदे आहेत. गट क आणि ड संवर्गातील भरतीला शासनाने बंदी घातलेली होती. ही बंदी गेल्या महिन्यामध्ये उठविण्यात आलेली आहे. येणा-या ४ महिन्यांच्या कालावधीत सर्व पदे भरण्यासंबंधीची कार्यवाही सुरु केली जाईल. गट अ आणि ब मधील रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत एमपीएससीला प्रस्ताव पाठविलेला होता.परंतु युजीसीच्या काही नॉर्म्समध्ये बदल झाल्यामुळे रिक्रुटमेंट रुल्समध्ये बदल करण्यासंबंधीची नस्ती आम्ही तयार केलेली आहे. एमपीएससीला तीन महिन्यामध्ये रिक्विझिशन पाठविण्यात येईल. गट अ आणि ब ची पदे एमपीएससी मार्फत लवकरात लवकर भरण्याचा आम्ही प्रयत्न करु.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहात मुद्दा उपस्थित करण्यापूर्वी पीठासीन अधिका-यांची परवानगी घेण्याबाबत**

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. ठाण्यामध्ये अधिकारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन किंवा औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा असेल तर ती बाब माझ्या निदर्शनास आणून त्यासंबंधी रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे. माझी परवानगी न घेता कोणताही विषय मांडणे इष्ट नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या दोन सूचना आलेल्या आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, श्रीमती शोभा पडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री. चंद्रकांत पाटील, केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, परशुराम उपरकर, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया आणि प्रवीण पोटे यांनी "गतवर्षी नोव्हेंबर महिन्यामध्ये निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती निवारण्यासाठी शासनाकडून कोणतीही पूर्व उपाययोजना न करण्यात येणे" या विषया संबंधी नियम 289अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. हा नियम 289चा विषय कसा होतो हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी थोडक्यात सांगावे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.शिगम.. 12:10

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये दुष्काळाच्या संदर्भात चर्चा झाली. त्या चर्चेनंतर माननीय मंत्री महोदयांनी 50 कोटी रुपये वेगळे देण्याची घोषणा केली. बाकीच्या ज्या नियमित योजना सुरु आहेत त्या योजना त्यामध्ये दाखवून 2400 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. महाराष्ट्रामध्ये आजच्या घडीला दुष्काळाची परिस्थिती फार भयानक आहे. या दुष्काळी परिस्थिती बाबत सरकारने कोणत्या उपाय योजना केलेल्या आहेत. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु झाले तेव्हा आपणास वाटत होते की, पुढच्या एक-दोन आठवड्यात पाऊस पडेल आणि पिकांची परिस्थिती बरी होईल. परंतु तसे झालेले नाही. हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. तेव्हा या प्रश्नाच्या संदर्भात सरकारकडून कोणत्या उपाय योजना करण्यात आल्या वा येणार आहेत या बाबत चर्चा होणे आवश्यक आहे म्हणून आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. आता मुंबई शहरामध्ये चार दिवसांनी, आठ दिवसांनी पाणी मिळणार आहे तर ग्रामीण भागामध्ये पाणी मिळेल की नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. जनावरांचा चाऱ्याचा तसेच त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. कालच येथे माननीय कृषी मंत्री महोदयांनी सांगितले की, आता दुबार पेरण्या कराव्या लागतील अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपणा सर्वांना माहीत आहे या दुष्काळामध्ये संपूर्ण महाराष्ट्र होरपळत आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी शासनाने पॅकेज दिले, परंतु नेहमीची तरतूद कमी केली. आपण दुष्काळावर मात करण्यासाठी केंद्र सरकारकडे मदतीची मागणी केली. परंतु केंद्र सरकारकडून फारशी मदत मिळाली नाही. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी सांगितले की, 2200 कोटी रुपयांपैकी 600 कोटी रुपये मिळतील. तो निधी शासनाला मिळाला की नाही ते आम्हाला समजत नाही. माननीय श्री.शरद पवार साहेब सुरुवातीला म्हणाले होते की, पाऊस उशिराने सुरु झाला तरी समाधानकारक पडेल. परंतु त्यांनीही दोन दिवसांपूर्वी चिंता व्यक्त केलेली आहे. आता अधिवेशन सुरु आहे. तेव्हा दुष्काळाच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाय योजना केल्या आहेत वा करणार आहेत. तसेच भविष्यात उद्भवणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी कोणत्या उपाय योजना आहेत ? आम्हाला शासनाची भूमिका समजणे आवश्यक आहे त्यासाठी या विषयावर येथे चर्चा होणे आवश्यक आहे अशी मी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे ती अत्यंत महत्वाची आहे. अधिवेशाचे फक्त दोन दिवस शिल्लक राहिले आहेत. माझी शासनाला सूचना आहे की, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. राज्यामध्ये जी दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्या परिस्थितीला शासन कशा पध्दतीने तोंड देणार आहे किंवा या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने कोणते प्रयत्न केलेले आहेत, वा कोणकोणत्या उपाय योजना केलेल्या आहेत. पुढील काळात कोणत्या उपाय योजना करणार आहे याबाबत शासनाने उद्यापर्यंत सविस्तर निवेदन करावे.

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, या संदर्भात निवेदन करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांनी दुष्काळाच्या प्रश्ना संदर्भात बोलाविलेल्या बैठकीस त्यांनी बहिष्कार घालू नये.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** माझ्याकडे दुसरी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना आलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "मागासवर्गीयांच्या वसतिगृहातील अनुसूचित जातीचे 80 टक्के आरक्षण रद्द करण्यात आल्याने निर्माण झालेला असंतोष, व्यवसायिक आणि कम्प्युटर पदवी अभ्यासक्रमातील फी माफीचे धोरण बंद करण्याचा निर्णय, मागासवर्गीय, ओबीसी व भटके विमुक्त विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहणे, शिक्षणाचे बाजारीकरण आणि व्यापारीकरणामुळे गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण दुरापास्त होणे, गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी कोणतीही सवलत नसणे, यामुळे राज्यात निर्माण होत असलेली विषमता व त्यातून उफाळत असलेला असंतोष." या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे.

या बाबी संबंधी शासनाने उद्या पर्यत सविस्तर निवेदन करावे.

श्री.भास्कर जाधव : होय.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आदिवासी विकास विभागाने वित्त विभागाची पूर्व परवानगी न घेता आश्रमशाळेतील वस्तुंच्या खरेदी संदर्भात परिपत्रक काढल्या बाबत या विषयावरील श्री.पांडुरंग फुंडकर, व श्री.जगदीश गुप्ता, वि.प.स. याच्या तारांकित प्रश्न क्रमांक 13930 ला दिनांक 7 एप्रिल 2011 रोजी सभागृहात अनुपूरक प्रश्नोत्तरांच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे अधिकची माहिती छापावी.)

-------

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव ( क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, 2012 व "महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण, 2012" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : "महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, 2012 व "महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण, 2012" सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना एक मुद्दा मांडावयाचा होता, तो मुद्दा मांडण्यासाठी मी त्यांना परवानगी देत आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी काल ठाणे येथील महानगरपालिकेत गेलो होतो. त्या महानगरपालिकेतील प्रशासकीय अधिकारी अतिशय भीतीने काम करीत आहेत. त्याचे कारण असे आहे की, मागील आठवडयात ठाणे महानगरपालिकेच्या महापौरांनी तेथील मुख्य लेखा परीक्षक श्री.सत्यवान उबाळे यांना "माझ्या टेंडरचे जेवढे देयक आहे, तेवढे संपूर्ण देयक मला देण्यात यावे " अशा प्रकारचा दबाव आणला. संबंधित अधिकाऱ्यांनी खरी वस्तुस्थिती लिहिली. श्री.उबाळे यांनी महापौरांच्या म्हणण्याप्रमाणे अहवाल दिला नसल्यामुळे तुला भोसकून टाकू, जीवे मारु, अशा प्रकारच्या धमक्या महापौरांनी दिल्या. त्यामुळे तेथील प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. या गोष्टीकडे शासन गांभीर्याने पाहण्यास तयार नाही. ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री.आर.ए.राजीव यांनी शासनाकडे अहवाल पाठविला आहे की, अशा व्यक्ती विरुध्द कारवाई झाली पाहिजे, त्यांना सहा वर्षासाठी निलंबित केले पाहिजे. सदर अहवालाच्या अनुषंगाने देखील शासनाने कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. दलित अधिकाऱ्याला जीवे मारणे, भोसकून टाकीन, अशा प्रकारची धमकी दिल्यामुळे त्यांच्या विरुध्द कलम 307 चा गुन्हा दाखल केला पाहिजे. या प्रकरणी शासनाने तत्काळ कार्यवाही करणे गरजेचे आहे. माझी शासनास विनंती आहे की, या प्रकरणी लक्ष घालून तेथील प्रशासनाला अभय देण्याचे काम करावे, अन्यथा त्या ठिकाणी मोठा गोंधळ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांच्या मुद्दयाची नोंद घेण्यात आली आहे.

------------

3...



ABG/ ST/ D/ प्रथम श्री.अजित 12:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.**:पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील अजवली गावातील गोदामामध्ये डाळीचा सापडलेला अवैध साठा याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.अनिल देशमुख ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 35 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 9,40,50,500 क्विंटल धान्य बाजारपेठेत न पुरविता गोदामात साठवून ठेवले होते, ही बाब स्थानिक प्रशासनाच्या लक्षात कधी आली ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, दिनांक 6 जुलै, 2012 रोजी तपासणी अंती ही बाब लक्षात आली.

श्री.विनोद तावडे : नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन वाचल्यानंतर असे लक्षात येते की, राज्यात आदर्श घोटाळा, म्हाडा घोटाळा, सनदी अधिकाऱ्यांचा घोटाळा सुरु आहे. काही अधिकारी राज्यात प्रामाणिकपणे काम करीत आहेत. काही अधिकारी कामच करीत नाहीत.

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ ST/ 12:20

निवेदन क्र. 35 पुढे सुरु...

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, जे अधिकारी काम करीत नाहीत मग रायगड जिल्हयाचे जिल्हा पुरवठा अधिकारी असतील किंवा अन्य अधिकारी असतील, कंत्राटदार असतील त्यांच्यावर शासन काही कारवाई करणार आहे काय ? त्याचप्रमाणे जे अधिकारी चांगले काम करीत आहेत त्यांना पारितोषिक देणार काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, "होय".

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, निवेदनामध्ये 9 कोटी 40 लाख रुपयाचा माल आढळून आल्याचे म्हटले आहे. परंतु आज वर्तमानपत्रामध्ये 124 कोटी रुपयांचा माल मिळाला आहे अशी बातमी आली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी माहिती दडवून ठेवली किंवा चुकीची माहिती दिली त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, पनवेल,जि. रायगड येथील ही घटना आहे. 4 कोटी 89 लाख रुपयांचे धान्य मिळाले आहे. सदर प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून चौकशी चालू आहे.

--------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : ठाणे शहरात गणेशोत्सव व दहिहंडीच्या काळात मंडप उभारणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 19 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ठाणे शहरामध्ये महापालिका आयुक्तांनी गणेशोत्सव काळात रस्ते व्यवस्थित ठेवावेत या हेतूने परिपत्रक काढलेले आहे त्यासंदर्भातील हे निवेदन आहे. सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, मंडप घालायचा असेल अगर खांब रोवायचे असतील तर महापालिकेची परवानगी घ्यावी लागेल. मंडप उभारत असताना खड्डे पडणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. वेगवेगळया महापालिका शहराची देखभाल होण्याच्या दृष्टीने वेळोवेळी परिपत्रके काढीत असते. यासंदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. ठाणे महापालिका आयुक्तांनी 20.8.2011 रोजी जे आदेश दिलेले आहेत त्यासाठी महासभेची मान्यता घेण्यात आलेली नाही. एखाद्या मुद्यावर संपूर्ण शहरामध्ये समस्या असताना काही तोडगा काढावयाचा असेल तर लोकप्रतिनिधींशी चर्चा करावी लागते. याठिकाणी लोकप्रतिनिधींचे म्हणणे समजून न घेता आयुक्तांनी जो निर्णय घेतला आहे त्याला स्थगिती दिली जाईल काय ?

सभापती महोदय,उत्तरामध्ये शहरातील रस्त्यांवर खड्डे नाहीत असे वारंवार सांगितले आहे.तीनहात नाका, सर्व्हीस रोड या भागामध्ये खड्डे आहेत. त्यादृष्टीने विचार करता प्रशासन आयुक्तांवर गुन्हा दाखल करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. गणपती उत्सवाच्या निमित्ताने उभारले जाणारे मंडप आणि रस्त्यावर पडणारे खड्डे याबाबत आयुक्तांनी परिपत्रक काढले आहे आणि धोरणात्मक निर्णय जाहीर केला आहे. गणपती उत्सवामध्ये महापालिकेच्या आणि सरकारच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे आणि कुठेही मंडप उभारल्यामुळे नुकसान करण्याचा कोणी प्रयत्न केला आणि तशा प्रकारचे कृत्य होऊ नये म्हणून नियम लागू केलेले आहे. हे नियम केवळ गणपती उत्सवाकरिता लागू नाहीत. आयुक्तांच्या निर्णयाला स्थगिती देणार का असा प्रश्न विचारला गेलाआहे. संपूर्ण शहर खड्डेमुक्त करा अशी माननीय सदस्यांचीच भूमिका आहे. खड्डयांना प्रोत्साहन देण्याची कारवाई होऊ नये, त्यामुळे स्थगिती देण्याची आवश्यकता नाही. किंबहुना अशा प्रकारचे केले जाणार नाही याकरिता निर्णय घेतला पाहिजे. लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले नाही अशा प्रकारचा मुद्दा देखील उपस्थित करण्यात आला. खरे पाहता हे नियमित कामकाज आहे. रुटीन वर्क म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते.

यानंतर श्री. भोगले....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींची नियमितपणे सुरक्षा तपासणी होणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-32 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अग्निशमन प्रतिबंधक व जीव संरक्षक विहित साधने बसविण्यात येतील असे निवेदनात म्हटले आहे. या संदर्भात शासनाने कालबध्द कार्यक्रम निश्चित केला आहे काय? मंत्रालय इमारतीला आग लागल्यानंतर काय अवस्था झाली हे आपण प्रत्यक्ष पाहिले आहे. केवळ कार्यक्रम घोषित केला जातो आणि नंतर सर्व विसरुन जातो. तसे न होता कालबध्द वेळेत वेगळे अधिकारी नेमण्यात येतील काय किंवा वेगळा सेल निर्माण केला जाईल काय? 180 पात्र अनुज्ञप्तीधारक कोण आहेत? त्यांची शैक्षणिक अर्हता काय आहे? हा कार्यक्रम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी वेगळा सेल निर्माण केला जाईल काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, अशाप्रकारच्या एजन्सी या सर्व्हे आणि ऑडिट करणाऱ्या खाजगी संस्था आहेत. त्या टेक्नीकली फिट असल्या पाहिजेत. तशा प्रकारच्या एजन्सी तयार करण्याची क्षमता 60 होती, ती वाढवून 180 करण्यात आली आहे. अधिक एजन्सी सुध्दा निर्माण करण्याचे काम करावे लागेल. मंत्रालयाला लागलेल्या आगीनंतर डी.सी.रुल्सच्या शेड्युल्ड 1 आणि 2 मधील सब सेक्शन 3 (3) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अधिनियम, 2006चा स्पेशल ड्राईव्ह घेतला जाईल व आवश्यकता वाटल्यास माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार केला जाईल.

-------

..3..



**पृ.शी./मु.शी.**: मुंबई महापालिकेच्या सफाई कामगारांना कायमस्वरुपी
मोफत घरे मिळणे याबाबत श्री.रामदास कदम,
वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-41 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 12:25

निवेदन क्रमांक-32

श्री.रामदास कदम :सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी सफाई कामगारांसाठी 5 हजार घरे बांधण्याची घोषणा केली होती व त्यासाठी 300 कोटी रुपयांचे नियोजन केले होते अशी माझी माहिती आहे. या घोषणेची सद्य:स्थिती काय आहे हे मंत्री महोदय सांगतील काय? 8 वर्षापूर्वी मुंबई महापालिकेतील सफाई कामगारांना धारावी येथील संक्रमण शिबिरामध्ये हलविण्यात आले आहेत त्यांना आणखी किती काळ त्या ठिकाणी रहावे लागणार आहे? 6374 सेवा निवासस्थाने उपलब्ध असल्याचे निवेदनात म्हटले आहे. उर्वरित निवासस्थाने केव्हा उपलब्ध होतील?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मुलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. महापालिकेतील सफाई कामगारांच्या घरांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. मुंबई महापालिकेमध्ये 28018 सफाई कामगार कार्यरत आहेत. या क्षणापर्यंत महापालिका 6374 कर्मचाऱ्यांना घरे देऊ शकली आहे. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जी घोषणा केली होती त्याबाबतची वस्तुस्थिती काय आहे असा प्रश्न विचारण्यात आला आहे. मुंबईमध्ये आणि उपनगरामध्ये कन्स्ट्रक्शन करण्यासाठी जो एफ.एस.आय.दिला जातो तो मुंबईमध्ये जास्त आणि उपनगरामध्ये कमी आहे. म्हणून मुंबई महापालिकेच्या सफाई कामगारांच्या ज्या 38 वसाहती आहेत त्याचे एकूण क्षेत्रफळ 4 एकर आहे. त्यासाठी 4 एफ.एस.आय.मंजूर केला तर 269 चौ.फुटाची घरे सफाई कर्मचाऱ्यांना देता येतील. या योजनेला शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. तत्वत: मान्यता दिलेली असली तरी प्रत्यक्ष शहराच्या डी.सी.रुल्समध्ये तरतूद करावी लागेल. सेक्शन 37 अंतर्गत हरकती व सूचना मागवून शासनाकडे प्रस्ताव यावा लागेल. मुंबई महापालिकेने शासनाकडे अद्याप प्रस्ताव पाठविलेला नाही. शासनाने आजच महापालिकेला तातडीने प्रस्ताव दाखल करण्यास सांगितले असून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मान्यता देण्यात येईल.

सभापती महोदय, शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर आवास योजना सुरु केली आहे. आश्रय योजनेच्या अनुषंगाने 25 वर्षे सेवा झालेल्या सफाई कामगाराला किंवा सेवेमध्ये असताना मृत झालेल्या सफाई कामगारांच्या वारसांना कायमस्वरुपी मोफत घर देण्याची योजना यामध्ये अंतर्भूत आहे.

...5...

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सफाई कामगारांची इमारत पाडून तेथील कर्मचाऱ्यांना आठ वर्षापूर्वी धारावीतील संक्रमण शिबीरामध्ये हलविण्यात आले. त्यांना त्यांच्या मूळ जागेवरील इमारतीमध्ये केव्हा घरे दिली जातील? काही ठिकाणी बांधकाम करण्यामध्ये सी.आर. झेड.ची अडचण निर्माण झाली आहे, ती अडचण केव्हा दूर होईल आणि निधीची तरतूद केली जाईल काय?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ).........

माननीय गृहमंत्री यांनी यापूर्वी सभागृहामध्ये एका प्रश्नाला उत्तर देतांना असे सांगितले होते की, राज्यातील एकूण फरार झालेले कैदी 47 हजार इतके होते. परंतु त्यातील काही कैदी पकडले गेलेले आहेत. काही कैदी मरण पावलेले आहेत. काही कैद्यांचे दाखले घेण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे आता फरार कैदींची संख्या 12,000 इतकी आहे.

अध्यक्ष महोदय, पोलिसांनी केलेल्या अत्याचाराचा अतिरेक होत असल्यामुळे जेलमध्ये कैद्यांचा मृत्यू होत आहे.

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

अध्यक्ष महोदय, जेलमध्ये असणा-या कैद्यांना जेल मॅन्युअल नियम लागू करण्यात येत आहेत की नाही ? जेलमधील निम्मे कैदी दवाखान्यात असतात. कैद्यांच्या छातीत, पोटात दुखू लागल्याकारणाने त्यांना दवाखान्यामध्ये भरती करण्यात येते.जेलमधील कैदी सिव्हील हॉस्पीटलमध्ये एक महिना, तीन महिने व सहा महिन्यांकरिता उपचार घेण्याकरिता भरती झालेले असतात. हे सर्व सिव्हील सर्जन आणि जेलमधील पोलीस यांच्या संगनमताने चालू आहे, असे वाटते. जे कैदी खरोखर आजारी आहे, त्यांना जेलमध्ये डांबून ठेवण्यात येते. जे कैदी आजारी नसून ढोंग करीत आहेत, त्यांना मात्र एक ते सहा महिन्यांकरिता दीर्घ उपचाराकरिता जिल्हा रुग्णालयामध्ये भरती होण्याकरिता परवानगी दिली जाते.

अध्यक्ष महोदय, भडगांव तालुक्यामध्ये ही जी घटना घडलेली आहे,ती चिंतन करण्यासारखी आहे. या घटनेसंदर्भात शासनाच्या गृह विभागाची चौकशी होत राहील परंतु राज्यासमोर जेलमधील कैद्यांच्या सुरक्षिततेे विषयी प्रश्न उभा राहिलेला आहे, त्याचे काय ? जेलच्या बाहेरही आज नागरिक सुरक्षित नाहीत. आज राज्यामध्ये अशी परिस्थिती आहे की, घरेदारे, मालमत्ताही सुरक्षित राहिलेली नाही. शासनाच्या गृह विभागाच्या ताब्यात आलेले कैदीही सुरक्षित नाहीत. जेलमधील कैदीही आत्महत्या करीत आहेत. भडगाव येथील जेलमधील कैद्याच्या मृत्यूची सीआयीडी मार्फत चौकशी करुन काही निष्पन्न होईल, असे मला वाटत नाही. सीआयडीमार्फत चौकशी होत असतानां पोलीसच पोलिसांची चौकशी करतील, यामधून काही महत्वाची माहिती समोर येईल, असे वाटत नाही.

.....2

श्री.एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ).........

अध्यक्ष महोदय, विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु असतांनाही अशा प्रकारच्या घटना या राज्यामध्ये घडत आहेत. याचा अर्थ असा होतो की, विधिमंडळ अधिवेशनाचाही धाक राहिलेला नाही. सरकारच्या यंत्रणेचा धाक आता राज्यामधील जनतेला, गुन्हेगांराना व पोलीस अधिका-यांना राहिलेला नाही. " हम करे सो कायदा " आम्हाला वाचविणारे व आमचे संरक्षण करणारे लोक वरपर्यंत बसलेले आहेत. अशा भावना जर बळावत चालल्या तर भविष्यकाळामध्ये राज्याची कायदा व सुव्यव्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याशिवाय राहणार नाही. या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी. अशा प्रकारचे आदेश शासनाच्या माध्यमातून तातडीने निर्गमित होणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ प्रथम श्री.सांगळे......... 13:20

श्री.विजय शिवतारे ( पुरंदर ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चिमणराव पाटील यांनी या सभागृहामध्ये जी स्थगन प्रस्तावाची सूचना मांडलेली आहे, त्यावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, स्थगन प्रस्तावावरील चर्चेदरम्यान अतिशय महत्वाचा मुद्दा शासनासमोर आलेला आहे. गुन्हे प्रकटीकरण करण्याकरिता गृह विभागाच्या पोलीस अधिका-यांना व कर्मचा-यांना जे प्रशिक्षण दिले जाते, ते प्रचलित गुन्हयांच्या स्वरुपांच्या अनुषंगाने दिले जात आहे का ? याचा शासनाने विचार करणे आवश्यक आहे. पोलीस अधिकारी व कर्मचारी आजकाल मारपीट व दहशतीचा आधार घेऊन गुन्हे प्रकटीकरण करीत असतात. मानसशास्त्रीय पध्दतीने गुन्हेगाराला विश्वासात घेऊन त्यांच्याकडून माहिती काढून घेण्याचे प्रशिक्षण पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना देणे आवश्यक आहे. राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था ख-या अर्थाने नीटपणे सांभाळण्याकरिता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाते का ? पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना अद्ययावत मानसशास्त्रीय शिक्षण देण्याकरिता एखादी यंत्रणा शासनाच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे का ? हे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये सांगावे.

यानंतर श्री.सोनावणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, तलाठयाकडे जमिनीचे संपूर्ण रेकॉर्ड असते व त्याच्या जवळचे रेकार्ड गृहीत धरुन आपण काम करीत असतो. असे असतांना कर्नाटका "एम्टा" पॉवर कंपनीने 2003, 2006 व 2009 या तीन वर्षाच्या टप्प्यामध्ये जमिनीचे अधिग्रहण केले. जमिनीचे अधिग्रहण केल्यानंतर तलाठयाला किंवा तहसीलदाराकडे रेकॉर्ड दुरुस्त करुन नोंद दुरुस्त करण्याच्या संदर्भात नोंद घेण्यात आली होती काय ? आपण अशा खाणींसाठी ज्या जमिनी अधिग्रहीत करुन देतो त्यातील सर्वच जमीन कोळसा खाणीवाले घेत नसतात. एखादी जमीन आता घेतो व बाकीच्या जमिनी नंतर घेतो असे ते सांगत असतात. अशा पध्दतीच्याही चुका या ठिकाणी झालेल्या आहेत हे खरे आहे काय ? ज्या तलाठयाकडे सदर रेकॉर्ड होते त्याच तलाठयाने सदर प्रकरणाच्या संदर्भात तक्रार केली असतांना तक्रार करणाऱ्यालाच निलंबित करणे चुकीचे आहे. त्यामुळे सदर तलाठयाला रिइन्स्टेट केले जाणार आहे काय ? सदर तलाठयाने एसडीओ आणि कलेक्टरांवर आरोप केले होते, खणिकर्म अधिकाऱ्यांच्या विरोधात तक्रार केली होती. ज्यांनी गैरव्यवहार केले होते त्यांच्यावर कारवाई न करता तक्रार करणाऱ्या तलाठयालाच निलंबित केले गेले त्यामुळे सदर तलाठयाला परत सेवेत घेतले जाणार आहे काय ? जमिनीच्या नोंदणी 7/12 च्या उताऱ्यावर करण्यात आल्या होत्या काय ? एका जमिनीच्या भागामध्ये एकंदर किती प्लॉट घेण्यात आले होते ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सर्व्हे नंबर 356/2, 348, 354, 359 व 368 मध्ये जागा देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, यासंदर्भात परवानगी घ्यावयास पाहिजे होती ती घेतली आहे की, नाही ही बाब निश्चितपणे तपासून घेतली जाईल. 7/12 मध्ये नोंद आहे की, नाही याची खात्री करण्यात येईल. 2009 मध्ये माईनींग लिजचे काम ज्या कंपनीला देण्यात आले होते त्या कंपनीकडे सदर जमीन दिली होती अशी माहिती रेकॉर्डवर आहे. आपण म्हटल्या प्रमाणे मी आपल्या मताशी सहमत आहे. रेकॉर्डवर असलेल्या जमिनीच्या व्यतिरिक्त जमिनीवर उत्खनन झालेले आहे काय ही बाब 7/12 उताऱ्यावरुन तपासली जाईल.

सभापती महोदय, तलाठी श्री. विनोद खोब्रागडे यांना या प्रकरणावरुन निलंबित करण्यात आले नसून त्यांचे निलंबन वेगळया कारणास्तव झालेले आहे. गंभीर अनियमिततेच्या प्रकरणी उप विभागीय अधिकारी, वरोरा यांनी दि. 13.7.2012 रोजी निलंबित केले होते. त्यांचे निलंबन या प्रकरणाशी संबंधित नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सूचनेमध्ये म्हटले आहे की, श्री. विनोद खोब्रागडे, तलाठी बरांज यांना वरोरा येथे तसेच बरांज मोकासा येथे दप्तराचा कार्यभार असतांना त्यांनी शासकीय कामकाजात केलेल्या गंभीर अनियमततेच्या अनुषंगाने अन्य प्रकरणी उप विभागीय अधिकारी, वरोरा यांनी निलंबनाची कारवाई केलेली आहे." त्यामुळे श्री. खोब्रागडे यांना याचवेळी निलंबित का केले ? या ठिकाणी जी काही माहिती देण्यात आलेली आहे ती देण्याची काही सुध्दा गरज नव्हती.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस ज्या पध्दतीने या प्रकरणाच्या संदर्भात विचार मांडत आहेत त्यासंदर्भात आपल्याला जर पुन्हा चौकशी करता येत असेल तर जरुर करावी. संबंधित तलाठयावर अन्याय झालेला आहे असे दिसून आले तर संबंधिताला कशी मदत करता येईल ते पहावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तलाठी मीडियाकडे गेला व सदर प्रकरण उघडकीस आणले असा उल्लेख नोटीस मध्येच करण्यात आलेला आहे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या प्रकरणात श्री. खोब्रागडे यांना जर निलंबित करण्यात आले असेल तर ते निलंबन मागे घेण्याची कारवाई निश्चितपणे करु परंतु अन्य प्रकरणात त्यांचे निलंबन झाले असेल तर त्यासंदर्भातील जबाबदारी मी घेऊ शकणार नाही. या प्रकरणात त्यांचे निलंबन झाले असेल तर निश्चितपणे फेर विचार करण्यात येईल.

----

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 46 अन्वये निवेदन**

**पृ.शी.**: विदर्भ एक्सप्रेसची घसरलेल्या कसारा लोकलला धडक बसणे

**मु.शी.**: विदर्भ एक्सप्रेसची घसरलेल्या कसारा लोकलला धडक बसणे यासंबंधी माननीय परिवहन मंत्र्यांचे निवेदन.

श्री. गुलाबराव देवकर ( परिवहन राज्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

**(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)**

-----

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना 3-4 वर्षापासून शिष्यवृत्तीची रक्कम न मिळणे

**मु.शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना 3-4 वर्षापासून शिष्यवृत्तीची रक्कम न मिळणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते,विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासनाच्या वतीने इयत्ता 4 थी व इयत्ता 7 वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन होणे, गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून शिष्यवृत्ती मिळणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीस पात्र असणे, गेल्या 3-4 वर्षातील शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडून प्राप्त होऊनही संबंधित विद्यार्थ्यांना अदा न होणे, शिक्षण विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी आलेली रक्कम विद्यार्थ्यांना अदा न करता बॅकेतून काढणे व या निधीचा अपहार करणे, जिल्हा प्रशासनाने व वरिष्ठ कार्यालयाने पालकांच्या तक्रारीची दखल न घेणे, गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणे, पालकांमध्ये व शिक्षकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

प्रा.फौजिया खान (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना सूचना आहे की, आजच्या लक्षवेधी सूचनांवर आपण फक्त एक-दोन प्रश्न विचारावेत. कृपया, सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न डेव्हलप करू नये.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना गेल्या 3-4 वर्षापासून शासनातर्फे देण्यात येणारी शिष्यवृत्ती मिळालेली नाही. त्या संबंधातील ही लक्षवेधी सूचना आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही हे शासनाने मान्य केले आहे. गेल्या चार वर्षापासून जवळ जवळ 988 विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित आहेत. शिष्यवृत्तीच्या रकमेचा अपहार झालेला आहे हे देखील शासनाने मान्य केले आहे. या संबंधातील चौकशी सुरू आहे, असे देखील शासनाने सांगितले आहे. हा अत्यंत गंभीर विषय आहे. विद्यार्थी स्पर्धा परीक्षेला बसून शिष्यवृत्तीधारक होतात. अशा विद्यार्थ्यांना शासन शिष्यवृत्ती देते. पण अधिकारी व शासनाच्या कार्यालयांकडून त्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही. यात निधीचा अपहार झालेला आहे. शिष्यवृत्तीचे हे एकच प्रकरण आहे. अनेक विषय आहेत. हे हिमनगाचे टोक आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे या संपूर्ण प्रकरणाची शासनाच्यावतीने सखोल चौकशी करण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या संबंधातील लक्षवेधी सूचना आहे. इयत्ता चौथी व सातवी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. सन 2010 पूर्वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रोख रक्कम देण्याची पद्धत होती. 2010 नंतर विद्यार्थ्यांच्या अकौंट मध्ये रक्कम जमा करण्याची पद्धत सुरू करण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एज्युकेशन ऑफिसरने बँक अकौंटमध्ये रक्कम ठेवली होती. पण लेखा परीक्षणाच्या वेळी सदर रकमेचा ताळमेळ लागत नव्हता. त्यामुळे सी.ई.ओ.यांनी कॅफोंना प्राथमिक चौकशी करण्यास सांगितले. प्राथमिक चौकशीमध्ये रूपये 3,85,156/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे उघडकीस आले आहे. ओरस पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदविण्यात आली असून संशयित आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री.एकनाथ बाळकृष्ण बिले यांना पोलीस व न्यायालयीन कोठडी मिळाली होती. आता त्यांना बेल मिळाला आहे. श्री.प्रसाद चंद्रकांत केसरकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

हे फरार आहेत. तसेच, एज्युकेशन ऑफिसरची देखील चौकशी होत आहे. ते सेवानिवृत्त झालेले आहेत. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले होते. त्यांची आज देखील चौकशी सुरू आहे. 988 विद्यार्थी हे शिष्यवृत्ती पासून वंचित झाल्याचे आढळून आले आहेत. त्यांना शिष्यवृत्तीची रक्कम ताबडतोब वितरित करण्यासंबंधीचे आदेश देण्यात आलेले आहेत.

........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मत्स्यव्यावसायिकांना राज्य व केंद्र शासनाच्या योजनेतून देण्यात येणारे कर्जाचे प्रस्ताव 4-5 वर्षापासून प्रलंबित असणे.

**मु.शी.** : मत्स्यव्यावसायिकांना राज्य व केंद्र शासनाच्या योजनेतून देण्यात येणारे कर्जाचे प्रस्ताव 4-5 वर्षापासून प्रलंबित असणे या संबंधी श्री.राजन तेली, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्याच्या मत्स्यव्यावसायिकांना चालना मिळण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या योजनेतून देण्यात येणाऱ्या कर्जाचे प्रस्ताव मागील 4-5 वर्षापासून त्या-त्या वेळच्या किंमती प्रमाणे राज्य शासनामार्फत एनसीडीसी (पुणे) कार्यालयाकडे सादर झालेले असून मंत्रालयीन अधिकारी वर्गाच्या दप्तर दिरंगाईमुळे वर्षानुवर्षे सदर प्रकरणे प्रलंबित राहणे, तथापी नवीन किंमतीच्या निविदा देऊनही सदर प्रस्तावाची कर्जे मंजूर करताना गत 4-5 वर्षापूर्वीचे निविदामूल्यांप्रमाणे प्रस्ताव मंजूर करणे, परिणामी लाभार्थी मत्स्यव्यवसायी सहकारी संस्थाना अतिरिक्त स्वभांडवलातून प्रकल्प उभारणीसाठी खर्च करावे लागण्याची निर्माण झालेली गरज; सिंधुदुर्ग भद्रकाली मत्स्यव्यवसायी सहकारी संस्थेने नवीन निविदा सादर करुनही जुन्या दरानुसार कर्जे मंजूर करण्यात आल्यामुळे 4 ते 4.5 लाखाचा आर्थिक तोटा सोसण्याचा अलिकडेच निदर्शनास आलेला प्रकार, सदर मत्स्यव्यवसायिकांनी सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांना प्रकल्प उभा करणे अशक्यप्राय होणे, राज्यातील सर्वच मत्स्यव्यावसायीक संस्थांना पुरेशा निधी अभावी प्रकल्प पूर्ण होणार नसल्याची निर्माण झालेली भीती, मत्स्यव्यावसायिकांमध्ये पसरलेला तीव्र संताप याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..5

श्री.भास्कर जाधव (मत्स्य व्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, मच्छीमारांच्या दृष्टीने महत्त्वाची अशी लक्षवेधी सूचना आहे. ही लक्षवेधी सूचना मागच्या वेळी देखील आली होती. त्यामुळे आपण मला प्रश्न विचारण्यास थोडा अधिक वेळ द्यावा ही विनंती.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कितीही महत्त्वाचा विषय असला तरी सभागृहाचे माननीय नेते, माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षांचे गट नेते यांनी निर्णय घेतला आहे की, आज कामकाज जास्त असल्यामुळे लक्षवेधी सूचनेवर फक्त दोनच प्रश्न विचारण्यास अनुमती द्यावी.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगला प्रयत्न केला आहे. माझा असा प्रश्न आहे की, भद्रकाली मिशनरी सोसायटी आहे. तसेच 2008 चा प्रस्ताव अद्यापही मंजूर झालेला नाही. टँकरसाठी निधीची मागणी केली होती. मात्र आपण त्यांना निम्मा म्हणजे 3 लाख 50 हजार रुपयांचा हप्ता दिला. मार्केटमध्ये कोणतीही गाडी घ्यावयाची असेल तर सगळे पैसे त्यांना द्यावे लागतात. आज 2012 सुरु झाले तरी अजून बाकीचा निधी मिळालेला नाही. उदाहरणादाखल या एका प्रस्तावाबाबत मी सांगितले. पण मच्छीमारांचे अनेक प्रश्न आहेत, मग ते बर्फाच्या संदर्भात असतील किंवा गाड्यांच्या संदर्भात असतील. अशा प्रकारे एकंदर जवळजवळ 210 कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे आणि आपल्या विभागाला 42 कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे. यामुळे कोकणातील सर्व प्रस्ताव वर्षानुवर्षापासून पेंडींग आहेत. ते प्रकल्प कधी पूर्ण होणार आहेत हा माझा पहिला प्रश्न आहे.

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आज भारत पेट्रोलिअमने मच्छीमारांना सूचना दिल्या आहेत की, तुम्हाला डिझेलचा कोटा मंजूर झालेला आहे तेथे एन.ए.असणे आवश्यक आहे. ती जागा सीआरझेड मध्ये येते.परंतु आता त्या लोकांना एन.ए.करणे शक्य नाही, नाहीतर डेपो बंद केला जाईल. असे झाले तर शासन म्हणून आपण याबाबतीत काय करणार आहात? तसेच डिझेल परताव्याच्या संदर्भात फायनान्स विभागाने अडचण निर्माण केलेली आहे. पण परताव्याची रक्कम व्यक्तिगतरित्या नॅशनलाईज बँकेमध्ये जमा होते. त्या ठिकाणी सोसायट्या असतात त्या संबंधितांना डिझेलसाठी कर्ज देतात, जाळया देतात. परंतु सध्या त्याठिकाणी अडचण निर्माण झालेली आहे. त्यामुळे डिसेंबरपासून पुढील पाच महिने पैसे वितरित झालेले नाहीत. हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी आपण नेमके काय करणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाबाबत सातत्याने पाठपुरावा केलेला आहे.एन.सी.डी.सी.ची प्रकरणे असतील ज्याला केंद्र शासन 80 टक्के रक्कम देते.सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन मूलभूत प्रश्न विचारलेले आहेत.पहिला प्रश्न सिंधुदुर्ग भद्रकाली मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे आणि ते अशासाठी की, एन.सी.डी.सी.चा प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार केंद्र शासनाला आहेत. केंद्र शासन त्या साठी 80 टक्के निधी देत असते. पहिल्यांदा महाराष्ट्र शासनाने निधी द्यावयाचा असतो आणि नंतर केंद्र शासन त्याचा परतावा देत असते. परंतु आपण जेव्हा प्रस्ताव करतो, त्यावेळी त्या वस्तुची, प्रोजेक्टची किंमत कमी असते आणि जेव्हा प्रत्यक्षात प्रस्तावाला मंजूरी मिळते. तेव्हा त्याची खूप ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . ..

मोठ्या प्रमाणात किंमत वाढते म्हणून मधल्या फरकाची रक्कम कोणी द्यावयाची असा प्रश्न निर्माण होतो. आपण यासाठी केंद्र सरकारकडे विनंती केलेली आहे. पण हा संपूर्ण देश पातळीवरील प्रश्न असल्यामुळे आणि विशेष करुन मच्छीमारांशी संबंधित प्रश्न असल्यामुळे राज्य शासनाने या बाबतीत स्वत: पुढाकार घ्यावा यासठी प्रयत्न केले जातील.

सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे भद्रकाली संस्थेला साडेतीन लाख रुपये दिले. साडेतीन लाखामध्ये काय येणार? खरे म्हणजे त्यामुळे कोकणातील संस्थांना मदत होईल. भद्रकाली संस्थेच्या प्रस्तावाला 31 मार्च रोजी मान्यता मिळाल्यानंतर त्याच दिवशी वर्कऑर्डर दिल्यामुळे निधी उपलब होऊ शकला नाही. म्हणून पुढील वर्षी त्याची तरतूद केलेली आहे. पण सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ती वस्तुस्थिती आहे की, कोणत्याही वाहनाच्या बाबतीत 55 टक्क्याचा पहिला हप्ता देतो. त्यानंतर 25 टक्के हप्ता सोडतो अशी पध्दत असल्यामुळे एखादे वाहन घ्यावयाचे असेल तर हप्त्याने रक्कम सोडून वाहन घेता येत नाही. अशा संस्थेसमोर वेगवेगळया अडचणी आहेत. सदनामध्ये संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांच्या दालनामध्ये बैठक घेण्यात आली आहे आणि यातील जे काही प्रश्न आहेत ते मार्गी लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण त्यात काही व्यावहारिक अडचणी येतात, त्या दूर करण्यासाठी या संदर्भात निर्णय घेता येईल.

सभापती महोदय, डिझेलच्या प्रस्तावाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी काय सांगितले ते लक्षात आले नाही. यापूर्वी डिझेल परताव्यासाठी शासनाकडे लावे लागत असे पण आता ते अधिकार जिल्हाधिकऱ्यांना देण्यात आले होते.

(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

परंतु आता संस्थेलाच डिझेल परताव्याचे अधिकार दिले असल्यामुळे त्यामध्ये काही अडचण आहे असे मला वाटत नाही. जर काही अडचण असेल तर सन्माननीय सदस्यांनी सांगावे. डिझेल स्टोअर करण्याकरिता ज्या टॅन्क बांधल्या जातात त्या सीआरझेडच्या हद्दीमध्ये बांधू नयेत असा एक नवीन अडचणीचा मुद्दा निर्माण झाला आहे. मच्छीमारांना जर डिझेल द्यावयाचे असेल तर ते किनाऱ्यावरच द्यावे लागेल. म्हणून पर्यावरण विभागाशी चर्चा करुन त्यामधून निश्चितपणे मार्ग काढण्याची हमी मी या ठिकाणी देतो.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 2008 सालापासून आतापर्यंत किती प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत आणि जे प्रस्ताव जुन्या दराने प्राप्त झालेले आहेत ते नवीन दराने प्राप्त करण्यासाठी आपण त्यांना संधी देणार का ? ते प्रस्ताव मंजूर करण्यासाठी किती कालावधी लागेल ? मागच्या अधिवेशनात आपण सांगितले की, सबसिडीचे रॉकेल देण्याचा शासनाचा विचार आहे. या बाबत गेल्या अधिवेशनानंतर काय निर्णय झाला ? मत्स्यदुष्काळामुळे मच्छीमार अडचणीत असल्यामुळे त्यांचे व्याज माफ करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेईल का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या क्षणापर्यंत आमच्या मत्स्य व्यवसाय विभागाकडे, केंद्र सरकार पासून राज्य सरकार पर्यंत वेगवेगळ्या टप्प्यावर, मग ते सोसायटीच्या पातळीवर असतील किंवा जिल्हा पातळीवर असतील, अशी 714 प्रकरणे आमच्याकडे प्रलंबित आहेत. नुकतेच एनसीडीसीची मान्यता मिळालेले 200 प्रस्ताव आहेत आणि या व्यतिरिक्त 714 प्रस्ताव आमच्याकडे वेगवेगळ्या ठिकाणी प्रलंबित आहेत. आता अर्ज स्वीकारणे यासाठी बंद करण्यात आले आहे की, पूर्वीच्या प्रस्तावांची टक्केवारी मध्ये वेगवेगळ्या हप्त्यांमध्ये जी रक्कम देतो ती रक्कम आधी पूर्ण करावी. त्यांना पूर्ण न देता सर्वांनाच अर्धवट स्थितीत ठेवण्याऐवजी पहिल्यांदा त्या प्रस्तावाच्या 55 टक्के, 25 टक्के आणि 10 टक्के अशा पूर्ण रकमा देऊन मग पुढच्या प्रस्तावांना मान्यता घ्यावी. आतापर्यंत 20 ते 22 कोटी रुपयांपर्यंत आपल्याला राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात रक्कम मिळत होती. या वर्षी 42 कोटी रुपये एवढी रक्कम मिळालेली आहे. पुरवणी मागण्यांवर ती रक्कम वाढविण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी या मच्छीमारांकरिता रॉकेलचा

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

कोटा मंजूर करणार असे आश्वासन दिले होते त्या संदर्भात तिसरा प्रश्न विचारला. सभागृहात तसे आश्वासन दिले होते आणि त्याप्रमाणे केंद्र शासनाने त्यांना हा कोटा मंजूर केलेला आहे. त्यांची मागणी येऊ द्या. मागणी आल्यानंतर सबसिडीचाही प्रश्न निर्माण होणार आहे. तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर राज्य शासनाकडे निश्चितपणे पाठपुरावा करण्यात येईल.

सभापती महोदय, व्याज माफीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. सोसायटी स्थापन झाल्यानंतर सोसायटीमधील एखाद्या सदस्याने जरी पैसे भरले नाहीत किंवा कर्ज भरले नाही तरी बाकीची संपूर्ण सोसायटीच अडचणीत येते ही बाब आमच्या लक्षात आलेली आहे. म्हणून मागच्या किती वर्षापासून लोकांचे एकंदरीत देणे थकीत आहे याची आकडेवारी तयार करण्यास माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी सांगितले आहे. त्या संदर्भामध्ये कट ऑफ डेट ठरवून सर्व मच्छीमारांचे एकाच वेळला ते कर्ज वन स्ट्रोकमध्ये माफ करता येईल का याचा प्रस्ताव घेऊन आम्हाला दिल्लीला बोलविले आहे. त्या संदर्भामध्ये आम्ही पाठपुरावा करीत आहोत.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या योजना राबविण्याची आवश्यकता

**मु. शी.**: राज्यात 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या योजना' राबविण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, अनिल भोसले, रमेश शेंडगे, हेमंत टकले, अरुण गुजराथी, सतीश चव्हाण, दीपकराव साळुंखे, सर्वश्रीमती विद्या चव्हाण, दिप्ती चवधरी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयवंतराव जाधव ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या' ही योजना राबविण्याबाबत शासनाचा असलेला प्रस्ताव, या योजनेसाठी सुमारे ५०० कोटी रूपये खर्च प्रत्येक वर्षी अपेक्षित असणे, मुलगी जन्मल्याबरोबर तीच्या नावाने बँकेत अथवा विमा कंपनीकडे विशिष्ट रक्कम जमा करून मुलगी १८ वर्षाची झाल्यानंतर तीला १ लाख रुपये पुढील शिक्षणासाठी उपलब्ध करून देणेबाबत ही योजना असणे, मात्र ही योजना स्थगित करण्याचा शासनाने नुकताच घेतलेला निर्णय, राज्यातील मुलींचे प्रमाण कमी होत असलेच्या पार्श्वभूमीवर ही योजना तातडीने सुरू करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. वर्षा गायकवाड ( महिला व बाल विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, अतिशय उत्कृष्ट समाजोपयोगी असलेली ही योजना राज्य शासन सुरु करीत आहे. आम्हाला आनंद आहे की, अतिशय कोमल मनाची आणि कणखर नेतृत्व असलेली आमची भगिनी या खात्याचे नेतृत्व करीत आहे. सदर योजना शासनाच्या विचाराधीन आहे असे उत्तर अनेक दिवसापासून आम्हाला दिले जात आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, विचाराधीन असलेली योजना विचार होऊन नक्की कधी कार्यान्वित होणार, त्याचा कालावधी काय असणार ?, स्त्री भ्रूणहत्या बंद व्हावी आणि बालिकांचा दर वाढावा असा सदर योजना सुरु करण्याचा हेतू आहे. या ठिकाणी निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, सदर योजना प्रायोगिक तत्वावर फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांकरिता केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

त्यामुळे मला येथे नमूद करावेसे वाटते की, अनुसूचित जाती व जमातींपैकी अनुसूचित जातीच्या लोकांमध्ये हुंडा पध्दत कमी आहे. अनुसूचित जमातींमधील मुलींची संख्या 79,094 एवढी आहे आणि अनुसूचित जातींमधील मुलींची संख्या 50,166 एवढी आहे....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, अनुसूचित जमातीच्या मुलींची संख्या जास्त आहे. बी.पी.एल.च्या लोकांना ही योजना लागू केलेली आहे. ही योजना राज्यातील सर्व मुलींना लागू केली जाईल काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहातील एका कोपऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या काही ठराविक सन्माननीय सदस्यांचे मन कोमल झालेले आहे की काय असे मला वाटत आहे. या सभागृहात दोन दिवसापासून वेगळे वातावरण तयार झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी माधुरी दीक्षितला एका कार्यक्रमाच्या निमित्ताने पुण्यात आणल्यापासून सभागृहातील वातावरण एकदम बदलले आहे. सभापती महोदय, पुण्याशी आपलाही संबंध आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या ही योजना बी.पी.एल.च्या... (अडथळा) ही योजना आम्ही कॅबिनेटसमोर घेऊन जाणार आहोत. याबाबतची फाईल वित्त विभागामध्ये आहे. त्यानंतर ती फाईल कॅबिनेटसमोर येईल....

श्री.दिवाकर रावते : या योजनेची फाईल सन्माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांनी अडवून ठेवलेली आहे. हे राज्याला शोभणारे आहे काय ?

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**उप सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : या योजनेची फाईल सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अडविली आहे हे बरोबर आहे काय, याबाबतची माहिती सभागृहाच्या रेकॉर्डवर आलेली आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन राज्य करीत असताना अशा प्रकारे फाईल अडवून ठेवणे त्यांना शोभते काय ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**उप सभापती** : मी आता चौथी लक्षवेधी सूचना पुकारतो.

( गोंधळ )

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी या लक्षवेधी सूचनेला उत्तर देत आहे.

**उप सभापती** : मी आता चौथी लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी कृपया खाली बसावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, राज्याच्या मुलींच्या दृष्टीने ही महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. त्यासंबंधीच्या महत्वाच्या निर्णयाची माहिती मंत्री महोदया देत आहेत. त्यामुळे आपण त्यांना उत्तर देण्याची परवानगी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांची कामकाज करण्याची इच्छा दिसत नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटापर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.59 ते 1.09 पर्यंत स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगिती नंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**पृ. शी.** : म्हाडाने घरांच्या किंमतीमध्ये केलेली वाढ

**मु. शी.** : म्हाडाने घरांच्या किंमतीमध्ये केलेली वाढ यासंबंधी श्री. दिवाकर रावते,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"म्हाडाने मे, २०११ मध्ये काढलेल्या घरांच्या सोडतीला मुंबईतील मालवणी मालाड येथील अल्प उत्पन्न गटातील २ हजार ६३२ घरांची किंमत प्रत्येकी २ लाख ४० हजार ५०० रुपयांनी आणि पवईमधील उच्च उत्पन्न गटातील ११० घरांची किंमत तब्बल १५ लाख रुपयांनी वाढविण्याचा निर्णय माहे मे, २०१२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास घेण्यात येणे, सदरहू उत्पन्न गटातील तयार घरांच्या किंमती वाढविण्याचा निर्णय अवास्तव असल्याने सदरहू सोडत विजेत्यांनी उक्त वाढीव रक्कम न भरण्याचा घेतलेला निर्णय, शासनाच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने फेर विचार करुन तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : म्हाडाच्या घरांची किंमत ठरल्यानंतर त्या घरांची सोडत काढण्यात आली,लोकांना घरे देण्यात आली. नंतर अचानक घरांच्या किंमती वाढविण्यात आल्या. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, सुरुवातीला एस अधिक 7 मजल्यांचे काम करण्यास मंजुरी मिळाली. आपण सदनिका बांधल्या. त्या नंतर टीडीआर घेतला. टीडीआर घेतल्यामुळे जमिनीची किंमत वाढत नाही. उलट वरच्या काही मजल्यांच्या बांधकामाची किंमत वाढते. ती किंमत खालच्या मजल्यापेक्षा 5 टक्के किंवा 10 टक्क्यांनी जास्त असते. टीडीआरमुळे सदनिकांची किंमत न वाढता उलट ती कमी व्हायला पाहिजे. तेव्हा सदनिकांची ही वाढविलेली किंमत अयोग्य आहे असे माझे मत आहे. 8 ते 14 मजल्यांसाठी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. सीसीचा आणि बांधकामाच्या किंमती वाढण्याचा काही संबंध नाही. हा तांत्रिक भाग आहे. सीसी मिळण्यास उशीर झाल्यामुळे बांधकामाचा खर्च वाढला असे जे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे ते चुकीचे आहे. म्हाडाने आर.जी.साठी टीडीआर घेतला, झोपड्या काढल्या. झोपड्या काढण्यासाठी विलंब झ ााल्यामुळे सदनिकांच्या किंमती कशा वाढतात हे मी समजू शकत नाही. सदनिकांच्या किंमती वाढण्यासंबंधी जी कारणे म्हाडाने दिलेली आहेत ती बरोबर वाटत नाहीत. या सदनिकांची जी किंमत वाढविलेली आहे ती समर्थनीय होऊ शकत नाही, ती किंमत अयोग आहे असे आमचे म्हणणे आहे. याबाबत शासनाचे म्हणणे काय आहे ?

श्री. सचिन अहिर : निवेदनामध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. महानगरपालिकेच्या धोरणानुसार विकास सुविधा अंतर्गत एफएसआय मिळत होता आणि तो एफएसआय मिळेल हे गृहीत धरुन 14 माळयाची इमारत पवई येथे प्रपोझ केली. परंतु महानगरपालिकेकडे प्रस्ताव गेल्यानंतर महानगरपालिकेने या सुविधांचा एफएसआय देता येणार नाही असे सांगितले. त्यानंतर विशेष बाब म्हणून शासनाची परवानगी मागण्यासाठी ती फाईल नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आली. नगरविकास विभागाने जास्तीचा एफएसआय देता येणार नाही असे सांगितले. म्हणून नाईलाजास्तव आम्हाला टीडीआर घ्यावा लागला. टीडीआरची कॉस्ट त्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. 1991 ते 2012 पर्यन्त या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये जी वाढ झालेली आहे ती वाढ वाढीव किंमतीमध्ये धरली गेली नव्हती. म्हाडाच्या नियमाप्रमाणे सदनिकेची अंतिम किंमत सदनिकाधारकांना कळविण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे आपण शेवटी ही रक्कम सदनिकाधारकांना कळविलेली आहे.

..3..



MSS/ D/ KTG/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

एस्कलेशनची किंमत, टीडीआरची किंमत धरुन ही किंमत सदनिकाधारकांना कळविलेली आहे. या संदर्भात काही निवेदने मला प्राप्त झालेली आहेत. आपण या वाढीव किंमती बाबत अगोदर कळविले असते तर त्यांना कर्ज घेण्यासाठी उपयोग झाला असता. शेवटचा हप्ता भरण्याबाबत काही मुदत वाढवून देता येईल का याचाही विचार करण्यात येईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : पुण्यातील पीएमपीएलला डेपोसाठी जागा उपलब्ध करुन

देण्याची आवश्यकता

**मु. शी.** : पुण्यातील पीएमपीएलला डेपोसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता यासंबंधी श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शहरांची लोकसंख्या, आणि शहरातील सार्वजनिक वाहतुकीसाठी बसेसची संख्या याबाबत आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे पुणे व पिंपरी चिंचवड या महानगरासाठी २५०० बसेस पेक्षा अधिक बसेसची आवश्यकता असताना पीएमपीएलकडे केवळ १७२० बसेस असणे, त्यातही मालकीच्या १४६० व भाडेतत्वावरील ३२७ बसेस असणे, वाहक चालकांअभावी त्यातील २०० बसेस रस्त्यावरच येत नसणे, सर्वसामान्यांना रिक्षांचे दर परवडत नसल्यामुळे पुण्यातील लोकप्रतिनिधीनी मिशन पीएमपीएल सुरु करणे, पीएमपीएलला तीन डेपोंची आवश्यकता असून शासनाने अद्याप वाघोलीच्या डेपोसाठी केसनंद येथील गायरानाची जागा उपलब्ध करुन दिलेली नसणे, वाकडेवाडी येथे बजाज उद्यानाजवळ पीएमपीएलसाठी आरक्षित असलेली १० एकर जागा व सिंहगड रोडवरच्या डेपोसाठी आवश्यक जागा तातडीने उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, तसेच हिंजवडी येथील आयटी पार्कमध्ये देखील अडीच एकर जागेवर पीएमपीएलसासठी रिझर्वेशन असून सदरहू जागा देखील उद्योग विभागाने एमआयडीसी मार्फत एक रुपया नाममात्र भाडेतत्वावर तात्काळ देण्याची होत असलेली मागणी, विद्यार्थ्यांचे मोफत प्रवासाच्या पासचे पैसे दर तीन महिन्यांनी पीएमपीएलला देण्यात यावेत, पुणे दर्शनासाठी चार बसेस खरेदीची मान्यता स्थायी समितीने देवूनही अद्यापपर्यंत बसेस खरेदी करण्यात आलेल्या नसणे, पीएमपीएलचे तब्बल आठ कोटी ५३ लाख रुपये गृह विभागाने थकविले आहेत ते शासनाने त्वरित देण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

...५..

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...नंतर श्री. अजित...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहरातील वाहतूक समस्या दिवसेंदिवस अतिशय बिकट होत चालली आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था केली पाहिजे. कोणतीही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभी राहू शकत नाही. त्यांना शासनाच्या आर्थिक मदतीची आवश्यकता असते. आपल्या समोर बेस्ट आणि बंगलोर येथील परिवहन सेवेचे उदाहरण आहे. पुण्याच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. पुणे महानगरपालिका आणि पीएमपीएल प्रशासनाने पीएमपीएलसाठी डेपो विकसित करण्यासाठी पाच वर्षापूर्वी अडीच एफ.एस.आय. देण्याचा निर्णय घेतला होता. जी.बी.मध्ये तसा ठराव होऊन तो शासनाकडे पाठविण्यात आला. मागील पाच वर्षापासून हा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. तेव्हा शासन हा निर्णय केव्हा घेणार आहे ?

सभापती महोदय, पीएमपीएलला दररोज 13 लाख रुपयांचा तोटा होत आहे. पुणे महानगरपालिकेला आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला डिझेल, ऑईल आणि सुटे भाग इत्यादीसाठी पीएमपीएल सव्वा तीन कोटी रुपये देते. तेव्हा आपणास हा तोटा भरुन काढावयाचा असेल तर डिझेल, ऑईल आणि सुटे भाग इत्यादींना जकातीमध्ये सूट मिळेल काय ?

सभापती महोदय, आज पीएमपीएलच्या बसेसना पार्किंगसाठी डेपो नाही. त्या बाहेर रस्त्यावर उभ्या कराव्या लागतात. त्यामुळे गाडीतून बऱ्याच वस्तू चोरीला जात आहेत. पीएमपीएलला डेपोसाठी जागा देण्याचा ठराव वाघोली ग्रामपंचायतीने तीन वर्षापूर्वी केला होता. हा ठराव जिल्हाधिकाऱ्यांकडे अजून प्रलंबित आहे. तेव्हा वाघोली आणि वाकोडी येथे डेपोसाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागा शासन किती दिवसात ताब्यात देणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड अशी परिवहन सेवा सुरु झालेली आहे. ही परिवहन सेवा सुरु झाल्यामुळे तेथे असलेल्या डेपोची संख्या कमी पडत आहे. तेव्हा डेपोंची संख्या वाढविण्यात यावी असा त्यांचा पहिला प्रश्न आहे. त्या ठिकाणी दहा डेपो अस्तित्वात असून आणखी दहा डेपोंची आवश्यकता आहे. आताच्या जागेमध्ये अपेक्षित बांधकाम करता येणार नाही म्हणून तेथील बांधकामासाठी अडीच एफ.एस.आय.द्यावा अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे पाच वर्षापूर्वी पाठविला असून तो अद्याप



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

प्रलंबित आहे त्यास मान्यता केव्हा देणार असा त्यांनी प्रश्न विचारला. त्या बाबत सांगू इच्छितो की, या संदर्भात महानगरपालिकेकडून कोणताही प्रस्ताव शासनाकडे आलेला नाही. तरी देखील तसा प्रस्ताव आला असेल तर त्या संदर्भात नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल. ही परिवहन सेवा दर दिवशी नुकसानीमध्ये जात आहे तेव्हा त्यांना जकात अनुदानामध्ये सूट मिळावी असे सांगितले. कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेने जकात घेणे किंवा न घेणे हा त्यांचा वैयक्तिक अधिकार आहे. तेव्हा शासन निदेश देऊन त्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करु इच्छित नाही. ही सेवा तोट्यात आहे, फायद्यामध्ये नाही. त्याबाबत सांगू इच्छितो की, नो लॉस नो प्रॉफीट इथपर्यंत आणण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वत:च निर्णय घेणे अपेक्षित आहे.

-------

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.अजित 13:20

**पृ. शी.** : परळी वैजनाथ,जि.बीड येथील उप जिल्हा रुग्णालयात अत्यावश्यक सोईसुविधांचा असलेला अभाव.

**मु. शी.** : परळी वैजनाथ,जि.बीड येथील उप जिल्हा रुग्णालयात अत्यावश्यक सोईसुविधांचा असलेला अभाव यासंबंधी श्री.धनंजय मुंडे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनजंय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"परळी वैजनाथ, जि.बीड येथील शंभर खाटांची सोय असलेल्या उप जिल्हा रुग्णालयात शहर व परिसरातील असंख्य रुग्ण उपचारासाठी नियमित येत असणे, मात्र सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी तसेच अत्यावश्यक सोईसुविधांचा अभाव असणे, एक वर्षापासून कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नसणे, वैद्यकीय अधिकारी वर्ग 1 व वर्ग 2 ची 4 पदे रिक्त असणे, रुग्णालयात एकच स्त्री रोग तज्ज्ञ कार्यरत असल्याने प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांची हेळसांड होत असणे, 1 वर्षापासून रेडिओलॉजिस्ट नसल्यामुळे या रुग्णालयातील सोनोग्राफी व ई.सी.जी.मशीन बंद असणे, त्यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय, या प्रकरण तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही आणि शासनाची भूमिका."

श्री. सुरेश शेट्टी ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या आहेत. सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने निवेदनात थोडी दुरुस्ती करु इच्छितो.

निवेदनातील शेवटून ओळ क्रमांक 6 मध्ये "अकोला" असा उल्लेख केला आहे. "अकोला" या शब्दाऐवजी "बीड" असा शब्द वाचावा. सदरहू निवेदन दुरुस्तीसह मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, परळी वैजनाथ, जि.बीड येथील उप जिल्हा रुग्णालयातील असुविधेच्या बाबतीतील महत्वपूर्ण लक्षवेधी सूचना आहे. लक्षवेधी सूचनेवरील निवेदनात पदे भरल्याबाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे. जी पदे भरलेली दाखविण्यात आली आहेत, परंतु प्रत्यक्षात त्या रुग्णालयात ती पदे रिक्त आहेत. डॉ.तुपे त्या रुग्णालयात हजर झालेले नाहीत. वैद्यकीय अधीक्षक डॉ.चाकुरकर यांची नेमणूक झाली आहे, ते देखील अद्याप हजर झालेले नाहीत. फिजिशियन डॉ.पवार यांची नेमणूक केली आहे, परंतु ते देखील या रुग्णालयात हजर झाले नाहीत. अतिरिक्त स्त्री रोग तज्ज्ञ पदे भरली नाहीत. ती पदे अद्यापही रिक्त आहेत. नियुक्ती देऊन या रुग्णालयात जे अधिकारी हजर झाले नाहीत, त्यांच्या विरुध्द काय कारवाई करणार? तीन ई.सी.जी.मशीन्स पैकी 2 मशीन्स चालू असून 1 मशीन बंद आहे असे उत्तरात म्हटले आहे. फिजिशियनचे पद रिक्त आहे. तर या ई.सी.जी.मशीन्स कोण चालवित आहे,फिजिशियनचे पद रिक्त असेल तर ते कधीपर्यंत भरण्यात येईल, भूल तज्ज्ञांच्या दोन जागांना मान्यता आहे, त्यापैकी एक जागा भरली आहे. ती एक जागा कधीपर्यंत भरली जाणार आहे ?

महोदय,परळी वैजनाथ या ठिकाणी स्त्रीभ्रूण हत्येची प्रकरणे घडली. परळी तालुक्यात जी खाजगी रुग्णालये आहेत, त्या खाजगी रुग्णालयांमधील डॉक्टर कायद्याच्या बडग्यामुळे स्त्रियांची प्रसूती करीत नाहीत. ग्रामीण रुग्णालयात एप्रिल महिन्यात 68, मे महिन्यात 57,जून महिन्यात 78 आणि जुलै महिन्यात आतापर्यंत 52 अशी प्रसुती संबंधीची आकडेवारी आहे. प्रसूती प्रकरणाची संख्या पाहता ग्रामीण रुग्णालयात एक अतिरिक्त स्त्री रोग तज्ज्ञ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ही सर्व रिक्त पदे कधी भरली जाणार आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी उप जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदांबाबतचा मुद्दा मांडला. त्या रुग्णालयात 13 पैकी 12 मेडीकल ऑफिसर नेमले आहेत. वर्ग-3 ची 57 पैकी 51 पदे भरण्यात आली आहेत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, बदल्यासंबंधी नुकतीच कार्यवाही पूर्ण केलेली आहे. अधिकारी आणि कर्मचारी यांना पूर्वीच्या जागेवरील चार्ज हॅन्ड ओव्हर करण्यासाठी आपण 7 दिवसांचा कालावधी देतो आणि प्रत्यक्ष हजर होण्यासाठी 30 दिवसांचा कालावधी देतो. बीड जिल्हयात रिक्त 30 पदे बदलीने भरली आहेत, त्यांच्या बदलीसंबंधीच्या आदेशास अजून 30 दिवस पूर्ण झालेले नाहीत. या ठिकाणी

3..



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.अजित 13:20

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

डॉ.चाकुरकरांचा उल्लेख केला गेला. यांची बदलीचे आदेश दिनांक 21 जुलै, 2012 रोजी काढले आहेत. दिलीचे आदेश काढून फक्त तीन दिवस झाले आहेत. सन्माननीय सदस्यांनी समजून घेतले पाहिजे की, अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर त्यास हजर होण्यासाठी किमान सात दिवसांचा कालावधी दिला पाहिजे. या रुग्णालयात जास्तीत जास्त पदे भरण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी रेडिओलॉजिस्टची मागणी केली आहे. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, त्या रुग्णालयात रेडिओलॉजिस्टचे पद मंजूर नाही. तेथे नवीन पद निर्माण करावे लागेल. या संदर्भात सन्माननीय सदस्यांसमवेत दोन दिवसापूर्वीच या विषयी चर्चा झाली आहे. त्यावेळी मी सांगितले की, त्या रुग्णालयात आय.पी.एस.अंतर्गत कंत्राट बेसीसवर रेडिओलॉजिस्टची नेमणूक करु आणि त्यास लवकरच पोस्टींग देऊ.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 13:25

लक्षवेधी सूचना क्र.6....

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, बीड जिल्हयाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. जिल्हा उप रुग्णालयात रेडिओलॉजीस्टची नेमणूक करण्यासाठी ते अतिशय आग्रही आहेत आणि त्यांनी हे पद भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावाही केलेला आहे. सध्या एकच स्त्रीरोग तज्ज्ञ याठिकाणी काम करीत आहे. बीड जिल्हयात मागील काही महिन्यात झालेले दूषित वातावरण,गर्भपात,अर्भकांची हत्या याअनुषंगाने जिल्हा उप रुग्णालयावर कामाचा ताण अतिशय वाढलेला आहे. इसीजी मशीन बंद आहे. माझा प्रश्न असा आहे की, या उपरुग्णालयासाठी दोन स्त्रीरोग तज्ज्ञ देणार काय त्याचप्रमाणे इसीजी मशीन सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली जाणार आहे ?तसेच रेडिओलॉजीस्टचे पद निर्माण करुन त्याठिकाणी अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, इसीजी चालविण्यासाठी कर्मचाऱ्याची नियुक्ती केलेली आहे. काम सुरु आहे. रेडीओलॉजीस्टची पोस्ट याठिकाणी उपलब्ध नाही. नवीन पोस्ट निर्माण करावी लागेल. तोपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून आयपीएचएस मधून रेडिओलॉजीस्टची नियुक्ती करण्यात येईल. बीड जिल्हयासाठी जुलै महिन्यात 750 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश काढलेले आहेत. त्यामध्ये 285 मेडिकल ऑफीसर आहेत, 465 स्पेशालिस्ट डॉक्टर्स आहेत, 3 सर्जन आहेत, 3 फिजिशिअन आहेत, 3 पेड्रीयाटिशीअन आहेत, 3 भूलतज्ज्ञ आहेत आणि 2 एमबीबीएस डॉक्टरांच्या नेमणुकीचे आदेश काढलेले आहेत.

------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका व नगरपरिषदा(दुसरी सुधारणा)विधेयक.

**मु.शी.**:

L.C. BILL NO. XII OF 2012

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 12- मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949,नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महानगरपालिकेचे किंवा नगरपालिकांचे नगरसेवक व लोकप्रतिनिधी आहेत त्यांचा लोकसेवक या व्याख्येमध्ये स्पष्टपणे अंतर्भाव करण्यात आलेला नव्हता. कोणत्याही प्रकारे कळत किंवा नकळत किंवा प्रत्यक्षपणे झालेल्या चुका असतील तर त्यांच्यावर लोकप्रतिनिधी दंडसंहिता कायद्याअंतर्गत फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल केले जात होते. या नगरसेवकांचे किंवा लोकप्रतिनिधींचे योग्य प्रकारे म्हणणे कधी कधी ऐकून न घेता सुध्दा त्यांना तत्काळ निष्कासित केले जात होते. नगरपरिषदेमधील नगरसेवकांवर जिल्हाधिकारी आणि महानगरपालिकेतील नगरसेवकांवर महापालिका आयुक्त कारवाई करीत होते. यामध्ये पूर्णपणे स्पष्टता नव्हती. वेगवेगळया प्रकारे, वेगवेगळया गुन्हयांमध्ये, वेगवेगळया कारणास्तव या लोकप्रतिनिधींना कधी कधी खूप मोठया समस्येला सामोरे जावे लागत होते. म्हणून यामध्ये अधिक स्पष्टता यावी, लोकप्रतिनिधी अथवा नगरसेवक त्याच्यावर कारवाई करताना किंवा त्याला निष्कासित करताना शासनाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल आणि शासनाच्या अंतिम मंजुरीनंतरच त्याच्यावर कारवाई करण्याचे कायद्यामध्ये अंतर्भूत केलेले आहे. त्यामुळे एकप्रकारे व्याख्या अधिक

.....3



SSK/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 13:25

स्पष्ट केलेली आहे. दुसऱ्या बाजूला कायदेशीरदृष्टया योग्य ठिकाणी न्याय मिळावा म्हणून देखील तरतूद केलेली आहे. म्हणून या मूळ विधेयकामध्ये केवळ सुधारणाच केलेली असल्यामुळे सदनाच्या सर्व माननीय सदस्यांनी एकमुखाने मान्यता द्यावी अशी माझी विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, शासनाने नगरसेवकांचा लोकसेवक उल्लेख करुन त्यांच्यावर खटले दाखल करण्याच्या संदर्भामध्ये जे विधेयक आणलेले आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अधिकृत अशी ॲथॉरिटी किंवा संबंधित अधिकारी याबद्दल अडचणी होत्या. मला असे म्हणावयाचे आहे की, गुन्हेगारीच्या विरोधात सरकारचा जो चेहरा आहे तो अधिक स्वच्छ करण्यासाठी प्रयत्न केले असले तरी देखील स्वत:चे प्रतिबिंब आरशामध्ये बघणे अतिशय गरजेचे आहे. याचे कारण असे की, पॅरोलवर असणारे लोक मोठया प्रमाणात निवडणुकीमध्ये येऊन प्रचारात उतरतात असे चित्र दिसत आहे.

यानंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

कायद्याची अंमलबजावणी आपण कशी करतो या संदर्भात आपण स्वत: कधी आढावा घेत नाही. अतिक्रमणांच्या मुद्यावरुन अनेक नगरसेवकांचे नगरसेवक पद रद्द होईल अशा प्रकारची कारवाई वर्षानुवर्षे सुरु असते. स्वत: कायद्याचे उल्लंघन करुन ज्या पध्दतीचे काम करतात त्या संदर्भात आपण कुठपर्यंत तपासणी करण्यासाठी जातो? केवळ राजकीयदृष्टया सौदेबाजी करणे किंवा मानेवर तलवार ठेवून सरकारकडून एखादे काम करुन घेणे यासारखी भूमिका बजावली जाते. त्याचबरोबर अतिशय गंभीर स्वरुपाचे गुन्हे असणारे सुध्दा निवडणुकीत प्रचारक किंवा समर्थक म्हणून संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये खुलेआम प्रचाराच्या कार्यात सहभागी होत असतात. या संदर्भात आढावा घेतला तर आपल्याला असे दिसून येईल की, लोकसेवकांच्या संदर्भातील विधेयकाचा हेतू कितीही स्तुत्य असला तरी आपण तात्पुरती मलमपट्टी किंवा कॉस्मेटिक सर्जरी करीत आहोत. त्यामधून शासनाचा गुन्हेगारीच्या संदर्भातील चेहरा भेसूर दिसतो या गोष्टीकडे मला लक्ष वेधावयाचे आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक-12 महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक, 2012 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक म्हणजे शासनाने दुधारी शस्त्र सभागृहापुढे आणलेले आहे. हे विधेयक का आणले हे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु विधेयक आणण्याची शासनाला आवश्यकता का भासली याबाबत विवेचन केले नाही. नगरसेवकांनी कायद्याचे उल्लंघन केले तर सरकारने दखल घेतल्याशिवाय काही करता येत नाही म्हणून हे विधेयक आणले आहे. बदनामी आणि गुन्हेगारी म्हणजे काय?

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये भ्रष्टाचार झाला म्हणून कायम ओरड केली जाते. पावसाळ्यात रस्त्यात खड्डे पडले म्हणजे भ्रष्टाचार झाला अशी ओरड सुरु होते. एका राजकीय पक्षाचे अध्यक्ष रस्त्यांवरील खड्डयांची पाहणी करण्यासाठी स्वत: मुंबईमध्ये फिरत होते. एकूण टेंडरची रक्कम किती? 550 कोटी रुपयांचे टेंडर होते म्हणजे 550 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असे सांगण्यात येते. सिंचन खात्यामध्ये टक्केवारी कशी चालते याचे उदाहरण या सभागृहात देण्यात आले होते. सिंचन खात्यामध्ये टक्केवारीचे प्रमाण 10 टक्के इतके आहे. म्हणजे सिंचन विभागाने 500 कोटी रुपयांचे टेंडर काढले तर 10 टक्क्याप्रमाणे 50 कोटी रुपये होतात. म्हणजे 50 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असे म्हणता येईल. संपूर्ण टेंडरची रक्कम म्हणजे भ्रष्टाचार असे म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, भ्रष्टाचार कशाला म्हणतात? रस्ते दुरुस्तीसाठी 556 कोटी रुपयांचे टेंडर महापालिकेने काढले म्हणजे 556 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असे म्हटले जाते. कोणत्याही नगरपालिकेमध्ये किंवा महापालिकेमध्ये प्रस्ताव प्रशासनाकडून सादर केला जातो. निवडून आलेले लोकसेवक त्या प्रक्रियेत सहभागी होत नसतात. टेंडर कोणाला द्यायचे, कोणाला नेमायचे, छाननी कशी करायची, योग्य की अयोग्य हे सर्व निर्णय प्रशासकीय अधिकारी घेत असतात. ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडून तो प्रस्ताव लोकसेवकांपुढे येतो आणि त्या प्रस्तावाला मंजुरी दिली जाते. प्रस्ताव मंजुरीचे मर्यादित अधिकार असतात, त्या पलीकडे काही अधिकार नाहीत. प्रस्ताव मंजूर केला किंवा केला नाही तरी ओरड केली जाते. प्रस्ताव मंजूर केल्यानंतर

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

तो योग्य की अयोग्य यापेक्षा अंमलबजावणीची जबाबदारी अधिकाऱ्यांवर असते. खड्डे रस्त्यावर पडले म्हणून ओरड केली जाते. परंतु अंमलबजावणी करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई झाल्याचे ऐकीवात नाही. ज्यांनी काम व्यवस्थितपणे पाहिले नाही, दुर्लक्ष केले ते नामानिराळे राहतात.

सभापती महोदय, आपण रस्त्यावरुन प्रवास करीत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील मोऱ्या मातीच्या गाळाने भरलेल्या असतात. याचा अर्थ सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी पैशाचा गैरव्यवहार केला असे आपण म्हणणार का? खात्याचा जो प्रमुख असतो त्याची ती जबाबदारी असते. तेव्हा अशा प्रकारे बदनामी करण्यामागे राजकीय षडयंत्र असते.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

हे दुधारी शस्त्र कसे आहे हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

आताच सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले ते बरोबर आहे. शेवटी याला मान्यता शासनच देणार आहे. समजा एखादी घटना घडली त्या घटनेची पूर्ण चौकशी करुन शेवटी शासनाने मान्यता दिलीच तर कारवाई हा विषय येतो, ही चांगली गोष्ट आहे. पण एखाद्याची वाट लावण्याचे ठरविले तर त्याने कितीही सांगितले तरी त्याचे ऐकून न घेणे किंवा त्याने मांडलेले पटले नाही म्हणून शिक्षा करायची अशा प्रकारे शुक्ल काष्ठ काढणे किंवा शुक्ल काष्ठ लावणे हे दोन्ही प्रकार यात होऊ शकतात. तरी देखील हे अयोग्य आहे असे मी म्हणणार नाही. पण कुठे तरी एक वेगळ्या प्रकारची कळत न कळत असुरक्षितता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा कारवाईसाठी शासनाची मान्यता घेण्याची तरतूद यात केली पण हा विषय सचिवांकडे येणार की मंत्री महोदयांकडे येणार आहे हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. जर मंत्री महोदयांपर्यंत हा मान्यतेचा विषय येणार असेल तर आनंद आहे. याचे कारण लोक प्रतिनिधी म्हणून निवडून आल्यानंतर जनतेसमोर जात असताना काय वेदना असतात त्या लोक प्रतिनिधींनाच माहिती असतात. अशीच एखादी घटना घडली म्हणून मंत्री महोदयांच्या कल्पनेत ही दुरुस्ती आली असावी, ठीक आहे ही चांगली गोष्ट आहे. तसेच या तरतुदीचा दुधारी शस्त्र म्हणून वापर न होता कोणताही पक्ष असो पण त्याला न्याय मिळेल एवढीच बाब आहे. या सुधारणेच्या अनुषंगाने मंत्री महोदयांचे स्वागत करतो व माझे भाषण संपवितो.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मंत्री महोदयांनी जे सुधारणा विधेयक सभागृहात मांडले आहे त्याचे स्वागत करण्यासाठी व त्यावरील माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, अत्यंत चांगल्या शब्दांत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हा विषय येथे मांडला. माझ्या मनात जे मुद्दे होते तेच त्यांनी चांगल्या प्रकारे उद्‌धृत केलेले आहेत. मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, स्थायी समितीसमोर जे प्रस्ताव येत असतात त्या सर्व प्रस्तावांची छाननी करणे, टेंडर इनव्हाईट करणे आणि त्यात विश्लेषण करुन एल-1, एल-2 व एल-3 अशा प्रकारचे वर्गीकरण करुन आपल्या शिफारशीसह स्थायी समितीसमोर जाणे व त्यावर निर्णय घेण्याचे काम स्थायी समितीच्या सदस्यांना करावे लागते. मुळात हे अधिकारी योग्य प्रकारे काम करीत नाही. अनेक ठिकाणी आता ई-टेंडरिंगची सुविधा निर्माण झालेली आहे. तरी देखील काही ठिकाणी अशा प्रकारे स्वतःच्या अधिकारातून कामे केली जातात, त्याला या सुधारणेच्या माध्यमातून आळा घालण्यात येईल.

एक विषय अत्यंत महत्वाचा असून सन्माननीय सदस्यांनी त्याचा उल्लेख केला आहे. लोक प्रतिनिधी म्हणून निवडून येत असताना त्याच लोक प्रतिनिधीवर कारवाई जर अधिकारी करीत असेल तर लोक प्रतिनिधीची किंमत निश्चितपणे कमी होणार आहे. समाजामध्ये लोक प्रतिनिधी हा काहीच नाही, त्यावर कारवाई अधिकारी करतो असे चित्र तयार होणार ते या विधेयकाच्या निमित्ताने होईल नाही, कारण त्यासाठी शासनाकडे पूर्व परवानगीची आवश्यकता लागेल हा नियम अत्यंत महत्वाचा आहे. शासनाकडे पूर्व परवानगी मागत असताना त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला ही परवानगी देण्याचे काम शासनाने अधिकारी वर्गाच्या हातात न ठेवता त्यासाठी एखादी मंत्रिमंडळ उप समिती नेमली तर अधिक बरे होईल. ती समिती अशा सर्व प्रस्तावांची छाननी करुन न्याय देण्याचे काम करील व उगाचच कोणावर कायद्याने काही कारवाई होईल असे घडणार नाही. अशा दोन चार सूचनांचा विचार करुन त्यांचा समावेश शासनाने नियमावलीत करावा आणि लोक प्रतिनिधींचे समाजातील स्थान अबाधित राखण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्य मंत्री ): सन्माननीय सभापती महोदय, विधिमंडळाचे महत्वाचे काम हे कायदे बनवणे आहे व त्याची पाठराखण सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते हे नेहमी करीत असतात. त्यांनी या विधेयकाच्या संदर्भात अतिशय मोजक्या शब्दात आशय व्यक्त केलेला असल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, शहरामध्ये मोठया प्रमाणात 10-12 मजली इमारतींची बांधकामे झाली की, काही दिवसानंतर त्या बांधकामाच्या संदर्भात तक्रारी होतात व तक्रारी झाल्यानंतर बांधकाम तोडण्यासाठी अधिकारी गेल्यानंतर लोकप्रतिनिधीही तेथे जाता व सांगतात की, 20 वर्षापासून हे लोक येथे राहतात व आता हे बांधकाम तोडले तर या ठिकाणचे रहिवासी जातील कोठे, राहतील कोठे ? लोकप्रतिनिधींची लोकांशी बांधिलकी असल्यामुळे त्यांना लोकांबरोबर रहावे लागते. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली जात होती. परंतु अधिकाऱ्यांना कधीही जबाबदार धरले जात नव्हते. त्यामुळे आपण यासंदर्भात कायदा केला असून एखाद्या विभागात अनाधिकृत बांधकाम सुरु असेल व ते बांधकाम अनाधिकृत आहे ही बाब लक्षात आणून दिली असेल व अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही तर त्या अधिकाऱ्यावर दंडाच्या रक्कमेसह जेलच्या शिक्षेची सुध्दा तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, परवाच्या दिवशी समितीवर सर्व लोकप्रतिनिधींना संधी मिळाली पाहिजे यासंदर्भात एक महत्वाचे विधेयक आणून पासही करण्यात आलेल आहे. तशाच प्रकारचे हे विधेयक सुध्दा आहे. या विधेयकात लोकसेवकांची व्याख्या केलेली आहे. अनाधिकृत बांधकामाची माहिती असतांनाही त्यावर अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही तर संबधित अधिकांऱ्यावर फौजदारी गुन्हयांसह, लाचलुचपत गुन्हयांसह कारवाई करण्यात येईल इतकी स्पष्टता या विधेयकात करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी शासन या व्याख्येचे विश्लेषण केलेले आहे. शासन म्हणजेच त्या खात्याचा मंत्री किंवा राज्यमंत्री असा होतो. विधानसभेत एक विधेयक आणले होते परंतु त्या विधेयकातील अडचणी लक्षात आल्यानंतर, त्यातील चूक लक्षात आल्यानंतर मी ते विधेयक मागे सुध्दा घेतले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.....

होते. त्यामुळे शासन म्हणजे मंत्री किंवा राज्यमंत्री असू शकतात. अधिकारी म्हणजे शासन नाही हे या विधेयकात स्पष्ट करण्यात आलेले आहे. लोकप्रतिनिधींवर अशा प्रकारे अधिकाऱ्यांना कारवाई करण्याची संधी देऊ नये यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी विचार व्यक्त केलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या विधेयकाच्या संदर्भात विचार मांडतांना सांगितले की, "सरकारने स्वत:च्या गुन्हेगारीचा चेहरा साफ करण्याचा प्रयत्न केलेला आहे." शासकीय पक्षाच्या लोकप्रतिनधींना, लोकांना प्रोटेक्शन करण्यासाठी किंवा मदत करण्यासाठी हे विधेयक आणले नसून जो कोणी लोकप्रतिनिधी आहे त्यासाठी हे विधेयक येथे आणले गेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जो शब्दप्रयोग केलेला आहे त्याबाबत मी फार काही बोलणार नाही. राजकीय दृष्टया लोकप्रतिनिधींच्या मानेवर तलवार ठेवणे, चेहरा पावडर लावूनच साफसूफ होतो असे नाही तर चेहरा साबणाने सुध्दा साफ होतो. त्यामुळे यासंदर्भात मी फार लक्ष देऊ इच्छित नाही.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी या विधेयकाच्या संदर्भात ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याच भावना सर्व सन्माननीय सदस्यांच्या आहेत असे समजतो. अगोदर लोकप्रतिनिधींनाच जबाबदार धरले जात होते त्यांची सुटका करतांना ती एकाच बाजूच्या लोकप्रतिनिधींची होणार नाही तर हा कायदा सर्वांनाच लागू राहणार आहे. तसेच शासन म्हणजे कोण ? याचीही माहिती मी या ठिकाणी दिलेली आहे. या विधेयकाच्या संदर्भात मी जी काही माहिती दिलेली आहे त्यामुळे सभागृहाचे समाधान झाले आहे असे मी समजतो व या विधेयकाला सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9 ( दोन्ही संम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 12 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** :सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 12 संमत झाले आहे.

----

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावात बदल करणे) विधेयक.

L.A. BILL NO. LIV OF 2011

( A BILL TO AMEND CERTAIN ENACTMENTS TO CHANGE THEIR SHORT TITLES FROM "BOMBAY ACTS" TO "MAHARASHTRA ACTS".)

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 54 - विवक्षित अधिनियमांची संक्षिप्त नावे "मुंबई अधिनियम" या ऐवजी "महाराष्ट्र अधिनियम" अशी बदलण्यासाठी त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडते.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 54 - विवक्षित अधिनियमांची संक्षिप्त नावे "मुंबई अधिनियम" या ऐवजी "महाराष्ट्र अधिनियम" अशी बदलण्यासाठी त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

दिनांक 1मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्त्वात आले. मुंबई राज्याशी संबंधित असलेल्या 150 अधिनियमांमधील संक्षिप्त नावामध्ये "बॉम्बे" असा शब्द असल्याचे आढळून आले आहे. यातील "बॉम्बे"चे नाव "मुंबई" करणे आवश्यक आहे. याची तपासणी व खात्री करण्यासाठी प्रत्येक विभागाशी विचारविनिमय करण्यात आला. त्या त्या विभागांकडून माहिती मागविण्यात आली. प्रत्येक विभागाने कारवाई करण्या ऐवजी एकाच अधिनियमान्वये ज्या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात "बॉम्बे" असा उल्लेख आहे त्या ऐवजी "मुंबई" अथवा "महाराष्ट्र" असा बदल करणे योग्य होईल असे विचार विनिमयाअंती आढळून आले. अशा विभागांची कारवाई एकाच विभागाने करावी व त्याकरिता धोरणात्मक निर्णय घ्यावा असे निश्चित करण्यात आले. 1960 पूर्वीच्या अधिनियमांचे संकलन व तपासणी करण्यात आलेली आहे. सर्व मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त माहिती तपासून एकूण 84 अधिनियमांत सद्य:स्थितीत बदल करण्याचे प्रस्तावित केले आहे. यापूर्वी सन 1980 व 1996 मध्ये दोन वेळा बदल करण्यात आला आहे. गुजरात राज्याने देखील सन 2011 मध्ये असे विधेयक आणले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकूण 84 अधिनियमाच्या संक्षिप्त नावात मुंबई ऐवजी महाराष्ट्र असा बदल व मुंबई अधिनियम इतर राज्य अधिनियमिती आणि दुय्यम विधी विधानातील "बॉम्बे" आणि "ग्रेटर बॉम्बे" यांच्या संदर्भात "मुंबई", "बृहन्मुंबई" असा अर्थ लावण्यसाठी एक एकत्रित शासकीय विधेयक दिनांक 13.12.2011 रोजी विधान सभेत मांडण्यात आले होते. याबाबतीत येथे अनेकदा चर्चा झालेली आहे. अनेक आश्वासने देण्यात आलेली आहेत. त्यानुसार आज हे विधेयक सभागृहा समोर आणण्यात आले आहे. हे विधेयक एकमताने मंजूर करावे अशी मी विनंती करते.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, विधानसभा विधेयक क्रमांक 54 बाबत बोलण्यासाठी मी उभा आहे.

खरे म्हणजे राज्याच्या निर्मितीला आता 50 वर्षे उलटून गेली आहेत आणि उशिरा का होईना पण आपण काही गोष्टींमध्ये सुधारणा करीत आहोत. याठिकाणी सुधारणा करीत असताना 84 ची यादी देण्यात आलेली आहे. सरकारने वेगवेगळ्या विभागांकडून ती माहिती मागविली. पण तरीही यामध्ये अजून बऱ्याच गोष्टींचा अंतर्भाव व्हावयाचा आहे ही गोष्ट वेगवेगळ्या याद्या तपासल्या नंतर लक्षात येते. बॉम्बे कोर्ट ऑफ वॉर्डस् ॲक्ट 1905 किंवा बॉम्बे सिटी सिव्हील कोर्ट ॲक्ट 1948 तसेच बॉम्बे हॅबिच्युअल ऑफेन्डर्स् ॲक्ट, 1959, बॉम्बे डिस्क्लोजर म्युनसिपल ॲक्ट 1958, याचा याठिकाणी उल्लेख झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे अशा बऱ्याच गोष्टींचा अंतर्भाव करण्याचे राहिलेले आहे हे वेगवेगळ्या याद्या तपासल्यानंतर लक्षात येते. याबाबतीत आता सुरुवात झाली आहे हे खरे आहे. पण ती परिपूर्ण नाही. खरे म्हणजे एक गठ्ठा, एकत्रपणे हे सगळे बदल कसे होऊ शकतात आणि याची यादी करीत असताना काही बाबी कशा निसटून जातात याबद्दल स्वाभाविकपणे मनात प्रश्न आहे. दुसऱ्या बाजूला मला असे वाटते की, ज्या गोष्टीची अधिक चर्चा होत असते ते मुंबई हायकोर्ट आहे. आता त्याबाबत राज्य शासनाकडून काही होणार नाही हे मला माहिती आहे. कारण त्यातील लेटर पेटंट ॲक्ट 1866 प्रमाणे बॉम्बे हाय कोर्ट असे म्हटले गेले आहे. पण बॉम्बे हाय कोर्टच्या नावामध्ये बदल होण्यासाठी केंद्र शासनाकडे, सर्वोच्च न्यायालयाकडे याबबात आपल्याला पाठपुरावा करावयाचा आहे. त्याबाबत सरकारची काय भूमिका आहे आणि पुढे कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे हे समजले पाहिजे. मला असे वाटते की, उशिरा का होईना पण जे आपल्यासमोर आले ते परिपूर्ण आले पाहिजे.

सभापती महोदय, सदरहू विधेयक वाचत असताना त्यामध्ये काही पाच-सहा गोष्टी राहून गेल्याचे आढळून आले आणि त्याबाबत मी सांगितले आहे. विधानसभेमध्ये चर्चा होत असताना सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई यांनी त्यामध्ये 80-82 बाबी वाढविल्या आणि सन्माननीय सदस्य अजूनही त्यामध्ये काही गोष्टींचा समावेश करतील. परंतु सदनामध्ये विधेयक आणत असताना ते परिपूर्ण का आणले जात नाही ही खंत आहे.सदनामध्ये विधेयक परिपूर्ण न येण्यामागे काय अडचणी आहेत की विरोधी पक्ष आग्रह धरीत आहे,बाहेरही तशा प्रकारचे वातावरण आहे म्हणून कसेतरी उरकावयाचे म्हणून सदरहू विधेयक पास करावे या भावनेतून आणले जात आहे काय असा प्रश्न निर्माण होतो.त्यामुळे याबाबत माननीय मंत्री महोदयांनी नीट माहिती दिल्यानंतर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

विधेयकाच्या बाबतीत चर्चा करता येईल. मात्र जे झाले आहे तेही काही कमी नाही. त्यामुळे आम्ही याला पाठिंबा देऊच. पण तसा तो देत असताना हे विधेयक अर्धवट स्वरुपाचे असल्याने याला पाठिंबा कसा द्यावयाचा असा प्रश्न विरोधी पक्षासमोर निर्माण होतो. त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे असे मला वाटते.

----

. . . .2 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/KTG/D 13:50

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सरकारतर्फे कायदा करीत असताना त्यामागील प्रक्रिया ही मोकळ्या मनाने व्यक्त करणे म्हणजे या सदनाच्या सन्मानाचा भाग असतो. हे सभागृहच असे आहे की, तुम्ही कोण आणि आम्ही कोण असे प्रश्न न विचारता, तुम्ही-आम्ही सर्वजण या महाराष्ट्राचे कोण? याचे उत्तर शोधन येथे आलो. म्हणून आपले एकमेकांशी सवाल-जवाब होत असतात, एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप होत असतात. यामागे व्यक्तिगत कटुतेची भावना नसते तर त्या प्रश्नाचा वेध घेण्याची आणि छेद देण्याची मानसिकता असते.

सभापती महोदय, येथे सदरहू कायदा आणला आहे, त्याचे वेगळ्या प्रकारचे विश्लेषण करण्यासाठी मी उभा आहे. तसेही सदरहू विधेयक दोन मिनिटांमध्ये मंजूर करण्यासारखेच आहे. पण सरकारच्या खोट्या प्रवृत्तीमुळे नाईलाजाने हे सगळे वेगळ्या पध्दतीने मांडणे भाग आहे. या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते अत्यंत कमी शब्दामध्ये बोलले आहेत. पण विधेयकातील पान क्र.2 वर मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावांची सुधारणा" असे म्हटले आहे. यामुळे महाराष्ट्रातील येणाऱ्या कोणत्याही पिढीला राज्यकर्त्यांचा सन्मान वाटावा अशा प्रकारचे हे वाक्य नाही. परंतु ते अपरिहार्य असल्याने तेथे घालण्यात आले आहे. कारण कायद्याची तशी तरतूद आहे. एखादा माणूस जन्माला आला, मोठा झाला, कार्य कर्तृत्व केले, वृध्दत्वाकडे झुकला. मग आपण असे म्हणावयाचे की, अमुक-अमुक माणूस जन्माला आला असे समजून काम करु या. पण त्यावेळेस नाव का दिले नाही? खरे म्हणजे त्याचा पाळणा तेव्हा हलावयास पाहिजे होता. तेव्हाच त्याचे नामकरण व्हावयास हवे होते. परंतु ती व्यक्ती 60 वर्षाची झाल्यानंतर त्याला असे सांगणार आहात काय की, तू 60 साली जन्माला आलास पण आम्ही आता तुला नाव देणार आहोत. आपण आता हे करणार असाल तर ते सरकारी मनोवृत्तीची विक्षिप्तता दर्शविणारे आहे. मी याठिकाणी मुद्दाम वाचून दाखवितो.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या विधेयकाच्या खंड 2 मध्ये असे म्हटले आहे की, "या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (4) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, दिनांक 1 मे, 1960 पूर्वी अधिनियमित केलेल्या मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावांमध्ये अनुसूचीच्या स्तंभ (5) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्याप्ती पुरत्या सुधारणा करण्यात येतील आणि त्या सुधारणा दिनांक 1 मे, 1960 पासून करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल." म्हणजे त्या कायद्याला सांगावयाचे की तुला 'मुंबई' असे नाव 1960 साली दिले असे समज. साठाव्या वर्षी पोराला सांगावयाचे की, तुझे नाव अमुक अमुक ठेवले आहे तशा प्रकारची ही विक्षिप्तता आणि विचित्रता या कायद्यामध्ये का आली ? ते अपरिहार्य आहे. कायद्याची ती भाषा आहे पण ही अपरिहार्यता का आली ?

सभापती महोदय, खंड 4 मध्ये असे म्हटले आहे की, "बॉम्बे" अथवा "ग्रेटर बॉम्बे" या नावाचा कोणताही संदर्भ हा, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, या अधिनियमाव्दारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावाचा किंवा, यथास्थिती "मुंबई" अथवा "बृहन्मुंबई" या नावाचा संदर्भ आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल." म्हणजे आता या सगळ्या कायद्यांचे नामकरण होत आहे. इंग्रजांच्या काळापासून ते चालू आहेत. They used to call this as Bombay Province. So, whatever Act which was created, it was known as 'Bombay Act'. मग नागपूरला जा किंवा कोठेही जा 'मुंबई कायद्याप्रमाणे' असेच म्हटले जात होते. इंग्रजांनी केलेले पुसण्याकरिता आम्हाला एवढी वर्षे लागली त्याची ही साक्ष आहे.

सभापती महोदय, मघाशी मी हे 'कोत्या वृत्तीचे' असा शब्द वापरला त्याचे कारण असे आहे की, मी सातत्याने हा विषय लावून धरतो. कधी हा विषय गमतीचा असतो, कधी हसण्याचा असतो तर कधी उत्सुकतेचा असतो पण मला त्याचे काही वाटत नाही. कारण मी तो ध्यास घेऊन या ठिकाणी बसलेलो आहे. आदरणीय शिवसेनाप्रमुखांनी माझ्या अंगामध्ये ते जर्म्स टाकलेले आहेत आणि त्यामुळे मी कधी स्वस्थ बसू शकत नाही आणि बसत नाही. कधीही हा विषय आला की, दिवाकर रावते यांना विचारा असे सांगतात. काल मी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी स्वत:चे जे वर्णन केले ते मी इंग्रजीमध्ये वाचून दाखविले. पण त्यांनी स्वत:चे वर्णन इंग्रजीमध्ये

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

केले त्याला मी काय करणार ? ते इंग्रजीमध्ये असल्यामुळे इंग्रजीमध्येच वाचावे लागले. मला इंग्रजी येत नाही असा काही भाग आहे का, मी इंग्रजीचा व्देष्टा आहे का ? तोही भाग नाही. पण मी मराठीचा स्वाभिमानी आहे आणि अस्सल मराठी आईच्या कुशीत जन्मलो याचा मला अभिमान वाटतो. मराठी आमची राज्यभाषा आहे म्हणून या ठिकाणी ती राज्यभाषा म्हणून रुळलीच पाहिजे. मराठी राज्यभाषा तामिळनाडूमध्ये जाऊन रुळविणार नाही. आंध्र प्रदेशमध्ये जाऊन रुळविणार नाही पण मी त्या कुशीत जन्मलो असल्यामुळे माझ्या राज्यामध्ये ती असलीच पाहिजे याचा आग्रह धरण्याचा मला नैतिक अधिकार आहे, घटनात्मक अधिकार आहे, जन्मसिध्द अधिकार आहे. मला माझ्या आईबापाने ज्या कुशीतून जन्माला घातले त्या मराठी कुशीची सेवा करणे हे माझे ब्रीद आहे आणि म्हणून मी त्या भावनेतून बोलत असतो.

सन्माननीय सदस्य श्री. चरणसिंग सप्रा यांचा मला नेहमी आदर वाटतो. अस्सल मराठी बोलणारा सरदारजी आपल्यात बसतो याचा मला आनंद होतो. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, मी सरदारजीबद्दल बोलत आहे. आपण सरदारजी आहात का ? तुमच्यातील मी पणा मी कालपासून बघत आहे. जे काही करीन ते मी, जे काही होईल ते मी. आता आपण जे बोलण्याचा प्रयत्न केला त्याला मी उत्तर देत आहे. परंतु कोकणात तुमच्या आमच्या पेक्षाही चांगले मराठी जाणणारे, अस्खलित मराठी बोलणारे, साहित्यिक झालेले मोठ्या प्रमाणावर मुसलमान अस्सल मराठी आहेत. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे पुढे बसलेले आहेत. त्यांना हे माहीत आहे. त्यामुळे प्रत्येक वेळी मी आहे असे कशाला बोलावयाचे ? आपल्यापेक्षाही वर कोणी तरी असू शकतो हे आपण लक्षात ठेवावे. आपल्याला जर जीवनात मोठे व्हावयाचे असेल तर आपल्यापेक्षाही वर कोणी तरी असू शकतो हे ज्या दिवशी आपण स्वीकाराल त्या दिवशी तुम्ही मोठे व्हाल, मी मोठा होईन, सगळे मोठे होतील, हे आपण लक्षात ठेवावे. त्यांनी काल भाषणात सांगितले की, हिंदुस्थानमध्ये पाशा पटेल बोलेगा वोही बाजारभाव चलेगा.

श्री. पाशा पटेल : ते वेगळे आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/ KTG/

श्री. दिवाकर रावते : काय असेल ते असेल. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांच्याबद्दल माझ्या सद्‌भावना आहेत. त्यामुळे वेळ मिळेल तेव्हा त्यांना आपल्या अनुभवाच्या चार गोष्टी सांगणे हे आपले काम आहे. मी सांगून मोकळा झालो. ते मानावयाचे की नाही हा त्यांचा प्रश्न आहे.

श्री. पाशा पटेल : आपण वडीलकीच्या अधिकाराने सांगितले.

श्री. दिवाकर रावते : कोणता अधिकार आहे हे नंतर ठरवू. सभापती महोदय, मराठी भाषेच्या संदर्भात या विधिमंडळाचा एक इतिहास आहे. मराठी राज्यभाषा असावी या विषयावर मी 2005 मध्ये जो प्रस्ताव दिला होता त्यावर पाच दिवस सभागृहात चर्चा झाली. मराठी भाषेवर पाच दिवस चर्चा होणे हा या विधिमंडळाचा फार मोठा सन्मान आहे आणि तो इतिहास आहे. सभापती महोदय, आपलेही मोठेपण आहे की, आपण आत्मीयतेने पाच दिवस ती चर्चा होऊ दिली आणि या सदनातील प्रत्येक सदस्य त्या प्रस्तावावर तळमळीने बोलला.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मला आठवते की, मार्च, 2010 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये दिनांक 19 मार्च, 2010 रोजी मी बॉम्बे हायकोर्टाचे नाव मुंबई उच्च न्यायालय असे करण्याबाबत आग्रह धरला होता. त्यानंतर त्याच अधिवेशनामध्ये दिनांक 22 मार्च, 2010 रोजी बॉम्बे, पुणे ही नावे बदलल्यानंतर कायद्याचे नाव का बदलले जात नाही असा मी आग्रह धरला होता. सभापती महोदय, आपणच त्या दिवशी सभापती स्थानी होता. त्यादिवशी आपण निदेश देताना असे म्हटले होते की, "सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी बरीच उदाहरणे देऊन उल्लेख केला आहे की, अजूनही मुंबई ऐवजी बॉम्बे असे म्हटले जाते याबद्दलचा त्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. शासनाने या सर्व संस्थांना बॉम्बे ऐवजी मुंबई असा बदल करण्याच्या सूचना द्याव्यात." हे निदेश देऊन दीड वर्ष झालेले आहे. आता आपण 2012 मध्ये आहोत. पुणा मर्चंट असोसिएशन, बॉम्बे शिप यार्ड, बॉम्बे डॉक यार्ड, बॉम्बे शॉप्स ॲण्ड एस्टॅब्लिशमेन्ट ॲक्ट, बॉम्बे रेन्ट ॲक्ट, बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट हे सर्व यामध्ये आलेले आहे. या नावांबाबत या विधेयकात काहीच नमूद केलेले नाही.

सभापती महोदय, बॉम्बे हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाला खूप माज चढलेला आहे. आपल्या सर्वांचे बॉम्बे हॉस्पिटल लाडके आहे. कोणतेही आमदार आजारी पडल्यानंतर ते त्या हॉस्पिटलमध्ये दाखल होतात, जे.जे.रुग्णालयात जात नाहीत. सरकारी रुग्णालयावर आपला विश्वास नाही. उपचारासाठी पैसे दिल्याशिवाय आपण बरे होऊ शकत नाही अशी सर्वांची भावना झाली आहे. खाजगी रुग्णालयात उपचारासाठी खर्च केल्यानंतर तो खर्च आपल्याला शासनाकडून परत मिळतो. हे सर्वांना माहीत आहे. कोणी कोठे उपचार घ्यावेत हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. त्या बॉम्बे हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाने समोरच्या इमारतीवर हिंदी भाषेत बम्बई हॉस्पिटल असे लिहिलेले आहे. त्यांनी हिंदीत बॉम्बे हॉस्पिटल असे लिहिले असते तर ते त्यांच्या ट्रस्टचे नाव अद्याप वापरत आहेत असे म्हणता आले असते. हिंदीत बम्बई हॉस्पिटल, इंग्रजीत बॉम्बे हॉस्पिटल असे लिहिलेले आहे. परंतु मराठीत मुंबई हॉस्पिटल असे नाव लिहिण्यास ते व्यवस्थापन तयार नाही. विधिमंडळाच्या कोणत्याही सदस्यांनी माझ्या मातृ भाषेकरिता जोपर्यंत ते हॉस्पिटल आमच्या मुंबईचा सन्मान करीत नाही तोपर्यंत माझा जीव गेला तरी चालेल असा बाणा दाखवून त्या हॉस्पिटलमध्ये

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ D/ ST/

श्री.दिवाकर रावते...

पाऊल सुध्दा टाकता कामा नये. परंतु आम्ही सर्वजण तेथेच जातो. हा व्यक्ती स्वातंत्र्याचा विषय आहे. पण स्वाभिमानाचा, प्रांतीय अस्मितेचा, माझ्या मातृ भाषेच्या अस्मितेचा पीळ निर्माण करु तेव्हा समोरच्या व्यक्तीला सरळ करु शकतो. मुंबई या नावाच्या संदर्भात मुंबईतील भांडवलदारी प्रवृत्तीला किती माज आला आहे ते मी सांगणार आहे. ते हॉस्पिटल बम्बई हॉस्पिटल लिहू शकते, बॉम्बे हॉस्पिटल असे इंग्रजीत लिहू शकते, पण मुंबई रुग्णालय असे मराठी भाषेत लिहिण्याचे नाकारतात. अशा हॉस्पिटलला शासनाला सरळ करता येत नाही.

बॉम्बेचे नाव मुंबई झाल्यानंतर बॉम्बे या नावाने ज्यांनी ज्यांनी धर्मादाय आयुक्तांकडे ट्रस्टची नोंदणी केलेली असेल त्या सर्वांना पत्रे धाडून तुमच्या ट्रस्टचे नाव बॉम्बे ऐवजी मुंबई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे तातडीने सादर करुन त्या प्रमाणे सुधारणा करण्यात यावी असे सांगावे. ही कार्य पध्दती हे शासन का अनुसरत नाही ? परंतु आज मात्र हे विधेयक सभागृहासमोर सादर केलेले आहे. कोत्या मनोवृत्तीचे हे विधेयक आहे असे मी मघाशी म्हटले होते. त्याचे कारण असे आहे की, 3 दिवसांपूर्वी शासनाने एक विधेयक सभागृहात सादर केले होते. त्यात असे म्हटले होते की, "निवडून आलेल्या सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन शासनाने हा कायदा आणलेला आहे." त्यात पुढे असेही नमूद केले आहे की, "विधानपरिषदेमध्ये झालेल्या चर्चेनुसार आणि पुढील सहा महिन्यात याबाबतचा कायदा आणला जाईल" असे सरकारने सांगितल्या प्रमाणे हा कायदा आणला आहे. त्या प्रमाणे या विधेयकाबाबतही नमूद केले असते तर माझ्या सदनाचा तो मोठा सन्मान झाला असता. हे सदन काय करु शकते ?

या विधेयकाच्या उद्देश व कारणात असे नमूद केले आहे की, "दिनांक 1 मे, 1960 पासून अंमलात आलेला मुंबई पुनर्रचना अधिनियम या अन्वये नवीन गुजरात राज्याची स्थापन करण्यात आली ; आणि उर्वरित मुंबई राज्य हे महाराष्ट्र राज्य या नावाने पुढे कायम राहिले. राज्यात अंमलात असलेले मुंबई अधिनियम हे त्यातील आवश्यक त्या अनुकूलनांसह....." मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना विचारु इच्छितो की, अशा विधेयकांचे ड्राफ्टिंग कोणाकडून केले जाते, राज्यकर्ते पाहतात की नाही ? कोणत्या अधिकारात असे छापले जाते, असे छापणाऱ्यांना फोडले पाहिजे. गुजरात राज्य कधीच संपले आहे. शासनाने हा कायदा आणत असताना बॉम्बे ऐवजी मुंबई असा बदल केलेला नाही.

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

श्री. दिवाकर रावते....

मुंबईच्या नावाने एखादा कायदा या राज्यामध्ये ओळखला गेला तर ती अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्राचा उल्लेख झाला याचे मला दुःख नाही. कारण महाराष्ट्र हा आमचा प्रांत आहे. महाराष्ट्र ही देखील आमच्या अभिमानाची बाब आहे. सगळया कायद्यातील "मुंबई" शब्द वगळून त्या जागी "महाराष्ट्र" शब्द समाविष्ट करण्यात आला. आम्ही म्हटले "बाम्बे" चे "मुंबई" करा. परंतु तसे केले नाही. असे न करण्यामध्ये त्यांच्या मनामध्ये एक द्वेष भरलेला आहे. तुम्हाला "बॉम्बे"चे "मुंबई" करु देणारच नाही या भावनेतून "महाराष्ट्र" शब्द प्रयोग केला. त्याबद्दल आनंद आहे महाराष्ट्र हे आपले राज्य आहे. सभापती महोदय, माझ्या हातामध्ये कॉ. डांगे यांच्या कन्या श्रीमती मीना देशपांडे यांनी लिहिलेले "हुतात्मा" नावाचे पुस्तक आहे. त्यांचा आणि माझा परिचय होता. त्यांच्या पुस्तकातील काही उतारे मी टिपून ठेवलेले आहेत. हे विधेयक केव्हा चर्चेसाठी येणार आहे हे मला माहीत नव्हते. आज ते चर्चेसाठी आलेले आहे म्हणून मी त्या पुस्तकातील काही उतारे या ठिकाणी उद्धृत करणार आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये गुजरात असा उल्लेख करण्याची काय आवश्यकता होती ? उद्देश व कारणामध्ये असे म्हटलेले आहे की, "1 मे 1960 पासून अंमलात आलेला मुंबई पुनर्रचना अधिनियम, 1960 (1960 चा मुंबई 11) या अन्वये नवीन गुजरात राज्याची स्थापना करण्यात आली". महाराष्ट्र राज्याची निर्मिती होताना जे 105 हुतात्मे झाले त्यांचा अवमान करणारी ही बाब आहे. या महाराष्ट्रासाठी लढणा-या थोर नेत्यांच्या, जेष्ठ नेत्यांच्या लढ्याचा अवमान करणारी बाब आहे. या ठिकाणी महाराष्ट्राची निर्मिती ही "महाराष्ट्र" म्हणूनच झाली. त्यावेळी जो द्विभाषिक गुजरात प्रांत होता तो त्यावेळीच नष्ट झाला. त्या गुजरातचा उल्लेख या विधेयकाच्या उद्देश आणि कारणामध्ये का करण्यात आला ? कोणत्या मानसिकतेचे अधिकारी मंत्रालयात बसलेले आहेत ? श्रीमती मीन देशपांडे यांच्या "हुतात्मा" पुस्तकामध्ये असे नमूद केलेले आहे की, "प्राचीन काळी महाराष्ट्र कुठपर्यंत पसरला होता याबद्दल अनेक प्रवाद आहेत. महाभारतात अश्मक, कलिंग व अपरान्त अशी तीन महान राष्ट्रे सांगितली आहेत. विदर्भाला पूर्वी महाराष्ट्र म्हणत.त्याची विदर्भ, कौशिक, भोज, भोजकर, वर्धातट व महाराष्ट्र अशी नावे होती. महाराष्ट्रातील काही विशिष्ट भागांना गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र व पंडुराष्ट्र ही नावे असल्याचा उल्लेख

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

महाभारतात आहे. हा सर्व प्रदेश प्राचीन दक्षिणापथाचा भाग होता. दक्षिणापथ म्हणजे दक्षिण मार्गाकडील प्रदेश. हा सर्व उल्लेख प्राचीन ग्रंथात आलेला आहे. महाराष्ट्राचे दैवत असलेल्या पंढरपूरच्या विठोबाच्या यात्रेची पंरपरा 2000 वर्षापासून चालू आहे असे संशोधन प्रा. दामोदर कोसंबी यांनी केले आहे.

इ.स.पूर्व 1000च्या सुमारास या अरण्यमय प्रदेशात 'दामनीय' व 'महाराष्ट्रिक' या नावाचे लोक शिरले. त्यांनी इथे राहणा-या वारली, कोळी, ठाकर वगैरे स्थानिक लोकांना डोंगराळ भागात रेटले. इ.स.पूर्व 500 पासून ते इ.स.पूर्व 300 पर्यंत महाराष्ट्रावर शातवाहन, आंध्र वगैरे प्राचीन राजघराण्यांनी राज्ये केली. यानंतरच्या सातशे वर्षाच्या काळात शिलाहार, चालुक्य, राष्ट्रकूट व दुसरे चालुक्य अशा राजघराण्यांनी या भागावर राज्य केले.

मराठी लोक हे साधे असून प्रामाणिक आहेत. त्यांचा स्वभाव निग्रही व करारी आहे. मित्रांशी कृतज्ञ तर शत्रूंशी निर्दयी अशी त्यांची वृत्ती आहे. त्यांचा कोणी अपमान केला तर ते केव्हाही सहन करणार नाहीत. मग त्यात त्यांच्या प्राणावर संकट आले तरी त्याला ते भीत नाहीत."

म्हणून मी मघाशी असे म्हटले की, जोपर्यन्त बॉम्बे हॉस्पिटलचे मुंबई हॉस्पिटल असा बदल होत नाही तोपर्यंत प्रत्येक आमदाराने प्राण गेला तरी चालेल पण त्या बॉम्बे हॉस्पिटलमध्ये पाऊल टाकणार नाही असा निग्रह केला पाहिजे.

...नंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.शिगम.. 14:10

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.केशवराव मानकर )**

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, ह्यु-एन-त्सँगने महाराष्ट्राला "मोहालाच्छा" म्हणजे मोठे राष्ट्र असे नमूद करुन तत्कालीन महाराष्ट्राचे वर्णन ह्या राज्याचा परीघ आठशे मैलांचा असून देशाची राजधानी पैठण, एका नदीच्या तीरावर वसली आहे असे केले आहे.

सभापती महोदय, पूर्वजांनी महाराष्ट्राचे जे वर्णन केले आहे ते मी सांगत आहे. आपण मुद्दाम महाराष्ट्र का केला ते मला समजत नाही ? महाराष्ट्र असे नामाभिधान करणे आवश्यक आहे. आपण जे केले ते बरोबर आहे. तो महाराष्ट्र मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, "महंत म्हणजे महंत राष्ट्र ! म्हणौन महाराष्ट्र ! " असे च्रकधरस्वामींनी आचारमाहात्म्यात महाराष्ट्राचे वर्णन केले आहे. "देश म्हणजे खंडमंडळ" असे महाराष्ट्राविषयी म्हणताना त्यांनी या देशाच्या चतु:सीमाही सांगितल्या आहेत. "फलेठाण" म्हणजे फलटणच्या दक्षिणेकडील भागापासून ते उत्तरेस बालेघाटाचे पश्चिम टोक बीडपर्यंत, "उभयगंगातीर" म्हणजे गोदावरी नदीच्या आसपासचा, "मेघकर" म्हणजे मेहेकराच्या पूर्वोत्तर भागात "इंध्याद्री" पर्वताचा पूर्व-पश्चिम पसरलेला घाट व "इंध्याद्री" पर्वतापलीकडचा सारा वऱ्हाड हे सर्व मराठी बोलणाऱ्यांचे भाग म्हणून महाराष्ट्र, असा महानुभावी यांचा लेख आहे.

सभापती महोदय, हा सर्व जुना संदर्भ आहे. एवढे सर्व असताना महाराष्ट्राबद्दल द्वेष कायम होता. 1906 साली बनारस काँग्रेसपुढे टिळकांनी आपली स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही सुप्रसिध्द चतु:सूत्री मांडून राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य यांची सांगड घातली. सरकारी कामकाज त्या त्या मातृभाषेतून चालले पाहिजे. एका कमिटीमध्ये इंग्रजीमध्ये चर्चा सुरु होती. मी त्या वेळी सांगितले की, आपण हे सर्व मराठी भाषेत मांडावे. तेव्हा काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य मला म्हणाले की, " इंग्रजी भाषेमध्ये चर्चा होऊ शकते आणि घटनेने तसा अधिकार दिलेला आहे." घटनेने तसा अधिकार दिलेला आहे हे मला देखील माहीत आहे. परंतु आईची माया आईच देऊ शकते. ती घटनेने मिळणार नाही. मातृत्व हे जन्माने मिळालेले असते ते घटनेने मिळालेले नसते हे भान आम्ही विसरतो. परंतु दिल्लीपुढे कुर्निसात घालण्याच्या सवयीमुळे हे सर्व होत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, काल बाळ गंगाधर टिळक यांची जयंती होती. आपण सर्वांनी त्यांना पुष्पहार घालून त्यांचे स्मरण केले. त्यांनी म्हटले होते की, "सरकारी कामकाज त्या त्या मातृभाषेतून चालले पाहिजे, त्यासाठी त्या भाषेचे राज्य-स्वराज्य असले पाहिजे असे आवर्जून सांगितले." टिळकांचे हे स्पष्ट विचार म्हणजे एकभाषी राज्याची पूर्वसूत्रीच होती. म्हणजे सर्व देशामध्ये भाषावार प्रांतरचना व्हावी असे 1906 साली टिळकांनी सुचविले होते.

सभापती महोदय, टिळकांनी आयुष्याच्या अखेरच्या काळात फेब्रुवारी 1903 मध्ये कॉंग्रेस अंतर्गत "कॉंग्रेस डेमॉक्रेटिक पार्टी" नावाचा पक्ष स्थापन करण्याचा प्रयत्न केला. या पक्षाच्या जाहीरनाम्याच्या मसुद्यात म्हटलेल्या अनेक उद्दिष्टांबरोबर "भारतासाठी एक राष्ट्रभाषा विकसित करावी आणि हिंदुस्थानातील प्रांताची भाषेच्या आधारावर पुनर्रचना करावी" अशी एक सूचना केली होती. म्हणजे महाराष्ट्राच्या निर्मितीची बीजे टिळकांनी 1903 मध्ये पेरली होती.

सभापती महोदय, 1921 सालच्या नागपूरच्या कॉंग्रेस अधिवेशनात कॉंग्रेसने 31 कलमी नवीन घटना तयार केली. या नव्या घटनेनुसार कॉंग्रेसच्या 21 प्रांतिक संघटना असतील असे ठरविण्यात आले. त्यानुसार पक्षाची रचना भाषेच्या तत्त्वावर करण्यात आली. तामीळ, तेलगू, मल्याळम ,गुजराती, सिंधी, पंजाबी, उडीया, आसामी आणि ब्रम्ही भाषा बोलणाऱ्यांना प्रत्येकी एक अशा प्रांतिक कॉंग्रेस समित्या नेमण्यात आल्या. म्हणजे हे प्रांत आहेत हे मान्य केलेले आहे. पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, "हिंदी भाषा बोलणाऱ्यांचे संख्याबळ लक्षात घेऊन सरहद्द प्रांत, दिल्ली अजमेर, मारवाड, राजपुताना, मध्य प्रांत, बिहार या सहा प्रांतांना स्वतंत्र कॉंग्रेस समित्या देण्यात आल्या. मराठी भाषिकांचे संख्याबळ हिंदुस्थानी बोलणाऱ्यांइतके नसतानाही महाराष्ट्रासाठी पुण्याला एक, मध्यप्रांतासाठी नागपूरला एक, वऱ्हाडसाठी अमरावतीला एक व मुंबई शहरासाठी स्वतंत्र प्रांतिक समिती निर्माण करण्यात आली. मात्र मुंबई शहरात बहुसंख्य मराठीभाषिक असले तरी, गुजरातीभाषिकांचा राजकारणातला प्रभाव लक्षात घेऊन मुंबईची प्रांतिक समिती द्विभाषिक करण्यात आली." दुर्दैवाने 1921 सालचा प्रभाव सरकारच्या प्रवृत्तीतून आजही कायदा मांडताना मला दिसतो, त्याचे वर्णन मी काय करावे ?

यानंतर श्री.गिते...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

1921 साली जे प्रकट झाले ते स्वातंत्र्यानंतरही आजही दिसून येत आहे.

महोदय, महाराष्ट्राची निर्मिती 1960 साली झाली आहे. " मराठी भाषिकांचे सर्व प्रदेश एकत्रित करुन एकच मराठी प्रांत असावा अशी आकांक्षा अनेक वर्षापासून मराठी माणसांनी मनात बाळगली होती. लोकमान्य टिळक मंडाले तुरुंगात असताना "केसरी"चे संपादकत्व सांभाळणारे न.चिं.केळकर हयांनी "भाषा आणि राष्ट्रीयत्व" या लेखात बंगलाची फाळणी सरकारने रद्द केली, म्हणून ब्रिटीश सरकारचं अभिनंदन केले. पण त्याचबरोबर त्यांना आठवण करुन दिली की, मराठी भाषिकांचे एक राज्य असावे ही मराठी माणसांची मागणी बंगाली लोकांच्या मागणीपेक्षाही जुनी आहे. तेव्हा सरकारने ती चूक लवकरात लवकर सुधारावी असे ब्रिटीशांना लोकमान्य टिळकांनी सांगितले. न.चि.केळकर हे केसरीचे संपादक होते, नंतर श्री.आगरकर संपादक झाले. हा महाराष्ट्र एकसंघ असला पाहिजे.

सभापती महोदय, पुढील संदर्भ अतिशय क्लिष्ट व विचित्र आहे. या संदर्भात रोष सुरु झाला तो स्वातंत्र्यानंतरचा आहे. स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात महाराष्ट्र एकसंध असावा असे लोकमान्य टिळक पासून सर्व नेते सांगत होते. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर इंग्रज गेले आणि केंद्रात आमची सत्ता आली, केंद्रात सरकार आले. भाषावार प्रांतरचनेसाठी आयोग नेमण्याबाबत नेहरु, पटेल चालढकल करीत होते. पण संविधानसभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या प्रयत्नांनी 7 जून, 1948 रोजी दार आयोगाची स्थापना झाली. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एस.के.दार यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या आयोगात बिहारमधील एक वकील जगतनारायण लाल व निवृत्त आय.सी.एस.अधिकारी पन्नालाल यांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. या आयोगाला साहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, वऱ्हाड,कर्नाटक, आंध्र, तामीळनाडू आणि केरळ या प्रांताच्या प्रतिनिधींची एक समिती नेमण्यात आली. त्या त्या प्रांताच्या सरकारांनी मात्र पूर्णपणे मौन पाळणे पसंत केले होते. दार समितीला छेद देणारी काही माहिती मी या ठिकाणी देऊ इच्छितो.

महोदय, 15 डिसेंबर, 1948 रोजी अखिल भारतीय कॉंग्रेसच्या जयपूर अधिवेशनात काकासाहेब गाडगीळांनी दार आयोगाच्या अहवालावर टीका केली. भाषावार प्रांतरचनेच्या कॉंग्रेस

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

समर्थकांची नाराजी लक्षात घेऊन जयपूर कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पट्टाभी सीतारामय्या, जवाहरलाल नेहरु व सरदार वल्लभभाई पटेल या तिघांची नवी समिती नेमली, जी "जवप" (JVP) म्हणून ओळखली जाते. या समितीपुढे कोणालाही साक्ष देण्यास बोलावण्यात आले नाही. "जवप" समितीचा अहवाल 5 एप्रिल, 1949 साली प्रसिध्द झाला. फाळणीनंतर बदललेल्या देशांतर्गत परिस्थितीत भाषावर प्रांतरचनेच्या प्रश्नाचा नव्याने फरविचार करण्याची गरज असल्याचे मत अहवालात ठासून मांडले गेले. एखाद्या प्रदेशात भाषावार प्रांतरचनेविषयीची लोकभावना लक्षात घेऊन त्यांच्या मागणीची व्यवहार्यता व संभाव्य परिणाम याचा विचार करावा लागेल, असे "जवप" समितीने म्हटले. थोडक्यात, " महाराष्ट्राला स्वतंत्र प्रांत मिळेल, पण मुंबई मिळणार नाही. आंध्रला आंध्र मिळेल, पण मद्रास मिळणार नाही. कर्नाटकाला प्रांत मिळेल पण तूर्तास नाही, असा फक्त वायदा समितीने केला.

सभापती महोदय, या अहवालाबाबत महाराष्ट्रात निरनिराळया प्रतिक्रिया उमटल्या. "कॉंग्रेसश्रेष्ठींनी दिलेला हा निर्णयम्हणजे उघड उघड महाराष्ट्राचा अपमान आहे. हा अपमान महाराष्ट्र कधीच सहन करणार नाही. महाराष्ट्र कॉंग्रेसचे नेते भाऊसाहेब हिरे गरजले. ते त्यावेळी असे म्हणावयाचे की, माझ्या खिशामध्ये 54 आमदारांचे राजीनामे आहेत. दिल्ली येथून आदेश आल्यानंतर ते सर्व राजीनामे खालच्या खिशात गेले. त्यांनी नमस्कार केला आणि महाराष्ट्र विरोधी भूमिका ताबडतोब घेतली. दिल्ली पुढे शरणागती पत्करली. शंकरराव देवही पक्षशिस्तीपुढे नरमले.

सभापती महोदय, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस शंकरराव मोरे यांनी पत्रक काढले. " संयुक्त महाराष्ट्रासाठी लढण्याची तयारी करा, मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांना कायमचे अलग ठेवून, त्यांचे रक्तशोष करण्याचे हे भांडवलशाही कारस्थान आहे."

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य जी माहिती देत आहेत, तसे घडलेले नाही. ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्र घडला, आपण इतिहास काढून पाहू शकता. त्यावेळच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळात झालेली भाषणे आपण पाहू शकता. संयुक्त महाराष्ट्र मुंबईसह असावा असा आग्रह भाऊसाहेब हिरे यांनी प्रथम पासून धरुन ठेवला. मुंबई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

महाराष्ट्राला मिळाली. यामध्ये भाऊसाहेबांचे योगदान देखील मोठे आहे. ज्यावेळेला आम्ही टपाल तिकिट काढले, त्यावेळी माननीय राष्ट्रपतींनी देखील ही बाब मान्य केली. ही गोष्ट मी सभागृहाला माहितीस्तव सांगू इच्छितो. या बाबतची नोंद सभागृहाने घ्यावी, अशी विनंती आहे.

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : माननीय सदस्य डॉ.प्रशांत हिरे यांनी खुलासा केला त्याबद्दल धन्यवाद. हे पुस्तक 1 मे 2010 रोजी प्रसिध्द झाले.त्याला अजून आक्षेप घेतला जात आहे. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये या मुद्यावरुन संयुक्त महाराष्ट्राचा लढा उभा राहिला. तो इतिहास सांगणारे येथे अनेक लोक आहेत. काल उषाताई दराडेंच्या भाषणात अहिल्याताईचा उल्लेख आला. मला खूप भरुन आले होते. अहिल्याताई रांगणेकर या मुंबई महानगरपालिकेमध्ये होत्या. हे आम्ही लहानपणापासून पहात आहोत. येथे लिहिले आहे ते नोंद केले आहे. भाऊसाहेब हिरें विषयी राजीनाम्याच्या संदर्भात जेवढा उल्लेख मी केला आहे तो सदनाच्या कामकाजातून काढून टाकावा मी त्यांचा आदर करतो. भाऊसाहेब हिरे हा विषय नाही.

सभापती महोदय, मुंबई मिळविणे हा अट्टाहास होता. मुंबई प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष स.का.पाटील यांच्यासह पाच सदस्यांच्या समितीने भाषावार प्रांतरचना हा विषय 10 वर्षे पुढे ढकलावा अशी शिफारस केली .बिगर मराठी भाषिकांचा जबरदस्त प्रभाव मुंबई प्रदेश कॉंग्रेस समितीवर होता. जे.आर.डी.टाटा, होमी मोदी, दोराबजी करंजिया, ठकरसी पोतदार अशा उद्योगपतींनी मुंबई महाराष्ट्रात समावेश करण्यास विरोध केला होता. समितीचे अध्यक्ष स.का.पाटील बॉम्बेच्या बाजूने हिरीरीने मांडत होते. तीच प्रवृत्ती हे विधेयक मांडतांना शासनाने आणली आहे .आग्रह असा होता की, बॉम्बेचे मुंबई करा. बॉम्बेचे महाराष्ट्र केले ही आम्हाला अभिमानाची बाब आहे. पण बॉम्बेचे मुंबई करणार नाही. महाराष्ट्र देणार पण मुंबई हे नाव देणार नाही. राजधानीचे नाव तुम्हाला मुळीच देणार नाही ही प्रवृत्ती दिसली. सभापती महोदय, योगायोग पहा की मी आज बोलणार आहे आणि हिरेंचे नपाव घेणार आहे हे मलाही माहीत नव्हते. पण डॉ.अपूर्व हिरे यांनी त्या गोष्टीचे खंडन केले हे फार महत्वाचे झाले. हा योगायोग आहे. हे सगळे का मांडले आहे याचा विचार करा. कारण सदस्य म्हणतील कुठून वाचून काढले आणि काय मांडले आहे ? महाराष्ट्र हा शब्द 5-6 हजार वर्षापूर्वी निर्माण झाला, महाराष्ट्र देश कसा होता त्याचे वर्णन काय होते हे सांगत असतांना आणि माझा महाराष्ट्र कसा आहे हे सांगत असतांना आधुनिक महाराष्ट्रातील जे खलनायक होते तेसुध्दा यामध्ये दिसले. पंडित जवाहरलाल नेहरु तर महाराष्ट्राच्या बाबतीत 100 टक्के खलनायक होतेच. विधेयकामध्ये जी अशा प्रकारे नोंद झालेली आहे ती अत्यंत दुर्देवी बाब आहे. मी सर्व सदनाला विनंती करतो. हा पक्षाचा विषय नाही.
तुम्हा आम्हा सर्वाचा हा विषय आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

सभापती महोदय, उद्देश आणि कारणे यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे. कायदे बदलण्याचा आग्रह विधान परिषदेत झाला त्याचा सन्मान करुन राहिलेले काम आम्ही पूर्ण करीत आहोत, कायद्यात बदल केला असता तर विधिमंडळाचा सन्मान झाला असता. येथे दिवाकर रावते ही व्यक्ती महत्वाची नाही. विधिमंडळात मी बोलत आहे. उद्देश आणि काराणामध्ये भयंकर उल्लेख केलेला आहे.

श्री.एस.क्यु.जामा : सभापती महोदय, पॉइंट ऑफ इनफॉर्मेशन है. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावतेजी की जो भावना है, उससे मै सहमत हूँ. ये जो बिल हे वो मैंने पढा है. मराठी और इंग्रजी भी पढा. आपने पुरा इतिहास बताया. पहलेभी कहा हूं कल भी कहाँ है, की मराठी और महाराष्ट्र की अस्मिता के लिए हम सब लोग खडे रहेंगे. आपसे मैं ये जानना चाहता हूॅ की कौनसे एक मुद्देपे आपका विरोध है. वो बात बताईए.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यामध्ये एक वाक्य आहे. म्हणून हे विधेयक ताबडतोब मागे घेतले पाहिजे. 1960 पासून अंमलात आलेल्या मुंबई पुनर्रचना अधिनियम 1960 (1960 चा मुंबई 11 ) या अन्वये नवीन गुजरात राज्याची स्थापना करण्यात आली आणि उर्वरित मुंबई राज्य हे महाराष्ट्र राज्य या नावाने पुढे कायम राहिले.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 14:25

श्री.दिवाकर रावते.......

राज्यात अंमलबजावणीत असलेले मुंबई अधिनियम म्हणजे या महाराष्ट्र राज्यातील अधिनियम असा त्याचा अर्थ आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा अवमान करणारी आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी आणलेल्या मंगल कलशाचा अवमान करणारी आहे. महाराष्ट्रासाठी बलिदान करणाऱ्या 105 हुतात्म्यांचा अवमान करणारी आहे. जे लढवय्ये होते त्यात एस.एम.जोशी, प्रबोधनकार ठाकरे, कॉ.डांगे, सेनापती बापट, अहिल्या रांगणेकर, आचार्य अत्रे असे अनेक महारथी होते. या सर्व महान प्रभूतींचा अवमान करणारी ही वाक्ये आहेत. म्हणून माझी प्रामाणिक विनंती आहे की, महाराष्ट्राचा अवमान होईल असे कोणतेही विधेयक या विधिमंडळामध्ये मंजुरीसाठी आणू नये. असे महाराष्ट्राचा अवमान करणारे विधेयक आम्ही मंजूर करु शकत नाही.

सभापती महोदय, मराठी भाषेकरिता आणि मराठी राज्याकरिता प्राणत्याग करावा अशा प्रकारची चिथावणी देणाऱ्या महान प्रभूतींचा अवमान करणारी चुकीची नोंद या विधिमंडळाच्या पटलावर येणे अक्षम्य आहे. महाराष्ट्र कसा आहे, मुंबई कशी आहे, कोणी विरोध केला, कोण लढले एवढ्यासाठी पुराण वाचावे लागले. म्हटले तर हा विषय सोपा आहे. आत्मीयता तेवढी सोपी नसते. आईचे नाव काय यापेक्षा आईचे आईपण श्रेष्ठ असते. मातृभाषेपेक्षा आणखी काही अनमोल असू शकत नाही. हे विधेयक मागे घेऊन योग्य ती सुधारणा करावी अशी मी शासनाला नम्र विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक-54 महाराष्ट्र (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावांत बदल करणे) विधेयक, 2011 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक सभागृहापुढे येण्यास खूप विलंब झाला आहे. ही बाब एवढी सोपी होती तर ती अंमलात आणण्यास इतकी वर्षे का वाट पहावी लागली? हा चिंतनाचा आणि चिंतेचा विषय आहे. याला कारण असेही असू शकते की, नावात काय आहे? परंतु नावात सर्व काही असते. नावात सर्व काही असते या भावनेशी शासन यंत्रणा, सत्ताधारी आणि सर्व माननीय सदस्य लोकशाही प्रक्रियेत एकत्रपणे नसतील तर सगळेजण म्हणतात म्हणून करुन टाकण्याने फारसे काही बिघडणार नाही किंवा घडणार नाही अशा एका अलिप्ततेच्या भावनेतून विधेयक सभागृहापुढे आलेले आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने या अतिशय महत्वाच्या विधेयकाबाबत कुठेही भावनेचा ओलावा जाणवत नाही.

सभापती महोदय, शासकीय यंत्रणेकडून हे अपेक्षितही नाही. कारण यंत्रणा आपण राबवित असतो, त्यामुळे रचना करताना आपण राहिलेल्या गोष्टी पूर्ण करीत असतो. अशा वेळेला अधिक बारकाईने काळजीपूर्वक या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्याची गरज आहे. विधेयकाच्या मराठी प्रतीमधील उद्देश व कारणांमध्ये कोणत्याही स्थितीत गुजरात राज्याचा उल्लेख येण्याची आवश्यकता नव्हती असे मला वाटते. अशा अनावश्यक गोष्टी का अंतर्भूत होतात? अशा गोष्टी अंतर्भूत होत असतील तर आपली मानसिकता काय आहे, या मानसिकतेचे परिणाम काय आहेत याचाही या निमित्ताने विचार करण्याची वेळ आलेली आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ ST/ D/ पूर्वी श्री. भोगले....... 14:30

श्री. हेमंत टकले ........

महोदय, काल योगायोगाने माननीय विधानसभा अध्यक्षांच्या दालनात मी बसलो होतो. त्या सभागृहात हे विधेयक चर्चेला येणार होते. तेव्हा शिवसेनेचे माननीय गट नेते सुध्दा तेथे उपस्थित होते. तेच सांगत होते की, यामध्ये 84 कायद्यांचा उल्लेख केला आहे. पण हे 84 कायदे सोडून अजून भरपूर कायदे आहेत की ज्यांच्या नावात बदल करण्याचे राहून गेले आहे. अशा प्रकारे उर्वरित कायद्यांच्या नावांबाबत देखील काळजी घेणे आवश्यक आहे. हे सर्व एकाच वेळी करता आले असते, तसे करणे अवघड नाही. आपण यामध्ये नाव बदलत आहात व हा बदल महाराष्ट्रातील फक्त 84 कायद्यांनाच लागू होणार आणि बाकीच्या कायद्यांच्या बाबतीत विधि विभागाची अडचण होती काय हे समजण्यास मार्ग नाही. ज्यावेळी कायदा तयार होतो त्याची अंमल बजावणी समजावून सांगणारा वकील, कायद्याप्रमाणे राज्य चालविणारी प्रशासकीय यंत्रणा आणि ज्यांना कायद्याचा लाभ मिळणार आहे अशा सर्वांचा समान्वय या विधेयकातील तरतुदीच्या माध्यमातून केला होता काय असाही प्रश्न येथे निर्माण होतो. खरे तर जेव्हा आम्ही कायद्याचा मसुदा तयार करतो किंवा त्यात सुधारणा करतो त्यावेळेस आपल्याजवळ शब्दकोष निर्माते आहेत, विश्वकोष निर्माते असतात. हे सर्व लोक असताना देखील अर्थ बरोबर तसाच येईल असा मराठी शब्द कोणालाच का सापडत नाही, हा प्रश्न आहे. पुन्हा मराठी भाषा विभाग आहे, त्याची चर्चा केल्यानंतर आपण जो शब्द यात दिला आहे तो पृ.क्र.3, कलम 17 मध्ये आहे. "महाराष्ट्र बोर्स्टल शाळा अधिनियम, 1929" आणि त्याचे "मुंबई बोर्स्टल शाळा अधिनियम, 1929" असा जो उल्लेख केला आहे त्यात "बोर्स्टल" म्हणजे काय याचाही बोध होत नाही. ज्यांचा कोणाला फायदाच नाही तर त्याला मान्यता का द्यावयाची हा प्रश्नही निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकारे कायदा करताना ज्याचा आपल्या जाणिवेशी, राज्याच्या स्वाभिमानाशी, मराठी भाषेशी संबंध आहे त्यावेळेस संपूर्ण व सखोल विचार करणे आवश्यक आहे. केवळ वरवर विचार हा साधा वाटत असला तरी त्याचा गर्भितार्थ खूप मोठा आहे, खूप मोठा आशय त्यात दडलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे केवळ कॉस्मेटिक सर्जरी करुन चालणार नाही, पुस्तकावरील नाव, कव्हर किंवा चित्र बदलून घेण्याचे काम आपण करीत आहोत. म्हणून सर्व बाजूंनी मराठी माणसाची मागणी येते त्यादृष्टीने या गोष्टींचे महत्व आहे. अशा सर्व गोष्टींचा पुन्हा विचार करावा व आवश्यक वाटत

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले........

असेल तर त्या सुधारणा कराव्यात लागतात आणि उर्वरित 4-5 बाबींचा समावेश लवकरात लवकर कसा करता येईल व असे परिपूर्ण विधेयक होऊन मराठी माणसाला हे राज्य महत्वाचे आहे, हा कायदा महत्वाचा आहे, प्रशासकीय यंत्रणा महत्वाची आहे असा विश्वास पुन्हा निर्माण होईल अशा प्रकारचा बदल केला तर हे विधेयक महत्वाचे असून मराठी माणूस मोठ्या मनाने स्वीकारेल व त्याला आनंद वाटेल. एवढे बोलून माझे भाषण मी पूर्ण करतो. धन्यवाद.

-------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : महोदय, मुंबई अधिनियमाच्या ऐवजी महाराष्ट्र अधिनियम अशा दुरुस्तीची सुधारणा करणाऱ्या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बॉम्बेचे मुंबई असे नामकरण होते आणि सर्व कायद्यांमध्ये महाराष्ट्र असा उल्लेख होतो, या निर्णयाचे मी एका बाजूला स्वागत करतो पण शासनाला अशी कोणती घाई होती की अर्धे मुडदे विभागाकडे घेऊन येथे येण्याची गरज पडली, असे काय घडले होते हे समजत नाही. जर शासनाला असे करावयाचेच होते तर सर्वच कायद्यांमध्ये अशा प्रकारचे नामाभिधान करणे आवश्यक होते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नेमका मुद्दा मांडला. तसेच बॉम्बेचे मुंबई असे नामकरण करण्याचे श्रेय खरोखरच संपूर्णपणे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनाच जाते व त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदनही करतो. ते अनेक वेळा एकाकी लढा देतात, पण तो लढा मराठीसाठी, महाराष्ट्रासाठी आणि मुंबईसाठी असतो.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ....

अनेकदा त्यांचा आग्रह दुराग्रहासारखा वाटतो परंतु आपल्या राज्याच्या अस्तित्वासाठी, आपल्या राज्याच्या अस्मितेसाठी, मायबोलीच्या अस्मितेसाठी असा दुराग्रह असला तरी तो आवश्यक आहे. त्याशिवाय तुमचे अस्तित्व, ओळख सिध्द होऊ शकत नाही. स्वत:ची ओळख पटविण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते करीत असलेला दुराग्रह स्वागतार्ह आहे. या विधेयकाच्या संदर्भात सुध्दा सर्व श्रेय सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे आहे हे आपण कबूल केले पाहिजे. या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपला राग व्यक्त केला आहे.

उद्देश व कारणामध्ये जो उल्लेख करण्यात आलेला आहे तो अनावश्यक आहे. कायदे बनविण्याचा अधिकार या सभागृहाचा असला तरी कायद्याचा ड्राफ्ट तयार करणारी मंडळी वेगळी असतात. ड्राफ्ट बनविणाऱ्या माणसांनी नेमके काय केलेले आहे हे आपण बघितले पाहिजे. ड्राफ्ट बनविणाऱ्यांकडून कायदेशीर व तांत्रिक भाषा तयार करुन घ्यावी परंतु विधेयकातील आशय हा आपलाच असला पाहिजे व त्यामुळेच "शब्दाला" किंमत असते. उद्देश व कारणामधील पहिलीच ओळ अस्मितेला दुखावणारी आहे. उद्देश व कारणामध्ये म्हटले आहे की, "1 मे 1960 साली गुजरात राज्याची स्थापना करण्यात आली व उर्वरित राज्य महाराष्ट्र राज्य म्हणून कायम राहिले." महाराष्ट्र हे प्राचीन काळापासून आहे. पूर्वी मुंबई हे द्विभाषीक राज्य होते व त्यातून महाराष्ट्राची निर्मिती झाली परंतु ती लढवून मिळवावी लागली, महाराष्ट्र असा तसा मिळालेला नाही. महाराष्ट्रासाठी 105 हुतात्म्यांनी बलिदान दिलेले आहे. महाराष्ट्रासाठी एस.एम.जोशी, प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, अमर शेख या सर्व मोठ्या माणसांनी अभूतपूर्व त्याग केला आहे. महाराष्ट्रात लढलेल्या प्रत्येक मराठी माणूस, केवळ मराठी माणूसच नाही तर महाराष्ट्राच्या या लढाईमध्ये अनेक पारशी लोकांनी, अनेक अन्य भाषिकांनी योगदान दिलेले आहे, तेलगू भाषिकांनी सुध्दा योगदान दिले असून मुंबईसह महाराष्ट्र व्हावा अशी या सर्वांची इच्छा होती. म्हणून "मुंबई" शब्दाला, "मुंबई" शहराला आणि "महाराष्ट्र राज्याला" एक वेगळा अर्थ आहे व तो आशय या विधेयकात आला असता तर राज्याचा सन्मान झाला असता.

या राज्यात जे कायदे मंडळ आहे कायदे बनवित असतांना किमान यासंदर्भात बूज राखली गेली पाहिजे. हे विधेयक एवढया घाई घाईने आणण्याची गरज

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ....

नाही व आता आपल्याला विधेयक मागे घ्यावे लागणार आहे म्हणून कमीपणा वाटण्याचे काही कारण नाही. सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी या विधेयकाच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. खरे म्हणजे सोनारानेच कान टोचलेले बरे असते. माननीय मंत्री महोदयांना विरोधी पक्षाच्या सदस्यांचे म्हणणे ऐकावयाचे नसेल तर ऐकू नका परंतु सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे तरी ऐका. त्यामुळे हे विधेयक मागे घेऊन पुन्हा नव्याने आणले तर ते अधिक सन्मानपूर्वक ठरेल.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी महाराष्ट्राच्या संदर्भात ज्या पुस्तकाचा उल्लेख केला आहे त्या पुस्तकातील माननीय भाऊसाहेब हिरे यांचा उल्लेख केला त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य डॉ. अपूर्व हिरे हे माननीय भाऊसाहेबांचे पणतू आहेत. माननीय भाऊसाहेबांनी त्योवळच्या श्रेष्ठींच्या विरोधात भूमिका घेतली होती. त्यांची अशी भूमिका होती की, महाराष्ट्र झाला तर तो संयुक्त महाराष्ट्र व्हावा व तो मुंबईसह व्हावा. माननीय भाऊसाहेबांना यासंदर्भात मोठी किंमत मोजावी लागली होती, त्यांना मुख्यमंत्रीपद गमवावे लागले होते. अन्यथा मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. भाऊसाहेब हिरे होणार होते व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुध्दा तेच होऊ शकले असते. परंतु माननीय भाऊसाहेबांना त्यावेळी किंमत मोजावी लागली होती. महाराष्ट्राला जेवढे माननीय यशवंतराव चव्हाणांचे योगदान आहे तेवढेच योगदान भाऊसाहेब हिरे यांचेही आहे हे या निमित्ताने नमूद केले पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते असे म्हणाले होते की, महाराष्ट्राच्या वाटयाला नेहमी तिरस्काराची भावना आलेली आहे, महाराष्ट्राला इतिहास नाही, महाराष्ट्राचे लोक संकुचित आहेत. महाराष्ट्राचे लोक किती विशाल ह्दयाचे आहे याचा दाखला चिनी यात्रेकरुने त्याच्या वर्णनात करुन ठेवलेला आहे. महाराष्ट्रातील लोक हे जिवाला जीव देणारे आहेत, न्यायी आहेत परंतु ते तितकेच कठोर होणारेही आहेत. महाराष्ट्राचा इतिहास छोटा नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. यामध्ये आपल्याला यश आलेले नाही. परंतु मराठी भाषा प्राचीन

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ....

भाषा आहे. मराठी भाषा संस्कृतच्याही अगोदरची आहे. संस्कृतमधून मराठी भाषा निर्माण झाली असे म्हणणे देखील चुकीचे आहे. मराठी भाषा स्वयंभू भाषा आहे. संस्कृतच्या आधीपासून मराठी भाषा होती. मुंबई शहर हे बहुभाषिक आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

मुंबईत सापडलेला शिलालेख हा मराठी भाषेतील आहे. त्यातील वाक्य मी येथे उच्चारू शकत नाही. कारण येथे संसदीय भाषा वापरावी लागते. शिलालेखातील भाषा ही आजच्या संदर्भात थोडीशी असंसदीय आहे. मराठी माणसाची अस्मिता, ताकद, रागावणे हे सर्व त्या शिलालेखातील एका वाक्यात आहे. त्यात श्री.पाशाभाई पण आहेत. मराठी माणूस चिडला की काय करतो हे त्यात आहे. मराठी माणूस न्यायासाठी, हक्कासाठी, कायद्यासाठी चिडतो. मराठी माणूस हा कायद्याने चालणार आहे. कायद्याने चाला अन्यथा.... अशा प्रकारे या शिलालेखातील पुढचे वाक्य आहे. मराठी माणसाचे सगळे आतले रूप जोश, रस व्यक्त करणारा शिलालेख आहे. मुंबईतील पहिला शिलालेख हा मराठीतच आहे. तो शिलालेख मी छापला होता. तो छापल्या नंतर मला इतके फोन आले होते की, अरे तू काय छापतो आहेस असे विचारले होते.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती** (श्री.केशवराव मानकर) : आपली हरकत कशावर आहे? सन्माननीय सदस्यांना बिलावर बोलू द्यावे. आपण खाली बसावे.

श्री.राम. पंडागळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे माननीय सदस्य श्री.पाशाभाई पटेल यांच्या बद्दल बोलले आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी आक्षेप घेतला नाही. ते आता सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे आपण आता खाली बसावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी येथे जो इतिहास सांगितला तो पलीकडच्या बाजूला माहिती आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. या बिलाचा ड्राफ्ट बनविणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. त्यांना सातवाहन, शालीवाहन म्हणजे कोण हे माहीत नसेल. त्यांना संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर माहीत असतील. त्यांना श्री चक्रधरस्वामी कसे काय माहीत असणार ? महाराष्ट्राच्या सीमा श्री चक्रधरस्वामींनी आपल्या ग्रंथात लिहून ठेवल्या आहेत. तेव्हा हा सर्व इतिहास त्यांना माहीत असण्याची शक्यता नाही. कोणत्याही कायद्याचा मसुदा तयार करीत असताना सगळा इतिहास माहीत असला पाहिजे. कारण आपण राज्याच्या सत्तेवर बसले आहात. कोणताही कायदा सभागृहा समोर घेऊन येत असताना तो ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ जुन्नरे. 14:40

श्री.कपिल पाटील...

परिपूर्ण आणला पाहिजे. मला माहिती आहे की, आपणाला काही कोणाचा अपमान करायचा नाही. हे नाकारायचे नाही हे मला माहीत आहे. पण आपण विसरत असाल तर ते देखील चुकीचे आहे. आपणाला हे माहीत असलेच पाहिजे. माहीत नाही असे म्हणून चालणारच नाही. कायदा माहीत नाही म्हणून मी पाळला नाही असे बोलून चालणार नाही. त्यासाठी कायद्यामध्ये सूट नाही. त्याला शिक्षा भोगावी लागते.

कायदे मंडळामध्ये एखादी दुरूस्ती घेऊन यायची असेल तर आपणाला सगळे माहीत पाहिजे. माहीत नव्हते असे सांगून पळण्याची सोय नाही. आता विधेयक पास करा असे सांगता येणार नाही. माझे असे म्हणणे आहे की, विधेयक मागे घ्यावे. आपण जर विधेयक परत घेतले तर दोन्ही बाजूने स्वागत होईल. कारण कोणी नकार देण्याचा प्रश्नच नाही. आपण विधेयक नीट करून आणावे एवढीच माझी या निमित्ताने अपेक्षा आहे. धन्यवाद.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ ST/ पूर्वी श्री.ओटवणेकर . . . . 14:45

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शासनाने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक इ 54 विवक्षित अधिनियमांची संक्षिप्त नावे "मुंबई अधिनियम" याऐवजी "महाराष्ट्र अधिनियम" अशी बदलण्यासाठी त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक आणलेले आहे. पण याठिकाणी जे चुकीचे विधयक आणलेले आहे, त्याला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, खरेतर सुरुवातीला या विधेयकाच्या बाबतीत कोणी बोलावयाचे नाही आणि ते विधेयक मंजूर करावयाचे अशी आमच्यामध्ये हलकी चर्चा होत होती. पण मी विधेयकातील उद्देश व कारणे वाचली. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "1 मे 1960 पासून अंमलात आलेला मुंबई पुनर्रचना अधिनियम, 1960 (1960 चा मुंबई 11) या अन्वये नवीन गुजरात राज्याची स्थापना करण्यात आली; आणि उर्वरित मुंबई राज्य हे महाराष्ट्र राज्य या नावाने पुढे कायम राहिले." म्हणजेच या महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम या विधेयकाच्या माध्यमातून झाले आहे असे जर मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, एका गोष्टीचे वाईट वाटते की, ज्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्ण कलश आणला आहे त्या स्व.यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. तसेच सदरहू विधेयक आणताना या महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री देखील श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब आहेत. प्रथम मला एक गोष्ट समजली पाहिजे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सदरहू विधेयक विधेयक पाहिले आहे काय? तसेच त्यातील उद्देश व कारणे वाचलेली आहेत काय? असा मला प्रश्न पडला आहे. मग हे कोण अधिकारी आहेत, कोण सचिव आहेत? त्यांची हिंमत कशी होते? महाराष्ट्र राज्याला मुंबई सहजासहजी मिळालेली नाही. गुजरातचा उर्वरित भाग म्हणजे महाराष्ट्र असे म्हणण्याची हिंमत कशी झाली? मी परत सांगतो की, महाराष्ट्राला मुंबई सहजा सहजी मिळालेली नाही. या बोलण्याने कदाचित कोणाला तरी वाईट वाटेल.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांना सांगू इच्छितो की, त्यावेळी कै.पंडित जवाहरलाल नेहरु यांनी असे वक्तव्य केले होते की, "जोपर्यंत चंद्र, सूर्य आहेत तोपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही" त्यामुळे आम्हाला सहजासहजी मुंबई मिळोली नाही.एपण असे म्हणण्याची हिंमत कशी होऊ शकते? ही मुंबई मिळविण्यासाठी, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी 105 हुतात्मे झाले आहेत आणि यामध्ये गिरणी कामारांचा सहभाग अधिक आहे आणि आम्हाला घरे कधी मिळणार आहेत हे विचारण्यासाठी आज बाहेर बसलेले आहे. 50 वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर देखील आज याठिकाणी हे विधेयक आणले जात असून त्याव्दारे मुंबईतील मराठी ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

माणसाची चेष्टा केली जात आहे असे मी म्हणेन. तसेच याठिकाणी माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत. मला असे सांगावयाचे आहे की, अहो, अजून आपला संपूर्ण महाराष्ट्र कुठे झाला आहे? कारण बेळगाव, कारवार, धारवाड, निपाणी, बिद्री यासह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे यासाठी गेली 56 वर्षे 21 लाख मराठी माणसे वाट पहात आहेत. पण संयुक्त महाराष्ट्र कुठे झाला आहे? होय, आम्ही स्वातंत्र्यांची फळे खात आहोत आणि बाकीचे सगळे तिकडे पारतंत्र्यामध्ये जगत आहेत.

श्री.दीपक साळुंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, कै.पंडित जवाहरलाल नेहरु यांनी असे वक्तव्य केले होते की,"जोपर्यंत चंद्र, सूर्य आहेत तोपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही." पण कै.पंडित जवाहरलाल नेहरु यांनी असे म्हटलेले नाही तर कै.मोरारजी देसाई यांनी म्हटलेले आहे असे मला सांगावयाचे आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कै.पंडित जवाहरलाल नेहरु असे म्हणालेले आहेत. तुम्ही तपासून पहावे. यामध्ये काही अडचण नाही. मी जबाबदारीने बोलत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्या आताच्या भावनेशी मी सहमत आहे. त्यावेळी अपमान झाला होता पण पंडित जवाहरलाल नेहरु यांनी केला नव्हता.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, जर कै.पंडित जवाहरलाल नेहरु असे म्हणाले नसतील तर ते काढून टाकण्यात यावे. पण त्यापूर्वी पंडित जवाहरलाल नेहरु काय म्हणाले, कै.स.का.पाटील काय म्हणाले ते तपासून पहावे. संयुक्त महाराष्ट्र कसा झाला हे सर्व तपासून पहावे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सदरहू बाब तपासून काढण्यात येईल. सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्याला पुन्हा सांगतो की, आपण ते तपासून पहावे आणि तसे नसेल तर कामकाजातून काढून टाकावे.

**तालिका सभापती** : मी निर्णय दिलेला आह की, तपासल्यानंतर ते काढण्यात येईल.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मोरारजी देसाई यांची गाडी अडविल्यानंतर ही मुंबई तीन दिवस जळत होती. शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे तीन महिने जेलमध्ये होते. ही मुंबई सहजासहजी मिळालेली नाही. तीन दिवस मुंबई जळत होती. 1969 सालामध्ये शिवसेनेने 69 हुतात्मे दिलेले आहेत. मघाशी या ठिकाणी मराठी माणसांचा उल्लेख करताना बाणेदार मराठी माणूस, आक्रमक मराठी माणूस असा उल्लेख करण्यात आला. या मराठी माणसांची आज मुंबईमध्ये काय अवस्था आहे ? मुंबईमध्ये मराठी माणूस कोठे शिल्लक आहे ? एकेकाळी मराठी माणसांचे गिरणगाव होते. काही दिवसानंतर मुंबईमध्ये मराठी माणूस शोधावा लागेल. विरार, नालासोपारा, वसई या भागामध्ये मराठी माणूस स्थलांतरित होत आहे.

सभापती महोदय, आज मुंबईमध्ये जे टॉवर्स तयार होत आहेत त्या ठिकाणी बोर्ड लागलेले असतात की, मटण, मासळी खाणाऱ्यांना या ठिकाणी फ्लॅट मिळणार नाही. अशी आज मुंबईची अवस्था आहे. ही आमची मुंबई आहे. ही मराठी माणसांची मुंबई आहे. ज्यावेळी आपण मुंबई शहरातील मराठी शाळांची माहिती घेतो तेव्हा असे दिसून येते की, मुंबईतील मराठी शाळांपेक्षा उत्तर भारतीयांची आणि परप्रांतीयांची संख्या मराठी शाळेमध्ये अधिक आहे, हे स्पष्ट झाले आहे. मराठी माणूस मुंबईमध्ये कोठे आहे ? मराठी माणूस आक्रमक आहे, प्रामाणिक आहे असे आम्ही नुसते म्हणावयाचे. हे सगळे कागदावर आहे. आज मराठी माणूस मुंबईमध्ये शिल्लक आहे का ?

सभापती महोदय, मला सांगितले पाहिजे की, या ठिकाणी जे विधेयक आणलेले आहे ते आम्ही कोणत्याही परिस्थितीमध्ये मंजूर होऊ देणार नाही. ही आमची अस्मिता आहे. या बिलाच्या पाठीमागे आपला उद्देश चांगला आहे पण बिलाचे जे ड्राफ्टींग केले आहे ते अपमानकारक आहे. ते मराठी माणसांना मान खाली घालावयास लावणारे आहे. मराठी माणसांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे ड्राफ्टींग केलेले आहे. या विधेयकामध्ये ज्या बिलांची नावे दिलेली आहेत ती वाचून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. पण एक गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे की, आज मुंबई महानगरपालिका देशातील इतर राज्यांना जगविते. मुंबई शहराच्या माध्यमातून दरवर्षी 1 लाख 30 हजार कोटी रुपये दिल्लीमध्ये जात आहेत. त्यातील एक छदामही मुंबईच्या विकाससाठी, मराठी माणसाच्या विकासासाठी आम्हाला मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. मुंबईतून फक्त पैसे घेऊन जाण्याचे काम होते. आम्हाला विकासासाठी पैसे मिळत नाहीत. ते पैसे मिळाले असते तर आपल्या राज्यातील धरणांची अशी अवस्था झाली नसती.

आम्ही सिंचनाच्या बाबतीत सारखे बोलत असतो. एका बाजूला आम्ही सांगावयाचे की, मुंबई ही संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी आहे पण या मुंबईला ओरबाडून खात आहेत, तिचे कपडे उतरवून घेऊन चालले आहेत. तुम्ही मुंबईला काय देता ? या मुंबईमध्ये मराठी माणसांसाठी काय शिल्लक आहे ? आपल्या शिक्षण खात्याला मराठी भाषेचा सचिव मिळत नाही ही आपली शोकांतिका आहे. मराठी भाषेसाठी एकही मराठी सचिव मिळत नाही. या ठिकाणी अनेक वेळा चर्चा झाली. कोणतीही सुनावणी असेल, महानगरपालिकेची सुनावणी असेल किंवा म्हाडाची सुनावणी असेल सगळ्या सुनावण्यांची निकालपत्रे इंग्रजीमध्ये असतात. या सभागृहामध्ये फक्त आश्वासने दिली जातात. 'मराठी असे आमुची मायबोली परि आज ती राजभाषा नसे' या सगळ्या गोष्टी सांगण्यासाठी ठीक आहेत. पण प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे ? मराठी भाषेला न्याय देण्यासाठी आपण एक वेगळे खाते उघडले. थोडी पैशाची तरतूद केली पण पुढे काय झाले ? आज जैसे थे परिस्थिती आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 14:55

श्री.रामदास कदम...

म्हणून शासनाने प्रथम असे सांगितले पाहिजे की, मराठी माणसांची, मुंबईची आणि या महाराष्ट्राची मान उंचावयाची असेल तर कर्नाटकमध्ये, तामीळनाडूमध्ये जाऊन पहावे. मातृभाषेच्या अस्मितेबद्दल ते लोक किती जागरुक आहेत ते त्यांच्याकडून शिकले पाहिजे. पण येथे मात्र आश्वासन देण्यापलीकडे काहीही केले जात नाही. ही मुंबई आपल्याला सहजा सहजी मिळालेली नाही. त्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला आहे. 105 हुतात्मे झालेले आहेत.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, मी खास करुन आपले भाषण ऐकण्यासाठी आलो आहे. आपण मघाशी 'मराठी असे आमुची मायबोली' ही कविता म्हणून दाखविली होती. ती कविता खरोखरच सुरेख आहे. कृपया आपण ती कविता पूर्ण म्हणून दाखवावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या सभागृहामध्ये शासनाच्या वतीने तब्बल 85 वेळा मंत्री महोदयांनी मराठी भाषेला न्याय देण्यासाठी आश्वासने दिलेली आहेत. त्यापैकी किती आश्वासनांची शासनाकडून पूर्तता झाली आहे त्याची जर माहिती मला मिळाली तर मी ती कविता पूर्णपणे म्हणून दाखवितो. सभापती महोदय, या सभागृहात कवितेपेक्षा मराठी माणसांना, मराठी भाषेला न्याय देण्याचे काम, या महाराष्ट्राचे मराठीपण जपण्याचे काम शासनाकडून होणे अपेक्षित होते, पण ते अद्याप झालेले नाही. हे महाराष्ट्र राज्य आमचेच आहे. सह्याद्रीच्या पाठीशी महाराष्ट्र उभा राहतो ही एक वेळची भूमिका होती, अशी परिस्थिती यशवंतराव चव्हाणांच्या वेळी होती. परंतु आजची परिस्थिती कशी आहे ? सध्या महाराष्ट्राच्या लोकांना दिल्लीत जाऊन मुजरे करावे लागतात. आज आपण कोठे आहोत ? आज राज्याबद्दल छोटासा निर्णय घ्यावयाचा असेल तरी दिल्लीत गेल्यानंतर नेत्यांसमोर कंबरेपासून खाली झुकावे लागते. अशी आमची अवस्था आहे. येथे मात्र आपण म्हणावयाचे की, हा महाराष्ट्र आमचा आहे. आमचा महाराष्ट्र म्हणण्याचा या शासनाला अधिकार आहे काय ? म्हणून शासनाने आणलेल्या या विधेयकाला मी पूर्णपणे विरोध करीत आहे. या विधेयकाच्या उद्देश व कारणाचे जे ड्राफ्टिंग केलेले आहे ते अत्यंत चुकीचे आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ ST/ KTG/

श्री.रामदास कदम...

त्यात असे नमूद केले आहे की, " 1 मे, 1960 पासून अंमलात आलेला मुंबई पुनर्रचना अधिनियम, 1960 या अन्वये नवीन गुजरात राज्याची स्थापना करण्यात आली; आणि उर्वरित मुंबई राज्य हे महाराष्ट्र राज्य या नावाने पुढे कायम राहिले. हे ड्राफ्टिंग सर्वांची मान शरमेने खाली जाईल असे आहे. त्यामुळे हे विधेयक शासनाने तातडीने मागे घ्यावे. त्यामुळे सभागृहाचा वेळ जाणार नाही आणि सभागृहापुढील कामकाजही होईल. हे विधेयक अपूर्ण ठेवून त्याचे ड्राफ्टिंग बदलून घ्यावे अशी माझी शासनाला विनंती आहे. यामध्ये जे शब्द आलेले आहेत ते तयार करणारे सचिव कोण आहेत, कोणाच्या सुपीक डोक्यातून ही कल्पना निघालेली आहे. ते देखील आम्हाला कळले पाहिजे. ते अधिकारी महाराष्ट्रद्रोही आहेत की राष्ट्रद्रोही आहेत की राष्ट्रवादी आहेत तेही आम्हाला समजले पाहिजे. यापुढे संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी सरकारची भूमिका काय आहे, ते स्पष्ट झाले पाहिजे.

यापुढील काळात महाराष्ट्र या नावाने शासकीय विधेयके येणार आहेत. त्यापैकी अनेक मूळ विधेयके 1918 सालातील, 1920 सालातील आहेत हे आम्हाला मान्य आहे. पण बेळगांव, धारवाड, कारवार, निपाणी, भालकी, यासह आपल्याला महाराष्ट्र अखंड ठेवावयाचा आहे. या भागांचा समावेश करुनच हे विधेयक आणले असते तर या विधेयकाला आणखी शोभा आली असती. आणखी एक चांगली किनार लाभली असती. परंतु दुर्दैवाने तसे झालेले नाही त्याला आम्ही जबाबदार आहोत.

वास्तविक पाहता भारतीय संविधानाच्या कलम 3 प्रमाणे केंद्र शासनाला त्याबाबत कायदा करता आला असता. दुर्दैवाने अजूनही ते झालेले नाही. ज्यावेळी दोन राज्यांचे एकमत होत नाही. त्यावेळी केंद्र सरकार त्याबाबत हस्तक्षेप करुन कायदा करु शकते. बेळगाव, धारवाड बाबत निर्णय घेऊ शकले असते. दोन राज्ये लढत आहेत ना तर त्यांना लढू दे अशी केंद्र सरकारची भूमिका आहे. सुप्रीम कोर्टात हा प्रश्न प्रलंबित आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय होईपर्यंत सीमा भाग केंद्र शासित करण्याचा निर्णय या सभागृहात अनेक वेळा घेतलेला आहे, परंतु त्याची अंमलबजावणी केंद्र शासनाकडून होत नाही.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

MSS/ D/ ST/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:00

श्री. रामदास कदम....

इतकी वर्षे हे विधेयक का आणले नाही ? इतकी वर्षे "मुंबई" ऐवजी "महाराष्ट्र" असा बदल का केला नाही ? आताच झोपेतून जागे का झालात ? बेळगाव, कारवार, धारवाड, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर हे विधेयक आणले असते तर महाराष्ट्र राज्यातील 11 कोटी जनतेला आनंद झ ाला असता. या विधेयकाच्या उद्देश आणि कारणामध्ये "गुजरात" असा जो उल्लेख केलेला आहे तो अत्यंत अवमानकारक आहे. हा उल्लेख वगळण्यात यावा एवढे बोलून मी विधेयकाला तीव्र विरोध करतो. खरे तर हे विधेयक मागे घेऊन सरकारने सुधारित विधेयक आणावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री दिवाकर रावते जी, माननीय सदस्य श्री हेमंत टकले जी, श्री कपिल पाटील साहब तथा श्री रामदास कदम साहब ने भी अपनी बात यहां पर रखी. लेकिन कांग्रेस पार्टी के किसी भी माननीय सदस्य को यहां पर बोलने का मौका नहीं मिला है. मैं भी यहां पर अपने विचार रखना चाहता हूं. यहां पर बोलने के लिए सबसे पहले, अपना हाथ मैंने ही उठाया था.

**उप सभापति** : ठीक है, आप बोलिए.

श्री एस. क्यू. जमा ( विधान सभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, मैं यहां पर बोलना चाहता हूं कि अंग्रेजी और मराठी, इन दोनों भाषाओं में छपा हुआ यह विधेयक मैंने पढ़ा है. माननीय सदस्यों ने संयुक्त महाराष्ट्र की बात यहां पर कही. उन्होंने यहां पर कहा कि संयुक्त महाराष्ट्र बनाने के लिए 105 लोगों को बलिदान देना पड़ा. मैं उनकी बात से सहमत हूं. मेरा कहना है कि इस अंग्रेजी और मराठी भाषा में छपे इस विधेयक में पहले गुजरात शब्द का उल्लेख किया गया है, जो कि संवैधानिक दृष्टि से उचित नहीं है. In the Statement of Objects and Reasons it is mentioned "Under the Bombay Re-organisation Act, 1960 (Bom.XI of 1960) which came into force from the 1st May 1960, a new State of Gujarat was formed, and the residuary State of Bombay is continued under the name of State of Maharashtra."

सभापति महोदय, मुझे लगता है कि सन् 1960 में जो एक्ट पास हुआ था, वह स्टेट रि-ऑर्गेनाइजेशन के तहत हुआ था. यहां पर गुजरात शब्द लिखने की जरुरत नहीं थी. हमारा कहना है कि इस एक्ट के माध्यम से गुजरात बना ऐसा न कहकर, ऐसा कहना चाहिए कि इस एक्ट के माध्यम से महाराष्ट्र राज्य बना. महाराष्ट्र राज्य "बॉम्बे" सहित बना. उसी बॉम्बे का नाम अब "मुंबई" हुआ है. हमारा कहना है कि इस विधेयक में महाराष्ट्र शब्द का नाम सेकेंडरी तौर पर लिखा गया है तथा गुजरात का उल्लेख यहां पर पहले किया गया है. यह गलत है, ऐसा नहीं होना चाहिए.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा...

सभापति महोदय, एक और विषय बार-बार आता है कि सन् 1864 से लेकर 1960 तक जितने भी बिल पास हुए उनके नाम अब बदले जा रहे हैं. इस विधेयक के मार्फत उन विधेयकों में "मुंबई अधिनियम" की जगह अब सभी जगह "महाराष्ट्र अधिनियम" लिखा जाएगा. लेकिन यह लिस्ट अभी पूरी नहीं है. इन विधेयकों को आप थोड़े- थोड़े करके क्यों ला रहे हैं. सभी बिल एक साथ क्यों नहीं ला रहे हैं. बाकी विधेयकों में भी यदि "मुंबई" की जगह "महाराष्ट्र" लिखना है तो उन सभी विधेयकों की एक कम्पलीट लिस्ट आनी चाहिए.

एक और बात मुझे यह कहनी है कि यहां पर बार-बार यह प्रश्न आता है कि जब हम लोगों ने बॉम्बे का नाम बदल कर मुंबई किया है तो उसके लिए भी एक ब्लेंकेट बिल यहां पर आना चाहिए. हमने पहले भी कहा है कि जितनी भी जगह "बॉम्बे" लिखा हुआ है उन सभी विधेयकों में "बॉम्बे" की जगह "मुंबई" करने के लिए एक बिल लाया जाना चाहिए. जिन विधेयकों का संबंध केंद्र सरकार से है या जहां पर बदल करने के लिए केंद्र सरकार की सहमति जरुरी है, उन विधेयकों को अलग किया जा सकता है. लेकिन जिन विधेयकों का संबंध सिर्फ महाराष्ट्र से है, उनमें संशोधन करने के लिए एक बिल पहले लाया जाना चाहिए और सभी जगह "बॉम्बे" की जगह पर "मुंबई" किया जाना चाहिए. उसके बाद "मुंबई" की जगह "महाराष्ट्र" शब्द लिखे जाने का काम होना चाहिए. इस तरह का मेरा सुझाव है और इसीलिए इस तरह का संशोधन होना चाहिए, ऐसा मेरा सुझाव है. धन्यवाद.

-0-

V V-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे )**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक मागे घेऊन पुन्हा एक चांगले विधेयक आणावे अशी मी विनंती केली होती. या ठिकाणी चुकीचे विधेयक ठेवण्यात आले आहे. "मुंबई अधिनियम ऐवजी "महाराष्ट्र अधिनियम" अशी सुधारणा करण्यात येत आहे. आमचा "महाराष्ट्र" या शब्दाला विरोध नाही. "मुंबई अधिनियम" असे नाव बदलून ते "महाराष्ट्र अधिनियम" असे करीत आहोत असे सांगण्यात आले. माननीय मंत्री प्रा.फौजिया खान यांचे नाव इंग्रजीमध्ये प्रा.फौजिया खानच राहणार आहे, उर्दू, तेलगू, तामिळ या सर्व भाषांमध्ये त्यांचे नाव प्रा.फौजिया खान राहणार आहे. भाषेमुळे नाव बदलत नाही. तेव्हा ही काय भानगड आहे मला कळत नाही. या ठिकाणी कायदा तयार करताना प्रत्येक शब्दाचा कीस काढला जातो. तेव्हा या ठिकाणी असे बेकायदेशीर कृत्य कसे करता येईल ? मराठीमध्ये मुंबई अधिनियम असेल तर आम्हाला ते बदलण्याची इच्छा नाही. अशा पध्दतीने कायदे होणार आहेत काय ? सरकारकडे बहुमत आहे म्हणून रेटून नेण्याचे काम होणार असेल तर हा महाराष्ट्राचा घोर अपमान आहे आणि तो आपल्या माध्यमातून होऊ नये असे मला वाटते. आपण सर्वोच्च पदावर आसनस्थ आहात. तेव्हा माझी आपणास नम्र विनंती आहे की, आपण हे विधेयक येथेच थांबवावे म्हणजे त्यावरील चर्चा देख्रील आपोआप थांबेल. आपण हे विधेयक दुरुस्त करुन या विधेयकाचा सन्मान करावा. मराठीमध्ये मुंबई अधिनियम असेल तर त्यास आमची मान्यता आहे. मी मागे "बॉम्बे हॉस्पीटलच्या" नावासंबंधी बोललो, परंतु ते नाव अजून तसेच आहे. सरकारने हे विधेयक मंजूर करण्याचा हट्ट करु नये. सरकारला अतिशय गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल एवढेच मी सांगतो.

-------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे ( नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 54 महाराष्ट्र (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावांत बदल करणे) विधेयक, 2011 मांडण्यात आले त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आले त्यातील उद्देश आणि कारणे यामध्ये "नवीन गुजरात राज्याची स्थापना झाली आणि उर्वरित भागास महाराष्ट्र नाव दिले" असे शब्दप्रयोग वापरण्यात आले आहेत. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी माझे पणजोबा मुंबई राज्याचे तत्कालीन महसूल मंत्री कै.कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी खूप मोठा वाटा उचलला होता. आपण कर्मवीर भाऊसाहेबांची सभागृहातील भाषणे वाचून त्याचा अभ्यास केला तर आपल्या निदर्शनास एक गोष्ट स्पष्टपणे दिसेल की, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला यामध्ये सर्वात मोठा वाटा कर्मवीर भाऊसाहेब हिरेंचा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी उल्लेख करण्यात आला की, कर्मवीर भाऊसाहेबांचा त्यास विरोध होता पण तो पूर्णतः चुकीचा आहे. कर्मवीर भाऊसाहेबांचा पहिल्यापासून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा असा आग्रह होता आणि त्यांच्यामुळेच ते झालेले आहे.

सभापती महोदय, मागील दोन वर्षापूर्वी कै. यशवंतराव चव्हाण आणि कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या तिकिटांच्या संयुक्त अनावरणाचा कार्यक्रम माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झाला. त्यावेळी केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार साहेबांनी देखील या गोष्टीचा उल्लेख केला होता. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मोरारजी देसाई महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार होते. परंतु त्यावेळी त्यांनी सांगितले की, "बिनविरोध निवड होत असेल तर मी मुख्यमंत्री होईन." त्यावेळी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी सांगितले होते की, " मी ही निवडणूक लढविणार आहे आणि ती निवडणूक बिनविरोध होणार नाही" मग मोरारजी देसाई यांनी निवडणूक लढविणार नसल्याचे जाहीर केले. त्यानंतर यशवंतराव चव्हाण यांचे नाव पुढे आले आणि ते संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्राचा पहिला मुख्यमंत्री मराठी माणूस व्हावा याकरिता देखील कर्मवीर भाऊसाहेबांचे योगदान आहे हे देखील मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे....

सभापती महोदय, "बॉम्बे ॲक्ट" ऐवजी "महाराष्ट्र ॲक्ट" अशी सुधारणा करण्यात आली. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. या ठिकाणी मुंबई आणि महाराष्ट्र असाही वाद झाला. महाराष्ट्र हेच नाव झाले पाहिजे शेवटी आपले महाराष्ट्र राज्य आहे आणि मुंबई हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे. कोणी किती प्रयत्न केला तरी मुंबई महाराष्ट्रपासून वेगळी होणार नाही ही गोष्ट देख्रील आपण लक्षात घेतली पाहिजे.

सभापती महोदय, सरकारने चांगले विधेयक आणलेले आहे. परंतु यातील काही शब्दप्रयोग बरोबर नाहीत. तेव्हा या विधेयकात सुधारणा करुन पुन्हा नव्याने विधेयक आणावे अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मघाशी असे मत व्यक्त केले की, इंग्रजी भाषेमध्ये "BOMBAY" लिहावयाचे आणि मराठी भाषेमध्ये "मुंबई" लिहावयाचे. आतापर्यंत कधी असे झाले आहे हे तपासून पहा. ही गोष्ट होऊच शकत नाही. कायद्याचे जे नाव आहे ते नाव तसेच राहिले पाहिजे. अधिनियम तोच राहिला पाहिजे. मराठीत "मुंबई" वापरणे योग्य आहे. पण इंग्रजीमध्ये "BOMBAY" लिहिण्याचे कारण काय, या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अन्यथा यात सुधारणा करावी लागेल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने दोन, तीन मुद्दे उपस्थित करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक सुधारित पध्दतीने यावे अशा प्रकारच्या सदस्यांच्या भावना आहेत असे माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आले असेल. त्यामुळे माझी विनंती आहे की, हे विधेयक सुधारणा करुन नंतरच सभागृहासमोर मांडण्यात यावे. या विधेयकात सुधारणा होणार असतील तर त्या अनुषंगाने मी दोन,तीन सूचना करु इच्छितो.

सभापती महोदय, या विधेयकाला अनुसूची दिलेली आहे. त्या अनुसूचीतील कॉलम 5 मध्ये सुधारित नाव दिले आहे. त्या नावासमोर कोणत्या वर्षी कायदा झाला, त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. तो उल्लेख करण्यात यावा. पहिल्या स्तभांमध्ये तसा उल्लेख आहे. तसा उल्ल्ेख पाचव्या स्तभांत करण्यात यावा. तो उल्लेख केला नाही तर ती चूक तशीच राहून जाईल. ती चूक दुरुस्त करावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, काळाच्या ओघात काही कायदे अल्पजीवी ठरतात. काही कायदे कालबाह्य झाले असतील आणि ते रद्दबादल देखील झाले असतील. सदर विधेयक चार परिच्छेदामध्ये आणले आहे. 5 व्या कलमामध्ये नामशेष वा रद्द झालेल्या कायद्यामध्ये "बॉम्बे", किंवा "मुंबई" शब्द असेल तोही रद्द करण्याचा उल्लेख असावा अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, 1960 नंतर जे कायदे केले आहेत, त्यात "महाराष्ट्र" अशा शब्दाचा उल्लेख असेल तर ती चांगली गोष्ट आहे. "मुंबई" अथवा "बॉम्बे" असा उल्लेख करुन काही कायदे झाले असतील त्यातही "महाराष्ट्र" असा उल्लेख करण्यात यावा,अशी सूचना करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

----------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या चर्चेत माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, हेमंत टकले, कपिल पाटील, एस.क्यू.जमा, रामदास कदम, भगवान साळुंखे, डॉ.अपूर्व हिरे यांनी भाग घेतला असून काही महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी तीन,चार महत्वाच्या मुद्यांवर चर्चा झालेली आहे. मी या ठिकाणी प्रत्येक मुद्याचा खुलासा करणार आहे. येथे सांगण्यात आले की, 84 कायद्यांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. आणखी काही कायद्यांचा समावेश या कायद्यात झालेला नाही. मला या ठिकाणी स्पष्ट करणे आवश्यक वाटते की, या कायद्यामध्ये इतर कायद्यांचा समावेश करीत असताना आम्ही सर्व विभागांना कळविले होते, त्याप्रमाणे त्यांच्याकडील जे कायदे आम्हाला प्राप्त झाले होते, त्या सर्व कायद्यांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये अनेक कायदे असे आहेत की त्यामध्ये बदल झालेला आहे. काही कायदे कालबाहय झालेले आहेत. सेंट्रल ॲक्ट आल्यामुळे ते रिपग्नन्ट झालेले आहेत. काही कायदे अस्तित्वात नाहीत. काही कायदे असे आहेत की, ते उपयोगात आणले जात नाहीत.

सभापती महोदय, विधानसभा सदस्य श्री.सुभाष देसाई यांनी 31 अधिनियमांचा समावेश करावा म्हणून विभागाकडे प्रस्ताव दिला होता. त्या संबंधित सर्व विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर असे लक्षात आले की, जे अधिनियम त्यांनी सुचविले होते ते निरसित झालेले होते. आता नावात बदल करण्याची गरज नाही, कारण ते रिपग्नन्ट झालेले आहेत. आज आपल्याला त्या कायद्यांची संख्या मोठी वाटत असली तरी वस्तुस्थिती तशी नाही.

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान....

सभापती महोदय, जर काही नवीन मुद्दा लक्षात आला तर कायद्यात तो समाविष्ट करणे गरजेचे आहे असे वाटले तर पुन्हा विधिमंडळासमोर येता येईल. अशा प्रकारे दोन वेळा कायद्यात सुधारणा केलेली आहे. 1980 मध्ये आणि 1996 मध्ये कायद्यात बदल केलेला आहे. यावेळी सुध्दा कायद्यात मोठा बदल केलेला आहे अशी वस्तुस्थिती नाही. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बॉम्बेचे मुंबई करण्याऐवजी महाराष्ट्र केले असा मुद्दा उपस्थित केलेले आहे. सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की जेव्हा हा कायदा करण्यात आला तेव्हा.......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, बॉम्बेचे महाराष्ट्र केले त्याचे मी स्वागत केलेले आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा हा विषय आहे. मुंबई अधिनियम आम्हांला मान्य आहे. कोणतेही बिल दडपून नेण्याचे काम बंद करा

( विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : (श्री. विनायक मेटे) : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या बिलावर आपले विचार मांडलेले आहेत. माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेल आहेत त्यावर मंत्रीमहोदयांना खुलासा करावयाचा आहे......

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी बिल मागे घेतो किंवा नाही ते सांगावे. विधानपरिषदेत हे सहन केले जाणार नाही. त्यांना विधेयक मागे घ्यायचे नसेल तर त्यांचे भाषण चालू राहू द्या.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याचे स्पष्टीकरण करणे मंत्रीमहोदयांना भाग आहे. ते स्पष्टीकरण सदस्यांना पटले नाही तर वेगळे मुद्दे उपस्थित करता येतील. मंत्रीमहोदयांना खुलासा करु द्यायचाच नाही हे बरोबर नाही. अधिक खुलासा हवा असेल तर विविध संसदीय आयुधांचा आपल्याला वापर करता येईल.

( विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

( **सभापतीस्थानी माननीय उप सभापती** )

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : विधेयकाच्या मराठी प्रतीमध्ये जे नमूद केले आहे ते मी वाचून दाखवितो. मुंबई अधिनियम या ऐवजी महाराष्ट्र अधिनियम असा बदल करण्यात येणार आहे. बॉम्बे ॲक्ट या शब्दाने सुरु होणारे कायद्यात यापुढे मुंबई ऐवजी महाराष्ट्र असा बदल होणार आहे. जे मुळात अस्तित्वात नाही ते कायद्यात अधिकृतपणे आले आहे. उद्देश व कारणामध्ये नवीन गुजरात राज्याची स्थापना करण्यात आली असे म्हटले आहे. त्याबद्दल आम्ही आक्षेप घेतला होता आणि योग्य ती सुधारणा करुन पुन्हा सभागृहापुढे विधेयक मांडण्यात यावे अशी विनंती केली होती. प्रत्येक गोष्ट प्रतिष्ठेची का करायची? मंत्री महोदयांना जे काही सांगायचे आहे तो त्यांचा अधिकार आहे. आम्ही विनंती केल्याप्रमाणे विधेयक मागे घेतले जाणार नाही असे सांगून त्यांनी उत्तराचे भाषण सुरु करावे एवढेच आमचे म्हणणे आहे. परंतु सभापती स्थानावरुन आम्हाला दरडावले जाणे योग्य नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या बिलाच्या निमित्ताने सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या भावना समान आहेत, तीव्र आहेत. महाराष्ट्राच्या अस्मितेच्या संदर्भात आहेत. कोणाचाही या बिलाला विरोध नाही. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सुरुवातीलाच सांगितले की, बिलाला आमचा विरोध नाही. उद्देश व कारणामध्ये जो आक्षेपार्ह भाग आहे तो बदलण्यात यावा. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी देखील याबाबत सहमती दर्शविली आहे. वास्तविक उद्देश व कारणे हे मंत्री महोदयांनी सरकारच्या वतीने केलेले निवेदन असते. तो बिलाचा भाग नसतो. तो भाग बदलून घ्यावा किंवा विधेयक मागे घेण्यात यावे. बिल आहे त्या स्थितीत मंजूर करण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. मंत्री म्हणून जे निवेदन केलेले असते ते राज्याचे अधिकृत धोरण असते. त्यामुळे मंत्री महोदयांच्या मुखातून राज्याचा अवमान होता कामा नये. शासनाच्या निवेदनातून राज्याच्या अस्मितेला नख लागता कामा नये, ही प्रामाणिक भावना दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांची आहे. उद्देश व कारणांमध्ये जे निवेदन केले आहे ते मागे घेऊन आक्षेपार्ह भाग बदलण्यात यावा. आयत्या वेळी त्यात दुरुस्ती करता येते. आपण आवश्यकता असल्यास सल्ला घ्यावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, बिल मागे घेऊन दुरुस्ती करण्यात यावी व पुन्हा सभागृहापुढे मंजुरीसाठी मांडण्यात यावे. 1 मे, 1960 पासून अंमलात आलेली मुंबई पुनर्रचना अधिनियम, 1960 या अन्वये नवीन गुजरात राज्याची स्थापना करण्यात आली आणि उर्वरित मुंबई

..2..

श्री.रामदास कदम........

राज्य हे महाराष्ट्र राज्य या नावे पुढे कायम राहिले असे उद्देश व कारणामध्ये म्हटले आहे. या वाक्याची काय आवश्यकता होती? जखमेवर मीठ चोळण्याचे काम मंत्री महोदय का करीत आहेत? मराठी माणसांच्या अस्मितेचा प्रश्न आहे. आक्षेपार्ह भाग वगळून पुन्हा बिल सभागृहापुढे मांडण्यात यावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या विधेयकाबाबत दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. बिल आहे त्या स्थितीत मंजूर करण्यास सुध्दा सभागृहाची संमती दिसते. उद्देश व कारणे हा बिलाचा भाग नसतो. बिल का आणले आहे या संदर्भात सरकारचे ते निवेदन असते. निवेदनाबद्दल जो आक्षेप घेण्यात आला आहे तो मान्य करु. बिल सभागृहामध्ये मांडल्यानंतर त्यात बदल करण्याचा सरकारला अधिकार आहे. मुंबई राज्य आणि उर्वरित महाराष्ट्राला दुय्यम स्थान मिळाले अशी जी भावना झाली आहे तिला सहमती दर्शवून मान्य करु. सत्ताधारी पक्षाची सूचना बिल मंजूर करताना मान्य करायची असते.

श्री.दिवाकर रावते : शासनाला जर ही बाब मान्य असेल तर हे विधेयक मागे घेण्यात यावे आणि सुधारणा करुन पुन्हा सभागृहापुढे मांडण्यात यावे. सुधारलेले बिल आम्ही लगेच मंजूर करु. याबाबत सचिवांचा सल्ला घेण्यात यावा. हा प्रतिष्ठेचा विषय नाही.

श्री.आर.आर.पाटील : मूळ बिलातील काही भाग बदलला पाहिजे असे आपले म्हणणे असेल तर ते योग्य आहे. परंतु उद्देश व कारणांमध्ये सरकारच्या वतीने केलेले निवेदन असते. त्यात उर्वरित महाराष्ट्राबद्दल जो काही आक्षेपार्ह भाग आहे, तो भाग वगळण्यात येईल. तो भाग वगळण्याची सूचना सभागृहात मांडण्यात येईल.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

उद्देश व कारणे यासंबंधीच्या निवेदनात ज्या ज्या शब्दांना आपली हरकत आहे तेवढा भाग वगळण्याच्या सूचना मी स्वत: मांडतो आणि त्यावर मतदान घेऊन त्या आपण मान्य कराव्यात व विधेयकाला मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : त्यासाठी आपल्याला विधेयकाचा मसुदा नव्याने तयार करावा लागेल.

श्री. रामदास कदम : सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करावी, त्यात यासंबंधी चर्चा करावी व पुन्हा सभागृहात चर्चेसाठी यावे.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, विधेयक चांगल्या हेतूने आणले आहे, यावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची सहमती आहे. मी अशी विनंती करतो की, सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करुन नेमकी कशी शब्दरचना पाहिजे त्याबाबत चर्चा करुन पुन्हा सभागृहात येऊ. तसेच उद्देश व कारणे यामधील एखाद दुसऱ्या शब्दात बदल करावयाचा असेल चांगल्या हेतूने हे विधेयक आणलेले आहे अशी सर्वांचीच भावना असल्याने केवळ विधेयक थांबविणे योग्य होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : आमचा विरोध नाही. पण सभागृहाची बैठक स्थगित करण्यापेक्षा दुसरे विधेयक चर्चेला घेऊ व या मसुद्यात दुरुस्ती झाल्यानंतर पुन्हा हे विधेयक चर्चेला घेऊ.

श्री. विनोद तावडे : महोदय, सभागृहाची बैठक दहा मिनिटे स्थगित करावी व त्यात आवश्यक ती दुरुस्ती करुन पुन्हा हे विधेयक सभागृहात चर्चेसाठी आणावे.

**उप सभापती** : ठीक आहे, मी सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 45 मिनिटांपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.26 ते 3.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : अल्पसंख्यांक आयोग (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XIV OF 2012

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE MINORITIES COMMISSION ACT, 2004.)

प्रा. फौजिया खान (अल्पसंख्यांक राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2012 चे वि.स.वि.क्र. 14-महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग अधिनियम, 2004 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडते.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

प्रा. फौजिया खान : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्र.14 -महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग अधिनियम, 2004 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, अल्पसंख्यांकामध्ये सुरक्षिततेची भावना जोपासणे, अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी व विकासाठी उचित त्या शिफारसी करणे याबाबतच्या धोरणाचा अवलंब करण्याच्या हेतूने राज्य अल्पसंख्याक आयोग गठीत करण्याकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम 2004(2005 चा महा.31) हा अधिनियमित करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे कार्य उत्तम व परिणामकारक रीतीने होण्यासाठी, राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाच्या आणि विभिन्न राज्यातील राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या धर्तीवर, आयोगाला, दिवाणी प्रक्रिया संहिता 1908 खालील दाव्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करणे हा सदर विधेयकाचा उद्देश आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

सच्चर कमिटी रिपोर्टच्या संदर्भात शासनाच्या काही अपेक्षा आहेत. प्रोॲक्टीव्हली या आयोगाला आणखी मजबूत करण्याची शासनाची गरज आहे. ज्या प्रमाणे महिला आयोग, बालहक्क संरक्षण आयोग, राज्य मानवी हक्क आयोग यांना अधिकार देण्यात आलेले आहे त्या प्रमाणे राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाला आंध्र प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, राजस्थान या राज्यानी जसे वेगवेगळया पध्दतीने अधिकार दिलेले आहेत व त्या प्रमाणे अधिकार आपल्या राज्यानेही द्यावेत. त्यामुळे हे विधेयक सर्वानुमते मान्य करावेत अशी मी सभागृहाला विनंती करते.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील अल्पसंख्याकांमध्ये सुरक्षिततेची भावना जोपासणे आणि अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी व विकासासाठी उचित शिफारशी करणे याबाबतच्या धोरणांचा अवलंब करण्याच्या उदात्त हेतूने हे विधेयक शासन आणत आहे.

आदरणीय मंत्री महोदया ह्या या विषयाच्या अभ्यासक आहेत. मला देखील हा विषय थोडा कळला आहे. सच्चर अहवालामध्ये जे आहे ते आम्हाला लागू करायचे आहे असे त्यांनी सांगितले. सच्चर अहवालामध्ये जे सांगितले आहे ते यामध्ये आणायचे असते तर आता पर्यंत आपणाला कोणीही अडविले नसते. कायदा केला म्हणजे प्रश्न सुटतो असे नाही. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम 2004 याच्या कलम 10 नंतर कलम समाविष्ट करण्यात येत आहे. महाराष्ट्रात वक्फ बोर्डाच्या किती जमिनी आहेत ? आताचे पुरावे काढले तर एकही जमीन मिळणार नाही. आपण दहा वीस वर्षे मागे गेल्यानंतर पुरावे मिळतील. मी एका लहानशा गावातील अडीच एकर जमिनीच्या तुकड्यासाठी आमदार म्हणून पत्र व्यवहार केला. मी सामान्य माणूस असतो तर माझे पत्र देखील नांदेड जिल्ह्यामध्ये कोणी घेतले नसते. 4 वर्षे मी त्या मुतवल्लीला पत्र देत आहे. आम्हाला फक्त उप जिल्हाधिकाऱ्यांनी न्याय दिला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात न्याय मिळाला नाही. विभागीय आयुक्त कार्यालयात देखील न्याय मिळाला नाही. वक्फ बोर्डाची जागा घेता येत नाही हे माहीत असताना सुद्धा, एका आमदाराचे पत्र असताना सुद्धा वक्फ बोर्डाची जागा वाचविता येत नसेल तर काय म्हणायचे ? म्हणूनच मला एक प्रश्न विचारावयाचा आहे की, आपण यापेक्षा आणखी वेगळे काय करणार आहात ? खाजगी लोकांनी या जमिनी गिळंकृत केल्या हे सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आहे. परंतु, राज्य सरकारने देखील वक्फ बोर्डाच्या जमिनी घेतल्या आहेत. बीड जिल्हा याचे उदाहरण आहे. मराठवाड्यामध्ये वक्फ बोर्डाच्या सर्वात जास्त जमिनी बीड जिल्ह्यामध्ये होत्या. वक्फ बोर्डाच्या जमिनीला सिलिंग लावता येत नाही. परंतु, बीड जिल्ह्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनीवर सिलिंग लावून त्या जमिनी सरकारने आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. यात आपण बदल करणार आहात काय ? आपण खरेच माझ्या समाजाला न्याय देणार आहात काय ? आपला कायदा त्या पद्धतीने वागणार असेल तर मला वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही.

..2

श्री.सय्यद पाशा पटेल..

सभापती महोदय, इक्वल अपॉर्च्युनिटी कमिशन नेमावे असे सच्चर समितीच्या अहवालात आहे. हा अहवाल आपण किती वर्षापासून वाचत आहात ? केंद्रात आणि राज्यात म्हणजे वर आणि खाली आपलेच सरकार आहे. ....(अडथळा).... आता इक्वल अपॉर्च्युनिटी कमिशन यायला पाहिजे. आपण आज कशामुळे जीवंत आहात ? आपण आज समाजामुळे जीवंत आहात. मुस्लिम समाज आज आमच्याकडे येऊ शकत नाही. आम्ही नीट बोलत नाही. त्यामुळे तुमच्या शिवाय त्यांना पर्याय नाही. तुम्हाला माहिती आहे की, इकडे ते जात नाहीत. आपल्या शिवाय त्यांना पर्याय नाही. तेव्हा काहीही न देता फुकटची मते घेण्याचे काम करीत आहात त्याबद्दल आपले कौतुक केले पाहिजे यासाठी आपण किती विद्वान माणसे कामाला लावली असतील ? मी एकटा आपल्या विरूद्ध भाषण करायला गेलो होतो.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल . . . .

मी एकटाच तुमच्या विरोधात गेलो. तिकडे कोणी बोलत नाही. मग आमदार करा, मंत्री करा. कोणी बोलत नाही. पण तुम्हीच कसे बोलत होता हे मला माहिती नाही. माननीय श्रीमती फौजिया खान मंत्री झाल्यानंतर मला आनंद झाला होता की, आमची भगिनी जी सतत हा विषय मांडत असे, ती आता मंत्री झाली आहे. त्यामुळे आपल्या समाजाच्या बाबतीत सगळे जमून येईल. पण प्रत्यक्षात काहीही जमले नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की, आपण काल जे बोलला आहात, तेवढे करा म्हणजे सगळे होईल.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, ते शक्य नाही. सगळयात महत्वाची गोष्ट अशी आहे की, इक्वल अपॉच्युनिटी कमिशन आल्याशिवाय समाजाचे भले होण्याची सुतराम शक्यता नाही. आपण वारंवार सच्चर कमिशनचा उल्लेख करतो, त्यानी सांगितले की, सर्व कार्यालयातील डाटा, देशातील डाटा गोळा करावा. तसा तो केला आहे काय ? प्रत्यक्षात डाटा गोळा झालेला नाही. जर डाटा कलेक्शन झाले असेल तर या समाजाची एवढी मोठी संख्या असून त्यातील लोकांना अमुक-अमुक खात्यामध्ये एवढ्या जागा मिळाल्या आणि त्याप्रमाणे त्या पूर्ण करण्याची गरज आहे आणि आपण तसे केले असते तर गावा-गावामध्ये तुमचे पुतळे उभे केले असते. मुस्लिम समाजामध्ये पुतळे उभे करीत नाही पण काहीतरी मिळावे म्हणून तसेही केले असते. पण तसे का झाले नाही? याठिकाणी एवढी विधेयके असताना आणखी एक नवीन बिल आले आहे.

सभापती महोदय, मला असे वाटते की, तुम्हाला बिले तयार करण्याची हौसच आहे आणि काम करण्याची गरज नाही. मात्र जर तुम्हाला बिले करण्याची हौस असेल तर मग डाटा गोळा करावा. इक्वल अपॉर्च्युनिटी कमिशन नेमावे. तसेच जर काही बदलावयाचे असेल तर एक शब्द बदलण्यात यावा, कोणता शब्द? तर मुस्लिम वस्त्यांमध्ये राष्ट्रीयकृत बँका कर्ज देत नाहीत. मुस्लिम वस्ती म्हणजे रेड अलर्ट एरिया आणि हे कोणाच्या भाषेत म्हणतात तर बँकांच्या भाषेत. याठिकाणी शासन अशा प्रकारचा कायदा करुन लोकांची मानसिकता बदलणार आहे काय? तसेच या देशामध्ये जे कर्ज वाटप होते त्यापैकी फक्त 0.5 इतके कर्ज अल्पसंख्यांक समाजासाठी दिले जाते.यामध्ये बदल करुन या बँकांचा दृष्टीकोन बदलणार आहे काय? या समाजातील मुले शिकलेली नाहीत आणि जर शिकलेली असतील तर त्यांना नोकरी मिळत नाही.पण जर यामध्ये बदल केला तर बँकेचा या समाजाकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलणार आहे.यामध्ये काही अडचण येणार आहे काय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल . . . .

पण यामध्ये अडचण येण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, त्याच प्रमाणे सच्चरच्या रिपोर्टमध्ये सांगितले की, अल्प संख्यांक समाजाचे गाव आहे तेथे जाणारा रस्ता चांगला नाही. अल्पसंख्यांक समाजाच्या गावामध्ये असलेल्या पोस्ट ऑफिसची स्थिती बत्तर से बत्तर आहे. तसेच दुसऱ्या अल्पसंख्यांक समाजाच्या गावामध्ये पोलीस स्टेशन आहे त्याची अवस्था तर बद् से बत्तर आहे. तेथील पोलीस स्टेशनचे दुर्दैव काय आहे तर ते अल्पसंख्यांक समाजाच्या गावामध्ये आहे. तसेच त्या गावातील एस.टी.स्टॅण्डची अवस्था अशी का आहे तर ते अल्पसंख्यांक समाजाच्या गावामध्ये आहे. त्या गावामध्ये जाणारा रस्ता हा दुर्दैवी आणि शापित का आहे? कारण तो रस्ता अल्पसंख्यांक समाजाच्या गावामध्ये जातो. हे कोणी लिहिले तर ते माननीय श्री.अटल बिहारी वाजपेयी यांनी लिहिलेले नाही, हे माननीय श्री.लालकृष्ण अडवाणी यांनी लिहिलेले नाही, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी लिहिलेले नाही. मग हे कोणी लिहिले? हे सच्चर यांनी लिहिले आणि देशाचे माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी त्यावर ठप्पा मारलेला आहे, काय कमाल आहे? तुम्ही हे समजून का घेत नाही? जर लोकांना ही अवस्था समजली तर लोक काय करतील तर तुम्हाला गावात येऊ देणार नाहीत. भले तुम्ही आम्हाला शिव्या देत तिकडे बसलात तरी तुम्हाला माहिती आहे.

यानंतर श्री.खंदारे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल.....

मी त्यावेळी 60 ते 70 हजार लोकांना जमा केले होते. त्यात 250 धर्मगुरु होते. नागपूरच्या सभेत मुक्ती, हालिम असे एकापेक्षा एक धर्मगुरु हजर होते. परंतु माझ्या सभेसाठी शासनाने कोणालाही येऊ दिले नाही. इतक्या मोठ्या संख्येने लोक जमल्यामुळे चमत्कार होईल अशी शासनाला भीती वाटली होती. या शासनाला अल्पसंख्याक समाजाचे भले करावयाचे आहे की, त्या समाजाच्या नावावर नाटक उभे करावयाचे आहे ?

श्री.एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है....

श्री.सय्यद पाशा पटेल : वारंवार हरकत घेऊ नका. हरकत में बरकत नहीं रहती. दो दिन और बाकी रह गए हैं. मुझे अपनी सही बात यहां पर बोलने दीजिए. अपने अंदर झांक कर देखो कि मैं सही बोल रहा हूं या नहीं ?

श्री.एस.क्यू.जमा : सभापति महोदय, उधर हमारे भाई श्री सय्यद पाशा पटेल हैं और इधर सय्यद कबरु जमा है. मैं कहूंगा कि उनकी भावना सराहनीय है. लेकिन आज कई विधेयकों पर यहां चर्चा होनी है. इसके अलावा नियम 97 के अधीन अल्पकालीन चर्चाएं भी यहां पर होनी हैं. जिस विधेयक पर अभी चर्चा हो रही है, वह बहुत छोटा सा विधेयक है. मेरा कहना है कि इस विधेयक से बाहर की बातें या वक्फ बोर्ड से संबंधित बातें यहां पर करना उचित नहीं है. सिर्फ इस विधेयक से संबंधित बातें ही माननीय सदस्य को यहां पर कहनी चाहिए.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, आमचे हे दुर्दैव आहे की, कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ असे म्हणण्याची माझ्यावर वेळ आली आहे. एक सय्यद दुसऱ्या सय्यदला विरोध करीत आहे.

श्री.एस.क्यू.जमा : सय्यद पाशा पटेल साहब, मैंने तो आपको सपोर्ट किया है.

श्री.सय्यद पाशा पटेल : आपका कहना है कि मुझे कम बोलना चाहिए. यह आपका कैसा सपोर्ट है ? मी थोडक्यात भाषण करावे असे आपण मला सांगू नये. माननीय सभापती मला सांगतील. आपण सभापती नाही. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण जे विधेयक सादर केले आहे त्यावर सत्तारुढ पक्षाचे सदस्य या विधेयकावर व्यापक चर्चा करण्याऐवजी सभागृहात सदस्यांचा आवाज दबला गेला पाहिजे यासाठी प्रयत्न करीत आहेत. आपल्या समाजाला

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.सय्यद पाशा पटेल...

काही मिळाले पाहिजे यावर काही बोलत नाहीत. हे दुर्दैव आहे. म्हणून मंत्री महोदयांनी अंतर्मुख झ ाले पाहिजे. मंत्री महोदया, माझ्या भगिनी आहेत. पाशा पटेल हे खरे बोलतात असे त्यांना कधी तरी वाटेल. त्या बोलून दाखविणार नाहीत, पण पाशा सही था, एवढे तरी मनातल्या मनात तरी बोलतील.

सभापती महोदय, अल्पसंख्याकाच्या कल्याणासाठी शासनाला योजना आणावयाच्या आहेत काय ? आदिवासी समाजातील भावाच्या कल्याणासाठी असलेल्या योजनांची मी विभागाकडून माहिती घेतली आहे. या समाजाच्या विकासाच्या व कल्याणाच्या योजनांची माहिती देण्यासाठी 23 पाने लागली. दलित समाजातील भावाच्या कल्याणासाठी सरकारने काय काय केले आहे त्याची माहिती मी घेतली आहे. त्याची माहिती देण्यासाठी 21 पाने लागली आहेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे चांगले भाषण करीत आहेत. ते स्वत: चांगले आहेत. याबद्दल दुमत नाही. काल या सभागृहात त्यांचा गौरव करण्यात आला आणि आज त्याचा त्यांना विसर का पडला हे माहीत नाही. ते स्वत: चांगले आहेत, पण दुसरे वाईट आहेत, त्यांचा हेतू वाईट आहे, हे ठरविण्याचा त्यांना अधिकार नाही. ते असा आरोप करु शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सन्माननीय सदस्य श्री.जामा यांना उद्देशून असे म्हटले आहे की, कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ. सन्माननीय सदस्य श्री.पाशा भाई हे आता कोठे त्यांच्या समाजासाठी बोलू लागले आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.जामा हे फार पूर्वीपासून अल्पसंख्याक समाजाचे काम करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी अल्पसंख्याक समाजाचे काय काम केले आहे ते त्यांनी सांगावे. पण त्यांच्यावर असा हेत्वारोप करणे योग्य नाही.

यानंतर श्री.शिगम....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. रामदास कदम : सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी समाजासाठी काय केले, हे विचारण्याचा अधिकार सन्माननीय सदस्य श्री. मेटे यांना कोणी दिला ?

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल हे अतिशय चांगले भाषण करीत आहेत. त्यांनी कुणावर दोषारोप करता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी देखील कुणावर दोषारोप करु नयेत. सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल हे आपले भाषण पुढे सुरु करतील.

श्री. विनायक मेटे : माननीय विरोधी पक्षनेते यांनी चांगली भूमिका मांडली. सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा हे आपणा सर्वांचे सहकारी आहेत. त्यांच्यावर झालेले हेत्वारोप काढून टाकावेत अशी माझी सूचना आहे.

श्री. एस.क्यू.जमा : मेरी कोई शिकायत नही.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, मला कुणाच्या भावना दुखवायच्या नाहीत. जळते त्याला कळते. सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांचे जळते म्हणून त्यांनी बोलण्याचा प्रयत्न केला. सभापती महोदय, मी सर्व समाजाच्या योजना काढून पाहिल्या. माझ्या आदिवासी भावाच्या अंगावर कपडा नाही, तो कंदमुळे खातो. त्याचे भले व्हायला पाहिजे. माझ्या आदिवासी भावाच्या भल्यासाठी 23 पानी योजना आहेत. माझ्या दलित भावाचे भले झाले पाहिजे. त्याच्यासाठी 19 पानी योजना आहेत. परंतु अल्पसंख्याक समाजासाठी केवळ एक पानी योजना आहे.

श्री. रमेश शेंडगे : माझा हरकतीचा मुद्दा आहे....

श्री. सय्यद पाशा पटेल : मी काय म्हणालो ? माझ्या आदिवासी भावासाठी, माझ्या अल्पसंख्याक भावासाठी...

(सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे हे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, तुलनात्मक बोलण्यासाठी मला या गोष्टींचा आधार घ्यावा लागला हे माझे दुर्दैव आहे. शिक्षण असो, बँक असो, रस्ता असो, शिक्षक असो, शिष्यवृत्ती असो, समाजाला ज्या ज्या गोष्टी मिळण्याची आवश्यकता आहे त्या मागील 60 वर्षात मिळालेल्या नाहीत, त्यांच्यावर अन्याय झाला आहे असे माननीय पंतप्रधानांनी नेमलेला आयोग सांगत आहे. सरकारला या समाजाचे भले करायचे असते, या समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणायचे असते तर त्यांनी या समाजाला यापूर्वीच आणले असते.

सभापती महोदय, टाईम्स ऑफ इंडियामध्ये एक लेख आला होता. आपण सर्वांनी तो वाचला असेल. त्या बातमीमध्ये माझ्या नावाचा उल्लेख अगदी सुरुवातीलाच होता. त्या बातमीमध्ये असा उल्लेख होता की, मुस्लिम समाजाची संख्या 10.6 टक्के आहे पण यातील 35 टक्के समाज जेलमध्ये आहे. मी एकदा थट्टेने म्हणालो होतो की, एवढ्या मोठ्या संख्येने मुस्लिम समाज जेलमध्ये असेल तर ईदगा जेलमध्ये बांधावा लागेल. कारण आमचे सर्व लोक तेथे आहेत. रमजानचे नमाज सर्वच मुसलमानांनी पढले पाहिजे. त्याचेच उदाहरण घेऊन ती बातमी छापली आहे. एवढ्या संख्येने हा समाज जेलमध्ये का जात आहे ? यापूर्वी मी सांगितले होते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या भाषणामध्ये सांगितले आहे की, "राजकीय क्षेत्रातील लोकशाही सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये विस्तारत गेली नाही तर याचे चटके ज्याला ज्याला बसतील ते लोक घटना जाळल्याशिवाय राहणार नाही."

सभापती महोदय, माझे नेते श्री.शरद जोशी सांगायचे की, " नदीचा प्रवाह सुरु असताना त्यामध्ये शेवाळ वा किडे होत नाहीत.परंतु नदीचा प्रवाह थांबला तर त्याचे रुपांतर डबक्यात होते आणि डबक्यातील पाणी कमी कमी होऊ लागले तर त्यामध्ये शेवाळ आणि किड्यांचा प्रादूर्भाव होतो. देशाचा विकास खुंटला तर देशाचे डबके होते. एकदा डबके झाले की,अन्नासाठी मारामाऱ्या होतात.

सभापती महोदय, 11 वी पंचवार्षिक योजना सुरु आहे. 11 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये केंद्र सरकारने उल्लेख केला आहे की, "अन्याय आणि नैराश्यातून केवळ अतिरेक्याचा जन्म होतो. देशातील 100 हून अधिक जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद्यांनी धोक्याचा इशारा दिलेला आहे. उरलेल्या जिल्ह्यांमध्ये जनतेच्या मनातील असंतोष जातीच्या माध्यमातून येऊ लागला आहे." असे का घडले

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..

याचे कारण म्हणजे गेल्या 60 वर्षात शेवटच्या माणसापर्यंत विकासाचा लाभ पोहोचण्यामध्ये सरकारला अपयश आले हे आहे. या समाजावर अन्याय झाला आहे म्हणून तो समाज एवढ्या मोठ्या प्रमाणावर जेलमध्ये आहे. हा समाज जेलमध्ये जाऊ नये यादृष्टीने शासन धोरण राबविणार आहे काय ? एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

------

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा ( विधान सभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, विधान सभा विधेयक क्रमांक 14 का समर्थन करते हुए मैं कहना चाहूंगा कि यह विधेयक बहुत ही प्रगतिशील विधेयक है. महाराष्ट्र सरकार ने यह सिफारिश स्वीकार की है कि हमारा कोड ऑफ सिविल प्रोसीजर 1908 का जो एक्ट है, उसके अंतर्गत कमीशन को सिविल कोर्ट की पावर दी जायें. यह डिमांड काफी दिनों से की जा रही थी. सरकार ने इस मांग को मान्य किया है इसलिए मैं इस विधेयक का समर्थन करता हूं और सरकार को धन्यवाद भी देता हूं.

मैंने यहां पर सय्यद पाशा पटेल साहब को बहुत अच्छी तरह से सुना है. उन्होंने यहां पर अल्पसंख्यकों की हालत बतायी है. माननीय सदस्य श्री सय्यद पाशा पटेल साहब की बातों का समर्थन सभी माननीय सदस्यों को यहां पर करना चाहिए. सभी मानानीय सदस्यों द्वारा उनकी भावनाओं की कद्र करनी चाहिए.

माननीय मंत्री महोदय को मैं यहां पर सुझाव देना चाहूंगा कि इस विधेयक के उद्देश्य एवं कारणों में लिखा है कि "The Maharashtra State Minorities Commission Act, 2004 (Mah.XXXI of 2005) has been enacted to constitute a State Minorities Commission with a view to adopt policies that foster a sense of safety and belonging among the minorities and to make appropriate recommendations for welfare and development of minorities in the State." मेरा सुझाव है कि मॉयनारिटीज की सिक्युरिटी से संबंधित मामला बहुत महत्वपूर्ण है. इसलिए मेरा कहना है कि वेल्फेयर एण्ड डॅवलपमेंट के साथ सिक्युरिटी शब्द भी आना चाहिए. ऐसी मेरी भावना है.

सभापति महोदय, हाऊस के रिकार्ड पर यह बात लाना भी बहुत जरुरी है कि माननीय सदस्य श्री पाशा पटेल साहब ने बहुत ही जोरदार शब्दों में अल्पसंख्यकों की बात यहां पर रखी. मेरा कहना है कि उन्हें यह बात नहीं भूलनी चाहिए कि राजेंद्र सिंह सच्चर समिति का गठन यूपीए (1) सरकार ने किया. माननीय प्रधान मंत्री और माननीय सोनिया गांधी जी के आदेश पर सच्चर कमीशन का गठन किया गया था. अल्पसंख्यकों की सामाजिक, शैक्षणिक तथा आर्थिक परिस्थिति का सही आकलन सच्चर कमीशन ने किया है.

मैं कहना चाहूंगा कि आजादी के बाद इतने सालों तक बहुत सारे लोगों ने अल्पसंख्यकों

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा ...

के लिए आंसू बहाए. अलग-अलग पार्टियों ने अल्पसंख्यकों के लिए बहूत आंसू बहाएं. लेकिन अल्पसंख्यकों कि दशा में बहुत अच्छा सुधार अभी तक नहीं हुआ है. मेरा कहना है कि अल्पसंख्यकों की दशा में यदि सुधार की कोई प्रक्रिया शुरु हुई है तो वह प्रक्रिया यूपीए (1) सरकार के समय से शुरु हुई है. आज कई राज्यों में अल्पसंख्यक विकास डिपार्टमेंट बनाए जा रहे हैं. केंद्र सरकार में भी मॉयनारिटी मिनिस्ट्री बनायी गयी है. यह काम हमारी सरकार ने किया है. सच्चर कमीशन जिसने अपाइंट किया उसको आप धन्यवाद क्यों नीं देना चाहते.

मैं कहना चाहता हूं कि सच्चर कमीशन हमारी सरकार ने बनाया है. सच्चर कमीशन ने जो सिफारिशें की हैं, उन पर काम किया जा रहा है. माननीय सदस्य ने जो कमीशन बनाने की बात यहां पर कही है, उस दिशा में भी काम किया जा रहा है. बहुत सारे राज्यों में अब कमीशन्स को ज्युडिशल पावर दिए जा रहे हैं. अल्पसंख्यक विभाग बनाए जा रहे हैं, उसके लिए फंड दिया जा रहा है. शिक्षा की व्यवस्था की जा रही है. अल्पसंख्यकों के सामाजिक उत्थान की व्यवस्था की जा रही है. सच्चर कमीशन की एक सिफारिश यह है कि मॉयनारिटीज के लोगों को 15 प्रतिशत रिजर्वेशन दिया जाना चाहिए. उस सिफारिश को भी संवैधानिक दर्जा दिए जाने की दिशा में काम किया जा रहा है. अल्पसंख्यकों को रिजर्वेशन देने के लिए यदि संविधान में संशोधन करने की आवश्यकता हो तो वह संशोधन भी किया जाना चाहिए.

इसलिए मुझे कहना है कि आज अल्पसंख्यकों की भलाई के लिए जो बहुत सारी पार्टियां आंसू बहा रही हैं, उनकी अब परीक्षा होगी. अब देखा जाएगा कि आंसू बहाने वाले ये लोग संविधान में संशोधन करना चाहते हैं या नहीं. 10 प्रतिशत रिजर्वेशन मुसलमानों को और 5 प्रतिशत रिजर्वेशन अन्य मॉयनारिटीज को देने की दिशा में काम किया जा रहा है. यह रिजर्वेशन देने के लिए जब संविधान में संशोधन किया जायेगा. उस समय देखा जाएगा कि घड़ियाली आंसू बहाने वाली पार्टियां, उस संशोधन को समर्थन देंगी या नहीं .

सभापति महोदय, अल्पसंख्यकों के विकास के लिए हमारी केंद्र सरकार और महाराष्ट्र सरकार बहुत काम कर रही है. उसी प्रक्रिया को पूरा करने के लिए विधान सभा विधेयक क्रमांक 14 यहां पर लाया गया है. इस विधेयक का मैं समर्थन करता हूं. यह बिल यहां पर पास किया जाना चाहिए. इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

-0-

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 16:20

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, समाजातील विविध घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारने विविध आयोगांची स्थापना केली. 1990 सालानंतर हे विविध आयोग स्थापन करण्यात आले. महिला आयोग, अल्पसंख्यांक आयोग असे आयोग निर्माण झाले.सच्चर आयोगाची निर्मिती 2000 सालानंतर झालेली आहे.

सभापती महोदय, आयोगासंबंधी जे कायदे आहेत ते देशामध्ये आणि राज्यांमध्ये अवलंबिले जातात. खास करुन राज्याबद्दलचा हा आयोग असल्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, या आयोगांच्या कामकाजाचा लेखाजोखा सरकारने कधी घेतला आहे काय ? आयोग निर्माण करुन काय साध्य झाले, आयोगाला जे अधिकार देतो त्याचा हेतू काय आणि तो हेतू किती साध्य झाला याचा लेखाजोखा घेतला आहे काय ? घरामध्ये ज्याप्रमाणे फ्रिज असतो त्याप्रमाणे हे आयोग म्हणजे प्रश्न फ्रीज करण्यासाठी तयार केलेले आहेत. कोणताही प्रश्न आयोगामार्फत धोरणात्मक रीतीने पुढे गेला आहे असे चित्र दिसत नाही. अशा वेळी अल्पसंख्याक आयोगाला दिवाणी प्रक्रिया संहितचे अधिकार आपण देत आहोत. हा अल्पसंख्याक आयोग समाजातील केवळ अल्पसंख्यांक पुरुषांसाठी आहे काय ? अल्पसंख्याक समाजातील महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना असेल किंवा आम्ही हे सुध्दा वाचले आहे की, मोबाईलवर बोलू नका असा त्यांनी फतवा काढला .बालविवाहाच्या प्रश्नावर आम्ही कोणाला हस्तक्षेप करु देणार नाही असा मुस्लीम महिलांच्या विरुध्द असणारा फतवा काढला. एसएमएसवर तलाक देण्यासारखे निर्णय घेतले जात आहेत. रमजानच्या महिन्यात मुलांना पोलिओ डोस तोंडातून देता येत नाही असे फतवे काढले जातात या संदर्भात हा अल्पसंख्याक आयोग काय करतो असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या आयोगाचे नामांतर करा. अल्पसंख्याक पुरुष आयोग असे नामांतर करा कारण महिलांच्या आरोग्याच्या संदर्भात, त्यांच्या हक्काच्या संदर्भात, त्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात किंवा कायदेविषयक जे बदल होतात ते मुस्लीम महिलांच्या हिताचे आहेत किंवा नाहीत हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे याचा विचार केला आहे काय ? राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोगाची जबाबदारी असते त्याप्रमाणे अल्पसंख्याक आयोगाने मुस्लीम महिलांच्या हित रक्षणासाठी काय कार्य केले हे जेव्हा आम्ही पाहतो त्यावेळी मोठे शून्य दिसून येते ही वस्तुस्थिती आहे. आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात येणार आहेत असे आपण म्हणतो तेव्हा त्यातून काय साध्य होणार आहे याचा विचार केला आहे काय ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ....

मुलांच्या संदर्भातील काही कौटुंबिक प्रश्न असतील तर त्या संदर्भात आयोग काही भूमिका घेणार आहे काय याचा शासनाने खुलासा करावा. या संदर्भात इतर राज्यातील काय अनुभव आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

सभापती महोदय,सच्चर आयोगाच्या बाबतीत माझा प्रश्न असा आहे की, मुळात जे आयोग होते त्यांना निधी दिल्यानंतर शिक्षणासारख्या प्रश्नावर किती कार्य केले ? शिक्षण म्हणजे केवळ मदरशांमधील शिक्षण नाही तर समाजातील सर्व घटकांमध्ये जसे अल्पसंख्याक काम करतात त्याच्यामध्ये विविध प्रकारचे अल्पसंख्याक संबंधित आहेत मग ते मुस्लीम असतील, खिश्चन असतील, ज्यू असतील, बौध्द असतील अशा विविध प्रकारच्या अल्पसंख्याकासाठी आम्ही काय कार्यक्रम घेतो या संदर्भात अधिवेशनात चर्चा होत नाही आणि या आयोगाचे अहवाल देखील चर्चिले जात नाहीत.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्यावर नेमलेले लोक आहेत त्यांची कार्यकक्षा काय आहे हे तपासले जात नाही. केवळ इतर राज्यांनी केले म्हणून आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार देणे म्हणजे रेफ्रिजरेटर बरोबर आणखी एक कोल्ड स्टोरेज देत आहोत की काय असे चित्र त्यातून दिसून येते. केवळ आपण या कृतीतून अल्पसंख्याक समाजाला न्याय देत आहोत असे दिसून येते. परंतु प्रत्यक्षात अल्पसंख्याक मुस्लीम समाजातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी, हितरक्षणासाठी काम करणार नसलो तर हे दावे फोल ठरणार आहेत एवढे सांगून मी माझे भाषण संपविते.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक 14 महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोग (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी आणि विधेयकाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल व एस.क्यू.ज़मा यांनी आपले विचार मांडले आहेत. जे विधेयक सभागृहासमोर येते त्या विधेयकातील उद्देश व कारणे आणि विधेयकाचा भाग हा अतिशय संक्षिप्त स्वरुपात आपल्यापुढे आलेला असतो. विधेयकामागील भूमिका मांडावयाची झाली तर विधेयकामागे फार मोठा ऐतिहासिक सत्यतेचा भाग आपल्याला त्यामध्ये जाणवतो. जेव्हा आपण त्या सत्यतेचा शोध घ्यायचा प्रयत्न करतो त्यावेळेला मागील 50-60 वर्षातील वाढत्या लोकसंख्येमध्ये वेगवेगळ्या समाजांचे जे प्रमाण आहे त्या समाजाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी सर्वांना बरोबर चालता येईल अशा प्रकारची रचना जर त्रुटीमुळे राहून गेली असेल तर त्या समाजाला कोणत्या तरी माध्यमातून भरवसा देता आला पाहिजे. त्यांच्या प्रश्नासाठी समाज एकत्रित होऊन काम करेल यासाठी आपण प्रयत्न करीत असतो. हे प्रयत्न करीत असताना इतिहासाचे भरपूर दाखले आहेत. बालविवाह प्रथा, सतीची प्रथा किंवा लवकर विवाह करु नये म्हणून प्रथा मोडण्याची वेळ आली त्या त्यावेळी प्रस्थापित समाज नेहमी विरोधच करीत राहिला आहे. ज्या समाजाची दु:खे या निमित्ताने बाहेर पडतात त्या समाजावर अन्याय होतो, त्या समाजात असे आहे, तसे आहे हे इतरांनी सांगणे म्हणजे बाहेरचे निरीक्षण आहे. त्यापेक्षा त्याच समाजातील आतल्या ज्या भावना आहेत त्या माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी या ठिकाणी मांडल्या आहेत.

सभापती महोदय, या देशात असे म्हटले जाते की, प्रत्येक गुन्हेगार हा अल्पसंख्याक आहे. म्हणून प्रत्येक अल्पसंख्याक हा गुन्हेगार समजला जातो. ही मानसिकता या देशातील 15 ते 20 टक्के जनतेची झाली असेल तर अल्पसंख्याक समाज नेहमीच राष्ट्रीय प्रगतीच्या प्रवाहात कसा सामील होईल? त्यासाठी काही तरी निश्चित आकृतीबंध समोर असला पाहिजे. केवळ दिवाणी न्यायालयीन अधिकार दिले, चौकशीला बोलावण्याचे अधिकार दिले म्हणजे फार मोठे गंडांतर सर्व समाजांवर आले आहे अशा प्रकारची भावना किंवा अशा प्रकारचे भय त्यातून निर्माण होते. वास्तविक ते व्हायला नको. समाज जेव्हा पुढे जात असतो तेव्हा मागे पडलेल्या माणसांना

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले........

आपल्याबरोबर नेण्यासाठी समाजातील जाणत्या मंडळींनी प्रयत्न करायचा असतो. म्हणूनच सच्चर कमिटीची स्थापना करण्यात आली. इतर राज्यांनी केले म्हणून आम्ही त्याचे अनुकरण करीत आहोत असा शासनाचा हेतू असल्याचे यामध्ये दिसत नाही.

सभापती महोदय, कायद्याची चौकट असली तर त्याचा दरारा निर्माण होतो. प्रत्येक वेळी कायदा वापरात आला पाहिजे अशी गरज नसते. परंतु ही चौकट आहे, ही मर्यादा आहे अशा प्रकारची व्यवस्था झाली तर त्या समाजाला निश्चितपणे विश्वास मिळण्याची निर्मिती त्यातून केली जाते. म्हणून हा बदल होणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने हे विधेयक मंजूर होणे ही देखील गरज आहे. म्हणून मी या विधेयकाला समर्थन देतो आणि माझे भाषण संपवितो.

----

नंतर श्री.खर्चे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एम.एम.शेख (नामनियुक्त) : महोदय, अल्पसंख्यांक आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्याबाबत जे विधेयक सभागृहात आणले आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, खरे पाहिले तर अल्पसंख्यांक समाजावर होणारे अन्याय दूर करण्यासाठी या आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. पण काही दिवसानंतर या आयोगाला काहीच अधिकार नसल्यामुळे दिवाणी अधिकार देण्याचे शासनाने ठरविले व तेच अधिकार या विधेयकाच्या निमित्ताने आज सभागृहासमोर ठेवून त्यांना मंजुरी घ्यावयाची आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. मी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनाही धन्यवाद देऊ इच्छितो की, या समाजाला कोणकोणत्या अडचणी येतात त्याचे चित्रण त्यांनी केले. तसेच मी या निमित्ताने एक मात्र जरुर सांगणार आहे की, केवळ सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हेच मुस्लीम समाजाचे द्रष्टे कार्यकर्ते किंवा मुस्लीम समाजाची चाड असणारे नेते आहेत अशातला भाग नाही तर आम्ही सुध्दा त्या समाजातच काम करतो.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे ज्या पक्षाचे सदस्य आहेत त्याच पक्षाचे सरकार सन 1995 मध्ये या राज्यात आल्यानंतर हा अल्पसंख्यांक आयोग बंद करण्यात आला होता. त्यानंतर सन 1999 मध्ये मात्र कॉंग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर माननीय श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांनी पुन्हा अल्पसंख्यांक आयोग स्थापन केला. केवळ आयोग स्थापन करुन चालत नाही तर त्याला आवश्यक ते जास्तीचे अधिकार दिले पाहिजे या मताचा मी आहे. या निमित्ताने एक सुधारणा वजा सूचना करु इच्छितो की, आयोगाने चुकीचे काम केले तर जे लोक यात आहेत अथवा कायदा हातात घेणारे लोक असतील तर त्यांना बोलावून जाब विचारणे, त्यांचे दस्तऐवज तपासून घेणे व सजा देऊन दंड करण्याचे अधिकार सुध्दा आयोगाला दिले पाहिजेत अशी विनंती करुन या विधेयकाला पुन्हा समर्थन करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, सन 2012 चे विधानसभा विधेयक क्र. 14 - महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग अधिनियम, 2004 यात सुधारणा करण्याकरिता जे विधेयक सभागृहासमोर आणले आहे त्याला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, शासनाने उद्देश व कारणे यांचे निवेदन केलेले असून त्यात असा उल्लेख केला आहे की, "राज्यातील अल्पसंख्यांकांमध्ये सुरक्षिततेची भावना जोपासणे आणि अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी व विकासासाठी उचित त्या शिफारशी करणे याबाबतचा धोरणांचा अवलंब करण्याच्या हेतूने, राज्य अल्पसंख्यांक आयोग घटित करण्याकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग अधिनियम, 2004 (2005 चा महा.31) हा अधिनियमित करण्यात आला आहे." यापूर्वीचे जे आयोग होते त्यात फक्त सजेशन्स देण्याचे अधिकार होते पण या आयोगाला पूर्णपणे अधिकार देण्याचा निर्णयच या निमित्ताने घेत आहे. एक गोष्ट मला समजली नाही की, अल्पसंख्यांक हा असुरक्षित असल्याची जी भावना विधेयकात दिलेली आहे ती मात्र पटत नाही, मग शासन ही भूमिका कशी घेत आहेत.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना मी धन्यवाद देईन की, त्यांनी अल्पसंख्यांक समाजाचे अनेक लोक जेलमध्ये असल्याचे सांगितले. या लोकांना शासनाने जबरदस्तीने जेलमध्ये टाकले की त्यांनी गुन्हे केले म्हणून ते आतमध्ये आहेत हा प्रश्न आहे. तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की या देशाची फाळणी झाली त्यावेळेस बाबासाहेबांनी महात्मा गांधींना विनंती केली होती की, या देशाची फाळणी करावयाची असेल तर या देशातील सर्व मुस्लीम पाकिस्तानमध्ये जाऊ द्यावे व पाकिस्तान मध्ये जितके हिंदू आहेत त्यांना सर्वांना भारतात आणावे, पण दुर्दैवाने तसे घडले नाही. त्यांच्या विनंतीनुसार घडले असते तर अल्पसंख्यांक असुरक्षित असे शब्द टाकण्याची गरज आज पडली नसती. विधिमंडळात कायद्याच्या बाबतीत चर्चा होते ती म्हणजे ज्याप्रमाणे ताक घुसळल्यानंतर जसे लोणी बाहेर पडते तसे या सभागृहात चर्चेतून काही तरी चांगलेच निष्पन्न होते.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, या अगोदरचे जे विधेयक होते ते विधेयक सुध्दा या विधेयकासारखेच होते. मालेगाव, भिवंडीमध्ये हिंदू सुरक्षित आहेत काय ? काही गोष्टींचा मी या ठिकाणी उल्लेख केला तर त्या वादग्रस्त होतील. या बिलाच्या माध्यमातून शासन कोणता संदेश देत आहे ? या हिंदुस्तानामध्ये, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये गणपतीची मिरवणूक काढली जाऊ शकत नाही. नवरात्री उत्सवाच्या वेळेस सोलापूरला आम्ही आंबा मातेची मिरवणूक काढू शकत नाही. असे असतांना या ठिकाणी कोण सुरक्षित नाही ? स्वातंत्र्यानंतर हिंदुस्तानातील काही जिल्हे मुस्लीम जिल्हे म्हणून घोषित करुन टाका अशी मागणी केली जाते. असे असतांना या ठिकाणी कोण असुरक्षित आहे ?

सभापती महोदय, ज्या वेळेला हिंदुस्तानची फाळणी झाली होती त्यावेळेस देशात मुस्लिमांची संख्या 17 टक्के आहे. परंतु फाळणी झाल्यानंतर 60 वर्षानंतर या देशातील मुस्लिमांची संख्या आता 14 टक्के झालेली आहे. अशा परिस्थिती या ठिकाणी अशा प्रकारचे बिल आणले जात असून या ठिकाणचे जे मुसलमान आहेत ते अल्पसंख्याक आहेत, असुरक्षित आहेत असे सांगितले जात आहे. कोण असुरक्षित आहे? या शासनाची अशा प्रकारचे बिल आणण्याची हिंमत तरी कशी काय होते ? आम्ही या ठिकाणी टाहो फोडून सांगत आहोत. प्रतापगडाच्या पायथ्याशी ज्या अफजल खानाचा छत्रपती शिवाजी महाराजांनी वध करुन, मुंडक छाटून कबर बांधली होती त्याच जागेवर 5 हजार चौ.फूट बेकायदा बांधकाम करुन मशीद बांधून नमाज पढला जात आहे. यासंदर्भात हायकोर्ट, सुप्रीम कोर्टाने हे बेकायदा बांधकाम पाडून टाकण्यात यावे यासंदर्भात आदेश दिलेले असतांनाही ते अवैध बांधकाम तोडले जात नाही. हे सरकार काय अफजलखानाची औलाद आहे काय ? कोर्टाचेही आदेश हे शासन मानत नाही. असे असतांनाही आपण सांगता की, अल्पसंख्यांक येथे असुरक्षित आहेत.

सभापती महोदय, मंत्रालयाच्या सातव्या माळयावर नमाज पढण्यासाठी मशीद बांधली जाते, ती कशासाठी ? मंत्रालयातील मुस्लीम समाजाला नमाज पढण्यासाठी मंत्रालयाच्या सातव्या माळयावर मशीद बांधली जाते हे काय आहे ? मंत्रालयातील मुस्लीम समाजाला नमाज पढण्यासाठी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सातव्या माळयावर मशीद बांधून त्यांना डोकयावर घेतले आहे. असे असतांनाही आम्ही म्हणतो की, अल्पसंख्याक असुरक्षित आहेत ? यातून आम्ही काय समजायचे ? महाराष्ट्रातील कोणत्याही मंदिरात लाऊड स्पीकर लावला तर पोलीस बूट घालून मंदिरात येतात व लाऊड स्पीकर जप्त करतात.

सभापती महोदय, मी कांदिवली येथे राहत असून तेथे गेल्या सहा महिन्यापासून सकाळी पाच वाजल्यापासून मशिदीमध्ये लाऊड स्पीकर लावून ब्ओरडले जाते. यामध्ये आमचा काय संबंध ? बेकायदेशीरपणे लाऊड स्पीकर लावले तर कारवाई केली जाईल अशा प्रकारचे आदेश कोर्टाने दिले असतांना त्यांच्यावर आतापर्यंत कारवाई का झाली नाही ? असे असतांनाही अल्पसंख्याक असुरक्षित कसे काय ? न्यायालयाचे आदेश हे शासन धाब्यावर कसे काय बसऊ शकते ?

सभापती महोदय, एक अतिरेकी सांगतो की, "होय, मी एका आमदाराच्या आमदार निवासातील एका रुममध्ये थांबलो होतो." असे असतांनाही त्या आमदारावर कारवाई का केली जात नाही ? ते मुस्लीम समाजाचे आहेत म्हणून त्यांच्यावर कारवाई होत नाही का ? तरी या बिलामध्ये अल्पसंख्याक असुरक्षित आहे असे म्हटले गेलेले आहे. अतिरेक्याला पाठिंबा देणारा मुस्लीम आमदार असला तरी त्याला पाठीशी घालण्याचे काम हे शासन करीत आहे. आम्ही सापाला दूध का पाजतो आहे ? हिरव्या सापाचा फणा ठेचण्यापेक्षा त्याला दूध पाजले जात आहे.

सभापती महोदय, सच्चर समितीचा अहवाल मी वाचलेला आहे. मुस्लीम बांधवांमध्ये, त्यांच्या समाजामध्ये गरिबी आहे हे मला मान्य आहे. मुस्लीम समाजात गरिबी का आहे याच्या खोलात आपण कधी गेला आहात काय ? मुस्लीम समाजाच्या एक कुटुंबामध्ये किती मुले असतात ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

एका मुस्लिम कुटुंबामध्ये दहा मुले असल्यामुळे ती मुले शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळेच त्यांना आज पोट भरण्यासाठी, उपजीविकेचे साधन मिळत नाही. कुटुंब नियोजन कायद्याची अंमलबजावणी मुस्लिम समाजामध्ये किती प्रमाणात केली जाते याची आकडेवारी आपण द्यावी. या समाजामध्ये कुटुंब नियोजनाची अंमलबजावणी झाली असती तर हा समाज गरीब राहिला नसता. त्यांना 2-3 मुले असती तर या समाजामध्ये गरिबी राहिली नसती.

मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळाच्या माध्यमातून एखाद्या मुस्लिम मुलाला फक्त सही करता आली तर तो सुशिक्षित आहे असे समजून त्याला मदत करण्यात येते. तो पाचवी शिकला असेल आणि त्याला सही करता येत असेल तर तो बारावी पास आहे असे समजून आर्थिक मदत करण्यात येते. मग आम्ही काय घोडे मारले?

या राज्यातील 96 टक्के आदिवासी हे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. त्या आदिवासींसाठी काहीही कायदे केले जात नाहीत. त्यांना वर आणण्यासाठी समित्या का नेमल्या जात नाहीत. याला कारण त्यांना आज विचारणारे कोणच नाही. आपण फक्त अल्पसंख्याकांची मते घेण्यासाठी, त्यांना खूष करण्यासाठी हे करत असाल तर ते चुकीचे आहे. एक दिवस आपल्याच खुर्ची खाली बॉम्ब फुटेल तेव्हा आपण काय कराल ? मी कायदा व सुव्यवस्थेवर बोलताना माझे विचार मांडणार आहे. आज हिंदुंना बदनाम करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे पुस्तके काढली जात आहेत. यावर देखील बोलणार आहे.

या हिंदुस्थानात, महाराष्ट्रात आपण संदेश देत आहात की, अल्पसंख्याक असुरक्षित आहेत. दिल्लीमध्ये अल्पसंख्याक मंत्रालय स्थापन करण्यात आले. त्या मंत्र्यांस कॅबिनेटच दर्जा दिला. लाल दिव्याची गाडी दिली. केबिन दिली. निवडणुका आल्या की, अल्पसंख्याकाला खूष करण्यासाठी नवनवीन घोषणा करण्यात येतात. आपण माननीय बॅ.अंतुले यांना मंत्रीपद दिले होते. त्या विभागासाठी आपण किती निधी दिला. फक्त गाजर दाखविण्याचे काम केले. अल्पसंख्याकांची मते घेऊन पुन्हा सत्तेवर येण्याचा धंदा सुरू आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळाद्वारे आपण किती बेकार तरूणांना निधी दिला व त्यामुळे किती बेरोजगारी कमी झाली हे देखील सांगावे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

कोकणात कुणबी समाज आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी कोकणात जाऊन घोषणा केली की, पेजे समितीचा अहवाल आम्ही मान्य करतो व कुणबी समाजाच्या विकासासाठी 5 ते 10 कोटी रूपयांची तरतूद करतो. आज कुणबी समाज लंगोटी लावून फिरत आहे. हिंदू धर्मीयांमध्ये गरीब लोक नाहीत काय ? मला एवढेच म्हणावयाचे आहे की, आपण समाजा-समाजामध्ये, धर्मा-धर्मामध्ये भेदभाव करू नका. शेवटी कोर्टाला सांगावे लागले की, मुस्लिम समाजाला आरक्षण देता येणार नाही. ओबीसीमध्ये मुस्लिमांना वेगळे आरक्षण देता येणार नाही असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. असे करण्या मागचा आपला उद्देश काय होता ? अशा प्रकारचे बिल आणून आपण जाती-जातीमध्ये, समाजा-समाजामध्ये भिंती पाडण्याचे काम करीत आहात. दुसऱ्याला जातीयवादी म्हणायचे पण स्वत:च जाती-जातीमध्ये भिंती पाडण्याचे काम आपण करीत आहात. हा जो प्रकार आहे तो देशाला आणि राज्याला अतिशय घातक आहे. सर्वधर्मसमभाव हा शब्द गोंडस आहे. सर्वधर्मसमभाव आज कुठे आहे ? तो आपण मला दाखवावा.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

अशा प्रकारे एका विशिष्ट समाजाची मते मिळविण्यासाठी अशी विधेयके आणावयाची हे योग्य आहे काय? आज देखील मुस्लिम समाजाच्या महिला रात्री दोन वाजता या मुंबई शहरामध्ये चौपाटीवर किंवा गिरगावला अशा प्रकारे फिरत असते की माझ्या जीवाला धोका नाही. ही भावना सगळया समाजामध्ये असताना मात्र तुम्ही मुस्लिम समाज असुरक्षित आहे असा संदेश देण्याचे काम कशासाठी करीत आहात हे आम्हाला कळले पाहिजे. त्यामुळे याठिकाणी जे विधेयक आणलेले आहे ते अतिशय भयानक आहे. या बिलाच्या माध्यमातून सांगावयाचे तर आतापर्यंत जे आयोग नेमण्यात आले, त्यांना केवळ शिफारशी करण्याचा अधिकार होता. परंतु शासन या आयोगाला निर्णय घेण्याचे अधिकार देत आहे. ज्युडिशिअल अधिकार देत आहे हा दोन आयोगामधील फरक असल्याने हे घातक आहे.

सभापती महोदय, मी विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेता असताना तेथे वक्फ बोर्डाचा जो घोटाळा आहे, तो मी बाहेर काढला. मी हिंदू आहे, मुसलमान नाही. पण अल्लाच्या नावाने दान दिलेली जागा ही कोणाकोणाच्या घशात गेली, ती कोणी-कोणी खाल्ली, त्यावेळी या बोर्डाचा अध्यक्ष आमदार निवासामध्ये 5 खोल्या घेऊन काय करीत होता? या सर्व बाबी मी सरकारच्या लक्षात आणून दिल्यानंतरही सरकार याबाबतीत काही चौकशी करीत नाही. याबाबतीत शासनाने काय केले, कोणता निर्णय घेतला, मुस्लिम समाजाला कोणता न्याय दिला ? मुंबईमध्ये वक्फ बोर्डाच्या, मुस्लिम समाजाच्या हक्काच्या जागांवर 30-30 तसेच 40-40 मजल्याच्या इमारती बांधल्या गेल्या. आम्ही ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतर शासनाने पुढे काय कार्यवाही केली? याठिकाणी अशा प्रकारे कायदे आणून, समाजामध्ये भिंत घालून, एकमेकांमध्ये तेढ निर्माण करुन तुम्ही असा संदेश देत आहात की, मुस्लिम समाजाच्या संरक्षणाच्या बाबतीत आम्ही किती काळजी घेत आहोत. मग बाकीचा समाज कुठे गेला? त्यांनी काय घोडे मारले आहे?

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : याबाबतीत कायदा आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याठिकाणी समान नागरी कायदा आणावा अशी आमची मागणी आहे. मग या राज्यामध्ये समान नागरी कायदा आणावयाचा असेल तर मग समाजाच्या नावावर, जातीच्या नावावर आम्ही तुम्हाला पाकिस्तान दिलेले आहे. गोवा येथे समान नागरी कायद्याची अंमलबजावणी होऊ शकते तर मग महाराष्ट्रामध्ये या कायद्याची अंमलबजावणी का होऊ शकत नाही, आज त्याची अवस्था काय आहे? आज महाराष्ट्रामध्ये आम्ही सगळेजण एकत्र

श्री.रामदास कदम . . . .

राहतो याचा आम्हाला आनंद आहे. तसेच मला अभिमान वाटतो की, आम्ही सर्व भावंडे म्हणून या देशामध्ये रहात आहोत. ज्यावेळी कसाबच्या सोबत असलेल्या 10 अतिरेक्यांना आमच्या पोलिसांनी यमसदनास पाठविले, गोळ्या घातल्या. मग ते सी.एस.टी.स्टेशन असू दे, ताजमहाल असू दे किंवा लॉबी असू दे. त्याठिक्राणी दहा लोकांची प्रेते पडली होती. पण आमच्या मुंबईतील मुस्लिम बांधवांनी सांगितले की, ते काफीर आहेत, बेईमान आहेत, देशद्रोही आहेत त्यामुळे यांची प्रेते आम्ही आमच्या कब्रस्तानामध्ये गाडणार नाही. अशा प्रकारचे या देशावर, येथील मातीवर प्रेम करणारे देखील मुसलमान आहेत. मग त्यांच्यामध्ये आणि आमच्यामध्ये भिंत कोण बांधत आहे हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी आतापर्यंत कुठे-कुठे बॉम्ब स्फोट झाले याची यादी वाचून दाखविणार आहे.याठिकाणी अशा प्रकारची विधेयके आणून एका विशिष्ट समाजाला गोंजारण्याचे काम होत आहे.सच्चर समितीच्या अहवालाची किती अंमलबजावणी झाली आहे हा प्रश्न आहे. मौलाना आझाद महामंडळाला किती कोटी रुपये दिले आणि सरकारने किती जाहीर केले होते सांगा. हा एकच अल्पसंख्यांक आहे काय? पण माझी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेलसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे साहेब या सर्वांना हात जोडून कळकळीची विनंती करावयाची आहे की, याठिकाणी आम्ही सगळेजण एक होऊन वागत असताना अशा प्रकारचे कायदे करुन जर आमच्यामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करणार असाल तर मी त्याचा धिक्कार करतो, त्याला विरोध करतो आणि याचा निषेध करतो, असे होता कामा नये. मग यामध्ये तेली, माळी, साळी, कोळी, गवळी किंवा हिंदू-मुस्लिम इ.कोणीही असो. आम्ही सगळे एक आहोत ही आमची भावना आहे. परंतु जर एक विशिष्ट समाज असुरक्षित आहे असे छापून आणून जर या महाराष्ट्रामध्ये मतांच्या लाचारीसाठी तेढ निर्माण करणार असाल तर अवघा महाराष्ट्र तुम्हाला कधीही माफ करणार नाही असा याठिकाणी इशारा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.खंदारे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, वि.स.वि.क्र.14 या विधेयकाचे स्वागत करण्यासाठी आणि त्याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये असे नमूद केले आहे की, "राज्यातील अल्पसंख्याकांमध्ये सुरक्षिततेची भावना जोपासणे आणि अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी व विकासासाठी उचित त्या शिफारशी करणे याबाबतच्या धोरणाचा अवलंब करण्याच्या हेतूने हे विधेयक सादर केले आहे." हे करण्यासाठी शासनाला उशीर का लागला असा माझ्यासमोर प्रश्न उभा आहे. बाजूच्या राज्यामध्ये अगदी गुजरात राज्यातही विधेयकांना यापूर्वीच सुधारणा करण्यात आली आहे. पण आपली वराती मागून घोडे अशी स्थिती आहे. प्रत्येक वेळी इतर राज्यामध्ये झ ााल्यानंतर आपल्या राज्यात निर्णय घेतला जाणार आहे काय ? हे राज्य जर पुरोगामी असेल, शाहू, फुले, आंबेडकर, यशवंतरावजींचे नाव घेऊन हे राज्य चालणार असेल तर अशा सुधारणा यापूर्वीच का केल्या जात नाहीत असा प्रश्न आहे. अल्पसंख्याक समुदायाला जेव्हा देण्याची वेळ येते तेव्हा आमचा हात आखडता असतो. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी दलित व आदिवासींसाठी शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची तुलना करुन माहिती दिली होती. आदिवासींच्या विकासासाठी 23 पानी योजना आहेत. दलित समाजाच्या विकासासाठी 21 पानी योजना आहेत. परंतु अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी केवळ 1 पान लागले आहे. दुबळ्या वर्गाची तुलना दुबळ्या वर्गाशीच केली जाते. मोठ्या भावाच्या ताटात काय काय वाढले आहे ते पाहावयास सुध्दा आम्ही तयार होत नाही. मोठा भाऊ आमचे सर्व ओरबडून घेऊन चालला आहे. पण आम्ही मात्र याची लंगोटी खेचत, त्याची लंगोटी खेचत भांडत बसलो आहोत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी या राज्यातील अल्पसंख्याक समाजाची मोठ्या भावाशी तुलना केली असती तर मला अभिमान वाटला असता. माझ्या समुदायाला मिळाले नाही याचे कारण असे आहे की, मोठा भाऊ सर्व घेऊन गेला आहे. ते न करता दुबळ्या वर्गाची लंगोटी खेचण्याचे काम सगळीकडे सुरु आहे.

सभापती महोदय, मी आज सकाळी वसतिगृहात अनुसूचित जातींसाठी जे आरक्षण होते ते रद्द केल्यामुळे त्या समाजात जो असंतोष निर्माण झाला आहे त्यासंबंधी मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली होती. 1984 साली जी योजना लागू केली होती ती 1995 मध्ये रद्द

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.कपिल पाटील....

करण्यात आली. पुन्हा त्यामध्ये दुरुस्ती करुन अनुसूचित जातीच्या समाजाला पूर्णपणे आरक्षण देण्यासाठी दुरुस्ती करण्यात आली. पुन्हा 1984 सालातील परिस्थिती निर्माण करुन ठेवल्यामुळे भांडण सुरु झालेले आहे. हे भांडण दलित विरुध्द आदिवासींमध्ये सुरु झालेले आहे. म्हणजे छोट्या समुदायांमध्येच भांडण सुरु आहे. मोठी भावंडे फक्त प्रत्येक वेळी कोणाला तरी ओंजारतात, गोंजारतात. त्यांना आम्ही दोष देत नाही, त्यांच्याशी आपण भांडण करीत नाही. ही आपली अडचण आहे. आपण सर्वजण एक आहोत, सर्वधर्मसम भावाची भावना निर्माण करतो. प्रत्यक्षात देण्याची वेळ आली की यांना कशा द्यावयाचे असे म्हणावयाचे. आपण असे बोलणाऱ्यांबरोबर भांडण करीत नाही. आपण सन्माननीय सदस्य श्री.जामा यांच्याबरोबर भांडतो, आपण सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांच्याबरोबर भांडतो. मोठी मंडळी दोघांचे भांडण गंमतीने बघत बसतात. हे कोठे तरी थांबले पाहिजे.

सभापती महोदय, प्रश्न वाट्याचा आहे, वाट्याला काय आले आहे त्याचा आहे. या देशाचा आम्ही भाग आहोत, या देशाचा हिस्सा आहोत, नागरिक आहोत. आम्हाला आमचा समान वाटा मिळतो की नाही, समान प्रतिष्ठा मिळते की नाही हा खरा मुद्दा आहे.

सच्चर समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करण्यासाठी मी सभागृहात दोन वेळा अशासकीय ठराव मांडला होता. परंतु तो दोन्ही वेळा अस्वीकृत झाला. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी नागपूर येथील अधिवेशनाच्या काळात मोर्चा आयोजित केला होता, त्या दिवशीच मी सच्चर समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करण्याचा ठराव मांडला होता. त्यावेळी सन्माननीय मंत्री प्रा.फौजिया खान यांनीच त्या ठरावाच्या चर्चेला उत्तर दिले होते. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी मोर्चा आणला नसता तर ते घडले नसते हे मी मान्य करतो. त्यापूर्वी मी दोन वेळा प्रयत्न केले होते. परंतु त्यावेळी शासनाने काहीही स्वीकारले नाही. शासनाने फक्त अल्पसंख्याक विभागाची स्थापना केली आहे. मी मंत्री महोदयांच्या बाजूनेच बोलत आहे. नडल्याशिवाय आपल्याला काही मिळत नाही. तत्कालीन सदस्य म्हणून सन्माननीय मंत्री प्रा.फौजिया खान यांनी अशासकीय ठराव मांडला होता. परंतु त्यावेळी माझा ड्राफ्ट स्वीकारण्यात आला होता. त्यावेळी आपण सत्तारुढ पक्षाच्या सदस्या होता म्हणून तुम्हाला तो ठराव मांडण्याची संधी मिळाली होती. मंत्री महोदया आता मंत्रिमंडळाच्या सदस्या आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:55

श्री. कपिल पाटील....

या ठिकाणी जेव्हा अल्पसंख्याकाच्या संदर्भातील प्रस्ताव आणला होता त्यावेळी मी माननीय राज्यमंत्री महोदया प्रा. फौजिया खान यांच्या बरोबर होतो आणि त्या आमच्या बरोबर होत्या.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम आणि सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी शासकीय सेवेतील मुस्लिम समाजाच्या टक्केवारीचा उल्लेख केला. प्रशासनामध्ये, पोलीस दलामध्ये किंवा शिक्षणामध्ये या समाजाचा वाटा 2 टक्के देखील नाही. नोकरीमधील शिक्षक काढले तर प्रशासनामध्ये मुस्लिम समाजाचा वाटा अर्धा टक्का देखील राहाणार नाही. महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये या समाजाचे कॉण्ट्रीब्युशन नाही काय, महाराष्ट्राच्या विकासामध्ये, महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यामध्ये या मुस्लिम समाजाचे कॉण्ट्रीब्युशन नाही काय ? छत्रपती शिवाजी महाराजांची आग्राहून सुटका करताना त्यांना मदत करणारा मदारी मेहतर हा मुस्लिम होता. त्या मदारी मेहतरची आपण आठवण ठेवली नाही. युती शासन सत्तेवर आल्यानंतर त्यांनी देखील मदारी मेहतरची आठवण ठेवली नाही. मदारी मेहतरसाठी आम्ही कोठे काय केले ? काही केले नाही. मी त्यावेळी मागणी केली होती की, दलित समाजामध्ये जे मुस्लिम धर्मीय आहेत किंवा जे त्या धर्माची उपासना करतात त्यांना 1934 पासून 1950 पर्यन्त प्रेसिडेन्शियल ऑर्डरने काही सवलती देण्यात आल्या होत्या. त्या सवलती त्यांना पुन्हा मिळण्याची आवश्यकता आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मुस्लिम समाजाचे कौतुक करायला माझी काही हरकत नाही. मदारी मेहतर हा शिवभक्त होता. त्याने खांद्यावर भगवा घेतलेला होता. आता यांना "वंदे मातरम्" म्हणायला सांगा. मग खूप झाले.

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, आम्ही "वंदे मातरम्" म्हणतो.

श्री. दिवाकर रावते : इतरांनाही म्हणायला सांगा...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी सांगत होतो की, मुस्लिम समाजाला प्रशासनाच्या सेवेमध्ये आपण अर्धा टक्का सुध्दा हिस्सा दिलेला नाही. हा हिस्सा देण्यापासून आपणाला कोणी रोखले नव्हते. दिवाणी कायद्याअंतर्गत आपण अल्पसंख्याक आयोगाला शक्तिमान

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

बनवित आहात याचे मी जरुर स्वागत करतो. पण त्या पलीकडे जाऊन जे करण्याची आवश्यकता होती ते का करत नाही ? ते करण्याची आवश्यकता आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी सभागृहामध्ये प्रस्ताव मांडला होता आणि सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी त्यावेळी बाहेर मोर्चा काढला होता. त्यावेळी मी अशी मागणी केली होती की दलित मुस्लिमांना संधी देण्यासंबंधीची तरतूद राज्य सरकार स्वत:हून करु शकते. मग तशी तरतूद राज्य सरकार का करीत नाही. मौलाना आझाद मंडळ आपण काढले. मी मदारी मेहतर मंडळ काढण्याची मागणी केली होती.

...नंतर श्री. अजित....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..

आपण ती मागणी का पूर्ण केली नाही ? त्यांची मागणी पूर्ण करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सन 1934 ते 1950 पर्यंत दलित मुस्लिमांना सर्व सवलती मिळत होत्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केल्यानंतर वातावरण बदलले. ते रोखण्यासाठी प्रेसिडेन्शिअल ऑर्डर काढण्यात आली. मग शिखांना, बौध्दांना, मुस्लिमांना वगळले. 1956 साली शिख समाज भांडला तेव्हा त्यांचा समावेश झाला. श्री.व्ही.पी.सिंग आल्यानंतर बौध्दांचा समावेश झाला. जे इस्लाम मानतात किंवा त्या धर्माचा अनुनय करतात पण जातीने आणि व्यवस्थेने दलितत्व मिळालेले आहे त्यांना मात्र आपण अगोदर नाकारले. यामध्ये मेहतर, धनगर, खाटीक, भंगी समाज इत्यादींचा समावेश आहे. या समाजाला जे द्यायचे होते ते का दिले नाही ? ते देण्याच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका येथे मांडण्यात आली पाहिजे. ती भूमिका येथे मांडण्यात आली असती तर मला अधिक आनंद झाला असता. माननीय राज्यमंत्री आपण या ठिकाणी आहात, तेव्हा आपण त्यासाठी अधिक भांडाल अशी मला खात्री आहे आणि भांडल्याशिवाय काही मिळणार नाही. मी सेक्युलर आहे असे सांगितल्यानंतर सर्व सेक्युलरिझम आहे असे होत नाही. आपण जेव्हा बरोबरीचा हिस्सा देऊ तेव्हा आपण सेक्युलर होतो. "सगळे घेऊ पण देऊ तुकडा" त्याला सेक्युलरिझम म्हणत नाही. निवडणूक आली की आपण सेक्युलर शब्द वापरतो आणि तो शब्द वापरला म्हणजे सर्वांना सर्व काही मिळाले असे होत नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी मुस्लिम समाजाबाबत जो उल्लेख केला तो बरोबर आहे. सच्चर समितीने म्हटले आहे की, "आज दलितांपेक्षा मुस्लिमांची वाईट परिस्थिती आहे." मला सरकारला सांगावयाचे आहे की, या समाजाला पाणी देण्यापासून आपणास कोणी अडविले होते, मुस्लिम वस्त्यांच्या ठिकाणी दूषित पाणी आहे. जेथे जेथे मुस्लिम वाड्या वस्त्या आहेत त्या ठिकाणी अजून रस्ता झालेला नाही. महाराष्ट्रातील अनेक भागात रस्ते नाहीत. या सर्व सुविधा देण्यासाठी सरकारला कोणी रोखले आहे ? ज्या ठिकाणी मुस्लिम समुदाय आहे त्या ठिकाणी शाळा का देत नाही ? ज्या ठिकाणी शाळा आहेत त्या शाळांना अनुदान मिळत नाही. मग शाळा चालविणार कोण, इमारती बांधणार कोण ? मुस्लिम समाज दलितांपेक्षा अतिशय वाईट स्थितीमध्ये जगत आहे. त्या समाजाला जे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..

द्यायचे आहे ते आपण देणार नसाल तर कायद्यामध्ये दुरुस्ती करुन त्यांना काही मिळेल असे मला वाटत नाही. त्या समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे. त्या समाजाला आर्थिक मदत मिळाली पाहिजे. त्या समाजाला रोजगारामध्ये वाटा मिळाला पाहिजे, त्या समाजाला प्रशासनामध्ये वाटा मिळाला पाहिजे. त्या समाजाला सत्तेमध्ये वाटा मिळाला पाहिजे हा वाटा आपण देणार आहात की नाही ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल म्हणाले की, "आम्ही दोघे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा आणि मी या सभागृहातून आऊट झालो आहोत." म्हणजे मग इकडे असो वा तिकडे असो, द्यायचे झाले की दोघांना आऊट केले. गरज असताना दोघांना आणले. मग त्यावेळी पाशा पटेल आणि जमा यांची आवश्यकता लागत नाही, गाशा गुंडाळा असे सांगतात आणि एकाच मुद्यावर ते दोघे भांडत असतात. मग आपला शत्रू कोण ते त्यांना कळत नाही.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये ज्या मुस्लिम समाजाची मातृभाषा मराठी आहे त्यांच्यासाठी मराठी शाळा नाहीत. महाविद्यालयात जायचे असेल तर शिष्यवृत्ती नाही. त्यामुळे ते शिक्षण पूर्ण करु शकत नाही. सरकारने तीन-चार तंत्रनिकेतन महाविद्यालये काढण्याचे जाहीर केले आहे.

सभापती महोदय, शिक्षणामध्ये अल्पसंख्याकाचा किती वाटा आहे, माध्यमिक शाळांमध्ये किती गळती आहे, महाविद्यालयामध्ये किती गळती आहे आणि महाविद्यालयापर्यंत किती विद्यार्थी पोहोचतात याची आकडेवारी माननीय मंत्री महोयांनी सांगावी. मुस्लिम समाजातील मुली महाविद्यालयापर्यंत पोहोचू शकत नाही अशी परिस्थिती आहे. जर मुली शिकत नसतील तर त्या समाजाचा कधीच विकास होऊ शकणार नाही. मुस्लिम समाजातील मुली शिकू नयेत अशा तऱ्हेची व्यवस्था आपण करीत आहोत. आपण ही व्यवस्था बदलणार आहोत की नाही याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. मुस्लिम मुलींच्या उच्च शिक्षणासाठी राज्य सरकार कोणती सुविधा पुरविणार आहे याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे.

यानंतर श्री.गिते..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

या बाबतीत शासन काही सांगणार नसेल आणि अल्पसंख्यांक आयोगाला काही आवश्यक असलेले दात देणार असू तर त्याच्यामुळे काही फरक पडणार नाही. ते फार तुम्हाला आणि आम्हाला बोलावतील. नोटीसा देतील. उत्तर तेच देतील. या संदर्भात राज्य सरकारने ठोस कार्यक्रम जाहीर केला पाहिजे.

महोदय,माननीय पंतप्रधानांचा 15 कलमी कार्यक्रम आम्ही राबवू एवढे सांगून पुरणार नाही. हे राज्य सरकार पुरोगामी असेल, त्यांनी या राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाला मग त्यात फक्त मुस्लीम समाज म्हणत नाही, अल्पसंख्याकांमध्ये ज्या ज्या समाजांचा समावेश आहे, त्यांना राज्य शासनाने मोठया प्रमाणात सवलती उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. अल्पसंख्यांक समाज हा अत्यंत गरीब आहे, अत्यंत दुर्लक्षित आहे. त्या समाजासाठी विकासाचा कोणता अजेंडा राज्य शासन घेऊन येणार आहे, याची आम्ही वाट पाहतो आहोत. तुम्ही जर ती माहिती दिली तर या विधेयकाला शक्ती मिळेल. अधिक ताकद मिळेल. यापुढे विधेयके सभागृहात नावापुरती येतील. विधेयक पास झाल्याचा आनंद होईल, पण समाजाच्या हाती धतुरा मिळेल. तो धतुरा द्यावयाचा की विकासाचा पक्का वाटा द्यावयाचा या बाबतचे उत्तर मला हवे आहे, एवढे बोलून मी माझे मनोगत पूर्ण करतो.

-----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल्ला खान अ.लतीफ खान दुर्राणी ( परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकरण संस्था ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 14 महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोग (सुधारणा) विधेयकाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्याक आयोगाच्या विधेयकामध्ये काही सुधारणा आणण्याचे ठरविले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा साहेब, आपण तिकडच्या बाजूस बसून अतिशय मोठ्या आवाजाने बोलत होतात. आपणास आठवत असेल की, सच्चर समितीच्या शिफारशी लागू कराव्यात या मागणीसाठी नागपूर येथे 50 हजार लोकांना स्वखर्चाने घेऊन गेलो होतो. परंतु तुमच्याच पक्षाचे नेते सच्चर समितीच्या शिफारशी लागू करु नयेत म्हणून विरोध करीत होते. तुमच्या पक्षाचे टोटल धोरण सच्चर समितीच्या शिफारशीच्या विरोधात होते. विरोधी पक्षाच्या बाकावर बसून जोरजोरात बोलत होते, सदस्य बाके वाजवित होते. मुस्लीम समाजाची वस्तुस्थिती ऐकून त्यांना आनंद होत होता की काय असे मला वाटत होते.

सभापती महोदय, या लोकशाही प्रक्रियेमध्ये एखादा समाज शिक्षणापासून वंचित आहे, नोकऱ्यांपासून वंचित आहे, त्या समाजाला इतर समाजाबरोबर आणण्यासाठी विधिमंडळाच्या माध्यमातून प्रयत्न करतो. मला या ठिकाणी एक गोष्ट आवर्जून सांगावयाची आहे की, मी विधानसभेत सदस्य होतो. तेव्हापासून मी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे भाषण ऐकत आहे. ते नेहमी आपल्या भाषणात उल्लेख करतात की, मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर मशीद बांधण्यात आलेली आहे. मी कधी ती मशीद पाहिलेली नाही. त्या ठिकाणी काहीही वास्तू नसताना अशा प्रकारचा आरोप करणे बरोबर नाही असे मला वाटते. मंत्रालयाच्या सातव्या माळयावर एखाद्या स्वच्छ जागेवर बसून नमाज पढत असतील. नमाजचा अर्थ असा आहे की, परमेश्वराला नमन करणे, परमेश्वराचे नामस्मरण करणे. एखाद्या स्वच्छ जागेवर बसून नमाज पढला तर त्याचा मोठा आव आणणे, त्या गोष्टीस वेगळे स्वरुप देणे, ही गोष्ट फार चुकीची आहे असे मी नम्रपणे नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी मुस्लीम समाजाची अवस्था काय आहे याची सविस्तर माहिती या सभागृहाला दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सेवेत मुस्लीम समाजातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण किती आहे याचा कधी कोणी विचारच केलेला नाही. शासनाच्या सेवेत मुस्लीमांची टक्केवारी शून्य आहे. यानंतर कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 17:10

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री. अब्दुल्ला खान अ.लतीफ खान दुर्राणी यांनी माझ्या नावाचा याठिकाणी उल्लेख केला आहे. त्यांनी असे सांगितले की, मंत्रालयाच्या 7 व्या माळयावर मशीद आहे असा मी माझ्या भाषणात उल्लेख केला होता. सभापती महोदय, मंत्रालयाच्या 7 व्या माळयावर नमाज पढण्यासाठी शेड बांधण्यात आलेली आहे. त्याप्रमाणेच मंदिरासाठी शेड बांधावी, दुसऱ्या समाजातील लोकांना प्रार्थनेसाठी शेड बांधा. नमाज पढण्यासाठी 7 व्या माळयावर व्यवस्था नाही असे शासनाने याठिकाणी सांगावे.

श्री: अब्दुल्ला खान अ.लतीफ खान दुर्राणी : सभापती महोदय, या बिलाच्या निमित्ताने अल्पसंख्याक समाजासाठी नवनवीन योजना आणि कार्यक्रम आखून या समाजाला मदतच होणार असल्यामुळे मी या बिलाला पाठिंबा देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, सभागृहामध्ये अल्पसंख्याक आयोगाच्या संदर्भात जे विधेयक मांडण्यात आले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, याबिलावर अनेक माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. हे विचार ऐकत असताना मला एक गोष्ट सतत मनामध्ये खटकत होती की, अल्पसंख्याक समाज म्हटला म्हणजे आपण एका विशिष्ट समाजाबद्दल बोलतो अशा स्वरुपाची भावना बाळगून माननीय सदस्य याठिकाणी बोलत होते. अल्पसंख्याक समाज म्हणजे केवळ मुसलमान समाज नाही तर त्यात ख्रिश्चन समाज आहे, शीख समाज आहे, जैन समाज आहे असे विविध प्रकारचे समाज या अल्पसंख्याकांमध्ये मोडतात. या समाजामध्ये वेगवेगळया प्रकारच्या ज्या उणिवा आहेत त्या आपल्याला आयोगाच्या माध्यमातून दूर करावयाच्या आहेत. याठिकाणी सच्चर समितीच्या अहवालाचा अनेक माननीय सदस्यांनी उल्लेख केला. सच्चर समितीचा अहवाल प्रसिध्द झाल्यानंतर ज्या पध्दतीचे विदारक असे चित्र समाजामध्ये उभे करण्याचा प्रयत्न झाला त्यामुळे या अहवालावर चर्चा करण्यासाठी कोणीही तयार नव्हते. मला याठिकाणी प्रामुख्याने नमूद करावयाचे आहे की, महाराष्ट्राचे आणि या देशाचे नेते आदरणीय श्री. पवार साहेबांनी सच्चर समितीचा रिपोर्ट आल्यानंतर आमच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांना आणि संघटनेत काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना बोलावून सच्चर समितीच्या अहवालावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:15

श्री.प्रकाश बिनसाळे.......

काय उद्देश होता? पहिला उद्देश हा अल्पसंख्याक समाजाच्या संरक्षणासाठी भारताच्या संविधानामध्ये आणि राज्य विधिमंडळामध्ये मंजूर केलेल्या कायद्यात तरतूद करण्यात आलेल्या विविध संरक्षण उपाययोजनांची कार्यक्षमतेने तपासणी करणे हा होता. राज्य सरकारने अल्पसंख्याक आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष श्री.नसीम सिध्दीकी हे होते. मी त्यांच्याबरोबर अनेक विषयांवर चर्चा केली. परंतु केवळ बाहुले म्हणून आयोगावर अध्यक्षांना नेमणार असू, त्या आयोगाला आर्थिक ताकद देणार नसलो तर त्यातून आयोग स्थापण्यामागचा जो उद्देश आहे तो साध्य होणार नाही. श्री.नसीम सिध्दीकी यांनी देशातील अनेक राज्यातील कायद्यामध्ये काय अंतर्भूत आहे याचा अभ्यास केला. मी त्यांच्याबरोबर मंत्रालयाच्या विविध विभागांच्या सभेमध्ये जाऊन प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न केला. दु:ख एकाच गोष्टीचे आहे की, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये ज्यावेळी हा कायदा अस्तित्वात आला त्याचवेळी आज जी सुधारणा केली जात आहे ती कायद्यात अंतर्भूत केली गेली असती आणि संपूर्ण देशाला महाराष्ट्राने दिशा दिली असती तर ते अधिक संयुक्तिक झाले असते.

सभापती महोदय, आज केवळ मुस्लीम नव्हे तर अल्पसंख्याक समाजाचे जे काही प्रश्न आहेत, विविध प्रकारच्या तक्रारी येतात, त्यांच्यावर अत्याचार होतात त्याची चौकशी करणे आवश्यक असते. आपल्यामागे कोणी तरी उभे आहे याची त्यांना खात्री वाटली पाहिजे. कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसेल तर त्याची माहिती घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याला बोलावण्याचे अधिकार जर आयोगाला नसतील आणि आयोगाच्या विनंतीला अधिकारी दाद देणार नसतील तर ते योग्य आहे का? आज अधिकारी मंडळी कशा प्रकारे वागतात याची मी चर्चा या ठिकाणी करु इच्छित नाही. परंतु कायद्यामध्ये सुधारणा करुन जे अधिकार आयोगाला दिले जाणार आहेत त्या अधिकाराच्या माध्यमातून या समाजाच्या उन्नतीसाठी या आयोगाने सक्षमतेने काम केले पाहिजे आणि आयोगाच्या ज्या काही शिफारशी सरकारकडे येतील त्यात कारवाई करण्याचा विषय असेल किंवा कार्यक्रमामध्ये सुधारणा करण्याचा विषय असला तरी त्याची अंमलबजावणी करणे हे शासनाचे कर्तव्य राहील. आयोगाच्या शिफारशींची गांभीर्याने दखल घेऊन त्यासंबंधी निर्णय घेतला जाईल या संदर्भातील अभिवचन शासनाने या सभागृहात दिले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:15

श्री.प्रकाश बिनसाळे.......

सभापती महोदय, मुस्लीम समाज स्वत:ला दबलेला समाज समजतो. या ठिकाणी शिक्षणासंबंधी आणि फतव्यासंबंधी बोलले गेले आहे. फतवा का काढला जातो? समाजामध्ये शिक्षण कमी असेल तर अशा स्वरुपाचे लोक समाजावर हावी होत असतात. मुस्लीम समाजामध्ये जे सुशिक्षित लोक आहेत ते अशा गोष्टीमध्ये शिरकाव करीत नाहीत. शिक्षण कमी असेल त्याच लोकांना अशा गोष्टीमध्ये दाबले जाते. शिक्षणाबाबत प्रगती झाली, जास्तीत जास्त सुविधा निर्माण करुन दिल्या आणि त्या समाजाला सुशिक्षित केले तर त्यांना नोकरी मिळू शकते. अशिक्षित राहिले तर नोकरी मिळणार नाही. नोकरी मिळाली नाही तर स्वत:च्या पोटाची खळगी भरण्यासाठी चुकीचे काही केले तर त्यांना दोष देणे बरोबर होणार नाही. या समाजाला सर्व समाजाबरोबर आणण्याची गरज आहे. ते काम या आयोगाच्या माध्यमातून प्रखरपणे होईल असा विश्वास व्यक्त करतो आणि या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक 54 महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोग (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर विस्तृतपणे चर्चा झाली आहे. हे विधेयक सभागृहापुढे आल्यानंतर माननीय सदस्यांना असे वाटले की, नवीन काही तरी सरकार करीत आहे. अल्पसंख्याक आयोग अस्तित्वात आहेच. फक्त या विधेयकाद्वारे त्या आयोगाला अधिक अधिकार प्रदान करण्यात येणार आहेत. एवढ्या मर्यादित विषयासाठी हे विधेयक सभागृहापुढे आलेले आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी भाषण केल्यामुळे मी बोलायला उभा राहिलो आहे. या देशामध्ये अल्पसंख्याक समाज म्हणजे मुस्लीम समाज हा काँग्रेस पक्षाला अभिप्रेत असलेला अर्थ संपूर्ण देशाला माहिती आहे. पूर्वी या आयोगाचे अध्यक्ष श्री.नसीम सिध्दीकी होते. आता अध्यक्षाचे पद रिक्त आहे. आयोगाच्या सचिवपदी श्री.अस्मीन कार्यरत होते. त्या आयोगामध्ये नेमलेला स्टाफ हा अल्पसंख्याक समाजाचा आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाचे मंत्री हे आदिवासी समाजाचे होते, परिणामी आदिवासी बांधवांची दुर्दशा होते असे सरकारचे मत बनले. म्हणून शासनाने बिगर आदिवासी समाजाचे श्री.बबनराव पाचपुते यांच्याकडे आदिवासी विकास मंत्री पद सोपविले.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .........

आदिवासी विकास विभागाच्या मंत्रिपदाचा कार्यभार बिगर आदिवासी माणसाकडे ज्याप्रमाणे देण्यात आला तसे या आयोगाचे अध्यक्षपद मुस्लीम समाजाच्या व्यक्तिला देण्यात आले. म्हणजे आयोगाचे प्रमुख म्हणून आपण त्याच समाजाचे नेमतो मग इतर अल्पसंख्यांक व्यक्ती आपल्याकडे या पदावर देण्यासाठी योग्य नव्हत्या काय हा प्रश्न निर्माण होतो.

श्री. प्रकाश बिनसाळे : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे की, सन्माननीय सदस्यांनी आता अल्पसंख्यांक अध्यक्ष पदावर नेमणूक करण्यासंबंधीचा विषय उपस्थित केला त्या अनुषंगाने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सध्याच्या परिस्थितीत अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष एक ख्रिश्चन व्यक्तीच आहे. त्यामुळे इतर समाजाचा विचार होत नाही असे नाही, पण इतर समाज शिक्षणाने पुढे गेलेला आहे, पारशी, जैन आणि ख्रिश्चन या समाजातील लोक शिक्षण क्षेत्रात स्वावलंबी झालेले आहेत आणि केवळ हा एकच समाज असा आहे की, ज्या समाजात शिक्षणाचा अभाव आहे, कमतरता आहे.

श्री. दिवाकर रावते : मी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांचे कौतुक करतो कारण त्यांनी उभे राहून पुन्हा कौतूक करुन घेतले आहे. हे बाकीचे सर्व अल्पसंख्यांक आहेत ते सर्व विकसित झाले परंतु हेच राहिले हे आपणच आता सांगितले. प्रश्न असा आहे की, ज्याप्रमाणे आदिवासी विभागाचे मंत्री पद बिगर आदिवासी माणसाकडे दिले तसे हे अध्यक्षपद अन्य समाजाकडे का दिले नाही ? अल्पसंख्यांकामध्ये अशा प्रकारची व्यक्ती कोणीच नव्हती काय ....अडथळा..... आपल्या शासनाची नियत सुध्दा स्वच्छ नाही.

श्री. हेमंत टकले : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बिगर आदिवासी व्यक्तिकडे आदिवासी विकास विभागाचे मंत्री पद दिले असा विचार आमच्या कोणाच्या मनातही नाही, केवळ त्यांना सुचते म्हणून ते बोलत असतात व कशाचा कशाशी संबंधी नाही त्याबद्दल ते बोलत असतात, वास्तविक या विषयांशी काहीही संबंध नसतो.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी सन्माननीय सदस्यांना असे विचारु इच्छितो की, आपल्या पक्षाला असे वाटत नाही काय की माननीय मंत्री महोदया प्रा. फौजिया खान व आमदार मोहम्मद

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

आरिफ खान या दोघांनाच मंत्री पदे का दिली, इतर कोणतीही व्यक्ती आपल्या पक्षात कॅपेबल नव्हती काय, .......अडथळा.......हरदासाची कथा मूळ पदावर असा हा प्रकार आहे. मुळात प्रश्न असा आहे की, आपल्या शासनाची नियत ठिकाणावर नाही, आपण सुध्दा त्यातच गुरफटलेले आहात. या मुस्लीम समाजाची दुर्दशा मांडण्याचा आपण प्रयत्न केला पण त्याऐवजी त्या समाजाचे पुनरुत्थान व्हावे हे सांगितले त्याबद्दल दुमत नाही पण शासनाला माझी नम्र सूचना आहे की, अफझल गुरुला फाशी दिली तर मुस्लीम समाज नाराज होईल, हे कोणी सांगितले तर हा निर्णय आपणच घेतला,......अडथळा..........द्या ना, त्याला फाशी ........अडथळा.........माननीय शरदराव पवार ज्या महाराष्ट्राच्या नंबरासाठी केंद्रात अस्वस्थ आहेत, नंबराकरिता भांडत आहेत तर मग या अफझ ाल गुरुला फाशी द्यावी यासाठी का भांडत नाही, हा खरा प्रश्न आहे. हे आपणास देखील आवडेल काय ?

( सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळेस बोलत असतात )

श्री. दिवाकर रावते : मी मुस्लीम धार्जिण्या लोकांच्या विरोधात बोलतो असे नाही तर ही एक प्रवृत्ती असल्याने अशा लोकांकडून या समाजाचा विकास होत नाही, एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (अल्पसंख्यांक राज्यमंत्री ) : सभापती महोदय, अल्पसंख्यांक आयोगाला दिवाणी अधिकार देण्यासाठी या ठिकाणी सुधारणा विधेयक मांडण्यात आलेले आहे. या बिलावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल, सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा, डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, एम.एम. शेख, रामदास कदम, कपिल पाटील, दुर्राणी साहेब, प्रकाश बिनसाळे या सर्व सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. या विधेयकाच्या संदर्भात या ठिकाणी अतिशय सखोल चर्चा झालेली असून या सुधारणा विधेयकाच्या अनुषंगाने अल्पसंख्यांक समाजाच्या अनेक प्रश्नावर या ठिकाणी चर्चा करण्यात आली. अल्पसंख्यांक कोण ? असा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सांगितल्याप्रमाणे अल्पसंख्यांक हे धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक आहेत. धार्मिक अल्पसंख्यांक समाजामध्ये सर्वात मोठा अल्पसंख्यांक समाज मुस्लीम समाज आहे. ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व नवबौद्ध हे सर्व समाज धार्मिक अल्पसंख्यांक समाजामध्ये येत असून त्यांच्यासाठी योजना आखण्यात येत असतात. भाषिक अल्पसंख्यांक समाजासाठी विभागाद्वारे विकास कार्यक्रम व योजना आखल्या जात असतात.

सभापती महोदय, सच्चर कमिटीच्या रिपोर्टच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा करण्यात आली. सच्चर कमिटीच्या रिपोर्टवर शासनाने कोणती अमलबजावणी केली यासंदर्भात देखील या ठिकाणी चर्चा करण्यात आली. सच्चर समितीच्या संदर्भात अनेक प्रकारची अमलबजावणी करण्यात आलेली आहे. याचाच एक भाग म्हणून हे विधेयक येथे मांडण्यात आले आहे. अल्पसंख्यांकाच्या अधिकारासाठी, सुरक्षेसाठी, कल्याणकारी योजनांसाठी काम करणारा हा आयोग असून त्यांना थोडे अधिकचे अधिकार देण्याच्या बाबतीत हे बिल येथे आणले गेले आहे. बाकीच्या समाजासाठी काहीच करावयाचे नाही असा या विधेयकाचा अर्थ नाही. परंतु या ठिकाणी इतर समाजासाठी काहीच करावयाचे नाही यासाठी हे विधेयक आणले गेले असे मत काही सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेले आहे. चुकीच्या पध्दतीने अशा प्रकारची चर्चा करण्यात आलेली आहे. या राज्यामध्ये जे जे समाज संख्येमध्ये कमी आहेत अशा समाजासाठी विकास कार्यक्रम आखण्याचे धोरण शासनाचे आहे व त्या प्रमाणे अल्पसंख्यांक विकास विभागाच्या माध्यमातून कार्यक्रम घेण्यात येत असतात.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान......

सभापती महोदय, मला सुरुवातीलाच एक बाब नमूद करावयाची आहे की, या बिलाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी जोरदार भाषण केले त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करते. त्यांनी अल्पसंख्यांक समाजाच्या संदर्भातील सर्व परिस्थिती या ठिकाणी मांडलेली आहे. अल्पसंख्यांक समाजामध्ये काय काय करण्याची गरज आहे याबद्दलची सर्व वस्तुस्थिती त्यांनी सांगितली. अल्पसंख्यांक समाजासाठी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे सर्व करण्याची गरज आहे व त्याची शासनाला जाणीव आहे. राज्य शासन व केंद्र शासनाच्या माध्यमातून, माननीय पंत प्रधानांच्या आदेशाखाली सच्चर कमिटी नियुक्त करण्यात आली असून त्यावर अमलबजावणी करण्याची भूमिका राज्य शासनाची आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी सांगितले आहे की, या विषयाच्या संदर्भात नागपूर अधिवेशनामध्ये एक प्रस्ताव उपस्थित करण्यात आला होता.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

त्यावेळी चर्चेसाठी प्रस्ताव मी उपस्थित केला होता.

मी आमदार असताना सुद्धा एक प्रस्ताव दिला होता. त्यावेळी माननीय सभापतींनी सांगितले होते की, आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे आपला प्रस्ताव पुढच्या अधिवेशनात घेण्यात येईल. पुढच्या अधिवेशनात तो प्रस्ताव मांडण्याची संधी मला माननीय सभापतींनी दिली होती. सच्चर समितीच्या आयोगावर सभागृहामध्ये दोन दिवस चर्चा सुरू होती. परंतु, समोरच्या बाकावरील सर्व सन्माननीय सदस्य "सच्चर कमिटी हाय हाय" अशा घोषणा देत होते. अशा गोंधळाच्या वातावरणात देखील मी 3 ते 4 वेळा सभागृहात बोलण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी 7 वेळा सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली होती. त्या दिवशी चर्चा होऊ शकली नाही. ... (अडथळा) ....त्या दिवशी 50 हजार लोकांची दिशाभूल झाली. कदाचित या पक्षाने भूमिका घेतली आहे असे वाटल्यामुळे सर्व लोक सोबत आले असतील. पण नंतर त्यांची निराशा झाली की, ही सगळी भूमिका चुकीची आहे. अशा प्रकारे विरोधी पक्षाची भूमिका राहिली आहे.

आज राज्य शासनामध्ये अल्पसंख्याक विभाग सुरू करण्यात आला आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छिते की, आम्ही कुठल्या समाजाचे आहोत हा आमचा दोष नाही. शेवटी आम्ही त्या समाजामध्ये जन्म घेतला आहे. तो आमचा दोष असूच शकत नाही. आम्हाला जी जबाबदारी देण्यात आली आहे ती आम्ही सांभाळतो. या विभागाच्या माध्यमातून राज्यात अनेक प्रकारचे कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत. अल्पसंख्याक मुलांसाठी गणवेश वाटप करण्यात येत आहे, शिक्षणामध्ये प्रोत्साहन मिळावे म्हणून उपस्थिती भत्ता देण्यात येत आहे, नवीन आयटीआय स्थापन करण्याची योजना आहे, क्षेत्रविकास कार्यक्रमासाठी निधी देण्यात येत आहे, ए,बी,सी ग्रेड महापालिका असेल तर त्यांना त्या ग्रेड प्रमाणे निधी देण्यात येतो व अल्पसंख्याक क्षेत्राच्या विकासासाठी कार्यक्रम आखण्यत येतो. या विभागाच्या माध्यमातून वसतिगृहे बांधण्यात येत आहेत, नवीन आयटीआय, पॉलिटेक्निक सुरू करण्याचे विचाराधीन आहे. यात अल्पसंख्याकाच्या मुलांसाठी दुसरे आणि तिसरे सत्र सुरू करण्याचे काम या विभागाच्या माध्यमातून झाले आहे. शिष्यवृत्ती योजनाचा कार्यक्रम आहे, स्वयंसहाय्यता गटासाठी कार्यक्रम आहे, हज कमिटी, मौलाना आझाद विकास महामंडळासाठी निधी देण्यात येतो. गरीब मुलांना उभे करण्यासाठी स्वयंरोजगाराचे

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

काम या विभागामार्फत करण्यात येते. तसेच उर्दू अकादमीच्या माध्यमातून मदत करण्याची भूमिका असते. या सर्व योजनांच्या खोलात जाऊन मी सभागृहाचा जास्त वेळ घेऊ इच्छित नाही.

येथे सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी वक्फ बोर्डाच्या जमिनी संबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यासंबंधी मी असे सांगू इच्छिते की, या राज्यात 27 हजार वक्फ बोर्डाच्या प्रॉपर्टीज आहेत. त्यांचे रजिस्ट्रेशन करण्याची कार्यवाही सुरू आहे. यापैकी 5 हजार प्रॉपर्टींचे रजिस्ट्रेशन झाले आहे. संगणकाच्या माध्यमातून हा सर्व डेटा कलेक्ट करण्यात येणार आहे. आज वक्फ बोर्डाच्या अनेक जमिनींवर अतिक्रमण झाले आहे हे सत्य आहे. त्यासाठीच शासनाने हा कार्यक्रम आपल्या हातामध्ये घेतला आहे. ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर आणि पुणे येथे विभागीय कार्यालये स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मौलाना आझाद विकास महामंडळामार्फत 201 कोटी रूपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. 50797 लाभार्थींना हे कर्ज वाटप करण्यात आले आहे. या महामंडळामार्फत शिक्षणासाठी प्राधान्याने कर्ज देण्यात येत आहे. शासकीय सेवेमध्ये देखील अल्पसंख्याक असावेत म्हणून पोलीस दलात प्री रिक्रूटमेंट ट्रेनिंग देण्यात येते आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

अल्पसंख्यांक समाजातील लोकांना मराठी भाषेचा वापर करता यावा यासाठी सर्व शाळांमध्ये खास मराठी भाषा फाऊंडेशन कोर्स देखील घेण्यात येतो. युपीएससी च्या परीक्षेमध्ये जास्त प्रमाणात अल्पसंख्यांकांना संधी मिळावी आणि ते यामध्ये यशस्वी व्हावेत यासाठी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना सुरु केली आहे. मुंबई, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद आणि यशदा पुणे येथे सेंटर्स् सुरु करण्यात आलेली आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी अल्पसंख्यांक आयोगाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता की, अल्पसंख्यांक महिलांसाठी कोणतेही धोरण आखण्यात आलेले नाही. याबाबतीत मी सन्माननीय सदस्य डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छिते की, या विषयाबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे की, अल्पसंख्यांक आयोगामध्ये कमीतकमी तीन महिला सदस्य असावेत आणि अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष या पदावर महिला असावी. तसेच उर्वरित दोन सदस्य देखील महिला असाव्यात अशा प्रकारचे धोरण स्वीकारण्यात आलेले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अल्पसंख्यांक आयोगामध्ये महिला सदस्यांच्या जागा किती वर्षापासून रिक्त आहेत ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, अल्पसंख्यांक आयोगामध्ये महिला सदस्यांची नियुक्ती लगेच करण्यात येणार असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. पण मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छिते की, अल्पसंख्यांक आयोगाच्या माध्यमातून महिलांसाठी स्वयं-सहाय्यता बचत गट आणि महिलांना स्वावलंबी करण्यासाठी वेल्फेअर कार्यक्रम या स्वरुपाची योजना आखण्यात येते. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, आता योजनांची सुरुवात केलेली आहे. एकदा एका कार्यक्रमामध्ये तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख साहेबांनी एक चांगली उपाधी दिली होती की, हिमालयामधून गंगेचा उगम होत असताना ती लहान असते. पण जसजशी गंगा पुढे वाहत जाते तसतशी ती मोठी होत जाते. त्या प्रमाणेच आज अल्पसंख्यांक विभाग नवीन आहे, लहान मुलासारखा आहे. परंतु गंगेप्रमाणे या विभागाला शक्ती देण्याची शासनाची भूमिका आहे एवढेच मी येथे सांगू इच्छिते.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदमजी यांनी एक मुद्दा उपस्थित केला आहे. मंत्रालयातील सातव्या मजल्यावर नमाज पढण्यासाठी सुविधा निर्माण करण्यात



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

आलेली आहे असे त्यांनी सांगितले.परंतु याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की,त्या ठिकाणी अशा प्रकारची कोणतीही सुविधा उपलब्ध करण्यात आलेली नाही. कोणीही कुठेही नमाज पढू शकते. ही एक धार्मिक बाब आहे आणि त्यासाठी जागेची आवश्यकता नसते. पण मंत्रालयामध्ये यासाठी कोणतीही सुविधा निर्माण करण्यात आलेली नाही हे मला स्पष्ट करावयाचे आहे. यामुळे सदरहू विधेयकामध्ये ज्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत त्या मंजूर कराव्यात अशी मी सर्व सभागृहाला विनंती करते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश : विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक - 14 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक - 14 संमत झाले आहे.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी.** : (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावात बदल करणे) विधेयक.

L.A. BILL NO. LIV OF 2011

( A BILL TO AMEND CERTAIN ENACTMENTS TO CHANGE THEIR SHORT TITLES FROM "BOMBAY ACTS" TO "MAHARASHTRA ACTS".)

( चर्चा पुढे चालू )

**सभापती** : सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 54 या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरु आहे. चर्चे दरम्यान माननीय विरोधी पक्ष नेते व शिवसेनेचे गटनेते श्री. दिवाकर रावते व इतर सन्माननीय सदस्यांनी या बिलामध्ये काही किरकोळ दुरुस्ती असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्या अनुषंगाने मी माननीय गृहमंत्री, माननीय गृह राज्यमंत्री, विरोधी पक्ष नेते व गटनेते त्याचप्रमाणे विधी व न्याय विभागाचे विधी अधिकारी व या सचिवालयाचे प्रधान सचिव यांच्याबरोबर चर्चा केल्यानंतर माझे सुध्दा तेच मत झाले आहे. त्या अनुषंगाने विधान परिषद नियम 134 मध्ये मला जे अधिकार प्राप्त होत आहेत म्हणजेच उघड उघड असलेल्या चुका दुरुस्त करण्याचा आणि संमत झालेल्या विधेयकात परिणामस्वरुप फेरफार करण्याचा अधिकार, त्यानुसार मी या विधेयकात पुढील प्रमाणे दुरुस्ती करीत आहे.

(1) इंग्रजी शीर्षकात दुसऱ्या ओळीत "BOMBAY ACTS" ऐवजी "मुंबई ॲक्ट" असे वाचावे.

(2) विधेयकाच्या उद्देश व कारणे याचे निवेदनामध्ये दुसऱ्या ओळीत "या अन्वये नवीन गुजरात" या ऐवजी "या अन्वये महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली." अशी दुरुस्ती करण्यात यावी व त्यापुढील मजकूर म्हणजे "आणि उर्वरित मुंबई राज्य हे महाराष्ट्र राज्य या नावाने पुढे कायम राहिले" हे वगळण्यात यावे.

मी माझा निर्णय दिलेला आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी बिलावर उत्तराचे उर्वरित भाषण करावे.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्णयाचा आम्ही सन्मान करतो. या बिलावर मी बाकीचे उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दुसरे जे मुद्दे उपस्थित केले त्यामध्ये बाकीच्या संस्थांमध्ये सुध्दा अशा पध्दतीचा पाठपुरावा करुन त्या ठिकाणी सुध्दा मुंबई शब्द वापरण्यात यावा अशा पध्दतीची जी सूचना केलेली आहे त्याची अंमलबजावणी करण्याचे मी आश्वासन देते. सभागृहाने सर्वसंमतीने हे विधेयक मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल्.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित), अनुसूची विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 54 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 54 संमत झाले आहे.

---

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु.शी.**: राज्यातील रुग्णालयात नर्सेसची कमतरता भासणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

राज्यात असलेल्या रुग्णालयांमध्ये रुग्ण सेवेकरिता 1 लाख नर्सेसची गरज असतानाही राज्यात फक्त 24 हजार नर्सेसच असणे, या सर्वांमुळे रुग्ण सेवेवर हॉस्पिटलमध्ये परिणाम होणे, राज्यात मोठ्या प्रमाणात नर्सेसची मागणी होत असणे, हॉस्पिटलमध्ये नर्सेसची कमतरता पडू नये यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आपण मुंबईतील कोणत्याही हॉस्पिटलमध्ये गेल्यावर तेथील मोठ्या वॉर्डमध्ये 1 किंवा 2 नर्सेस काम करीत असल्याचे दिसून येते. हा प्रश्न महत्वाचा असल्यामुळे नर्सेसच्या जागा भरण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्यामुळे मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी. / मु.शी.** :मिरज-पंढरपूर रस्त्यावर मगदूम मळा परिसरातील पोल्ट्री फॉर्ममुळे नागरिकांचे धोक्यात आलेले आरोग्य याबाबत श्री.दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मिरज-पंढरपूर रस्त्यावर मिरज हद्दीतील मगदूम मळा परिसरातील, (ता.मिरज, जिल्हा सांगली) मगदूम यांच्या पोल्ट्री फार्मतील मेलेल्या कोंबड्याची पिसे, अवयव आणि मांसाचे तुकडे रस्त्यावर टाकण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली असते. त्यामुळे मी स्वत: त्या परिसराला भेट दिली आहे. त्या कोंबड्याच्या खुराड्याकडे उभे राहिले तरी असह्य होते. त्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढलेला असतो. त्या पोल्ट्रीतील कोंबड्याच्या विष्टा व इतर अवयवामुळे या सर्व परिसरात डासांचा प्रादूर्भाव होत असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. साधे जेवावयास बसलो तरी किमान 100 माशा ताटात येऊन पडतात, अशी तेथील गंभीर परिस्थिती आहे. या त्रासामुळे प्रत्येक कुटुंबातील एक माणूस तरी दवाखान्यात जातो. हे मी स्वत: जाऊन पाहिलेले आहे. तेथील नागरिकांच्या आरोग्याची परिस्थिती गंभीर आहे.

या संदर्भात सतत व सातत्याने तक्रारी करुनही महानगरपालिकेकडून ठोस कारवाई केली जात नाही. तक्रारीनंतर फवारणी केली जाते. पण काही तासानंतर तेथे पुन्हा दुर्गंधी पसरते. त्या भागात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्यामुळे लहान मुलांना खेळणे मुश्कील झाले आहे. ते कुत्रे केव्हाही मुलांना चावा घेतील अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून त्या भागातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला आहे. या पोल्ट्री फार्ममुळे हजारो कुटुंबाच्या आरोग्याबाबत प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून हा पोल्ट्री फार्म तातडीने दुसरीकडे हलविण्यात यावा यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

-------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी. / मु.शी.** : 2011 मधील गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांवरील खटले मागे घेण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, या वर्षाचा गणेशोत्सव सप्टेंबर महिन्यामध्ये सुरु होणार आहे. 2011 च्या गणेशोत्सवाच्या काळात ढोल ताशे व बैलगाडीतून कसबा पेठ गणपतीसमोर नगारे वाजवून मिरवणूक काढण्यात आली होती. अशा प्रकारच्या मिरवणुका काढल्यामुळे पुणे शहर पोलिसांनी काही मंडळाच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल केले होते. नागपूरच्या अधिवेशनात दि.21.12.2011 रोजी हा विषय उपस्थित केला असता या पदाधिकाऱ्यांच्या केसेस मागे घेण्यात येतील किंवा सहानुभूतिपूर्वक विचार केला जाईल असे माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी आश्वासन दिले होते. या वर्षाच्या गणेशोत्सवाची तयारी सुरु झाली आहे. कसबा गणेशोत्सव मंडळात आय.टी.सेक्टरमध्ये शिक्षण घेणारी मुले आहेत किंवा उच्च विद्याविभूषित पदाधिकारी आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:50

डॉ. नीलम गो-हे....

त्यांच्यावरील खटले मागे घेण्याच्या संदर्भात अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे त्यांच्यामध्ये नैराश्य पसरलेले आहे. विशेष म्हणजे गणेश विसर्जनाच्या मिरवणुका वेगवेगळया दिवशी काढाव्यात अशी सूचना स्थानिक पोलिसांनी केलेली आहे. या पार्श्वभूमीवर अशांतता निर्माण होऊ नये, सामंजस्याच्या माध्यमातून गणेशोत्सव पार पडावा म्हणून सन्माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिल्या प्रमाणे गेल्या वर्षीचे खटले मागे घ्यावेत अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : महाविद्यालयामध्ये अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु करावयाची पुस्तकपेढी योजना याबाबत डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठामध्ये असलेल्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक पेढी योजनेपासून वंचित रहावे लागत आहे. ही योजना विद्यार्थी कल्याण विभागाकडून राबविण्यात येते. विद्यापीठाच्या सर्व शाखातील आणि विद्यापीठाच्या सर्व अनुदानित व विनाअनुदानित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सर्व विषयांची पुस्तके पुरविली जावीत असा या योजनेमागील उद्देश आहे. सदर योजनेसाठी प्रत्येक महाविद्यालयाला पुस्तक पेढी सुरु करण्यासाठी लाखो रुपयांचा निधी दिला जातो. परंतु ब-याचशा महाविद्यालयाकडून सदर योजनेची माहिती अथवा पुस्तके विद्यार्थ्यांना दिली जात नाही. मागील शैक्षणिक वर्षात एकंदर 650 महाविद्यालयांपैकी केवळ 159 महाविद्यालयांनी ही योजना राबविली आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुस्तके पुरविणे ही संबंधित महाविद्यालयांची जबाबदारी आहे. परंतु सदर योजना राबविण्यामध्ये मुंबई विद्यापीठाची तसेच संबंधित महाविद्यालयाची अनास्था कारणीभूत आहे.

मुंबई विद्यापीठाने त्यांच्या अखत्यारित येणा-या सर्व महाविद्यालयांना पुस्तक पेढी सुरु करण्याचे आदेश द्यावेत. हे शैक्षणिक वर्ष आता सुरु होत आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पुस्तक पेढी योजना कार्यान्वित करुन पुस्तकासाठी खर्च केलेला लाखो रुपयांचा निधी कामी यावा, यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:50

**पृ. शी./मु. शी.** : चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवस्थापक व अध्यक्ष यांनी केलेला गैरव्यवहार याबाबत श्री.मितेश भांगडिया,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मितेश भांगडिया :(वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दिनांक 13 मार्च 2012 रोजीच्या कर्ज समितीच्या टिपणीमध्ये 35 लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्याबाबतच्या प्रकरणात बँकेच्या कर्ज समितीमधील उपाध्यक्ष, सचिव व कर्ज समितीतील सदस्यांची फसवणूक करुन बँकेचे सरव्यवस्थापक व अध्यक्ष यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे, या प्रकरणी कारवाई करण्याबाबत बँकेचे संचालक श्री. पांडुरंग जाधव यांनी दिनांक 22 जून 2012 रोजी बँकेच्या अध्यक्षांकडे लेखी तक्रार अर्जाद्वारे मागणी केली असता या प्रकरणाची विभागीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी व पाहणी करुन कर्ज प्रकरण सादर केलेले नसल्याचे तसेच उप व्यवस्थापकपदी असलेले श्री. बरबटकर यांनी टिपणीचे शेवटचे पान बदलून मंजुरी प्रदान केल्याचे दिसून येते असे चौकशी अहवालात नमूद केले असणे, कर्ज समितीच्या बैठकीत 27 व्यक्तींना कर्ज मंजूर केले असल्याच्या मूळ टिपणीवर श्री. अनिल मोरे या अधिका-याची सही असून जी बोगस कर्ज मंजुरीची टिपणी आहे त्यावरील शेवटच्या पानावर असलेल्या अनुक्रमांक 28 वर श्री. सुधाकर दामोदर बोरकर यांना 35 लाख रुपयांचे कर्ज मंजूर केलेले दाखवून त्यावरील अधिका-यांच्या सहीत बदल केलेला असणे, या बोगस टिपणीवर बँकेच्या अध्यक्षांची सही असल्यामुळे तेही या गैरव्यवहारास जबाबदार असणे, या गैरव्यवहार प्रकरणास जबाबदार असल्यामुळे बँकेचे उपव्यवस्थापक श्री. आर.एस.बर्डे यांच्यावर दिनांक 7 जुलै 2012 रोजीच्या पत्रान्वये निलंबनाचे आदेश बजावण्यात येणे, तरी बँकेच्या कर्ज प्रकरणातील मूळ दस्तावेजात फेरबदल करणा-या सर्व संबंधित अधिका-यांवर त्वरित पोलीस स्थानकात गुन्हे दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे."

--

...नंतर श्री. अजित..

**पृ.शी./मु.शी.**: वीज वितरण कंपनी इतर आकाराच्या नावाखाली ग्राहकांची लूट करीत असणे या बाबत डॉ.रणजित पाटील, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यात विशेषत: विदर्भात अमरावती, अकोला,यवतमाळ, बुलढाणा, वाशिम जिल्ह्यात भारनियमन कमी करण्याचा शासनाने निर्णय घेतला. अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम जिल्ह्यातील वीज ग्राहकांना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने बिलात स्थिर आकार, वीज आकार, वीज शुल्क, इंधन समायोजन, वीज विक्रीकर, इतर आकार व्याज, इत्यादी शुल्क लावले आहे. युनिट प्रमाणे बिलाची रक्कम दिल्यानंतरही इतर आकाराच्या व वीज शुल्काच्या नावावर ग्राहकाची लूट सुरु आहे. या प्रकारामुळे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला करोडो रुपयांचा फायदा होत आहे तर ग्राहकांचा खिसा रिकामा होत आहे. तेव्हा कंपनीने इतर आकार शुल्क घेणे बंद करुन शासनाने ग्राहकांना न्याय द्यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

------

..2..

**पृ.शी./मु.शी.**: अपंग कल्याण आयुक्तालयात कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे अपंगांसाठी असलेल्या योजनांवर होत असलेला परिणाम या बाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

अंध, अस्थिव्यंग, मुकबधिर, मतिमंद यांच्यकरिता कल्याणकारी योजना राबविणारे अपंग कल्याण आयुक्तालय कर्मचाऱ्यांअभावी अपंग बनले आहे. पुणे मुख्यालया समवेत विभागीय व जिल्हास्तरावरील 990 अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव दीड वर्षापासून मंत्रालयात धूळ खात पडून आहे. परिणामी राज्यातील अपंग व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना अत्यंत किरकोळ कामांकरिता देखील पुणे आयुक्तालयात खेटे मारावे लागत आहे. राज्यातील 16 लाखांपेक्षा अधिक असलेल्या अपंग स्त्री-पुरुषांच्या शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमावर त्याचा परिणाम होत आहे. अपंगाच्या तक्रारीच्या निवारणाचे काम विभागीय पातळीवर समाजकल्याण अधिकारी पाहत आहेत. पूर्वी हे काम वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता व सहायक सल्लागार पहात होते. अपंगांच्या योजना जिल्हापरिषदेकडे वर्ग करते वेळी ही पदेच रद्द करण्यात आली. परिणामी अपंगांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सक्षम अधिकारी नाही. तक्रारीची वाढती संख्या लक्षात घेता राज्यातील जनतेत शासना विषयी असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. तेव्हा अपंग कल्याण आयुक्तालयाच्या बळकटीच्या प्रस्तावास शासनाने तातडीने मान्यता द्यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

------

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी देखील विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझ्याकडे एकूण 34 विशेष उल्लेखाच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सूचना आल्या की यातील सात-आठ विशेष उल्लेखाच्या सूचना आपण निवडतो आणि त्या येथे मांडण्यात येतात. आपली सूचना कदाचित त्यामध्ये आली नसेल.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: बीपीएल व अेपीएलधारकांना पिवळी शिधापत्रिका न मिळणे या बाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सन 2005-2006 मध्ये राज्यात विशेषत चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात बीपीएलधारकांची यादी तयार झाली. सदर यादीतील लाभधारकांना बीपीएल व अंत्योदय योजनेंतर्गत पिवळी शिधापत्रिका मिळालेली नाही. त्यामुळे बीपीएल यादीत नावे असूनही त्यांना रेशन दुकानावरील स्वस्त धान्य मिळण्यापासून वंचित रहावे लागत आहे. राज्यात रेशन व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती वाधवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशी नुसार बीपीएल व अंत्योदय योजनेतील कार्डधारकांना अतिरिक्त धान्य वाढविण्याचे आदेश देऊनही अद्यापही त्याबाबत कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे खरे लाभार्थी योजनेपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील गरीब कुटुंबामध्ये असंतोष पसरलेला आहे. तेव्हा 2005-2006 मधील यादीतील लाभार्थ्यांना पिवळी शिधापत्रिका लवकरात लवकर देण्यात याव्यात अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: बनावट फवारणी औषधांमुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे झालेले नुकसान या बाबत श्री.दीपक साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दीपक साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

कामती बु.ता.मोहोळ, जिल्हा सोलापूर येथील प्रगतशील शेतकरी श्री.रामराव केरबा भोसले व अन्य तिघांनी मिळून एप्रिल 2012 मध्ये छाटणीनंतर द्राक्षबागेवर केलेल्या औषध फवारणीमुळे द्राक्षवेलींवर गंभीर परिणाम होऊन त्यांच्या बागांचे सुमारे 2 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. सदर प्रकरणी शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली असता जिल्हा कृषी अधीक्षकांनी सदरील औषधाचे नमुने पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविले. तालुका कृषी अधिकारी, पंचायत समितीचे कृषी अधिकारी, राहुरी कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, कीटक शास्त्रज्ञ आणि मुंबई येथील ओबरॉन औषध कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सदर बागेची पाहणी करुन पंचनामा केलेला आहे. सोलापूर जिल्ह्यात अशा घटना सातत्याने घडत असून त्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यांचे नाहक लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. तेव्हा शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन फवारणी औषधामुळे ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना आर्थिक मदत करावी. तसेच यापुढे अशा घटना घडू नयेत म्हणून शासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

-----

यानतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची वेळ संपत आलेली आहे, अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा व त्यावरील उत्तर उद्या घेण्याचे ठरविले आहे. आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दोन अल्पकालीन चर्चा दाखविण्यात आलेल्या आहेत. पहिली अल्पकालीन चर्चा सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांची असून दुसरी अल्पकालीन चर्चा सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांची आहे. प्रत्येक अल्पकालीन चर्चेस उत्तरासह 45 मिनिटांचा वेळ देण्याचे मी ठरविलेले आहे. तेवढया वेळेत ही चर्चा पूर्ण झाली नाही तर ती चर्चा अपूर्ण राहील आणि जे सन्माननीय सदस्य या चर्चेच्या अनुषंगाने बोलत असतील ते ऑन लेग राहतील. अशा पध्दतीने दोन्ही अल्पकालीन चर्चा आपल्याला आजच पूर्ण करावयाच्या आहेत. या दोन्ही अल्पकालीन चर्चा पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे. आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चा होणार नाहीत याची देखील सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

आता सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्या अल्पकालीन चर्चेस सुरुवात करावयाची होती, परंतु संबंधित सन्माननीय मंत्री उपस्थित सभागृहात नाहीत. त्यांना उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना देतो. ते सभागृहात उपस्थित होईपर्यंत दुस-या अल्पकालीन चर्चेस सुरुवात करावी.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये मी 10 लक्षवेधी सूचना दिल्या होत्या. मागच्या अधिवेशनामध्ये देखील मी 10 लक्षवेधी सूचना दिल्या होत्या. नागपूर येथील अधिवेशनामध्ये देखील मी 10 लक्षवेधी सूचना दिल्या होत्या. सभापती महोदय, माझ्या कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळासह मी आपणास भेटून विनंती केली होती. त्यानंतर आम्ही विधिमंडळाच्या प्रधान सचिवांना भेटलो होतो. गेल्या तीन अधिवेशनात माझी एकही लक्षवेधी सूचना लागली नाही. दलित समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या बाबतीतल्या लक्षवेधी सूचना आहेत. हे व्यासपीठ महाराष्ट्राचे सर्वोच्च न्यायालय आहे. या न्यायालयासमोर दलितांच्या व्यथा मांडल्या जाव्यात, त्यांच्या संवेदना समजल्या पाहिजेत म्हणून मी लक्षवेधी सूचना दिलेल्या आहेत. परंतु दुर्दैवाने माझी एकही लक्षवेधी लागत नाही. जे नवीन सभासद आहेत, त्यांच्या लक्षवेधी सूचना लागतात. एकाच सदस्यांच्या एकाच दिवशी दोन,दोन लक्षवेधी सूचना लागतात. हा माझ्यावर आणि माझ्या समाजावर होणारा अन्याय आहे असे मला वाटते. हे अधिवेशन उद्या संपत आहे. किमान पुढील अधिवेशनात तरी माझ्या लक्षवेधी सूचना लागल्या पाहिजेत, अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी अतिशय पोटतिडिकीने भावना मांडली आहे. त्यांनी काही लक्षवेधी सूचना दिलेल्या आहेत. मधल्या काळात ते मला भेटले होते. तसेच ते अधिकाऱ्यांना सुध्दा भेटले होते. मला वाटते की, त्यांच्या काही लक्षवेधी सूचना मंजूर झालेल्या असतील. परंतु दररोजच्या कामकाजात ज्या लक्षवेधी सूचना येतात, त्यात कदाचित त्यांची लक्षवेधी सूचना आली नसेल. आपणाला सुध्दा अशा प्रकारची संधी मिळेल. या बाबतीत जरुर काळजी घेण्यात येईल. नवीन सभासद या सभागृहात आल्यानंतर त्यांना योग्य पध्दतीने सभागृहातील कामकाजात भाग घेता यावा म्हणून त्यांना प्राधान्य देतो. आपल्याकडे सुध्दा माझे लक्ष राहील व पुढच्या वेळी निश्चितपणे तुमच्या लक्षवेधी सूचनांना मी प्राधान्य देईन.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

श्रीमती विद्या चव्हाण यांच्या अल्पकालीन चर्चेशी संबंधित मंत्री सभागृहात नाहीत. त्यांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. ते सभागृहात उपस्थित होईपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांच्या अल्पकालीन चर्चेस सुरुवात करु. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी आपल्या अल्पकालीन चर्चेस सुरुवात करावी. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांची अल्पकालीन चर्चा नंतर घेण्यात येईल.

--------

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पीक आणेवारी काढण्याच्या पध्दतीत बदल करणे.

**मु.शी.**: पीक आणेवारी काढण्याच्या पध्दतीत बदल करणे याविषयावर श्री. पाशा पटेल, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसाठी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 45 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

" राज्यात ब्रिटीश काळापासून चालू असलेली पीक आणेवारी काढण्याची पध्दत बदलण्याची आवश्यकता,त्यासाठी समिती गठीत करुन त्या समितीच्या सर्व सदस्यांनी पूर्ण शिवार फिरुन पीक आणेवारी काढणे व दरवर्षी 15 ऑक्टोबर पर्यत जाहीर करणे, ही आणेवारी काढतांना जमिनीचे तीन विभाग पाडून त्यात विविध 12 पिके कापून प्रयोग करण्यात येणे, 10 10 चे प्लॉट तयार करुन त्यातील मिळणारे उत्पन्न प्रति हेक्टर ठरविणे, प्लॉट निहाय महसूल विभाग, कृषि विभाग व पंचायत समिती असे तीन विभाग करणे, सद्य:स्थितीत शासनाकडून अशी कोणत्याही प्रकाराची उपाययोजना करण्यात येत नसल्याने प्रमाण उत्पन्न कमी येते, परंतु आणेवारीचे प्रमाण जास्त दाखविले जाते, या चुकीच्या धोरणामुळे शेतक-यांवर येत असलेले आर्थिक संकट व शासनाच्या विविध सवलती व लाभापासून वंचित राहण्याची त्यांच्यावर वेळ येणे, याबाबत शेतक-यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, पीक आणेवारी पध्दत बदल करण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना, त्यावर शासनाची प्रतिक्रिया

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा करण्याची संधी मला माननीय सभापतींनी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. पीक पैसेवारी ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने सर्वात महत्वाची अशी बाब आहे. दुष्काळ पडला आणि शेतकऱ्याला मदत द्यावयाची झाली तर पीक पैसेवारीवर मदत ठरविली जाते. या मदतीसाठी सगळयात मोठा निकष पैसेवारीचा असतो. पैसेवारीशिवाय काहीही देता येणार नाही हे सूर्यप्रकाशइतके स्वच्छ आहे. त्यामुळे पैसेवारी नेमकी कशासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

काढली जाते याचा विचार करणे गरजेचे आहे. पैसेवारी काढण्यासाठी विचार चालू नव्हता असे नाही. अनेक वेळा यावर विचार झालेला आहे. 1962 साली व्ही.एम.जोशी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने यावर विचार केला होता. 1971 साली दांडेकर समितीने यावर विचार केला होता. 1976 साली डी.डी.साठे समितीने यावर विचार केला होता. यापूर्वी सुध्दा यावर विचार झाला होता. 1884मध्ये, 1927 मध्ये आणि 1944 मध्ये वेळोवेळी यासंदर्भात चर्चा झालेली आहे. सगळयात महत्वाचे म्हणजे इंग्रजाच्या काळात देखील ही पध्दत अस्तित्वात होती. इंग्रजांच्या काळातील पध्दतीचा विचार केला तर ती पध्दत खरोखरच आताच्या पध्दतीपेक्षा चांगली होती असे म्हणण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, पैसेवारीची पध्दत म्हणजे काय हे जर सोप्या भाषेत सांगावयाचे झाले तर पुढीलप्रमाणे सांगता येईल. दरवर्षी प्रत्येक गावातील पीक परिस्थिती कशी आहे हे शासनाने समजून घेणे आवश्यक असते. विशिष्ट हंगामातील गावातील प्रमुख पिकाचे दर हेक्टरी उत्पन्न किती आहे याचा तुलना समाधानकारक हंगामात येणा-या प्रमुख प्रकारच्या पिकांच्या उत्पन्नाशी किंवा विशिष्ट पध्दतीने निर्धारित केलेल्या प्रमाण पिकाशी केल्यास पीक परिस्थिती कशी आहे हे समजून येते आणि त्या आधारे शेतक-याला शासनाकडून द्यावयाचे सहाय्य निश्चित करता येते. यासाठी समाधानकारक हंगामात प्रमुख पिकाचे उत्पन्न किती किंवा विशिष्ट हंगामातील उत्पन्नाची तुलना करण्याकरिता कोणकोणत्या प्रमाणात उत्पन्न घ्यावयाचे हे प्रथम ठरविले पाहिजे. अर्थात आधारभूत किंमत धरण्यासाठी उत्पन्नाचे प्रमाण ठरविण्याची पध्दत वेळोवेळी बदलत गेली.एकूण टक्केवारी म्हणजे पीक परिस्थिती दाखविणारा निर्देश याला आणेवारी किंवा पैसेवारी पध्दत म्हणतात.

सभापती महोदय, पैसेवारीची गरज का पडली याचा विचार करणे आवश्यक आहे.
शेतक-याला शेतमालाच्या उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही म्हणून शेतकरी हा कायम कर्जामध्ये राहतो.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**नंतर श्री.भोगले**

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल......

शेतकरी हा देशाचा आर्थिक कणा आहे. त्याच्याशिवाय गाडे चालणे शक्य नाही. शेतकऱ्यांना उत्पादन खर्च भरुन निघणे शक्य होत नाही. तो अडचणीत आल्यानंतर त्याला मदत मिळाली पाहिजे म्हणून ही आणेवारीची पध्दत अंमलात आली.

सभापती महोदय, उत्पादन खर्चाबाबत मागील काळात काय घडले याचे मी पुरावे देणार आहे. 1985 साली विविध पिकांचे उत्पादन खर्च निश्चित केले गेले. कापूस पिकाचा प्रती क्विंटल सरकारी उत्पादन खर्च 763.37 रुपये होता आणि बाजारामध्ये प्रती क्विंटल विक्रीचा दर 563 रुपये होता. एच.4 जातीच्या कापूस पिकाचा प्रती क्विंटल सरकारी उत्पादन खर्च 733.55 रुपये आणि बाजारात विक्रीचा दर प्रती क्विंटल 602 रुपये होता. बाजरी प्रती क्विंटल उत्पादन खर्च 340.37 रुपये आणि बाजारातील विक्रीचा दर 210 रुपये होता. म्हणजे उत्पादन खर्च हा शेतकऱ्याच्या दृष्टीने तोट्याचा होता. 1985 साली उत्पादन खर्च किती होता हे मी सांगितले. या वर्षीची परिस्थिती काय आहे? या वर्षी केंद्रीय कृषी मूल्य आयोगाला ज्वारीच्या पिकाबाबत गेल्या वर्षीपेक्षा 53 टक्के भाववाढ करावीशी वाटली. माननीय श्री.शरद पवार हे केंद्रीय कृषी मंत्री आहेत. त्यांच्या मंत्रालयाला मागील वर्षीपेक्षा या वर्षी ज्वारीच्या पिकाबाबत 53 टक्के भाववाढ सुचवावी लागली. गेल्या वर्षी ज्वारीला 980 रुपये भाव मिळाला होता आणि या वर्षी तो 1500 रुपये करण्यात आला आहे. 1985 मध्ये शेतकऱ्याची जी परिस्थिती होती ती आणि आजची परिस्थिती यामध्ये काहीही फरक पडलेला नाही. असे असताना केंद्र सरकारला गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी 53 टक्के भाववाढ करावी लागली. याचे कारण शेतकऱ्यांना उत्पन्न कमी मिळते हे सरकारला मान्य झाले आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च भरुन निघत नाही याचा केंद्र सरकारला साक्षात्कार झाला. शेतकरी कर्जामध्ये दबला जात आहे हे सूर्य प्रकाशाइतके स्वच्छ आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे 'आधुनिक किसान' या मासिकाचा जुलै महिन्याचा अंक आहे. त्यामध्ये काय नमूद केले आहे? "राज्यातील सहा जिल्हा बँकांचे दिवाळे वाजल्याने या राज्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांमार्फत पीक कर्जाचे वाटप झालेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी घरातील लक्ष्मीच्या अंगावरील दागिने मोडले, गहाण ठेवले, काहींनी घरातील कडी कुलुपे विकली. ज्यांच्याकडे अशा वस्तू नव्हत्या त्यांनी जमिनी सावकाराकडे गहाण ठेवल्या. पीक कर्ज वाटप सुरु असलेल्या उर्वरित 27 जिल्हयातील परिस्थिती आलबेल नाही."

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.........

सभापती महोदय, 27 जिल्हयातील परिस्थिती सुध्दा फार भयानक आहे. नगर जिल्हयात घडलेली घटना मी सांगू इच्छितो. शेतकऱ्याला पीक कर्जासाठी बँकेकडे जावे लागले. अहमदनगर शहरातील स्टेट बँकेच्या शाखेत सकाळी 11.00 वाजता ग्राहकांची झुंबड होती. काऊंटरवर कमी कर्मचाऱ्यांमुळे ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या होत्या.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल ......

एका शेतकऱ्यासह साप्ताहिक आधुनिक किसानच्या प्रतिनिधीने कृषी कर्ज विभागाच्या कर्मचाऱ्याची भेट घेतली. तेव्हा त्यांनी त्या कर्मचाऱ्याला सांगितले की, आम्हाला कोणतेही पीक कर्जाचे वाटप झालेले नाही. जिल्हा सहकारी बँक बुडाली, राष्ट्रीयकृत बँकेत आल्यानंतर मात्र तो कर्मचारी मस्तीतच त्याला म्हणाला की अशा कोणत्याही लोकांना आम्ही पीक कर्ज देत नाही. ऐपत नसलेल्यांना कर्ज नाही तर मोठ्या शेतकऱ्यांनाच फक्त कर्ज देतो असे त्या राष्ट्रीयकृत बँकेच्या कर्मचाऱ्याने सांगितले. त्यानंतर बँकेच्या व्यवस्थापकाची दोन तास वाट पाहिल्यानंतर त्यांनी भेट देण्याचे ठरविले पण त्यावेळेस इतर व्यापारी ग्राहकांचा या व्यवस्थापकाच्या केबिनमध्ये जोरात राबता सुरु होता. या शेतकऱ्यासोबत आम्ही बँक ऑफ इंडियाच्या आनंद धाम येथील शाखेत गेल्यानंतर तेथील कर्मचाऱ्याने 3 टक्के कमिशनसह कर्ज मंजूर करण्याचे आश्वासन दिले, अशी आज शेतकऱ्याची परिस्थिती आहे.

महोदय, शेतकऱ्याला पीक कर्ज किती मिळते हे सांगितले तर मोठे आश्चर्यच आहे. ज्या प्रमाणात शेतकऱ्याला आवश्यक असते तेवढे तर ते मिळतच नाही पण ज्या प्रमाणात पिकाचा उत्पादन खर्च येतो त्या खर्चाचा विचार करुन सुध्दा पीक कर्ज दिले जात नाही. पिकाचा उत्पादन खर्च पाहिला तर तुरीच्या पिकाला 14 हजार रुपये उत्पादन खर्च येतो आणि पीक कर्ज मात्र 7 हजार एवढेच मिळते, सोयाबीनसाठी 10600 रुपये आणि पीक कर्ज फक्त 930 रुपये, संत्र्यासाठी 20 हजार रुपये आणि पीक कर्ज 16 हजार रुपये, उडीद पिकासाठी 10300 रुपये आणि पीक कर्ज मात्र फक्त 930 रुपये, कांदा पिकाला 58500 रुपये आणि पीक कर्ज 1800 रुपये, कापसाला 3800 रुपये आणि पीक कर्ज 1000 रुपये अशा प्रकारे हे कर्ज मिळते. या सर्व गोष्टी पाहिल्या तर शेतकऱ्याला बँकांची साथ नाही, निसर्गाची साथ नाही. एवढेच नव्हे तर सरकारची व सरकारच्या धोरणांची सुध्दा साथ मिळत नाही.

महोदय, पीक पैसेवारीच्या बाबतीत सरकारचे धोरण पाहिले तर त्यात अशी मजा आहे की, या पीक पैसेवारीसाठी वेगवेगळ्या समित्या नेमल्या आहेत. त्यात गाव समित्यांचा समावेश आहे. त्यानुसार गावातील 12 विभागांमध्ये पीक कापणीचा प्रयोग केला जातो आणि त्याचा रिझल्ट आल्यानंतर पीक पैसेवारी निश्चित करण्यात येते. अशा प्रकारे मी कमीत कमी 10-20

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .........

तलाठ्यांना फोन केला आणि विचारले की, तलाठी साहेब, आपण या गावात किती वर्षापासून काम करीत आहात, तेव्हा तलाठी महोदयांनी सांगितले की, 20 वर्षांपासून मी याच गावात आहे आणि आमदार साहेब आपलेच असल्याने आपल्याला कोण बदलविणार आहे ? मी त्या तलाठ्याला विचारले की, आपल्या गावात पीक कापणीचे प्रयोग किती वेळा झाले, त्यावर तलाठी महाशय म्हणाले की, साहेब पीक कापणीचा प्रयोग कधी होतो काय ? अशा प्रकारे मला 90 टक्के तलाठ्यांनी सांगितले की, असले पीक कापणीचे प्रयोग होतच नाहीत. पण आपल्याच पक्षाचे अहमदपूरचे आमदार माझे मित्र आहेत. मी त्यांनाच तलाठ्याशी बोलायची विनंती केली. त्यांनी तलाठ्याला विचारले की, पीक कापणीचे प्रयोग किती झाले, त्यावर तलाठी म्हणाला की 14 वर्षांपासून मी येथे काम करीत आहे, या काळात फक्त तीनच वेळा पीक कापणीचा प्रयोग झाला.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .....

मी सगळया तलाठयांना प्रश्न विचारला की, पीक कापणीच्या प्रयोगाशिवाय पीक पैसेवारी जाहीर करता येत नाही व तुमच्याकडून आलेल्या रिपोर्टशिवाय म्हणजे गावातील पीक कापणीच्या प्रयोगाच्या आकडेवारी शिवाय तहसीलदाराला निर्णय घेता येत नाही, तहसीलदाराला कळाल्याशिवाय डेप्युटी कलेक्टरला निर्णय घेता येत नाही, डेप्युटी कलेक्टरला कळल्याशिवाय कलेक्टरला निर्णय घेता येत नाही, कलेक्टरला कळल्याशिवाय विभागीय आयुक्तांना निर्णय घेता येत नाही, विभागीय आयुक्तांना कळाल्याशिवाय ती माहिती मुंबईला कळत नाही, व मुंबईला माहिती आल्याशिवाय मंत्र्यांना निर्णय घेता येत नाही. कापणीचे प्रयोग न करताही त्याची माहिती शासनाला कशी काय कळते ? तुमच्या ऑफिसमध्ये आल्यावर मात्र कॉम्प्युटरवर नुसते टीक् टीक केली की, सर्व माहिती आपोआप येते.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, या विषयावर सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मला एकटयाला बोलू देण्याची संमती सर्व सदस्यांनी दिलेली आहे. वाटले तर आपण मतदान घेऊ शकता.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या चर्चेवर मतदान घेतले जात नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मतदानाचा जो उल्लेख केलेला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, कोठेही पीक पाहणी न करता पीक पाहणीची आकडेवारी येते त्यावर आम्ही विश्वास ठेवायचा का ?

सभापती महोदय, पीक पाहणीच्या संदर्भात नजर अनुमानाने पैसेवारी ठरविण्याची पध्दत आहे. जग आता चंद्रावर गेले आहे. उपग्रहाद्वारे जमिनीमध्ये किती खोलवर पाणी आहे याची माहिती दिली जाते. चोरीला गेलेला मोबाईल कोठे आहे त्याचीही माहिती उपग्रहाद्वारे मिळते,

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .....

गावातील माणूस पळून गेला तर तो कोठे आहे हे सुध्दा उपग्रहाने समजते अशा प्रकारे जग चालले असतांना तुम्ही नजर अनुमानाने पैसेवारी कशी काय ठरविता ? एवढी सारी यंत्रणा असतांना सुध्दा आमची आणेवारी, पैसेवारी मात्र नजेरेच्या अनुमानाने केली जाते. नजर आणेवारी

म्हणजे शेतात जायचे व पीक कसे आले आहे ते बघितले की, झाली नजर आणेवारी. नजर आणेवरीसाठी कोणताही अधिकारी जागेवर राहत नाही. नजर आणेवारीसाठी शिवार फेरी केली जात असते. शिवार फेरीमध्ये राजस्व निरीक्षक, ग्रामसेवक, सरपंच, प्रगतिशील शेतकरी, सहकारी पत पुरवठा संस्थेचा अध्यक्ष, अल्प भूधारक शेतकऱ्यांचे दोन प्रतिनिधी, यात एक महिला शेतकरी असणे आवश्यक आहे तसेच तलाठी एवढयांनी शिवार फेरी करावयाची असते. परंतु शिवार पेरी पेरणी झाल्या झाल्या करावयाची असते. पेरणी झाल्यानंतर शिवार फेरी झाल्यानंतर हंगामी पैसेवारी 30 सप्टेंबरला जारी करावयाची. हंगामी पैसेवारी जाहीर केली की, दुसरी सुधारित पैसेवारी 15 नोव्हेंबरला जाहीर करावयाची. दुसरी पैसेवारी जाहीर झाल्यानंतर त्या त्या गावातील शेतकऱ्यांनी ही पैसेवारी योग्य आहे किंवा नाही यासंदर्भात आक्षेप घ्यावयाचा असतो. दुसरी सुधारित पैसेवारी जाहीर केली जाते तेव्हा रानात तीळ, तूर,उडीद, मूग काहीच राहत नाही. सर्व पिकांची कापणी त्यावेळेस पूर्ण झालेली असते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल..

पीक कापले गेल्यानंतर कापणीचा प्रयोग करणार कसा ? आता हंगाम बदलला आहे. पहिली पेरणी 7 जूनला व्हायची. आता 25 जुलै शिवाय पहिली पेरणी होत नाही. हा ग्लोबल वॉर्मिंगचा दणका आहे. केव्हा पेरणी होईल हे सांगता येत नाही. ग्लोबल वॉर्मिंग मुळे हंगाम बदलला आहे. त्यामुळे पीक कापणीचे प्रयोग करण्यासंबंधीच्या तारखा आपण वर खाली करणार आहात काय की, मंत्रालयातून आलेल्या जी.आर.प्रमाणेच वागणार आहात ? आपण जी.आर.प्रमाणे वागलात तर आणखी 100 वर्षे सत्तेवर राहण्याचे भाग्य आपल्या नशिबात राहणार नाही. आज वातावरण बदलले आहे. पाऊसपाणी बदलला. माझ्या शेतात नांगरणीचे काम सुरू आहे. पाऊस आला आहे. त्यात बैलाचे एक शिंग भिजते तर दुसरे कोरडे राहते. आज एका गावात पाऊस पडतो तर दुसरे गाव दुष्काळी राहते. त्यामुळे आपण आम्हाला कसे वाचवणार आहात ?

मला आनंद एका गोष्टीचा वाटला. सगळेच लोक वेड्या सारखे वागतात काय, तर नाही. काही लोक शहाण्या सारखे वागतात. श्री.एस.के.जोगळेकर या शहाण्या माणसाचे नाव आपल्या समोर घेणार आहे. श्री.एस.के.जोगळेकर, उप व्यवस्थापक, राष्ट्रीय कृषी ग्रामीण विकास बँक यांना 1985 मध्ये भगवंतराव गायकवाड समितीवर घेतले होते. हा माणूस कर्मचारी होता. या समितीवर कोण कोण होते ते सांगतो. या समितीवरील सदस्यांची नावे सांगितली तर स्वतंत्र मत मांडणे हे देखील धोक्याचे काम होते. या समितीचे श्री.भगवंतराव गायकवाड हे अध्यक्ष होते. या समितीचे सदस्य श्री.शरद पवार, श्री.बबनरावजी ढाकणे, श्री.गोपीनाथ मुंडे, श्री.केशवराव राणे, श्री.चिमणराव कदम, श्रीमती सूर्यकांता पाटील हे होते. या सगळ्या दिग्गज लोकांच्या समवेत भूविकास बँकेच्या एका उप महाव्यवस्थापकाला घेण्यात आले. या माणसाने संपूर्ण रिपोर्टच्या विपरित आपला अहवाल दिला. त्याने काय रिपोर्ट दिला ते मी वाचून दाखवितो. त्याने सांगितले की, "आपल्या सारख्या ज्येष्ठ व अनुभवी कार्यकर्त्यांच्या समवेत तसेच वरिष्ठ शासकीय व अन्य अधिकाऱ्यां बरोबर या समितीच्या कामकाजाच्या संदर्भात सहभागी होता आले ही एक अपूर्व संधी उपलब्ध झाली. प्रचलित पैसेवारी पद्धतीत उणिवा, त्या बद्दल लोकांच्या अपेक्षा याची माहिती समितीच्या बैठकीत मिळाली." यापुढील सर्वात महत्त्वाचे आहे. ते आपण ऐकावे. पुढे ते म्हणतात, "त्यासाठी पैसेवारी निकष व्यवहारी, शास्त्रशुद्ध असले पाहिजेत व त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा काटेकोर, वस्तुनिष्ठ,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4G 2

श्री.सय्यद पाशा पटेल..

परवडणारी, कॉस्ट इफेक्टीव्ह असली पाहिजे. या यंत्रणेबद्दल मात्र मला साशंकता वाटते. अशा प्रकारची यंत्रणा उभी करण्यास प्राधान्य द्यावे." असे त्या श्री.जोगेळकरांनी सांगितले. त्यांचे काहीही चुकले नाही. त्यांनी अगदी बरोबर सांगितले आहे. पीक पैसेवारी ठरते कशी ? पैसेवारी प्रमाण उत्पन्नावर ठरते. प्रमाण उत्पन्न म्हणजे काय हे आपण समजून घ्यावे. प्रमाण उत्पन्न काढण्याची पद्धत काय आहे ? दहा वर्षांपैकी तीन वर्षात जे चांगले पीक आले असेल त्याची सरासरी काढायची.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल . . . .

त्या चांगल्या पिकाची सरासरी म्हणजे प्रमाण उत्पन्न, आणेवारी नाही. आता सगळे शब्द बदलले आहेत.या प्रमाण उत्पन्नाच्या प्रमाणात त्यावर आणेवारी असते. आता मी सगळयांना प्रमाण उत्पन्नाचा प्रॉब्लेम काय आहे ते सांगतो.

सभापती महोदय, आता प्रमाण उत्पन्नाचा चमत्कार पहा. मी माझ्या जिल्ह्यातील प्रमाण उत्पन्नाबाबत माहिती घेतली. माझ्या जिल्ह्यामध्ये ज्वारीचे पीक घेतले जाते. मी माझ्या सर्व जिल्ह्याची माहिती सांगत नाही तर मी माझ्या तालुक्याची माहिती सांगतो.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना मी सांगू इच्छितो की, त्यांना भाषण करण्यासाठी आता केवळ चार मिनिटांचा वेळ शिल्लक राहीलेला असून त्यानंतर माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा महत्वाचा विषय आहे.

**तालिका सभापती** : मला माननीय सभापतींनी सांगितले आहे आणि मी त्यांच्या शब्दाबाहेर जाऊ शकत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आम्हालाही या चर्चेमध्ये भाग घ्यायचा आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह ही चर्चा 6 वाजूनप 50 मिनिटांनी संपेल. मी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना विनंती करतो की, त्यांनी खाली बसावे. मी सन्माननीय सदस्यांना पाच मिनिटांचा वेळ देतो.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, मी आता फक्त दहा मिनिटे बोलतो.

**तालिका सभापती** : अजिबात नाही.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, मी याठिकाणी शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलत आहे. तुम्हाला त्रास होत आहे काय ? याठिकाणी कोण बोलले त्यापेक्षा काय बोलले हे जास्त महत्वाचे आहे. गेली दहा वर्षे कच खाऊन काढले. जरा ऐका. मला महत्वाचे बोलू द्यावे. मला माफ करा. खरेतर आतापर्यंत माझे बोलणे झाले असते. आता प्रमाण उत्पन्न कसे असते, सरकार किती गृहीत धरते आणि नेमका या योजनेमध्ये घोटाळा कोणता आहे तेवढे मी सांगतो.

सभापती महोदय, मी आपल्याला प्रमाण उत्पन्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात ज्वारीचे प्रमाण उत्पन्न किती गृहीत धरले तर 10.31 किलो म्हणजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल . . . .

निलंगा तालुक्यातील एका शेतकऱ्यांच्या अडीच एकरामध्ये 10 क्वि. 31 किलो ज्वारीचे हे हायेस्ट प्रमाण उत्पन्न आहे. माझ्या तालुक्यामध्ये सर्वात हायेस्ट उत्पन्न किती येत असेल तर 10 क्वि.31 किलो. जर तुम्ही याबाबतीत पाशा पटेलला विचारणार असाल तर माझ्या शेताचे नाव तीन टाक असे आहे. शेताला तीन टाक, बारा टाक, म्हसोबा अशी नावे असतात. माझ्या तीन टाक नावाच्या शेतामध्ये एक हेक्टर रान आहे, वर्षाला 50 क्विं. हायब्रीड ज्वारी होते. जर दहा वर्षापैकी तीन वर्षातील जे चांगले उत्पन्न आहे ते जर प्रमाण उत्पन्न म्हणून धरण्यात येणार असेल तर दादा, मला तुम्हाला सांगावयाचे आहे की, माझ्या शेतामध्ये एका हेक्टरमध्ये 50 क्वि.ज्वारी होते. पण माझ्याकडे अजून तलाठी आलेला नाही, तहसीलदार आला नाही, माझ्या शेताचा रस्ता देखील कोणाला माहिती नाही. पण यावर्षी पीक कापणीचा प्रयोग तुमच्या समोर करतो आणि तोपर्यंत ज्वारीचे पीक कापत नाही. शेतामध्ये ज्वारीचे पीक तसेच ठेवतो. ज्वारी गळून गेली तरी हरकत नाही. पण ज्वारी कापत नाही. अशा प्रकारे प्रयोग करुन समजा माझ्या सारख्या शेतकऱ्याच्या शेता मध्ये 1 हेक्टरमध्ये 50 क्वि.इतके प्रमाण उत्पन्न निघत असेल तर तुम्ही माझ्या तालुक्यातील शेतकऱ्याचे प्रमाण उत्पन्न 10.31 इतके ठेऊन शेतकऱ्याची माती करण्याचे पाप का केलेले आहे?

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात)

सभापती महोदय, मला बोलू द्यावे. ठीक आहे. तुम्हाला काय बोलावयाचे असेल ते बोलावे. ज्याला त्याला आपापली मते मांडावयाची आहेत. माझ्या बोलण्याच्या मध्ये बोलावयाचे आहे काय? तर बोला, हौस भागवून घ्यावी.

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .....

या ठिकाणी हे सरकारी आकडे आहेत पण माझ्याकडे खाजगी आकडेवारी आहे. मी माझ्या तालुक्यातील 50 शेतकऱ्यांना विचारले की, किती उत्पादन आहे ते खरे सांगा. शेतकऱ्यांनी सांगितले की, आमच्या तालुक्यामध्ये हेक्टरी 25 ते 35 क्विंटल ज्वारी पिकते. एका हेक्टरमध्ये 20 क्विंटल तूर पिकते. मुगाचे उत्पादन हेक्टरी 14 किंवा 15 पोते आहे. तिळाचे उत्पादन हेक्टरी 10 क्विंटल आहे. सूर्यफुलाचे उत्पादन हेक्टरी 15 क्विंटल आहे. हे माझ्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे जास्तीतजास्त उत्पादन आहे.

सरकारचा घोळ कोठे आहे ते मी सांगतो. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांना सरासरी 25 क्विंटल पीक येते त्या ठिकाणी सरकारने प्रमाण पीक 10 क्विंटल 31 किलो उत्पादन धरले. तुरीच्या बाबतीत हेक्टरी 20 क्विंटल पीक येत असताना सरकारने 9 क्विंटल 89 किलो उत्पादन धरले. उडीदच्या बाबतीत हेक्टरी 15 क्विंटल उतारा येत असताना सरकारने 5 क्विंटल 93 किलो प्रमाण पीक धरले. मुगाच्या बाबतीत शेतकऱ्यांना हेक्टरी 14 किंवा 15 क्विंटल सरासरी उतारा येत असताना सरकारने 6 क्विंटल 3 किलो उतारा धरला. अशा पध्दतीने प्रत्यक्षात जे उत्पादन होते त्याप्रमाणे प्रमाण पीक न धरता वेगळेच प्रमाण पीक धरले अशी परिस्थिती आहे. हेक्टरी 25 पोते प्रमाण उत्पादन असताना सरकार 10 क्विंटल धरते. सरकार जर हेक्टरी 10 क्विंटल उत्पादन धरत असेल तर एका एकराला चार पोते येतात. म्हणजे सरकारची अशी भावना आहे की, एका एकराला चार पोते ज्वारी म्हणजे 100 पैसे पीक आले. एका एकरमध्ये 2 क्विंटल ज्वारी आली आली तर 50 पैसे पीक आले. माझ्या शेतामधील पीक गेले असे म्हटले तरी एकरी 10 क्विंटल ज्वारी पिकते. सरकारच्या भाषेत 2 क्विंटल ज्वारी झाली म्हणजे 50 पैसे पैसेवारी येते. पैसेवारी काढण्याची ही पध्दत चुकीची आहे.

सभापती महोदय, यावर काय उपाय आहे ? 'माझी माती माझी माणसे' या कार्यक्रमामध्ये कृषी विद्यापीठ रोज सांगते की, एका हेक्टरमध्ये 15 क्विंटल, 20 क्विंटल उतारा येतो. नजर पैसेवारी म्हणजे कापणी न करता आम्ही प्रयोग करुन दाखविलेली पैसेवारी. तसेच हवामानावर आधारित असलेली पैसेवारी आहे. या सर्व पैसेवाऱ्यांऐवजी आपण जर दोन गोष्टी केल्या तर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल....

तर शेतकरी वाचणार आहे. पहिली गोष्ट अशी की, जशी पेरणी झाली असेल तसे पीक कापणीचे प्रयोग बदलावेत. दुसरी बाब अशी की, कृषी विद्यापीठ जे हायेस्ट उत्पादन सांगते तेच प्रमाण उत्पादन आपण धरले तरच या राज्यातील शेतकऱ्यांचे भले होईल आणि शेतकऱ्यांना दोन पैसे मदत मिळेल. नाही तर मिळणार नाही. आताचे जे पीक कापणीचे प्रयोग आहेत ते सर्वच्या सर्व 100 टक्के बोगस आहेत.

सभापती महोदय, या विषयावर मी दोन तास बोलू शकलो असतो पण आपली खूप तळमळ बघून मी बसण्याचा प्रयत्न करणार आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करणार आहे की, दोन गोष्टी कशा करावयाच्या हे आपण बघावे. पहिली गोष्ट अशी की, विद्यापीठ जे हायेस्ट उत्पादन सांगते तेच प्रमाण उत्पादन धरावे. दुसरी बाब अशी की, माझ्या शेतात, माझ्या गावचा जो हंगाम आहे त्याप्रमाणे पीक कापणी करावयाची असेल तर खर्च करण्याची गरज नाही. तिसरी बाब अशी की, हे सर्व पारदर्शक व्हावयास पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल...

मी आपल्या माध्यमातून शासनाला सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या न थांबण्याला वाढीव उत्पादन खर्च जसा कारणीभूत आहे तसेच पैसेवारी सुध्दा कारणीभूत आहे. उत्पादन खर्चाकडे सरकारने डोळसपणे बघण्याचा प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणे पीक आणेवारीकडेही सरकारने डोळसपणे बघावे एवढी कळकळीची विनंती करुन मी येथेच थांबतो. जय हिंद.

----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी पीक आणेवारी काढण्याच्या पध्दतीबाबत अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. आणेवारी चुकीची काढल्यामुळे शेतकऱ्यांना विमा मिळत नाही, शेतकऱ्यांना कोणत्याही सवलती मिळत नाहीत. या संदर्भात 1980-81 साली साठे समितीने आणेवारी काढण्यासाठी टेबल तयार केले होते. आजही त्याच पध्दतीने आणेवारी काढण्याची पध्दत सुरु आहे. त्यानंतर 2000-2001 या वर्षात दुसरी समिती नेमण्यात आली होती. परंतु त्या समितीनेही साठे समितीच्या पध्दतीनुसार आणेवारी काढण्याची पध्दत सुरु ठेवण्याची शिफारस केली होती. आणेवारी काढण्यासाठी 10 वर्षातील पिकांचे उत्पादन लक्षात घेऊन त्यापैकी 3 वर्षातील पिकांचे उत्पादन विचारात घेऊन त्याची सरासरी काढून उंबरठा उत्पन्न ठरविले जाते. त्या 3 वर्षातील उत्पादन सुध्दा काही ठिकाणी येते काही ठिकाणी येत नाही. तालुक्याची आणेवारी काढली जाते. त्यातही ओलिताच्या भागाची, कोरडवाहू भागाची आणेवारी वेगळी असते. पण सरसकट आणेवारी काढली जाते. पण ज्या भागात 16 टक्के सिंचन झालेले आहे, ज्या भागात 84 टक्के सिंचन झाले आहे या फरकाचा विचार न करता सरसकट आणेवारी काढली जाते. त्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

बँकेकडून शेतकऱ्यांना कर्ज देत असताना एकरी 10 ते 15 क्विंटल धान्य गृहित धरले जाते. म्हणजे तेवढे पीक आले तरच शेतकऱ्यांना 6 हजार रुपये कर्ज दिले जाते. बँकेकडून 10 ते 15 क्विंटल पीक गृहित धरले जाते त्या प्रमाणे महसूल विभागाकडून तेवढे पीक गृहित धरले जात नाही. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे 10 वर्षातील एकूण उत्पन्न आणि 3 वर्षातील अधिकच्या उत्पन्नाची सरासरी काढून उंबरठा उत्पन्न ठरविण्याची पध्दत आहे. पण ही पध्दत सुध्दा दरवर्षी बदलण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

3...



NTK/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

दोन वर्षापूर्वी पाऊस न पडल्यामुळे माझ्या शेतामध्ये एकही दाणा उगवला नाही. पण शासनाच्या सरासरी काढण्याच्या पध्दतीमुळे माझे 50 टक्क्यापेक्षा अधिक उत्पन्न दाखविण्यात आले. कोरडवाहू शेतकऱ्यांना पीक मिळाले नाही तरी सुध्दा सरासरी उत्पन्नामुळे आणेवारीच्या निकषात बसत असल्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. म्हणून शासनाने आणेवारी काढण्याच्या पध्दतीसाठी नवीन समिती गठित केली पाहिजे. त्या समितीमध्ये शेतकऱ्यांना व ज्यांना आणेवारी काढण्याचा अनुभव आहे त्यांना घ्यावे. त्यांच्या माध्यमातून आणेवारी काढण्याचे टेबल तयार केले तर शेतकऱ्यांना न्याय मिळू शकेल. 1980-1981 साली आणेवारीचे टेबल ठरवून आता 32 वर्षे झालेली आहेत.

आमच्या भागात हाय इल्डिंग व्हेरायटीची लागवड केली जाते. मोठ्या प्रमाणात जमीन ओलिताखाली आणली जाते. सरासरी उत्पादन 15 क्विंटल असताना केवळ 7-8 क्विंटल पीक गृहित धरले जाते. 8 क्विंटलपैकी 4 क्विंटल पीक आले तरी 50 टक्के पीक आले आहे असे गृहित धरले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणून शासनाने नवीन समिती गठित करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

-------

4....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/

श्री.दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाची चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी पैसेवारी व आणेवारी काढण्याच्या पध्दतीबाबत विचार मांडलेले आहेत. सन्माननीय मंत्री महोदय सुध्दा शेतकऱ्यांचे चिरंजीव आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी तलाठ्यांमार्फत आणेवारी कशी काढली जाते ते सांगितले आहे, ते अगदी बरोबर आहे. दुर्दैवाने काही तलाठ्यांना पैसेवारी कशी काढावयाची असते हेही माहीत नाही. काही तलाठ्यांच्या हाताखालील मुलांनी फॉर्मेटमध्ये भरुन दिलेली माहिती पुढे सादर केली जाते. चुकून 50 पैशापेक्षा जास्त आणेवारी जाहीर झालेल्या गावामध्ये शासनाकडून टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे असे जाहीर केले जाते. मी दुष्काळी भागातील आमदार असल्यामुळे आणेवारी काढण्याची पध्दत का बदलली पाहिजे ते सांगणार आहे.

शेतकऱ्यांना पीक विमा मिळत नाही. पण गावोगावी टँकर सुरु करावयाचे असतील तर त्यासाठी 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आली पाहिजे. अशा गावात पाण्याचा थेंबही मिळत नाही. मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आम्हाला तहसीलदार व प्रांताधिकाऱ्यांनी अशी माहिती दिलेली आहे. ही पैसेवारीची पध्दत बदललीच पाहिजे या मताशी मी 100 टक्के सहमत आहे तरच शेतकरी वाचेल व ग्रामीण भाग वाचेल अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:45

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रचलित पीक पैसेवारी काढण्याच्या पध्दतीमध्ये बदल करण्यासंबंधी या सदनामध्ये नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दीपकराव साळुंके, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी भाग घेतला.

सभापती महोदय, पीक पैसेवारी हा राज्यातील शेतक-यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळयाचा विषय आहे या बद्दल कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. ही पैसेवारी ठरविण्यास 1927 पासून सुरुवात झाली. त्यानंतर 1995मध्ये तत्कालीन महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली पैसेवारी ठरविण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. ही पीक पैसेवारी पध्दत बदलण्याच्या संदर्भात विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये वारंवार चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. इतकेच नाही तर दुष्काळावरील चर्चा असो, टंचाईच्या परिस्थितीसंबंधीची चर्चा असो, पीक परिस्थितीच्या संदर्भातील चर्चा असो, अशा चर्चेच्या वेळी या पीक पैसेवारीचा मुद्दा सन्माननीय सदस्यांकडून नेहमी मांडला जात असतो.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी ही पीक पैसेवारी ठरविण्याच्या पध्दतीमध्ये उणिवा असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितल्या प्रमाणे ही पीक पैसेवारी पध्दत सदोष आहे. ही पध्दत शास्त्रशुध्द आणि परिपूर्ण नाही हे मी देखील मान्य करतो. प्रमाण उत्पन्नाशी तुलना करुन ही पीक पैसेवारी काढली जाते. प्रमाण उत्पन्न ठरविण्याची जी पध्दत आहे ती शास्त्रशुद्ध आहे असे मला वाटत नाही. या पद्धतीमध्ये बदल करण्याची गरज आहे. सद्य:परिस्थितीत हंगामी पैसेवारी जाहीर करण्याची मुदत कोकण विभागासाठी 15 सप्टेंबर, पुणे-नाशिक विभागासाठी 15 सप्टेंबर, औरंगाबाद विभागासाठी 30 सप्टेंबर आणि नागपूर- अमरावती विभागासाठी 30 सप्टेंबर आहे. सुधारित हंगामी पैसेवारी जाहीर करण्याच्या तारखा कोकण विभागासाठी 31 ऑक्टोबर , पुणे-नाशिक विभागासाठी 31 ऑक्टोबर, औरंगाबाद-नागपूर विभागासाठी 15 नोव्हेंबर या प्रमाणे आहे. त्यानंतर अंतिम पैसेवारी ठरविण्याच्या तारखा कोकण-पुणे-नाशिक विभागासाठी 15 डिसेंबर, औरंगाबाद विभागासाठी 15 डिसेंबर आणि नागपूर-अमरावती विभागासाठी 15 जानेवारी या प्रमाणे आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके...

सभापती महोदय, पीक कापणी प्रयोगाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मुद्दे उपस्थित केले. राज्यामध्ये पीक सर्वेक्षण योजना 1944 पासून सुरु झाली. या पीक सर्वेक्षण योजनेसाठी पीक कापणी प्रयोग केले जातात. पीक उत्पादनाचा अंदाज शासनाला यावा यासाठी, पीक विम्यासाठी, पैसेवारी ठरविण्यासाठी पीक कापणी प्रयोग केले जातात. महसूल मंडळातील प्रत्येक गावामध्ये किमान 12 पीक कापणी प्रयोग व्हावेत अशा प्रकारची संकल्पना आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके...

परंतु प्रत्यक्षात तसे घडत नाही ही वस्तुस्थिती आहे. मी दौऱ्याच्या निमित्ताने अनेक गावांमध्ये फिरत असताना या समितीबाबत चौकशी केली. मला सांगण्यात आले की, अशी कोणतीही समिती येत नाही. त्या समितीच्या बैठका होत नाहीत. परंतु त्या समितीचा अहवाल मात्र अगदी बरोबर असतो. आपण कोणत्याही गावाची स्थिती विचारल्यास त्या गावाची कागदपत्रे योग्य पध्दतीने दिली जातात. अशा पध्दतीने पैसेवारी जाहीर केली जाते. तेव्हा या पैसेवारी मध्ये बदल करण्याची सदस्यांची मागणी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, यामध्ये प्रमाण उत्पादन धरले पाहिजे. आपल्या प्रत्येक विभागामध्ये कृषी विद्यापीठ आहे. कृषी विद्यापीठापेक्षा दुसरी तांत्रिक बाब आपल्याकडे उपलब्ध नाही. आपणास शास्त्रशुध्द पध्दतीने पैसेवारी ठरवावयाची असेल तर कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून प्रमाण उत्पादन ठरविणे याला दुसरा काही पर्याय आहे असे मला वाटत नाही. त्या दृष्टीकोनातून शासनाची भूमिका आहे. दहा वर्षाच्या सरासरीमध्ये तीन वर्षातील चांगले पीक अशी पध्दत सध्या अवलंबिली जाते. सद्य:स्थितीत हीच पध्दत योग्य आहे हेही मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. परंतु ही काही शास्त्रशुध्द पध्दत नाही.

सभापती महोदय, जसे बीटी बियाणे आलेले आहे. तसे आता नवनवीन बियाणांचे प्रकार येत आहेत. त्यामुळे शेतीमध्ये क्रांतिकारी स्वरुपाचे बदल झालेले आहेत आणि शेती उत्पादनामध्ये देखील क्रांतिकारी बदल झालेले आहेत. आज कोरडवाहू शेतकरी असो की बागायती शेतकरी असो ते उत्पादनाचे नवनवीन उच्चांक करीत आहेत हे मला मान्य करावे लागेल. मी आपणास माझ्या भागातील काही शेतकऱ्यांचे उदाहरण देतो. माझ्या भागातील काही शेतकऱ्यांनी एकरी 40 क्विंटल कापसाचे उत्पादन घेतलेले आहे. काही शेतकरी शास्त्रशुध्द पध्दतीने आणि मेहनतीने शेती करतात त्या शेतकऱ्यांचे उत्पादन सुध्दा विचारात घेतले पाहिजे या मताचे आम्ही आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी सूचना केली की, या पध्दतीमध्ये नव्याने विचार करण्याची गरज आहे. त्यासाठी एक समिती नेमली पाहिजे. या समितीमध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आणि दोन्ही सभागृहातील काही सदस्यांचा समावेश करावा. मी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके...

त्यांना सांगू इच्छितो की, दोन्ही सभागृहाला विश्वासात घेऊन अशी समिती गठीत करण्यात येईल. आम्ही तशा प्रकारचा प्रस्ताव तयार करुन तो माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे मान्यतेसाठी पाठविला होता. तेव्हा अशी समिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तेव्हा पुन्हा एकदा तसा प्रस्ताव करुन तो माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे या सदनाचे सहा वर्षे सदस्य राहिलेले आहेत. या सहा वर्षाच्या काळात त्यांनी शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न पोडतिडिकीने मांडले आहेत. परंतु शेवटच्या मिनिटामध्ये आपले मुद्दे येतात. बाकीचा आपला पसारा असतो. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे जाहीर सभेत बोलल्यासारखे बोलतात. जाहीर सभेत फार वेगळे बोलतात ते येथे सांगण्यासारखे नाही. तेव्हा मी अगोदर सांगितल्याप्रमाणे अशा प्रकारची समिती नेमण्याबाबत शासन तातडीने पावले उचलेल आणि या समितीमध्ये प्रश्नाची जाण असणारे आपल्या सारखे सदस्य व शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यांचा समावेश केला जाईल.

सभापती महोदय, आता हंगाम बदलत आहे, पावसाचा काळ बदलत आहे हे आम्हाला मान्य आहे. पूर्वी 7 जूनला पाऊस पडायचा, आता तो जुलै महिन्यात पडत असल्यामुळे त्या महिन्यात पेरणी करावी लागते. तेव्हा आता पेरणीच्या तारखा बदलण्याचा निर्णय शासनाने घेतला पाहिजे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके...

या सर्व बाबतीत ही कमिटी निश्चितपणे विचार करील. आपल्या सर्वांच्या चर्चेमधून एक चांगली पैसेवारी काढण्याची पध्दत या राज्यात येईल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो. धन्यवाद.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

आता सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्या अल्पकालीन चर्चेस सुरुवात होईल. ही चर्चा 45 मिनिटांमध्ये संपवावयाची आहे याची कृपया सदस्यांनी नोंद घ्यावी. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी आपल्या अल्पकालीन चर्चेस सुरुवात करावी.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: स्त्री हक्कांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याची होत असलेली मागणी

**मु.शी.** : स्त्री हक्कांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याची होत असलेली मागणी या विषयावर श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, हेमंत टकले यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 45 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणाऱ्या सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्रीमती विद्या चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करते.

"भारतीय घटनेनुसार प्रत्येक स्त्री, शासन, समाज, जात व कुटुंब या सर्व पातळयांवर समान हक्कासाठी पात्र असून महिलांना बऱ्याच ठिकाणी संघर्ष करावे लागणे, कचरा गोळा करणाऱ्या, घरकाम करणाऱ्या व वीट भट्टीवर काम करणाऱ्या महिला या संघटीत नसल्यामुळे त्यांचे होत असलेले शोषण, शहराची घाण कमी करणाऱ्या कचरा वेचणाऱ्या महिलावर्गाचे जगणे कठीण होवून बसणे, त्यांना समाजात हीनपणाची वागणूक मिळणे, कचरा वेचत असताना हातमोजे किंवा अन्य साहित्य त्यांचेकडे नसणे, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम, भटक्या कुत्र्यांपासून त्यांना होत असलेला त्रास, सध्या राज्यात प्लास्टीकच्या पिशव्यांचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, कचरा गोळा करणाऱ्या महिला त्याकडे आकृष्ट होवून त्यांनी प्लॉस्टीकच्या पिशव्या गोळा करण्यामुळे या गंभीर समस्येवर मात होण्याची शक्यता, बचतगटाद्वारे गरीब व गरजू महिलांना कामे देण्यात येणे, त्यापैकी शालेय पोषण आहाराचे असलेले अत्यल्प अनुदान वाढविण्याचे तसेच बचतगटांच्या वस्तु विकण्यासाठी शासनाने बचत गटांना मॉलमध्ये बाजारपेठ मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, राज्यातील बऱ्याच शाळा व महाविद्यालयात महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसणे, घरकाम करणाऱ्या असंघटीत महिलांना शासकीय सुविधा नसणे, त्यांच्या

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

संरक्षणार्थ पोलिसांकडून उदासिनता असणे, समाजाकडून व कुटुंबाकडून महिलांना समानतेचा दर्जा न मिळणे, महिलांविरुध्दच्या अत्याचाऱ्याच्या गुन्ह्यात लक्षणीय वाढ होणे, बहुतांशी खाजगी आस्थापनेत महिला कर्मचाऱ्यांची होत असलेली छळवणूक व त्यांचे करण्यात येणारे शोषण, स्त्री हक्काची अंमलबजावणी अधिक चांगल्याप्रकारे करण्याची व महिलांचे सक्षमीकरण करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर मी अल्पकालीन चर्चा उपस्थित करीत आहे. भारतीय घटनेनुसार प्रत्येक महिलेला समानतेचा हक्क मिळालेला आहे. परंतु आजही कष्टकरी महिला आहेत, मग ती महिला खेडयातील असो वा शहरातील असो. तिला आपल्या कुटुंबासाठी, आपल्या मुला-बाळांसाठी,तसेच पोटाची खळगी भरण्यासाठी, दैनदिन जीवनाच्या गरजा भागविण्यासाठी प्रचंड कष्ट करावे लागते. ती महिला एक दिवस घराबाहेर कामासाठी पडली नाही तर तिला तिच्या घरातील चूल सुध्दा पेटविता येत नाही, इतकी भयंकर स्थिती आज महिलांची आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, दलितांपेक्षा दलित कोण असेल तर ती महिला आहे. आज संविधानात महिला संरक्षणाच्या बाबतीत अनेक कायदे झालेले आहेत. परंतु आजही तिच्या नशिबाची दुर्दशा कमी झालेली नाही. गावातील महिला शेतकरी, शेतमजूर किंवा बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या महिला, दगड खाणी, वीटभट्टी, खानावळीत स्वयंपाक करणाऱ्या महिला, घरात काम करणारी महिला असो या महिलांना कायम स्वरुपी काबाडकष्ट करावे लागते.

सभापती महोदय, मोठ्या शहरात रहाणाऱ्या महिला आहेत, त्या कचरा वेचण्याचे काम करतात. आज शहरांमध्ये कचऱ्याचे प्रमाण खूप वाढलेले आहे. घनकचरा व्यवस्थापन हा मोठ्या शहरांचाच नव्हे तर जगभरामध्ये हा प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झालेला आहे. जागतिकीकरणामुळे कचऱ्याचे स्वरुपही बदलले आहे. पूर्वी आपण वस्तू धूवून वापरत होतो. आता ती पध्दत पूर्णपणे बदलली आहे. वस्तू धुवून पुन्हा त्याचा वापर करण्यास मध्यमवर्गीय महिलांना वेळ मिळत नाही. आता युज ॲन्ड थ्रो चा जमाना आलेला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी थर्माकॉलच्या वस्तू आणि प्लॅस्टिकचा मोठया प्रमाणात वापर होतो. कचरा वेचण्याचे काम खूप कठीण आहे. आज मुंबई महानगरपालिकेमध्ये २७ हजार कामगार कचरा वेचण्याचे काम करीत आहेत. त्या कामगारां

५...



ABG/ प्रथम श्री.अजित १८:५५

श्रीमती विद्या चव्हाण...

व्यतिरक्त १ लाख कचरा वेचक या शहराचा कचरा वेचत आहेत. वेळीच कचरा वेचल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कमी प्रमाणात होत आहे.

महोदय,मला या ठिकाणी खेदाने सांगावयाचे आहे की, शासन किंवा महानगरपालिका आहेत, ते या कचरा वेचकांची दखल घेत नाहीत. अत्यंत हालाखीमध्ये या महिला जीवन जगत आहेत. पहाटे उठल्यानंतर या महिला कचरा वेचण्यासाठी बाहेर पडतात. या महिलांना अनेक त्रासांना सामारे जावे लागते. त्या महिला घाणीतून कागद,प्लॅस्टीक उचलतात. दिवसभर वाकून काम करीत असतात. त्या महिलांना भटक्या कुत्र्यांचा देखील मोठया प्रमाणात त्रास होतो. त्यांना अनेक आजार होतात. या महिलांना बायो कचऱ्यास देखील सामोरे जावे लागते. त्यामुळे पाठीचे, मणक्यांचे विकार त्यांना मोठया प्रमाणात होतात. या महिलांवर अत्याचार होण्याचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे. तळेगाव येथे कचरा वेचण्यासाठी गेलेल्या १३ ते १४ वर्षे वयाच्या चार अल्पवयीन मुलींना एका माणसाने डांबून ठेवले होते. त्या मुलींना मारहाण केली. एका मुलीवर बलात्कार केला. या घटनेची दखल नंतर पोलिसांनी घेतलेली आहे...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

अशा अत्याचाराना सुध्दा या महिलांना अथवा लहान मुलींना बळी पडावे लागते. गरीब परिस्थितीमधील असल्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये त्या तक्रार नोंदविण्यासाठी गेल्या तरी त्यांची कोणी दखल घेतील अशी परिस्थिती नसते. त्यामुळे या महिलांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नसते. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये काम करीत असताना या महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी काचपत्रा पंचायत समिती स्थापन झालेली आहे. त्यांच्याकडून काही काही ठिकाणी विशेषत: पुणे,मुंबईसारख्या शहरांमध्ये मदत केली जाते. गेल्या 10 वर्षामध्ये अनेक ठिकाणी या महिलांना समितीमार्फत मदत करण्यात आलेली आहे. मला याठिकाणी सांगावयाचे आहे की, जेएनयूआरएम आणि 26 हजार कोटी रुपयांचे बजेट असलेली मुंबई महापालिका या महिलांसाठी किंवा कचरा वेचणाऱ्या महिलांसाठी कोणत्याही प्रकारची मदत करीत नाही. या महिलांना मदत करण्यासाठी किंवा त्यांच्या संरक्षणासाठी कोणतेही नियम तयार केलेले नाहीत. मुंबई महापालिकेने कचरा वेचणाऱ्या महिलांना त्यांचे हक्क मिळवून दिले पाहिजेत. कचरा वेचणाऱ्या महिलांची आणि काचपत्रा वेचणाऱ्या महिलांची नोंदणी झाली पाहिजे. त्यांना ओळखपत्र दिली पाहिजेत. संस्थांनी प्रत्येक विभागामध्ये कचरा ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. दिल्लीसारख्या ठिकाणी कचरा रस्त्यावर दिसत नाही कारण ती देशाची राजधानी आहे. परंतु मुंबईसारख्या ठिकाणी उपनगरामध्ये देखील कचराकुंडया ओव्हरफ्लो झालेल्या दिसून येतील आणि त्यातून बाहेर येणारा कचरा हा रस्त्यावर पडलेला असतो. कचरा ठेवण्यासाठी जागा नसते त्यामुळे जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. घनकचरा व्यवस्थापन अधिनियम, 2006 अनुसार घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी जागा दिली पाहिजे. ज्या कचरा वेचणाऱ्या महिला आहेत त्या पातळ प्लॅस्टीक कचरा वेचत नाहीत कारण त्या कचऱ्याला भाव मिळत नाही. मुंबई महापालिका 130 कोटी 200 कोटी रुपये नालेसफाईवर खर्च करते. गरीब महिला प्लॅस्टीक कचरा वेचतात त्याचे रिसायकलींग होत नाही. कमी जाडीच्या प्लॅस्टीकच्या पिशव्या असतात त्यांचे रिसायकलींग होत नाही. त्यामुळे या महिलांना या कचऱ्याला भाव मिळत नाही.

मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर रस्त्यावर भाजी विकली जाते त्यासाठी छोटया हलक्या प्रतीच्या पिशव्या वापरल्या जातात. भाजीसाठी मोठया प्रमाणात या पिशव्यांचा वापर केला जातो आणि त्या पिशव्या कचरा म्हणून गोळा केल्या जात नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4N-2

SSK/ पूर्वी श्री.गिते 19:00

श्रीमती विद्या चव्हाण....

त्या नाला किंवा गटारात टाकल्या जातात. मुंबईमध्ये 26 जुलै, 2005 रोजी जो महापूर आला होता त्यामुळे संपूर्ण मुंबई उध्वस्त झाली होती. नाले,गटारे याचे पाणी समुद्रामध्ये जाते. परंतु नाले,गटारे हे सर्व प्लॅस्टीकच्या पिशव्यांनी तुंबले असल्यामुळे पाणी वाहून गेले नाही आणि दरम्यानच्या काळात भरपूर पाऊस पडल्यामुळे मुंबईमध्ये संपूर्णपणे पाणी साचले होते. यासाठी मला सूचना करावीशी वाटते की, अशा प्रकारचे हे हलक्या प्रतीचे लॅस्टीक वेचतात त्याला भाव मिळाला पाहिजे. पेपरची रद्दी 10 रुपये किलोप्रमाणे विकली जाते. परंतु या प्लॅस्टीकच्या पिशव्यांना भाव मिळत नाही. जाडे प्लॅस्टीकचे रिसायकलींग केले जाते. त्याला भाव मिळतो. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी 400 कोटी रुपये खर्च केले जातात. ज्या कचऱ्याचे रिसायकलींग होत नाही अशा प्रकारचा कचरा वेचणाऱ्या सुमारे एक लाख महिला आहेत त्यांना वेचलेल्या कचऱ्याचा चांगला भाव मिळाला तर कचरा साठणार नाही. दिवसभर कचरा उचलणाऱ्या महिला आहेत त्यांना 100 रुपयेपर्यंत रोजंदारी मिळू शकते. प्लॅस्टीकचा भाव वाढवून दिला तर प्लॅस्टीक वेचले जाईल. तसेच या महिलांना रोजगार सुध्दा मिळू शकेल. ही महत्वाची सूचना केलेली आहे त्याचा शासनाने जरुर विचार करावा.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे महिलांवर होणारे जे अत्याचार आहेत त्याबाबतही विचार होणे गरजेचे आहे. या महिलांना दुसरे रोजगाराचे साधन नाही. याबाबतीत शासनाने विचार करुन सर्व महापालिका आणि नगरपालिकांना याबाबत सूचना दिल्या पाहिजेत. काही महिलांना फेकलेले साहित्य जमा करुन त्याची वर्गवारी करावी लागते. करोडो लोक उपजीविका करणारे आहेत. कचरा वेचल्यानंतर त्याचा पुर्नवापर झाला पाहिजे. उचललेला कचरा फेकून न देता त्याचा रिसायकलींगसाठी वापर झाला पाहिजे.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.........

महापालिकांना अशा प्रकारची सूचना दिली तर ते महत्वाचे होईल असे मला वाटते.

कचरा वेचक महिलांबाबतची जी समस्या आहे तशीच आणखी एक समस्या ही महिला बचत गटांबाबत आहे. राज्यात अनेक महिला बचत गटांची स्थापना झालेली आहे. त्यांच्यामार्फत विविध प्रकारचे लघु उद्योग किंवा व्यवसाय केले जातात. पापड बनविणे, लोणची तयार करणे, महिलांच्या पर्सेस तयार करणे, लहान मुलांची खेळणी तयार करणे असे व्यवसाय केले जातात. परंतु त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळण्यासाठी मोठमोठ्या शहरामध्ये दुकानासाठी जागा उपलब्ध होत नाही. आज अनेक मोठया शहरांमध्ये महापालिकांकडून मॉल्स उभारण्यासाठी परवानगी दिली जाते. अशा खाजगी मॉल्सकडे लाखो चौरस फूट जागा उपलब्ध आहे. महापालिकांच्या माध्यमातून अशा खाजगी मॉल्समध्ये महिला बचत गटांना आपल्या मालाची विक्री करण्यासाठी छोटासा गाळा उपलब्ध करुन देता आला तर अनेक महिलांच्या हाताला रोजगार मिळू शकेल. महापालिकांमार्फत ज्या मंडई विकसित केल्या जातात त्या ठिकाणी त्यांना दुकानासाठी गाळा देता येऊ शकेल. परंतु खाजगी मॉल्समध्ये महिला बचत गटांसाठी सामाजिक दृष्टीकोनातून दुकानासाठी जागा उपलब्ध करुन देणे त्यांच्यावर बंधनकारक केले पाहिजे.

सभापती महोदय, मुंबई सारख्या मोठया शहरामध्ये किंवा छोट्या गावांमध्ये एस.टी.स्थानक, शाळा-महाविद्यालयांमध्ये मुली किंवा स्त्रियांसाठी स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध नसते. सामान्य महिला दिवसातील 8 ते 10 तास घराबाहेर असते. कार्यालयांमध्ये देखील चांगल्या प्रकारची स्वच्छतागृहे नसतात. रेल्वे स्थानके, एस.टी.स्थानके, सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृहे आढळून येत नाहीत. मध्यंतरी मी कर्नाटक राज्यात गेले होते. त्या राज्यातील हायवेवरील बस स्थानकाच्या ठिकाणी पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय केलेली दिसून आली. प्रत्येक स्वच्छतागृहामध्ये पाण्याची सोय व्हावी म्हणून सिन्टेक्सच्या टाक्या बसविण्यात आलेल्या आहेत. राज्य शासनाने या विषयाची गांभीर्याने नोंद घेऊन महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे.

सभापती महोदय, अनेक महिला सार्वजनिक जीवनामध्ये वावरत असताना अत्याचाराला बळी पडण्याचे प्रमाण वाढत आहे. लहान मुले-मुली आणि स्त्रिया सुध्दा अत्याचाराला बळी पडत आहेत. हा चिंतेचा विषय बनलेला आहे. मध्यंतरी माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहात स्पष्ट केले होते की,



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.........

शिक्षेचे प्रमाण कमी झालेले आहे. गरीब स्त्री किंवा अंगावर फाटकी वस्त्रे असलेली महिला असली तर पोलीस स्टेशनमध्ये त्यांचे गुन्हे नोंदवून घेतले जात नाहीत. अशी महिला बाळंतपणासाठी सार्वजनिक रुग्णालयामध्ये गेली तर तिचे नाव नोंदवून घेतले जात नसल्यामुळे रस्त्यावरच बाळंतपण होण्याची पाळी त्यांच्यावर येते. शासनाने या प्रश्नाबाबत ठोस उपाययोजना केली पाहिजे.

सभापती महोदय, महिलांवरील वाढत्या अत्याचाराला माध्यमे सुध्दा जबाबदार आहेत. आज दूरदर्शन वाहिन्या घरोघरी पोहोचल्या आहेत. या वाहिन्यांवरुन प्रसारित होणाऱ्या सिरियल्समधून महिलांवरील अत्याचार दाखविले जातात. पूर्वी थिएटरमध्ये प्रदर्शित होणाऱ्या सिनेमांमधून महिलांवरील अत्याचार पहावयास मिळत होते. आज जाहिरातीच्या माध्यमातून, सिनेमातील गाण्यांच्या माध्यमातून स्त्रियांवरील अत्याचार दाखविण्याचे प्रमाण वाढत आहे. या संदर्भात शासनाने कडक निर्बंध घातले पाहिजेत. माध्यमामुळे लोकांना महिलांवरील अत्याचाराच्या नवनवीन क्लुप्त्या पुरविण्याचे काम होत आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .......

काही लहान मुली तर म्हातारे व वृध्दांच्या अत्याचाराच्या बळी पडत असल्याचे आपण पाहतो व हे प्रकार खूप वाढलेले आहेत.

माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, समाजात ज्या बचत गटाचे काम करणाऱ्या महिला असतील, कचरा वेचणाऱ्या महिला असतील, महिलांवरील अत्याचार असतील तसेच त्यांच्यासाठी स्वच्छतागृहांची सोय असेल अशा बाबतीत शासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. तशा सूचना महानगर पालिका व नगरपालिका यांना सुध्दा दिल्या पाहिजे. मुंबई महानगर पालिकेचा विचार केला तर राज्य शासनाच्या जवळपास अर्धे बजेट या महापालिकेचे आहे, त्यातून त्यांनी अशी तरतूद केली पाहिजे की, जेणेकरुन या महिलांचे राहणीमान व उत्पन्नाची साधने वाढू शकतील अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

--------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी महिलांच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा सभागृहात उपस्थित केली त्यावर माझे विचार मी व्यक्त करणार आहे.

महोदय, रिपेअर, रिसायकल आणि रिजनरेट म्हणजे एखादी वस्तू तुटली तर तिला दुरुस्त करणे, रिसायकलिंग म्हणजे ज्या वस्तू पुन्हा वापरात आणता येतील आणि रिजनरेट म्हणजे संपूर्ण विध्वंस केल्यानंतर त्यातून काही तरी निर्माण करणे अशा तीन आरच्या आधारे नोबल विजेत्या वांगार मशाई यांनी महिलांच्या संदर्भात एक चळवळ सुरु केली होती. त्या पार्श्वभूमीवर सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी येथे अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. त्यात त्यांनी अनेक विषय घेतले पण मी त्यातील तीन चार मुद्दे सूत्र रुपाने मांडणार आहे. केंद्र शासनाने प्रख्यात समाज सेविका श्रीमती ईलाबेन भट यांच्या अध्यक्षतेखाली एक श्रमशक्ती अहवाल मांडला होता. त्यांच्याकडून संपूर्ण आदिवासी महिला, घरकाम करणाऱ्या स्त्रिया, कचरा वेचणाऱ्या महिला अशा विविध असंघटित क्षेत्रातील महिलांचे लक्ष वेधणारा ऐतिहासिक महिलांचा टप्पा म्हणून या अहवालाकडे पाहिले जाते. नंतर श्रीमती ईलाबेन भट यांना केंद्रशासनाने आणि राजीव गांधी यांनी राज्य सभेवर सदस्य म्हणून नेमले होते. त्या कोणत्याही पक्षाच्या नाहीत परंतु त्यांचे कार्य समोर ठेवून त्यांना राज्यसभेवर घेण्यात आले होते. त्यांनी मांडलेल्या श्रमशक्ती अहवालाची किती राज्यांमध्ये अंमलबजावणी झाली यासंदर्भात महिला व बाल विकास विभागांनी अभ्यास करावा व त्यात अन्य सदस्यांनी कोणत्या सूचना केल्या आहेत त्यावरुन आपल्याला महानगर पालिकांनी किती अंमलबजावणी केली व आणखी काय करायला पाहिजे, त्याबद्दल सूचना करता येतील. खरा प्रश्न कामगार कल्याण विभागाच्या संदर्भात असून त्यात घर काम करणाऱ्या आणि कचरा वेचणाऱ्या स्त्रिया ज्या सेल्फ एम्प्लॉयर असतात, त्यांचा कोणीच मालक नसतो, त्यांच्या संघटना सुध्दा त्यांनी स्वत:च केल्या आहेत.

महोदय, प्रश्न असा आहे की, रमाबाई रानडे आणि पंडिता रमाबाई यांनी काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनात विचारले होते की, आम्हाला खूप सांगावयाचे आहे पण ऐकणारे कोण आहेत काय, हा खरा प्रश्न आहे. आता देखील महिलांच्या संदर्भातील अल्पकालीन चर्चा सुरु असताना सभागृहात तीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. महिलांवरील अत्याचाराची चर्चा ऐकण्यास एकही पुरुष

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .......

उपस्थित नाही, केवळ मंत्री महोदया, ज्या महिलाच आहेत व एक दोन पुरुष सदस्य एवढेच येथे आहेत. गेल्या काही वर्षात महिला व बालकल्याण विभागाचा कारभार महिला सदस्यांकडेच आहे ही गोष्ट स्वागतार्ह आहे. माननीय मंत्री महोदया श्रीमती वर्षाताई यांच्याशी आमचे मतभेद असतीलही पण राजकीय मतभेद वेगळे असतात. तरी देखील बऱ्याच ठिकाणी त्या स्वत: भेट देण्यासाठी आमच्या सोबत येत असतात. कधी आश्रमशाळांना भेट द्यावयाची असते तर वेगवेगळ्या प्रकारे एकत्र काम करण्याचा प्रश्न असतो. या निमित्ताने मी त्यांना विचारु इच्छिते की, या श्रमशक्ती अहवालाची अंमल बजावणी किती प्रमाणात झालेली आहे याचा खुलासा करावा. कारण या अहवालाच्या अनुषंगाने अनेक सामाजिक संस्था, त्यात टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस अशा वेगवेगळ्या सामाजिक संस्थांनी संशोधनही केले आहे. त्यांनी कोणते निष्कर्ष काढले किंवा राज्यात किती व कशी अंमल बजावणी झाली याचा विचार करुन शासन कोणत्या धोरणापर्यंत येऊ शकते याचा विचार शासनाने केला आहे काय, असेही मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे.

त्याचप्रमाणे एखाद्या बदलाच्या संदर्भात बरीच मते येथे मांडण्यात आली. तसेच धोरणांच्या अंमल बजावणीचा मुख्य प्रश्न आहे की यात महिला धोरणाचा विचार करता 7/12 च्या उताऱ्यावर पती व पत्नीचे नाव आले पाहिजे, अशा संदर्भात शासनाने सन 1998 मध्ये जी.आर. सुध्दा काढला आहे. त्यासंदर्भात विभागीय महसूल आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात सूचना दिल्या होत्या की गावागावात दवंडी पिटवून 7/12 च्या उताऱ्यावर पती व पत्नीचे नाव लावण्यात यावे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

गेल्या 10 वर्षात कोणत्याही विभागीय अधिकाऱ्याने यासंदर्भातील आढावा घेतला नसावा असे मला वाटते, त्यामुळे महसूल विभागाने यासंदर्भात आढावा घ्यावा अशी या निमित्ताने मागणी करते.

सभापती महोदय, घर कामगार मोलकरणींची कामगार विभागाने नोंदणी सुरु केली आहे. परंतु ज्यावेळी कुटुंबात अत्याचार होतात त्यावेळेस त्याची नोंदणी कोठे करावयाची, वकील कोणते द्यावयाचे याबाबत काहीही माहिती नसते. बलात्कारीत, पीडीत बाईची नोकरीही गेलेली असते अशा वेळेला तिला वकिली मदत कोण देणार आहे ? महिला बाल विकास कायदा हा सेवा केंद्राशी संबंधित आहे. त्यांच्याकडे यासंदर्भात प्रत्येक विभागाच्या संदर्भात जबाबदारी निश्चित केली पाहिजे. अशी घटना घडली तर राज्य महिला आयोग स्वत:हून त्या ठिकाणी जाऊ शकतो. त्यामुळे राज्य महिला आयोग लवकर निर्माण झाला तर चांगले होईल परंतु तोपर्यंत महिला बाल विकास विभागाने कायदा सेवा घरकाम करणाऱ्या मोलकरणींना उपलब्ध करुन दिली तर हरकत नाही. यासंदर्भात आपण नोडल एनजीओ काढू शकता. प्रत्येक पीडीत स्त्रिला कायदेशीर मदत मिळाली पाहिजे. सरकारी वकील या महिलांना कसे मिळतील हे बघणे जास्त गरजेचे आहे.

धोरणात्मक बदलाच्या संदर्भात मला असे सूचवावयाचे आहे की, बलात्काराच्या संदर्भातील कायदे जेंडर जेस्ट केलेले आहेत. पुरुषांवर सुध्दा अत्याचार होऊ शकतात असे त्यामधून ध्वनीत होत असते. यासंदर्भात केंद्राने निर्णय घेतला आहे परंतु त्याला पार्लमेंटची मान्यता अजून मिळायची आहे. परंतु यासंदर्भात आमची अशी सूचना आहे की, महिला बाल विकास विभागाने तसेच गृह विभागांने दोन्ही सदनाच्या महिला आमदारानां त्यामध्ये घ्यावे तसेच ज्या बांधवाना या बैठकीला यावयाचे असेल त्यांना सर्वांना कळवावे. यासंदर्भात नेमके कोणते मतभेद आहेत ते नोंदविले गेले पाहिजेत. धोरणात्मक मुद्यांवर मतभेद नोंदवले गेले नाही तर केंद्र सरकार ज्या सूचना देईल त्याची अंमलबजावणी सर्व राज्यांना करावी लागेल. म्हणून मला असे वाटते की, ज्या कायद्यांमध्ये बदल अडकलेले आहेत त्यासंदर्भात आढावा घेणे गरजेचे आहे.

युनायटेड ग्लोबल युथ नेटवर्कच्या संदर्भात युनायटेड नेशनने 25 जुलै ते 25 नोव्हेंबर पर्यंत एक कँपेन घेतलेली आहे. त्यांनी नेटवर जगभरातील लोकांनी या दरम्यानच्या काळात केशरी कपडे परिधान करण्याचे आवाहन केले आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

तरुण मुला-मुलींनी महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात संघटित व्हावे यासाठी www.saynotoviolence.org या वेबसाईटवर सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यामध्ये सर्व लोकांना सहभागी करुन घेत असतांना आंतरजातीय विवाह केलेल्या दाम्पत्यांना सरसकट पित्याची जात लावण्याची पुरुष प्रधान संस्कृती आपल्या समाजात स्वीकारली गेली आहे. परंतु दि. 18.1.2012 रोजी सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात निकाल दिला असून त्यांनी आधीच्या वलसम्मा पॉल विरुध्द कोचीन विद्यापीठ हा जो खटला होता त्याला ओव्हर रुल करुन मागासवर्गीय आईच्या पोटी जन्मलेल्या मुलांनी आईच्या जातीच्या संदर्भातील पुरावे दिले तर त्या मुलांना देखील आईची जात लावली जाईल अशा प्रकारचे जजमेंट दिलेले आहे. म्हणून या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने शासनाकडे मागणी करते की, विधी व न्याय विभाग, समाजकल्याण विभाग, महिला बालविकास विभागांनी तसेच या विषयाच्या संदर्भात ज्या ज्या विभागाशी संबंध येतो त्या विभागांनी मिळून महाराष्ट्रात सुध्दा सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार निर्णयाची अमलबजावणी करावी. ज्या मुलांना आपल्या आईची जात लावावयाची असेल त्यासंदर्भातील जे काही अडथळे असतील ते दूर करावेत या बाबीकडे मी शासनाचे लक्ष वेधते.

आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या ): सभापती महोदय, अत्यंत चांगल्या पध्दतीने सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण व सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मांडलेल्या विचारांशी मी सहमत आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राज्य महिला आयोगाचा मुद्दा उपस्थित केला आहे. राज्य महिला आयोगाचे सदस्य आणि चेअरमन नेमण्याचा मुद्दा या सभागृहात अनेक वर्षापासून महिला सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. परंतु राज्य महिला आयोगाच्या स्थापनेच्या संदर्भात शासन गांभीर्याने पाहत नाही. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, राज्य महिला आयोगाचे ताबडतोबीने गठण होईल यासंदर्भात पाऊले उचलावीत अशी मी पुन्हा एकदा सूचना करते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे...

त्याची अंमलबजावणी करणार नसू तर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. त्या दृष्टीने आपण प्रयत्न करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र व गुजरात मध्ये विशेष भूसंपादन कायद्याच्या रेफरन्सला half of the ॲडव्हॅलोरम कोर्ट फी लागते. महाराष्ट्र आणि गुजरात राज्य वगळता कलम 18च्या दाव्याला देशात कुठेही कोर्ट फी लागत नाही. काही वर्षांपूर्वी आपल्या राज्यात लँड ॲक्विझिशन ॲक्टचा रेफरन्स असेल तर महिलांना फी माफ केली जायची. तो कालावधी मला आता सांगता येणार नाही. ज्यावेळी रेफरन्स अलाउ होईल, त्यामध्ये जेवढी अमाऊंट अलाउड् होईल, डिक्री होईल तेवढ्याच अमाऊंटची half of the ॲडव्हॅलोरम कोर्ट फी स्वीकारली जायची. कालांतराने ते बंद झाले. माझी सभागृहाला विनंती आहे की, देशात गुजरात व महाराष्ट्र वगळता सेक्शन 18 च्या ॲप्लीकेशनला कुठेही फी घेतली जात नाही. त्याप्रमाणे शासनाने सर्वांसाठी निर्णय घेतला पाहिजे किंवा महाराष्ट्र शासनाने कमीतकमी महिलांच्या बाबतीत पुन्हा एकदा फेरविचार करावा. तसेच ॲक्सीडंट क्लेममध्ये सुद्धा अनेक वर्षे कोर्ट फी घेतली जात नव्हती. परंतु, आता ती घेतली जाते. यामध्ये देखील महाराष्ट्र शासनाने दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

मोटार अपघात झाल्यानंतर बाई उद्ध्वस्त होतेच. ती बाई आर्थिक दृष्ट्या परावलंबी असते. मी आपल्याला काल परवाचे उदाहरण सांगते. बीड मध्ये एका पित्याने 20 दिवसाच्या मुलीला पाण्याच्या ड्रममध्ये बुडवून मारले. त्याला जामीन मिळू नये यासाठी शासनाने प्रयत्न केला पाहिजे. ती बाई आत उद्ध्वस्त झाली. नवरा जेलमध्ये गेला. मुल वारले. मग त्या बाईला जगवणार कोण ? त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. तिला कायद्याने न्याय मिळाला पाहिजे. तिच्या नवऱ्याला शिक्षा होईल. परंतु, सामाजिक परिस्थितीत तिने जगायचे कसे ? या प्रश्नाचे उत्तर कोण देणार? आपले कायदे असावेत. परंतु, त्याची अंमलबजावणी करीत असताना त्या बाईला किती फायदा होणार आहे ?

मी आता शेवटची विनंती करणार आहे. खरे म्हणजे विशेष उल्लेखाच्या निमित्ताने विनंती केली आहे. त्यातील संदर्भ मी येथे देते. मी मघाशी बोलत असताना महाराष्ट्रामध्ये विशेष भूसंपादन कायद्याच्या कलम 18 च्या रेफरन्समध्ये half of the ॲडव्हॅलोरम कोर्ट फी लागते असे सांगितले आहे. अपील असेल तर ॲडव्हॅलोरम कोर्ट फी लागते. ही फी कोर्ट फीज ॲक्टप्रमाणे घेतली जाते. श्री.अंब्या विरूद्ध महाराष्ट्र राज्य हे प्रकरण सुप्रीम कोर्टामध्ये होते. या प्रकरणातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे...

सुप्रीम कोर्टाचे निकालाचे रिपोर्टस 2011 (6) All MR मध्ये वाचावेत. विशेष भूसंपादन कायद्या खालील जमिनी संपादित होणे, बाजार भावापेक्षा मावेजा कमी प्रमाणात मिळणे, असा त्यात उल्लेख आहे. तसेच शेतकऱ्यांनी कलम 18 खाली पिटीशन फाईल करण्याचा देखील उल्लेख आहे. पिटीशन म्हणजे सिम्पल अर्ज. त्याला कोर्ट फी लावण्याचा संबंधच येत नाही. half of the ॲडव्हॅलोरम कोर्ट फी लावण्याची तरतूद फक्त गुजरात आणि महाराष्ट्रात आहे.

या रूलिंगमध्ये असा उल्लेख आहे की, "In all other states advalorem Court Fees is payable only when an appeal is filed against the award of the reference court seeking higher compensation and not in regard to compensation for reference under section 18 of Land Acquisition Act. That in only Maharashtra and Gujarat the Land Loosers are required to pay half of the advalorem Court Fees while seeking reference to the Civil Court. Most of the Land Loosers are agriculturist, for many of them the only source of livelihood is taken away by acquisition of their lands. The State Government may, therefore, consider giving appropriate relief to the Land Loosers by providing for a nominal fixed court fees on the application for reference instead of advalorem court fees."

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे . . ..

माझी शासनाला विनंती आहे की, अशा प्रकारचा कायदा करावाच आणि त्याला जर विलंब लागणार असेल तर किमान महिलांच्या हद्दीपर्यंत मोटर व्हेईकल ॲक्ट मध्ये तरतूद करावी.

सभापती महोदय, शेवटी मला असे सांगावयाचे आहे की, ज्या कचरा वेचणाऱ्या महिला आहेत, असंघटित कामगार आहेत हा बेरोजगारीतून निर्माण झालेला प्रश्न आहे. पण हा प्रश्न केवळ त्या महिलांचा नाही तर तो आपल्या सगळ्यांचा आहे. आर्थिक दुर्बलतेमधून निर्माण झालेली ही संघटना आहे. असंघटित महिला संघटित होऊन त्या स्वतःच्या हक्कासाठी भांडल्याचे कदाचित महानगरामध्ये झाले असेल, मला माहिती नाही. पण आमच्या एरियामध्ये असे काही होत नाही. पहाटे पाच वाजता घराच्या अंगणामध्ये शिरुन कागद आणि प्लॅस्टीक गोळा करणाऱ्या या महिलांना चोर समजून आपण घराबाहेर हाकलतो एवढे दीनवाणे जीवन त्यांना जगावे लागत आहे. त्यामुळे कामगार विभागाने असंघटित महिला कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत, त्यांच्या आरोग्या साठी काही तरतूद करता येईल काय यादृष्टीने विचार करुन पुढील पाऊल उचलावे अशा प्रकारची नम्रपणे विनंती करते आणि रजा घेते.

----

. . . .4 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी अतिशय महत्वाचा आणि महिलांच्या दृष्टीकोनातून फायद्याची अशी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. या चर्चेच्या माध्यमातून अशी अपेक्षा आहे की, महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळावा.

सभापती महोदय, मुख्य म्हणजे 2000 सालामध्ये महिलांचे सबलीकरण करणे, आर्थिकदृष्ट्या सबल करणे हा महत्वाचा विषय केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे आला. जोपर्यंत महिला आर्थिकदृष्ट्या सबल होणार नाहीत तोपर्यंत तिच्यावर अन्याय होतच रहाणार आणि घरा मधील तिचे दुय्यम स्थान तसेच रहाणार आहे. त्यामुळे तिच्या सबलीकरणाच्या दृष्टीकोनातून 2000 मध्ये बचत गटाची योजना आली आणि आता 2012 वर्ष सुरु आहे.पण या कालावधीमध्ये एकंदर किती बचत गट झालेले आहेत, बचत गटांना अनुदान किती अनुदान दिले आहे, किती कर्ज दिलेले आहे आणि त्या माध्यमातून उद्योग उभे राहिले आहेत काय आणि त्यासाठी जे भाग-भांडवल द्यावयाचे आहे ते दिले आहे काय, याबाबत कधीही आढावा घेतलेला नाही.या कारणामुळे सुरुवातीला ज्या स्फूर्तीने बचत गट उभे राहिले, त्याच गतीने ते संपत आहेत. कारण आपण त्या मध्ये काही त्रुटी ठेवल्या आहेत. केवळ पोषण आहार देऊन बचत गटाचे सबलीकरण करता येईल या मताची मी नाही. कारण पोषण आहारासाठी कर्ज घ्यावे लागते आणि दोन-दोन वर्षे त्याचे पैसे मिळत नाहीत. त्यामुळे व्याजाची परतफेड करण्यामध्येच बचत गट बंद होत आहेत. स्वस्त धान्य दुकानांच्या बाबतीत सांगावयाचे तर जे बेईमानी करतात त्यांचीच दुकाने चालतात. महिलांना स्वस्त धान्य दुकाने चालवित असताना यामध्ये तूट येण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, याबाबतीत मी एक उदाहरण देते. ज्यावेळी आम्ही धान, गहू किंवा तांदूळ आणतो तेव्हा ते वजन काट्यावर मोजून कधी दिले जात नाही. तसेच मूळामध्ये पोत्यामध्येच तीन ते चार किलोची तूट असते आणि याची ॲडजेस्टमेंट करणे महिलांना जमत नाही. म्हणून स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून किंवा कांडप मशिनच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण होईल असे माझे मत नाही. मूळामध्ये सबलीकरणाची व्याख्या अशी आहे की, जर महिलांचा बारा जणांचा गट असेल तर किमान प्रत्येकीच्या संसारासाठी महिन्याला अडीच हजार रुपये मिळाले पाहिजेत. जर महिन्याला अडीच हजार रुपये द्यावयाचे असतील तर बारा मुलींचा जो गट असेल त्यांना कमीत कमी महिन्याला 25 ते 30 हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले पाहिजे पण तेवढे उत्पन्न कुठेच मिळत नाही. म्हणून महिलांना छोटे-छोटे उद्योग उभे करुन द्यावयाचे हा यामागचा मूळ उद्देश होता. यासाठी त्यांना बँकेचे कर्ज द्यावयाचे, अनुदान द्यावयाचे आणि स्वत:च्या पायावर उभे करावयाचे.....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

मात्र आपण यासाठी कर्जाची रक्कम अडीच लाख रुपये एवढी ठरविण्यात आली. आज अडीच लाख रुपयामध्ये फुटाण्याचे दुकानही काढता येणार नाही. म्हणून ही मर्यादा 25 लाखापर्यंत वाढविली पाहिजे हा सबलीकरणाचा मूळ उद्देश आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे लघु उद्योग कसे निवडावेत याचेही महिलांना ट्रेनिंग दिले पाहिजे आणि आपण त्यांना लघु उद्योग निवडण्याच्या बाबतीत सूचना दिल्या पाहिजेत जेणेकरुन त्यांना मोठ्या प्रमाणात मार्केट उपलब्ध होईल. तसेच लोकांची गरज काय आहे, त्यांना कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याप्रमाणे आपण जर उद्योग उभे करु शकलो तर त्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो.

सभापती महोदय, आपण मोठ्या उद्योजकांना, छोट्या उद्योजकांना शासकीय जमिनी मोठ्या प्रमाणात देतो. परंतु जर महिलांच्या बचत गटाने शासकीय जमिनीची मागणी केली तर कानावर हात ठेऊन त्यांना नकार दिला जातो.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

म्हणून माझी अशी विनंती आहे की, महिलांना जर खऱ्या अर्थाने मानसिकदृष्ट्या सबल करावयाचे असेल तर शासनाकडे ज्या महसुली जागा आहेत त्या त्यांना लीजवर दिल्या पाहिजेत. आपण लीजचे पैसे घ्यावेत. पण त्यांना लीजवर जमिनी मिळवून द्याव्यात. बँकेकडून कर्ज देत असताना 10 ते 25 लाख रुपयांचे कर्ज नाही पण आज आपण जे कर्ज देतो त्यामध्ये बीपीएलखालच्या बचत गटांना 35 टक्के अनुदान देतो. बीपीएलच्या उत्पन्नाची मर्यादा 21 हजार रुपये आहे. पण 21 हजार रुपयांवर एक रुपया जरी उत्पन्न वाढले तरी ती एपीएलमध्ये जाते. एपीएलच्या बचत गटाला आपण कोणत्याही पध्दतीची आर्थिक मदत किंवा अनुदान देत नाही. 21 हजार रुपयांच्या वर उत्पन्न असले तरी प्रत्यक्षात ती महिला बीपीएलमध्येच असते.

माझे असे स्पष्ट मत आहे की, कोणत्याही घरातील स्त्री असली तरी ती तशीही आयुष्यभर बीपीएलमध्येच असते. कारण तिचे स्वत:चे उत्पन्नच नसते. नवऱ्याच्या उत्पन्नामध्ये तिचा हक्क आहे असे जरी आपण म्हटले तरी प्रत्यक्षात ते तिचे स्वत:चे उत्पन्न म्हणून गृहीत धरले जात नाही. त्यामुळे महिला आयुष्यभर बीपीएलखालीच असतात आणि गुलाम म्हणून दुसऱ्यांच्या हाताखाली काम करीत असतात किंवा घरात तिला नंबर दोनचे स्थान असते. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही पण बीपीएचे एपीएल झाले तरी आपण लघु उद्योजकांना 30 टक्के अनुदान देतो. छोटे उद्योग उभे झाल्यानंतर आपण त्यांना कर्जावर 30 टक्के अनुदान देतो. जे 30 टक्के अनुदान आपण लघु उद्योजकांना देऊ शकतो त्याप्रमाणे एपीएलच्या उद्योजकांना आपण 30 टक्के अनुदान का देऊ शकत नाही ? एपीएलच्याही उद्योजकांना, महिला बचत गटांना आपण अनुदान दिले पाहिजे. 35 टक्के जरी नाही तरी किमान ज्याप्रमाणे लघु उद्योजकांना देतो त्याप्रमाणे 30 टक्के अनुदान दिले पाहिजे जेणेकरुन त्यांना सक्षम होता येईल. या पध्दतीने शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, तिसरी अतिशय महत्वाची बाब अशी आहे की, बचत गटांच्या वस्तू खरेदीच्या बाबतीत मला आठवते की, माननीय श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांनी माझ्या एका प्रश्नाच्या उत्तरात असे सांगितले होते की, बचत गटाच्या 50 टक्के वस्तू जिल्हा परिषदा आणि शासन खरेदी करील. परंतु अशा प्रकारचा जी.आर. कोठेही आलेला नाही. मागणी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

करुनही जी.आर. मिळालेला नाही. बचट गटांच्या जर 50 टक्के वस्तू आपण घेतल्या तर उरलेल्या 50 टक्के वस्तू कोठेही मार्केटमध्ये त्या विकू शकतील. त्यांच्या किमान 50 टक्के वस्तू विकल्या जातील याची त्यांना खात्री असते. त्या पध्दतीने त्यांचे सक्षमीकरण होऊ शकते आणि महिला स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकतात.

सभापती महोदय, मी आधीच सांगितले की, महिला थोड्या कमजोर वृत्तीच्या असतात. त्यांना आपण थोडा जरी आधार दिला, त्याच्या पायात थोडे जरी बळ दिले तरी त्या स्वतंत्रपणे उद्योग करु शकतील आणि आज आपण मोठ्या प्रमाणावर उद्योग उभे करु शकू. या ठिकाणी श्रीमंतांचे उद्योग उभे राहतात पण गरिबांचे उद्योग उभे राहात नाहीत. आपण बीपीएलचे, एपीएलचे मोठ्या प्रमाणावर बचत गट काढले. माझ्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये 40 हजार बचत गट आहेत. परंतु आज सक्षमतेने चालू आहेत असे त्यातील 10 टक्के सुध्दा बचत गट नाहीत. त्यांनी आपापल्या मताने उद्योग काढले. माझे असे म्हणणे आहे की, त्यांना आपल्या मतानुसार उद्योग काढू देऊ नका. त्यांना आपण सांगितले पाहिजे की, या एरियामध्ये हा उद्योग होऊ शकतो आणि यावर आधारित उद्योग जर आपण उभा केला तर तुम्हाला त्याचा फायदा होऊ शकतो. खऱ्या अर्थाने जर महिलांना सक्षम करावयाचे असेल, त्यांना स्वत:च्या पायावर उभे करावयाचे असेल, त्यांच्यातील हिंमत वाढवावयाची असेल, त्यांच्यातील शौर्य वाढवावयाचे असेल तर आर्थिक मदत अतिशय महत्वाची आहे. ती आर्थिक मदत अशा पध्दतीची नव्हे तर स्वत:च्या बळावर उभे राहून केली पाहिजे या दृष्टीकोनातून शासनाने बचत गटाला विशेष महत्व दिले पाहिजे अशी मागणी करुन मी माझे भाषण संपविते.

----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ( महिला व बाल विकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी या ठिकाणी ही अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. या अल्पकालीन चर्चेमध्ये सहभागी होत असताना सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी खूप मौलिक सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, आज जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यामध्ये पुष्कळ विभागांचा समावेश केलेला आहे. घरेलू कामगार किंवा कचरा वेचणाऱ्या असंघटित कामगारांचा प्रश्न हा कामगार विभागाशी संबंधित आहे. त्यांनी महिलांवरील अत्याचाराचा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो गृह विभागाशी संबंधित आहे. शाळांच्या संदर्भामध्ये स्वच्छता गृहांच्या बाबतीत जो उल्लेख केलेला आहे तो विषय शालेय शिक्षण विभागाशी संबंधित आहे. या व्यतिरिक्त महिला बचत गट आणि महिला सक्षमीकरणाच्या ज्या बाबी आहेत त्या महिला व बाल विकास विभागाशी संबधित आहेत. या सर्व मुद्यांची या ठिकाणी चर्चा झाली.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी भाषण करताना असंघटित कामगारांचे जे मोठ्या प्रमाणावर प्रश्न आहेत ते मांडले. महिला म्हणून त्यांचे प्रश्न मांडत असताना त्यांनी अत्यंत आत्मियतेने ते प्रश्न मांडले. मी सुध्दा महिला आहे त्यामुळे ती आत्मियता मी समजू शकते. कचरा गोळा करणाऱ्या महिला असतील, घरकाम करणाऱ्या महिला असतील किंवा विटभट्टीवर काम करणाऱ्या महिला असतील त्यांच्या दृष्टीकोनातून शासनाने प्रथमत: निर्णय घेऊन सन 2000 च्या अधिनियमान्वये महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ निर्माण केले. त्या अधिनियमाच्या कलम 5 मधील तरतुदीनुसार पाहिले तर राज्यातील जे घरेलू कामगार आहेत त्यांच्यासाठी अपघाताकरिता तत्काळ मदत देणे, लाभार्थ्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता आर्थिक मदत देणे, महिला लाभार्थ्यांना प्रसुती संबंधी वैद्यकीय मदत देणे, मुलांकरिता शैक्षणिक मदतीची योजना राबविणे,

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

या व्यतिरिक्त राष्ट्रीय सुरक्षा योजना असेल, जननी सुरक्षा विमा योजना असेल अशा प्रकारच्या योजना कामगार विभागामार्फत राबविल्या जात आहेत. या कायद्यातील कलम 3 अनुसार महाराष्ट्र घरेलु कामगाराच्या मंडळाची अधिसूचना दिनांक 12.8.2000 प्रसिध्द केलेली आहे. घरेलु कामगारांचे प्रतिनिधी व मालकांचे प्रतिनिधी मिळून हे मंडळ स्थापन केलेले आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी या मंडळाची नोंदणी झाली आहे का असे विचारले होते. या मंडळामध्ये 18 वर्षावरील व 60 वर्षाखालील महिलांनी नोंदणी केलेली आहे. दिनांक 21 जुलै, 2000 पर्यंत राज्यातील एकूण नोंदणी केलेल्या घर कामगारांची संख्या 1 लाख 16 हजार 975 इतकी आहे. या व्यतिरिक्त घरेलू कामगार कल्याण मंडळामार्फत नोंदणीकृत घरेलु कामगारांसाठी एलआयसीच्या माध्यमातून जननी सुरक्षा योजना लागू केलेली आहे. त्या योजनेसाठी प्रती लाभार्थ्यासाठी 50 रुपये शासनाचा हिस्सा दिला जात आहे. त्यानुसार शासनाने 16 लाख 54 हजार रुपयांचा हप्ता दिलेला आहे. या व्यतिरिक्त मृत नोंदणी कामगारांच्या वारसाला अंत्यविधीसाठी सुध्दा सहाय्य केले जाते. आवास योजनेचा फायदा दिला जातो. वृध्दापकालीन निवास योजनेचा फायदा दिला जातो. हे सर्व फायदा या कामगारांना दिले जात आहेत.

सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, मी सुध्दा मुंबई शहरातील लोकप्रतिनिधी आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी मुंबई महानगरपालिकेच्या बजेटमध्ये तरतूद केली जाते त्याचा वापर केला जात नाही असे सांगितले.मुंबई महानगरपालिका, अन्य महानगरपालिका किंवा नगरपालिका असेल तेथे महिला व बालविकास विभागासाठी 5 टक्के निधी राखून ठेवला जातो. तो त्यांनी तेथील महिलांच्या विकासासाठी खर्च केला पाहिजे अशा प्रकारच्या सूचना वारंवार केल्या जातात. पाळणा घर असतील किंवा अन्य योजना असतील त्या राबविल्या पाहिजेत.मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना विनंती करते की, मुंबई महानगरपालिकेमध्ये महिला व बालविकास समितीच्या सभापतींना 5 टक्के निधी खर्च करण्यास सांगावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : मी या संदर्भात सकारात्मक प्रतिक्रिया देऊ इच्छिते. मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांच्यासोबत एक बैठक आयोजित करावी. मी स्वत: याबाबत महापौरांशी बोलते. पण आपण महापौरांबरोबर एक बैठक आयोजित करावी. मुंबई महानगरपालिकेमध्ये कृती आराखडा तयार करण्यासाठी मंत्री महोदयांना माझे पूर्ण सहकार्य राहील.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती विद्याताई चव्हाण : मी सुध्दा महानगरपालिकेमध्ये नगरसेविका म्हणून काम केलेले आहे. तेथे महिला व बालविकास समिती आहे. मंत्री महोदया 5 टक्के निधीचा उल्लेख करीत आहेत. परंतु तेथे तर काहीच रक्कम या विभागासाठी खर्च केली जात नाही. 26 हजार कोटी रुपयांचे महानगरपालिकेचे बजेट आहे. त्याच्या 5 टक्के रक्कम गृहित धरली तर ती कोट्यवधी होऊ शकेल.

प्रा.वर्षा गायकवाड : माझी नगरविकास विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा झालेली आहे. 5 टक्के तरतुदीला संविधानिक अधिकार दिला गेला पाहिजे असे मी त्यांना सांगितले आहे. त्यांनी तशा प्रकारचे विधेयक आणून या निधीला संविधानिक अधिकार दिला जाईल असे मला सांगितले आहे. महानगरपालिकेने महिला व बालविकास विभागासाठी 5 टक्के निधी राखून ठेवला पाहिजे आणि ही त्यांची जबाबदारी आहे. जेणे करुन महिलांच्या उत्कर्षाचे किंवा अन्य प्रश्न मार्गी लागू शकतील. घरेलू कामगारांचे किंवा कचरा वेचणाऱ्या महिलांचे प्रश्न नगरविकास विभागाच्या खात्याशी संबंधित आहेत असे सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण सांगत होत्या. मी त्यासंबंधी बैठक आयोजित करीन. मी राजकीय भाषण करीत नाही, महिला सामाजिक विचार व्यक्त करीत असतात. महानगरपालिकेमध्ये फक्त नालेसफाईसाठी मोठ्या प्रमाणात तरतूद केली जाते. परंतु अशा महत्वाच्या विषयासंबंधी मी बैठक आयोजित करीन.

या ठिकाणी कामाच्या ठिकाणी महिलांवर लैंगिक अत्याचार होतात त्यासंबंधी चर्चा झाली आहे. सार्वजनिक जीवनात, खाजगी क्षेत्रात, शासकीय विभागात काम करणाऱ्या महिलांसंबंधी शासनाने एक पाऊल उचलले आहे. या क्षेत्रातील महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी कामगार आयुक्तांना नोडल ऑफिसर म्हणून नेमलेले आहे. शासकीय व निमशासकीय स्तरावर समित्या स्थापन होत असताना खाजगी क्षेत्रातही समित्या स्थापन झाल्या पाहिजेत. महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन झाले पाहिजेत. त्यामध्ये अध्यक्ष महिला असते, 50 टक्के सदस्य महिला असतात. त्या कक्षासमोर महिला आपले प्रश्न मांडू शकतात. या संदर्भात माननीय कामगार मंत्र्यांबरोबर एक बैठक झालेली आहे. त्या अनुषंगाने शासनाने एक जी.आर.निर्गमित केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:40

प्रा. वर्षा गायकवाड....

कामगार विभागाच्या माध्यमातून विविध अधिसूचना काढण्यात आलेल्या आहेत. शासन अधिसूचना 29 सप्टेंबर 1998 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम, 1979च्या नियम 22 प्रमाणे लैंगिक छळवणूक हे गैरवर्तन मानण्यात आले आहे. अशा प्रकारे विविध कायदे करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र बीडी व सिगार कामगार अधिनियम 1968, महाराष्ट्र कंत्राटी कामगार अधिनियम 1971 असे अनेक कायदे केलेले आहेत. खाजगी क्षेत्रातील तक्रारीसंबंधी कामगार आयुक्तांनी करावयाच्या कारवाई संबंधात महिला व बाल विकास विभागाने 2 मे 2012 रोजी कायदा केलेला आहे. आज शहरीभाग झपाटयाने वाढत आहे. नागरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. पुष्कळशा मुली आज कॉल सेंटरमध्ये, खाजगी क्षेत्रामध्ये काम करतात, बॅंक ऑफिसमध्ये काम करतात, मॉलमध्ये काम करतात. अशा मुलींच्या दृष्टीकोनातून आम्ही एक जी.आर. काढलेला आहे. जेथे औद्योगिक आणि वाणिज्य क्षेत्रात काम करणा-या असंघटित महिला कामगार असतील अशा ठिकाणी महिला रक्षण कक्ष निर्माण झाले पाहिजेत आणि तसे फलकसुध्दा लावले गेले पाहिजेत अशा सूचना जी.आर.च्या माध्यमातून केलेल्या आहेत.

सभापती महोदय, महिलांच्या दृष्टीकोनातून आणखी एक महत्वाचा प्रश्न या ठिकाणी मांडण्यात आला तो म्हणजे महिला प्रवास करीत असताना, कुठे जात असताना त्यांची प्रसाधनगृहाच्या संदर्भात मोठी अडचण निर्माण होते. महिलांसाठी ठिकठिकाणी रेस्ट रुम असणे आवश्यक आहे. आमच्या विभागाने जी.आर.च्या माध्यमातून अशा सूचना दिलेल्या आहेत की, ज्या ठिकाणी 50 टक्के महिला असतील तेथे रेस्टरुम असली पाहिजे. तसेच पाळणाघराची देखील व्यवस्था केली पाहिजे. हे महिलांचे मूलभूत प्रश्न असून ते आपण सोडविले पाहिजेत.

सभापती महोदय, या ठिकाणी साधारणपणे तीन विषयाच्या संदर्भात चर्चा झाली. एक म्हणजे बचत गट, दुसरी चर्चा शौचालय आणि तिसरी चर्चा ही महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी विविधस्तरावर बैठका आयोजित करुन समन्वय साधण्यासंबंधी झाली. शौचालयाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, आज आपल्या राज्यामध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक, शासकीय आणि खाजगी अशा एकूण 97787 शाळा आहेत. त्यापैकी 95426 म्हणजे 98 टक्के शाळांमध्ये कॉमन टायलेट आहे. त्यामध्ये 2361 म्हणजे 2 टक्के शाळांमध्ये ही सुविधा उपलब्ध नाही. 95426 शाळांपैकी

..2..

प्रा. वर्षा गायकवाड....

94584 शाळामध्ये म्हणजे 97 टक्के शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत. उर्वरित 3203 शाळांमध्ये स्वतंत्र स्वच्छतागृहे नाहीत. परंतु कॉमन टॉयलेट तेथे आहेत. फक्त 2361 शाळांमध्ये स्वच्छतागृहे नाहीत. मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे सर्व ठिकाणी असणे आवश्यक आहे. तशी ती नाहीत ही चिंतेची बाब आहे. सर्वशिक्षा अभियानांतर्गत 2012-2013 या शैक्षणिक वर्षात मुलींसाठी एकूण 2028 स्वतंत्र स्वच्छतागृहे व मुलांसाठी 1202 स्वच्छतागृहे मंजूर करण्यात आलेली आहे. या स्वच्छतागृहाचे काम या वर्षभरामध्ये सुरु होईल. स्वच्छतागृहांच्या देखभाल दुरुस्तीसाठी 5 हजार रु. दिले जातात असे जून 2011च्या पत्रान्वये शालेय शिक्षण विभागाने कळविले आहे.

सन्माननीय सदस्यांनी हायवेवर महिलांसाठी स्वच्छतागृहे असावीत असे सांगितले. या संदर्भात मी माननीय बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांच्या बरोबर एक बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये मुंबई महानगपालिकेच्या हद्दीमध्ये, रेल्वेच्या हद्दीमध्ये आणि हायवेवर महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था असावी यासंबंधी चर्चा झाली. त्या बैठकीमध्ये अशीही चर्चा झाली की, ज्या ठिकाणी टोल घेण्यात येतो त्या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करता येईल. कारण त्या ठिकाणी शौचालयाची चांगली देखभाल होऊ शकेल.परंतु हायवेवर मध्येच कुठे तरी ही व्यवस्था केली तर त्याच्या देखभालीचा प्रश्न निर्माण होईल. गैरप्रकार देखील तिथे होतील. तेव्हा जेथे टोलची व्यवस्था असेल किंवा जेथे हॉटेलची व्यवस्था असेल तेथे शौचालयाची व्यवस्था करण्यासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी असे ठरविण्यात आले की, मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी हे एकत्र व्हिजिट करतील.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड..

त्या भेटीच्या माध्यमातून मुंबई शहरात कोणत्या ठिकाणी शौचालये बांधण्यात येतील हे पाहिले जाईल. त्या व्यतिरिक्त रेल्वेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात येईल. प्रत्येक रेल्वे स्टेशनमधील शौचालये स्वच्छ असली पाहिजेत असे त्यांना कळविण्यात येईल.

सभापती महोदय, या ठिकाणी राज महिला आयोगा संबंधीचा मुद्दा मांडण्यात आला. राज महिला आयोग लवकरात लवकर स्थापन करावा अशी महिला व बाल विकास विभागाची सुध्दा इच्छा आहे. या ठिकाणी महिला सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 15 दिवसांत या आयोगाची स्थापना झाली पाहिजे. हा आयोग लवकरात लवकर कसा स्थापन करण्यात येईल यासाठी आपण सर्व महिला सदस्य एकत्र येऊन त्यासाठी प्रयत्न करु या.

सभापती महोदय, या ठिकाणी महिला सदस्यांनी श्रमशांती अहवाल कामगार विभागाकडून मागवून घ्यावा असे सांगितले. आपण सांगितल्याप्रमाणे कामगार विभागाकडून तो अहवाल मागविण्यात येईल. त्या अहवालाची योग्य अंमलबजावणी होते किंवा कसे याची देखील माहिती घेण्यात येईल.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याने सर्व प्रथम महिला धोरण राबविले. सन 1994 मध्ये आपल्या राज्याने पहिले महिला धोरण आणले. दुसरे महिला धोरण 2001 मध्ये आणले. आता आपण तिसरे धोरण काढण्याच्या विचारात आहोत. त्यामध्ये महिलांविषयक कायदे व योजनांची अंमजबजावणी याचा आपण अभ्यास करणार आहोत. आपल्याकडे दोन धोरण झालेली आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळाने एक धोरण केले आहे. तर दुसरे धोरण माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी तयार केलेले आहे. दिनांक 12 जुलै 2012 च्या शासन निर्णयानुसार या दोन्ही धोरणांचे प्रारुप तपासण्यासाठी एक समिती नेमलेली आहे. या समितीचे अध्यक्ष महिला व बाल विकास विभागाचे मंत्री असतील. शिवाय विधानसभा आणि विधानपरिषदेचे सदस्य तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांचा या समितीमध्ये समावेश आहे. या समितीमध्ये महिलांसाठीचे तिसरे धोरण कशा पध्दतीने तयार करावे याचा विचार करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड..

सभापती महोदय, या ठिकाणी आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्याच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला. आपल्याकडे पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे आंतरजातीय विवाह झाल्यानंतर मुलास किंवा मुलीस वडिलांचे नाव जोडले जाते. आता आपण आईचे नाव लावण्यास सुरुवात केली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आता माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्याला मुलाला किंवा मुलीला आईची जात लावता येईल. तसेच त्यांनी लॉ कमिशन बाबत उल्लेख केला. त्या बाबत सांगू इच्छिते की, कायद्याच्या संदर्भातील ज्या ज्या गोष्टी आहेत त्या बाबत विधी व न्याय विभागाचे अधिकारी, महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी तसेच दोन्ही सभागृहातील महिला प्रतिनिधी एकत्रित बसून या दोन्ही विषयांबाबत चर्चा करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याशी माझी चर्चा झाली होती. त्यांनी मला सांगितले की, "आपण महिलांसाठी कायदे केले, परंतु आता कायद्याचे स्वरुप बदलले पाहिजे. कारण आता काळ बदलत चालला आहे. तेव्हा प्रत्येक कायद्यामध्ये कोणता बदल केला पाहिजे हे पाहिले पाहिजे." आपण कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा केला. महिलांच्या संदर्भात असलेल्या कायद्याच्या संदर्भात कोणते बदल केले पाहिजेत त्यासाठी आपण सर्व महिला प्रतिनिधी एकत्र बसून त्यावर चर्चा करु.

सभापती महोदय, या ठिकाणी महिला आर्थिक विकास महामंडळाबाबत चर्चा झाली. महिलांनी एकत्र यावे, त्यांच्यात आत्मविश्वास वाढावा, कौशल्य वाढावे आणि त्यांना बचतीची सवय लागावी अशी बचत गटामागील संकल्पना होती. बचत गटाच्या माध्यातून हजारो महिला एकत्र आल्या आणि त्यांना वाटू लागले की, आपण व्यवसाय करु शकतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या संदर्भातील माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे काय ? माझ्याकडे महिला आर्थिक विकास महामंडळाची माहिती आहे. आतापर्यंत 12 हजार 243 गावांमध्ये 62 हजार 474 बचट गटांची स्थापना झालेली आहे. बचत गटाच्या माध्यमातून 8 लाख 64 हजार 258 महिला सहभागी आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड..

त्याशिवाय आपण प्रत्येक तालुक्याला सीएमआरसी सेंटर सुरु करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 33 जिल्ह्यांमध्ये 315 सीएमआरसी सेंटर्स आहेत. सहा विभागीय पातळीवर बीडीएस सेंटर्स काढलेली आहेत. काही ठिकाणी बीडीएसचे काम खूप चांगल्या प्रकारे सुरु आहे. कोकणसारख्या ठिकाणी बीडीएसच्या माध्यमातून खूप चांगले काम झालेले आहे.

सभापती महोदय, आता आपणास मार्केटींगवर जास्त भर दिला पाहिजे. आपणास क्वॉलिटीवर लक्ष दिले पाहिजे. लेबरवर लक्ष दिले पाहिजे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपणास पॅकींगवर लक्ष दिले पाहिजे. आपल्या महिला खूप चांगल्या प्रकारचा माल बनवितात. परंतु या मालाचे मार्केटींग करणे खूप महत्वाचे आहे. तेव्हा मार्केटींगचे प्रशिक्षण देण्याचे काम विभागाच्या माध्यमातून सुरु आहे. सन 2007 च्या कार्यक्रमांतर्गत एकूण 47हजार 694 महिला बचत गटांना सुमोर 402 कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे. सन 2008 पासून चार टक्के व्याज दराने एकूण 29 हजार 700 बचत गटांना एकूण 122 कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे. त्यापैकी 20 हजार 716 बचत गटांना 2 कोटी 56 लाख रुपये इतका परतावा दिलेला आहे. सन 2011-2012 मध्ये बचत गटांच्या अंतर्गत 89 कोटी 54 लाख इतके कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यापैकी चार टक्के व्याजाने 10 हजार 522 बचत गटांना 47 कोटी रुपये कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छिते की, आपण जी अपेक्षा व्यक्त केली आहे, ती रास्त असून तुमच्या मताशी मी सहमत आहे. आपण या ठिकाणी सांगितले की, बचत गटांना अनुदान मिळत नाही. 2.50 लाख रुपयांचे अनुदान आहे, ते 10 ते 15 लाख रुपयां पर्यंत केले पाहिजे. 50 टक्के वस्तू खरेदी संबंधीचा शासनाने निर्णय घ्यावा, तो निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्या संबंधी शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. आपणास त्या निर्णयाची प्रत हवी असेल तर ती आपणास पाठवून देते. माझे सुध्दा असे म्हणणे आहे की, ही एक चळवळ आहे. ही चळवळ जीवंत ठेवावयाची असेल तर महिलांच्या हातांना काम मिळाले पाहिजे. महिलांना असे काम मिळाले पाहिजे की, त्यांना त्यांचे कुटुंब चालविणे शक्य झाले पाहिजे.

महोदय, अल्पसंख्याक विभागाने 1200 महिलांचे बचत गट निर्माण केलेले आहेत. विविध विभागाच्या माध्यमातून बचत गटांसाठी प्रशिक्षण असेल, प्रोत्साहन असेल ते मोठया प्रमाणात सुरु झाले पाहिजेत. काही ठिकाणी प्रांगण घरे सुरु केलेली आहेत. महिलांना प्रशिक्षण देणे, त्यांना मार्केटींग शिकविणे अशी प्रांगण घरांची संकल्पना आहे. गडचिरोली येथे प्रांगण घर आहे. हिंगोली येथे एक प्रांगण घर आहे. जिल्हा स्तरावर अशा प्रकारची प्रांगण घरे झाली पाहिजेत. स्थानिक उत्पादनाचा महिलांनी जास्तीत जास्त उपयोग करावा. या संदर्भात कोकणामध्ये खूप चांगले काम केलेले आहे. आंबा फळापासून विविध पदार्थ तयार केले आहेत. फणस, सुका मेवा यापासून विविध पदार्थ तयार करण्याचे काम या माध्यमातून होते,त्यांचे पॅकींगचे काम सुध्दा सुधारलेले आहे. आपणाला ही सर्व कामे करावयाची आहेत. त्यासाठी तुमच्या मार्गदर्शनाची आणि सहकार्याची गरज आहे. महिलांचे जे प्रश्न आहेत ते प्रश्न आपणा सर्वांना सोडवावयाचे आहेत. महिलांना 50 टक्के आरक्षण दिल्यामुळे महिलांना बराचसा दिलासा मिळाला आहे. जो पर्यंत महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळत नाही. तो पर्यंत सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्टीकोनातून महिलांचे प्रश्न सुटणार नाहीत. मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, या संदर्भात एक बैठक आयोजित करण्यात येईल आणि त्या बैठकीत या सर्व विषयांची चर्चा करु एवढे मी या निमित्ताने सांगते आणि माझे मनोगत पूर्ण करते.धन्यवाद.

------ 2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : अल्पकालीन चर्चा संपलेली आहे. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, बुधवार, दिनांक 25 जुलै, 2012 रोजी दुपारी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 07 वाजून 53 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 25 जुलै, 2012 रोजीच्या दुपारी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही